


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

✦ अमरावती, रविवार ६ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०+४




# मुंबईत सात वर्षाच्या मुलाचा मृत्यू 32 गोविंदा जखमी



**मुंबई/प्रतिनिधी :** संपूर्ण महाराष्ट्रात आज दहीहंडीचा उत्सव साजरा केला जात असून मानवी मनो-याचा थरार अनुभवण्यासाठी नागरिक सज्ज झाले आहेत. गोपाळकाळाच्या निमित्ताने शहरातील विविध मानाच्या दहीहंड्यांचे आयोजन करण्यात आले असून, लाखो रुपयांची बक्षिसे, विश्वविक्रमाचे आव्हान आणि कलाकारांच्या उपस्थितीमुळे यंदाचा दहीहंडी उत्सव रंगतदार झाला. ठिकाणी गोविंदा जखमी होण्याच्या घटना घडल्या आहेत. मुंबईत दहीहंडीच्या उत्सवाला गालबोट लागले असून शनिवारी दुपारी एका इमारतीचा खांब कोसळून सात वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला. तर शहरात एकूण ३२ गोविंदा विविध घटनांमध्ये जखमी झाले. मुंबई मनपाने दिलेल्या माहितीनुसार, दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास मालाड मालवणी येथील एकता वेल्फेअर सोसायटीमध्ये सदर घटना घडली.

## पिंपरी चिंचवडमध्ये 45 वर्षीय महिलेचा दुर्दैवी अंत

पिंपरी-चिंचवडमध्ये दहीहंडीच्या स्टेजची कमान उतरवताना लोखंडी अँगल अंगावर पडल्याने सलमा पठाण या ४५ वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेचा व्हिडीओ समोर आला आहे. ही घटना शुक्रवारी रात्री पावणे अकराच्या सुमारास पिंपरी-चिंचवड मधील जुनी सांगवी येथे घडली. सलमा पठाण (वय ४५) असे मृत्यू झालेल्या महिलेचे नाव आहे.मुंबई महानगरपालिकेने दिलेल्या माहितीनुसार, दहीहंडी उत्सवादरम्यान मुंबईत ११८ लोक जखमी झाले आहेत. ५ जणांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करून घेण्यात आले आहे. तर ८० लोकांवर उपचार सुरू आहेत. ३३ लोकांना प्राथमिक उपचारानंतर घरी सोडण्यात आले आहेत.

दहीहंडी उत्सवातील साहसी खेळ आणि गोविंदा पथकांमधील चुरस हे दरवर्षीचे आकर्षण असते. यंदा त्याला विक्रमाची जोड मिळाली आहे. विविध मंडळांनी उंच थर रचणा-या गोविंदा पथकांसाठी बंपर बक्षिसांची घोषणा केली आहे. त्याचबरोबर हिंदी-मराठी चित्रपटसृष्टीतील अभिनेते, अभिनेत्री, गायक आणि लावणी कलाकारांच्या उपस्थितीमुळे दहीहंडीच्या ठिकाणी मनोरंजनाचीही मेजवानी मिळणार आहे.पुण्यात विद्यानंद बापट यांनी डीजे, लाउडस्पीकर विरोधात सुरू केलेल्या चळवळीचा या उत्सवावर काय परिणाम होतो, हे आज दिवसभरातील घडामोडींमधून जाणून घेउ. तसेच काही

# ...तर भारतीय सैन्य घरात घुसून प्रहार करते

## पंतप्रधानांचा दहशतवादावरून पाकला मोठा इशारा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी दिल्लीतील श्री राम कॉलेज ऑफ कामर्सच्या (एसआरसीसी) शताब्दी महोत्सवाला हजेरी लावली. एसआरसीसीच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या ऐतिहासिक टप्प्यावर विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. राष्ट्रीय शिक्षक दिनाचं औचित्य साधून आयोजित या शताब्दी महोत्सवाला पंतप्रधान मोदी मुख्य अतिथी म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील विविध मुद्यांवर भाष्य केलं आहे. जीडीपीवरून सरकारवर होणा-या टीका, दहशतवादाचा मुद्दा, माओवादी, नक्षलवादी, दहशतवाद अशा विविध मुद्यांवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भाष्य केलं आहे. याच कार्यक्रमात बोलताना पंतप्रधान मोदी यांनी दहशतवादावरून पाकिस्तानला पुन्हा एकदा अप्रत्यक्ष मोठा इशारा दिला आहे. पाकिस्तानने जर काही कुरापती



केल्या, तर भारतीय सैन्य घरात घुसून प्रहार करतं, असं मोठं वक्तव्य पंतप्रधान मोदी यांनी या कार्यक्रमात बोलताना केलं आहे. या संदर्भातील वृत्त एएनआयने दिलं आहे. दहशतवादाला प्रत्युत्तर देण्यासाठी आज भारत सक्षम आहे. दहशतवाद पसरवणारे सध्या बॅकफूटवर आहेत. मात्र, पाकिस्तानने जर काही नापाक कृत्य केलं, तर भारतीय सैन्य घरात घुसून प्रहार करतं. जम्मू-काश्मीरपासून ईशान्य भारतापर्यंत सध्या शांतता वाढली आहे. माओवादी, दहशतवाद आणि नक्षलवादाची कंबर मोडली गेली आहे. एकेकाळी भारताच्या धोरणात्मक पद्धतीबद्दल चिंता व्यक्तकरणारे जग आज भारताच्या धोरणात्मक गतिमानतेबद्दल चर्चा करत आहे, असं मोदी यांनी म्हटलं आहे.

**१३ वर्षांनंतर महाविद्यालयात परतले-** पंतप्रधान मोदी तब्बल १३ वर्षांनंतर एसआरसीसीमध्ये पुन्हा आले आहेत. यापूर्वी २०१३ मध्ये गुजरातचे मुख्यमंत्री असताना त्यांनी या महाविद्यालयाला भेट दिली होती. तत्पूर्वी शताब्दी वर्षाच्या सुरु वातीला म्हणजेच यंदा एप्रिल महिन्यात महाविद्यालयाच्या नियामक मंडळाने पंतप्रधानांची त्यांच्या निवासस्थानी भेट घेतली होती. त्यावेळी पंतप्रधानांच्या हस्ते एसआरसीसीच्या १०० वर्षांच्या प्रवासाची नोंद घेणा-या एका विशेष टपाल तिकिटाचं अनावरण करण्यात आलं होतं.



## पंतप्रधान मोदींचा दिल्ली मेट्रोतून प्रवास

दिल्लीतील श्री राम कॉलेज ऑफ कॉमर्सच्या (एसआरसीसी) शताब्दी महोत्सवाला उपस्थित राहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी दिल्ली मेट्रोने प्रवास केला. नेहमीच्या व्हीआयपी ताफ याऐवजी हातात मेट्रो कार्ड घेउन सर्वसामान्यांप्रमाणे डब्यात शिरलेल्या पंतप्रधानांना पाहून सहप्रवाशांनाही धक्का बसला. या प्रवासादरम्यान मोदींनी मेट्रोतील नागरिक आणि विशेषतः विद्यार्थ्यांशी दिलखुलास गप्पा मारल्या.

# भारताने पाकिस्तानला 7 गडी राखून हरवले

## महिला आशिया कपमध्ये 8.4 षटकांत 56 धावांचे लक्ष्य पूर्ण केले, हरमनप्रीतने षटकाराने विजय निश्चित केला

**दुबई/वृत्तसंस्था :**भारतीय महिला संघाने टी-२० आशिया कपमध्ये पाकिस्तानला ७ गडी राखून पराभूत केले. ८.४ षटकांत ३ गडी गमावून ५६ धावांचे लक्ष्य गाठताना, कर्णधार हरमनप्रीत सिंगने षटकार मारून संघाला विजय मिळवून दिला.शनिवारी दुबई आंतरराष्ट्रीय स्टेडियमवर पाकिस्तानचा संघ ५५ धावांवर सर्वबाद झाला. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यातील पाकिस्तानची ही सर्वात कमी धावसंख्या आहे. भारतीय महिला संघाची कर्णधार हरमनप्रीत कौरने नाणेफेकीदरम्यान पाकिस्तानी कर्णधार फातिमा सनासोबत पुन्हा एकदा हस्तांदोलन केले नाही. २२ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या पहलगाम दहशतवादी हल्ल्यापासून भारतीय आणि पाकिस्तानी खेळाडूंमध्ये हस्तांदोलन न करण्याचे धोरण पाळले जात आहे. भारतीय खेळाडूंची पाकिस्तानी खेळाडूंशी नो-




हँडशेक पालिसी गेल्या वर्षी पुरुष आशिया चषकापासून सुरू झाली होती. जेव्हा सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखालील भारतीय क्रिकेट संघाने सलमान अली आगाशी हस्तांदोलन केले नव्हते. हरमनप्रीत कौर १५० व्या सामन्यात कर्णधारपद भूषवत आहे. ती टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये हा टप्पा गाठणारी पहिली महिला क्रिकेटपटू आहे.

**भारताचा सलग तिसरा विजय-** भारतीय संघाने स्पर्धेत आपला सलग तिसरा विजय नोंदवला. पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यापूर्वी त्यांनी हाँगकाँग आणि थायलंडला पराभूत केले होते. दुसरीकडे, पाकिस्तानला आपल्या पहिल्या पराभवाला सामोरे जावे लागले. उपांत्य फेरी गाठण्यासाठी संघाला हाँगकाँगविरुद्धचा आपला पुढील सामना जिंकावा लागेल.

# नाशिकच्या रामकुंडात पाच मुले बुडाली

**नाशिक :** नाशिकमधील रामकुंडात स्नानासाठी उतरलेल्या मुलांपैकी पाच जण बुडाले. स्थानिक नागरिक आणि जीवरक्षक दलाने तातडीने बचाव कार्य हाती घेतल्याने चार मुलांना वाचवण्यात यश आले, तर एका मुलाचा बुडून मृत्यू झाला. मूळचे उत्तर भारतीय असलेले आणि काही वर्षांपासून मुंबईत राहणा-या ४० जणांचा ग्रुप धार्मिक पर्यटनासाठी नाशिकमध्ये आले होते. सकाळी गोदावरी नदीत स्नान करून शिर्डीला साईबाबांच्या दर्शनासाठी जाण्याचा त्यांचा नियोजित कार्यक्रम होता. सकाळी सगळे गोदावरीतील रामकुंडात स्नानासाठी उतरले. त्यांच्यासोबतची मुलेही पाण्यात उतरली. यात पाच मुले बुडायला लागली. लोक आणि जीवरक्षक दलाचे जवान धावले आणि त्यांनी मुलांना वाचवण्याचे प्रयत्न केले. यात चार मुलांना वाचवण्यात यश आले. तर १४ वर्षांच्या गोपाल गुप्ता या मुलाचा बुडून मृत्यू झाला.

# आश्रमशाळेत विद्यार्थिनीचा मृत्यू; 3 कर्मचा-यांना घरचा रस्ता

**नाशिक/ प्रतिनिधी-**आदिवासी वसतिगृह आणि आश्रमशाळांमधील असुविधांवरून राज्यात आंदोलनांची तीव्रता वाढलेली असतानाच नाशिक जिल्ह्यातील



विसापूर शासकीय आश्रमशाळेतील इयत्ता दुसरीच्या विद्यार्थिनीचा मृत्यू झाल्याने खळबळ उडाली आहे.श्रुती ओंकार सूर्यवंशी या विद्यार्थिनीच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नसून, प्रशासनाने या प्रकरणाची चौकशी सुरू केली आहे. दरम्यान, संतप्त पालक आणि आदिवासी युवकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार⇨(पान २ वर)

# राज्यातील भरती परीक्षांमध्ये सुधारणांसाठी राज्य सरकारकडून 'उच्चस्तरीय समिती' गठीत, जीआर जारी

**मुंबई/प्रतिनिधी :**शासकीय नोकरभरती परीक्षा अधिक पारदर्शक, सुरक्षित आणि गैरप्रकारमुक्त करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने महत्त्वाचे पाउल उचलले आहे. राज्यातील भरती परीक्षा पद्धतीचा अभ्यास करून सुधारणा सुचवण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय उच्चस्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. यासंदर्भातील अधिकृत शासन निर्णय राज्य शासनाकडून जारी करण्यात आला आहे.राज्यात विविध विभागांमार्फत घेतल्या जाणा-या भरती परीक्षांमध्ये प्रश्नपत्रिकांची गोपनीयता, परीक्षा केंद्रांचे व्यवस्थापन, तोतया उमेदवार आणि तांत्रिक त्रुटींवरून वारंवार प्रश्न उपस्थित होत होते. या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली १२ ऑगस्ट रोजी झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत विद्यमान परीक्षा पद्धतीचे पुर्नविलोकन करण्याचा निर्णय झाला होता. त्यानुसार ही समिती स्थापन करण्यात आली आहे.



पेपरफुटी व गैरप्रकारांना चाप बसणार

**या समितीमध्ये यांची नियुक्ती-** व्ही. राधा (अपर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग - सेवा) अध्यक्ष, सदानंद दाते (पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य) - सदस्य, वीरेंद्र सिंह (सचिव, आयटी व एआय विभाग) - सदस्य, डा. एन. रामास्वामी (सचिव, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विकास विभाग) - सदस्य सचिव, प्रवीण गेडाम ⇨(पान २ वर)

# इंजिनिअरिंगच्या 8 विद्यार्थ्यांचा अपघातात मृत्यू

**केरळ / वृत्तसंस्था-**केरळमधील त्रिशूर जिल्ह्यात शनिवारी एका कारनं उभ्या असलेल्या लारीला जोरदार धडक दिल्यानं आठ जणांचा मृत्यू झाला. वृत्तसंस्था पीटीआयच्या माहितीनुसार, मृतांमध्ये तामिळनाडूतील विद्यार्थ्यांचा समावेश असल्याचं समजतंय. त्रिशूर जिल्ह्यातील कैपामंगलम येथे राष्ट्रीय महामार्गावर उभ्या असलेल्या मालवाहू लारीच्या मागील बाजूस कार धडकल्यानं आठ जणांचा मृत्यू झाला. हा अपघात मध्यरात्रीच्या सुमारास पानंबिकुन्नू सेंटर येथे घडला. धडकेमुळं कारचा चक्काचूर झाला. त्यातील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी गाडी कापावी लागली. प्राथमिक माहितीनुसार, कारमधील प्रवासी हे तामिळनाडूतील दिंडिगुल येथील अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही घटना शुक्रवारी रात्री ११:४२ वाजता घडली. यात तामिळनाडूची नोंदणी असलेली एक कार भरधाव वेगानं जात असताना चालकाचं नियंत्रण सुटलं आणि ती एका लारीवर जाउन आदळली. ही ल?री राष्ट्रीय महामार्गावरील एका वळणाजवळ उभी होती. ही धडक इतकी भीषण होती की कार पूर्णपणे चक्काचूर झाली आणि तिचा पुढचा भाग पूर्णपणे लॉरीच्या खाली अडकला होता.कार कापून मृतदेह काढले बाहेर मोठ्या आवाजासह झालेली धडक ऐकून स्थानिक रहिवासी, पोलीस आणि अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी धावून आले. त्यांनी बचावकार्य सुरू केलं. गाडीतील प्रवाशांना बाहेर काढण्यासाठी गाडीचा काही भाग कापावा लागला. अपघाताची भीषणता लक्षात घेता, विशेषतः पुढच्या सीटवर अडकलेल्यांना बाहेर काढणं हे बचाव पथकासाठी अत्यंत आव्हानात्मक काम होतं. गाडीतील सर्व आठही जणांचा घटनास्थळीच मृत्यू झाला असल्याची माहिती पोलिसांनी दिली.

# 'नशामुक्त महाराष्ट्र' संकल्पनेला बळकटी देण्याचे काम दहीहंडीच्या उत्सवातून व्हावे - मुख्यमंत्री





**मुंबई/प्रतिनिधी :**युवकांनी व्यसनांपासून दूर राहून निरोगी, सक्षम आणि व्यसनमुक्त समाजनिर्मितीसाठी योगदान द्यावे, यासाठी सामाजिक उपक्रमांना व्यापक लोकसहभागाची जोड देणे आवश्यक आहे. उत्साहाने भरलेल्या दहीहंडीच्या उत्सवामधून 'नशामुक्त महाराष्ट्र' या संकल्पनेला बळकटी देण्याचे काम व्हावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.मुख्यमंत्री फडणवीस यांनी वरळी, दादर, घाटकोपर येथे आयोजित विविध दहीहंडी उत्सवांना भेट दिली. मुंबईतील वरळी येथील राजयोग प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित दहीहंडी' उत्सव प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मुंबईच्या महापौर रितू तावडे, सांस्कृतिक कार्य मंत्री अड. आशिष शेलार, आमदार कालिदास कोळंबकर, आमदार प्रवीण दरेकर, आमदार राम कदम, आमदार अमित साटम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.निरोगी आणि सक्षम महाराष्ट्राच्या निर्मितीसाठी प्रत्येक नागरिकाने व्यसनमुक्तीचा संकल्प करावा, तसेच आपल्या कुटुंबात आणि समाजात व्यसनमुक्तीचा संदेश पोहोचवावा, असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले.

**दहीहंडी हा महाराष्ट्राच्या परंपरेचा, साहसाचा आणि संघभावनेचा जागर-** दहीहंडी हा केवळ उत्सव नसून महाराष्ट्राच्या परंपरेचा, तरुणाईच्या साहसाचा आणि संघभावनेचा जागर असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. घाटकोपर येथील श्रेयस सिनेमा चौकात आमदार राम कदम यांच्या वतीने आयोजित मानाच्या दहीहंडी उत्सवात ते बोलत होते. गोविंदा पथकांतील तरुणांचा उत्साह, जिद्द आणि शिस्त पाहून मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांचे कौतुक केले. मुख्यमंत्री म्हणाले की, दहीहंडीतील मानवी मनोरे हे संघटित प्रयत्नांचे उत्तम उदाहरण आहेत. प्रत्येक गोविंदाची भूमिका महत्त्वाची असते. तळातील गोविंदांच्या मजबूत आधारापासून ते सर्वात वरच्या थरावर पोहोचणा-या बालगोविंदापर्यंत प्रत्येकाचा समन्वय, विश्वास आणि धैर्य या खेळाला यशस्वी करतात. घाटकोपरची दहीहंडी ही मुंबईतील प्रमुख आकर्षणांपैकी एक बनली असून, येथे देशाच्या विविध भागांतून येणारी पथके सहभागी होतात. त्यामुळे हा उत्सव आता केवळ स्थानिक स्वरूपाचा न राहता व्यापक ओळख निर्माण करणारा सांस्कृतिक सोहळा झाला आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

**दहीहंडी फोडून उत्सवाचा शुभारंभ**

आज सकाळपासूनच गोविंदा पथकांचा उत्साह पाहायला मिळाला. ढोल-ताशांचा गजर, गोविंदा रे गोपाळाचा जयघोष आणि उंचच उंच मानवी मनो-यांचा थरार अनुभवण्यासाठी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते राजयोग प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित दहीहंडी' उत्सवात प्रतिकात्मक दहीहंडी फोडून शुभारंभ केला. दहीहंडीतून निघालेले 'नशामुक्त महाराष्ट्र' मोहिमेचा संदेश देणारे बॅनर यावेळी मुख्यमंत्र्यांसह उपस्थित लोकप्रतिनिधी व मान्यवरांनी प्रदर्शित केले. यानंतर वरळी येथे जांबोरी मैदानावरील परिवर्तन फौंडेशन आयोजित दहीहंडी' उत्सव प्रसंगी उपस्थित राहून त्यांनी गोविंदा पथकांना शुभेच्छा दिल्या.



जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# पूर्ववैमनस्यातून तरुणाची चाकू मारून हत्या



## कपिलवस्तू नगरमधील खळबळजनक घटना

**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगे नगर पोलीस स्टेशनच्या हद्दीतील कपिलवस्तू नगर येथे पूर्ववैमनस्यातून एका तरुणाची निर्घृण हत्या करण्यात आल्याची खळबळजनक शनिवारी (दि.५) रात्री घटना घडली आहे. विशाल मनोहर असे हत्या झालेल्या तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, जुन्या वादातून अज्ञात व्यक्तीने विशाल मनोहर याच्यावर चाकूने प्राणघातक हल्ला केला. या



हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या विशालचा उपचारादरम्यान मृत्यू झाला.घटना घडताच गाडगे नगर पोलिसांसह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. तसेच खबरदारीचा उपाय म्हणून इर्विन रुग्णालयात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू केला आहे. अमरावती शहरात वाढत्या गुन्हेगारी घटनांमुळे कायदा सुव्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

# परमाणुशास्त्र विभागात अभ्यास मंडळाची स्थापना



**चांदूर रेल्वे/प्रतिनिधीः-** राजर्षी शाहू विज्ञान महाविद्यालयात ४ सप्टेंबर २०२६ रोजी परमाणु शास्त्र विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, तांत्रिक व सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी 'व्ही. राजारामन इलेक्ट्रॉनिक सोसायटी २०२६-२७' या अभ्यास मंडळाची स्थापना उत्साहात करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये नेतृत्वगुण, संशोधनवृत्ती, तांत्रिक कौशल्ये, सर्जनशीलता आणि संघभावना विकसित करणे हा या अभ्यास मंडळाचा प्रमुख उद्देश आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. पी. आर. वडणेरकर सर होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांनी केवळ अभ्यासक्रमापुरते मर्यादित न राहता नवीन तंत्रज्ञान, संशोधन, प्रात्यक्षिक ज्ञान आणि कौशल्यविकासावर भर द्यावा, असे आवाहन केले. अभ्यास मंडळाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना विविध उपक्रम, प्रकल्प, चर्चासत्रे, कार्यशाळा आणि तांत्रिक उपक्रमांमध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल. विद्यार्थ्यांनी मिळालेल्या संधींचा योग्य उपयोग करून नेतृत्वगुण व आत्मविश्वास विकसित करावा, असेही त्यांनी सांगितले.यावेळी IQAC समन्वयक प्रा. एस. ए. वाणी सर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या आयोजनामध्ये इलेक्ट्रॉनिक डिपार्टमेंटच्या प्रा. पल्लवी देशमुख मॅडम तसेच प्रा. कुनिका रोंघे मॅडम यांनी प्रमुख भूमिका बजावली.

अभ्यास मंडळाच्या कार्यकारिणीमध्ये एकूण आठ सदस्यांची निवड करण्यात आली. यामध्ये प्राची ठाकरे – प्रेसिडेंट, मनश्री वैद्य – व्हाईस प्रेसिडेंट, श्रीनव मंगळे – सेक्रेटरी आणि श्वेता मरगडे – ट्रेझरर यांची पदाधिकारी म्हणून निवड करण्यात आली. तसेच अली मोहरा, शाहबाज शाह, रागिनी ठवकर आणि आर्या चांबट यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रुती वडस्कर हिने केले, तर आभार प्रदर्शन खुशी घुरडे हिने केले. कार्यक्रमाला विभागातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कन्या शाळेच्या मैदानात इसमाची गळफास लावून आत्महत्या



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील बस स्टॅन्ड समोरील कन्या शाळेच्या मैदान परिसरात ४४ वर्षीय इसमाने झाडाला गळफास लावून आत्महत्या केली. हि घटना शनिवारी (दि.५) दुपारी एक वाजताच्या सुमारास उघडकीस आली. घटनेची माहिती शहरात पसरताच घटनास्थळी नागरिकांनी घटनास्थळावर मोठी गर्दी केली होती. सुधिर दादाराव वानखडे (वय ४४) असे मृतकाचे नाव असून ते मूळ रा.ढंगारखेडा रहिवासी असून सध्या दर्यापूर येथे साईनगर मध्ये परिवारासह वास्तव्यास आहे. मृतक सुधिर हे दर्यापूरच्या शितल गॅस एजन्सी मध्ये घरगुती गॅस डिलीव्हरी गाडीवर चालक होते. दरम्यान शनिवारी बसस्थानका समोरील कन्या शाळेच्या परिसरात कडू बदामच्या झाडाला दोरीच्या सहाय्याने गळफास लावून त्यांनी आपली जिवनयात्रा संपविली. दर्यापूर उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन पार पडल्यानंतर गावात अंत्यविधी पार पडला. मृतकाच्या पश्चात पत्नी, मुलगा असा आप्त परिवार आहे. दर्यापूर पोलिसांनी पंचनामा करून घटनेची नोंद केली आहे. अचानक घडलेल्या घटनेत कुटुंबाचा आधारवड गेल्याने वानखडे परिवारावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला आहे. वृत्त लिहीस्तोवर आत्महत्येचे नेमके कारण समजू शकले नाही. पुढील तपास दर्यापूर पोलिस करित आहेत.

# श्रावणातील शेवटच्या सोमवारी दर्यापूरचा धान्य बाजार बंद

## शेतकऱ्यांनी शेतमाल विक्रीस आणू नये -सभापती सुनिल गावंडे

**खल्लार/प्रतिनिधीः-** श्रावण महिन्यातील शेवटच्या सोमवारी ७ सप्टेंबर रोजी दर्यापूर शहरातून मोठ्या प्रमाणात कावड यात्रा निघणार आहे. या पार्श्वभूमीवर शहरात मोठ्या प्रमाणात भाविकांची गर्दी होण्याची शक्यता आहे. तसेच व्यापारी व अडते असोसिएशनच्या वतीने प्राप्त झालेल्या अर्जाच्या अनुषंगाने दि. ७ सप्टेंबर रोजी धान्य बाजार बंद ठेवण्यात येणार आहे.

त्यामुळे सदर दिवशी कृषी उत्पन्न बाजार समितीतील धान्य बाजाराचे व्यवहार बंद राहणार असून शेतकरी बांधवांनी आपला शेतमाल विक्रीसाठी बाजार समितीच्या आवारात आणू नये. असे आवाहन कृषी उत्पन्न बाजार समिती दर्यापूर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

कावड यात्रेमुळे शहरातील रस्त्यांवर मोठ्या प्रमाणात भाविकांची व वाहनांची गर्दी होण्याची शक्यता लक्षात घेता शेतकऱ्यांनी बाजार बंदची नोंद घेऊन आपला शेतमाल दुसऱ्या दिवशी बाजार समितीत विक्रीसाठी आणावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सामाजिक कार्यकर्ते किशोर गोयनका यांची प्रज्ञा प्रबोधिनी विवेकानंद छात्रावास येथे सदिच्छा भेट




**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील यशस्वी उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते व हरिगंगा ऑइल प्रतिष्ठानचे संचालक किशोर गोयनका यांनी रक्षाबंधनाचे निमित्ताने प्रज्ञा प्रबोधिनी विवेकानंद छात्रावास येथे सदिच्छा भेट दि.२८ऑगस्ट रोजी दिली.यावेळी रक्षाबंधन संपन्न झाले.या भेटीत त्यांना संस्थेची चित्रफित दाखविण्यात येवून त्यांना संस्थेच्या सर्व उपक्रमाची माहिती अध्यक्ष अविनाश देशपांडे यांनी दिली.यावेळी उल्हास बपोरीकर, महानगर संघचालक,रा.स्व.संघ हे उपस्थित होते.मान्यवरांचे संस्थेतर्फे यथोचित स्वागत करण्यात आले. किशोर गोयनका यांनी यावेळी उपस्थित विद्यार्थ्यांशी व संस्थेच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला व प्रकल्पास सर्वतोपरी सहकार्याचे आश्वासन दिले.यावेळी संस्थेचे बहुतांश पदाधिकारी उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी मान्यवरांसमोर गीतेंच्या १२व्या अध्यायाचे पठन केले.

# १ व १० वरिल उर्वरित

## पोलीस आयुक्तांच्या उपस्थितीत

मुर्तिजापूर तालुक्यातील त्याच्या मूळ गावी पोही येथे नेण्यात आले.पोही गावातील आरोपीच्या घरी पोहोचून पोलिसांनी त्याच्या आई-वडील आणि भावाचे अधिकृत जबाब नोंदवले. त्यानंतर पोलिसांनी आरोपी ज्या मार्गाने घटनेच्या दिवशी अमरावतीत आला होता, त्याच मार्गावरून त्याला नेत सीन रिक्रिएशन केले.

पोलिसांनी त्याच्या प्रत्येक पावलाचा मागोवा घेतला. घरातून निघाल्यानंतर आरोपी आधी एका पानठेल्यावर थांबला होता. त्यानंतर त्याने वाटेतील एका दुकानातून गुन्ह्यात वापरलेला चाकू विकत घेतला.पुढे जात असताना आरोपीने लोणी येथील पेट्रोल पंपावर आपल्या दुचाकीत पेट्रोल भरले.पेट्रोल भरल्यानंतर तो थेट रविनगर चौकात पोहोचला, जिथे त्याने शर्वरीची निर्घृण हत्या केली.

**सीसीटीव्ही फुटेज आणि प्रत्यक्षदर्शी महत्त्वाचे-** आरोपी ज्या-ज्या ठिकाणी थांबला होता, त्या सर्व ठिकाणांची पोलिसांनी बारकाईने तपास केला आहे. ज्या दुकानातून चाकू खरेदी करण्यात आला, तेथील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांनी जप्त केले आहे. या शिवाय पेट्रोल पंप, पानठेला आणि रस्त्यावरील इतर सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे रेकॉर्डिंग तपासले जात आहे. या ठिकाणी उपस्थित असलेल्या प्रत्यक्षदर्शींचे जबाबही नोंदवले जात आहेत, जेणेकरून न्यायालयात आरोपीची उपस्थिती भक्कम पुराव्यांसह सिद्ध करता येईल.

यापूर्वी शुक्रवारी न्यायालयात हजर केल्यानंतर पोलिसांनी बडनेरा रेल्वे स्टेशन परिसरातून आरोपीची ती दुचाकी जप्त केली होती, जी टाकून तो फरार होण्याच्या तयारीत होता. आता तांत्रिक पुरावे, सीसीटीव्ही फुटेज आणि सीन रिक्रिएशनच्या धागेदोऱ्यांना जोडून पोलिस एक मजबूत आरोपपत्र तयार करण्याच्या तयारीत आहेत.

## मोर्शी आगारात राजमाता

व भंगार अवस्थेत सुरू होत्या. कित्येक गाड्यांच्या बसण्याच्या सीटा काचा फुटलेल्या होत्या.प्रवासी वाहतूक करतांना चालकांना तारेवरची कसरत करावी लागत होती.कित्येक गाड्या बंद अवस्थेत पडून राहत असल्यामुळे प्रवाशांना गावागावात जाण्यासाठी अडचण निर्माण होत होती.शाळकरी मुलांना वेळेवर शाळेत हजर राहण्यासाठी गाड्या उपलब्ध होत नव्हत्या. परिणामी त्यांच्या पाल्यांना मोठा त्रास सहन करावा लागत होता.या गंभीर समस्येची दखल घेत आमदार चंदू यावलकर यांनी मोर्शी वरूड आगारात एसटी बसेस उपलब्ध करून देण्यात याव्या त्यासाठी शासनाला पत्रव्यवहार करून सतत पाठपुरावा केला. शेवटी त्यांच्या अथक प्रयत्नामुळे मोर्शी आगाराला काही महिन्यापूर्वी दहा लालपरी एसटी बसचे आगमन झाले.तर आता पुन्हा नवीन पाच राजमाता जिजाऊ एसटी बसेसचे आगमन झाल्यामुळे नागरिकांचा व शालेय विद्यार्थ्यांचा प्रवास सुखाचा होणार आहे. मोर्शी एसटी डेपोला नवीन १५ एसटी बसेस उपलब्ध करून दिल्याबद्दल आमदार चंदू यावलकर यांचे मोर्शी शहरासह तालुक्यातील नागरिकांनी आभार व्यक्त केले.या लोकार्पण सोहळ्याला भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रवीण राऊत,माजी नगराध्यक्ष आप्पासाहेब गेडाम,कैलास फंदे, नितीन उमाळे, सुनंदा लाडवीकर,नगरसेविका सुनीता कोहळे,नगरसेवक नितीन पन्नासे,अजय आगरकर, हर्षल चौधरी,ज्योतीप्रसाद मालवीय,शिवहरी फंदे, मिश्रा, राठोड, निलेश चौधरी,रामा कळंबे,रवी हिरुळकर, मनीष धर्माधिकारी, बाबाराव जाधव,राजू श्रीराव,अमोल फंदे, गोपाल टाकळे,शुभम भोजने,हरिदास लुंगे, सचिन गोमकाळे,मोर्शी शहरातील पत्रकार मंडळी, गावातील प्रतिष्ठित नागरिक,भाजपाचे पदाधिकारी,कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.लोकार्पण सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी मोर्शी आगाराचे आगार व्यवस्थापक योगेश ठाकरे यांच्या मार्गदर्शनात वाहतूक निरीक्षक सागर काशीकर,तेजस नागपुरे,वरिष्ठ लिपीक रोशन बरडे,वाहतूक नियंत्रक माधव केंद्रे, शिपाई रामेश्वर वरठी तसेच सर्व यांत्रिक,शिकाऊ उमेदवार,प्रशासकीय कर्मचारी,चालक वाहक, स्वच्छता कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन वाहतूक नियंत्रक गणेश सतई यांनी केले.

## आज एमपीएससी परीक्षा ;

झेरॉक्स सेंटर्स, कॉम्प्युटर दुकाने, खाद्यपदार्थांची दुकाने, फेरीवाले आणि ध्वनीक्षेपकांचा वापर पूर्णपणे बंद राहील.केंद्र परिसरात कोणत्याही प्रकारची वाहने लावण्यास बंदी असेल. मात्र, परीक्षेचे दस्तावेज आणणारी वाहने, परीक्षा कर्मचारी आणि दिव्यांग विद्यार्थ्यांच्या वाहनांना यातून सूट देण्यात आली आहे. तसेच या परिसरात राहणाऱ्या स्थानिक रहिवाशांच्या वाहनांना हा नियम लागू होणार नाही.

परीक्षा केंद्रांवर गर्दी करून शांतता भंग करण्याचा किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम २२३ आणि प्रचलित कायद्यानुसार कडक कायदेशीर व दंडात्मक कारवाई करण्यात येईल,असे निर्देश अमरावती शहर पोलीस प्रशासनातर्फे देण्यात आले आहेत.

## मारडा शिवारात पट्टेदार वाघाचा

शिवारातील शेतीची कामे पूर्णपणे ठप्प झाली असून शेतकरी आणि मजूर भयभीत झाले आहेत.

अचानक झालेल्या वाघाच्या आगमनामुळे परिसरात भीतीचे वातावरण असून, संबंधित वनविभागाने या घटनेची त्वरित दखल घ्यावी. तसेच मारडा परिसरात दहशत पसरवणाऱ्या या वाघाचा तातडीने बंदोबस्त करून शेतकरी व मजुरांना दिलासा द्यावा, अशी मागणी स्थानिक शेतकरी, मजूर आणि गावकऱ्यांकडून केली जात आहे.

## इलेक्ट्रिक पोलवरील साहित्य चोरी

ठाणे क्षेत्रात महावितरणचे इलेक्ट्रिक साहित्य चोरीच्या प्रकरणांना रोख लावण्यासाठी आणि प्रलंबित गुन्हे उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या निर्देशावरून अंजनगावचे ठाणेदार सूरज बोंडे यांच्या मार्गदर्शनात विशेष मोहीम राबवण्यात आली होती. त्या अंतर्गत ३ सप्टेंबर रोजी मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारावर सकाळी ४ वाजता टाकरखेडा नाक्यावर सापळा लावून नाकाबंदी करण्यात आली. यावेळी संशयित टाटा-४०७ वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये चोरीचा तांब्याचा तार, अॅल्युमिनियम तार आणि महावितरणचे साहित्य असा एकूण ५ लाख ७२ हजार ५८० रुपयांचा माल जप्त केला. हे वाहन मो. सुफियान हा टाटा-४०७ चालवत होता, तर मुख्य आरोपी शेख समीर आणि भांडे व्यापारी मो. साजिद त्यात बसले होते. तिघांनाही पोलिसांनी मालासह अटक करून २ लाख ८० हजार रुपये किमतीचे वाहन देखील जप्त केले आहे. या घटनेमुळे अंजनगाव ठाण्यात दाखल असलेले केबल चोरी आणि महावितरणच्या साहित्य चोरीचे अनेक गुन्हे उघडकीस आले आहेत. आरोपींकडून आणखीन काही प्रकरण समोर येण्याची शक्यता आहे.

पोलीस अधीक्षक निकेतन कदम, अपर पोलीस अधीक्षक दत्ता तोटेवाड, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील हुड यांच्या मार्गदर्शनात ठाणेदार सूरज बोंडे, सहाय्यक निरीक्षक अनिल चांदोरे, पीएसआय भारत चिरडे, विशाल पोल, रवि राठोड, आकाश रंगारी, अमित घाटे, मोहसीन पठाण यांनी ही कारवाई केली.

## कुऱ्हा परिसरात वन्यप्राण्यांचा

झाडांचे आणि पिकांचे मोठे नुकसान केले जात आहे.

आधीच अल्पशा पावसामुळे शेतकरी संकटात सापडला आहे; त्यातच वन्यप्राण्यांच्या त्रासामुळे हातातोंडाशी आलेला घास हिरावला जात आहे. त्यामुळे 'शेतकऱ्यांनी नेमके काय करावे?' असा उद्विग्न सवाल शेतकरी वर्ग उपस्थित करत आहे. संबंधित वनविभागाने या समस्येकडे त्वरित लक्ष देऊन वनप्राण्यांचा बंदोबस्त करावा व होणारे नुकसान थांबवावे, अशी जोरदार मागणी परिसरातील शेतकऱ्यांकडून होत आहे.

## कर्जाच्या चिंतेत शेतकऱ्याने

मुलाने विचारणा केली असता त्यांनी विषारी औषध घेतल्याचे सांगितले. कुटुंबीयांनी त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात दाखल केले. आयसीयूमध्ये उपचार सुरू असतानाच रात्री त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी वलगाव पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली असून, पोलीस उपनिरीक्षक प्रदीप शहाणे तपास करीत आहेत.

## कॉलेजला जाणाऱ्या तरुणीचा

आरोपी एकमेकांच्या परिचयाचे आहेत. ३ सप्टेंबर रोजी सकाळी तरुणी पायी कॉलेजला जात होती. ती तपोवन परिसरातील गंगोत्रीनगर भागातून जात असताना आरोपी दुचाकीवरून तिचा पाठलाग करू लागला. त्याने तरुणीला थांबण्याची हाक दिली. मात्र, तिने त्याच्याकडे दुर्लक्ष करून पुढे जाणे सुरू ठेवले. यानंतर आरोपीने दुचाकी तिच्याजवळ आणून तिचा हात पकडला आणि छेडछाड केली. तरुणीने धाडस दाखवत आरोपीचा हात झटकून तेथून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. याचवेळी परिसरात उपस्थित असलेल्या एका नागरिकाच्या ही बाब लक्षात आली. त्याने आरोपीला जाब विचारत चांगलेच दटावले. त्यामुळे घाबरलेल्या आरोपीने तेथून पळ काढला. घटनेनंतर पीडित तरुणीने गाडगेनगर पोलीस ठाणे गाठून संपूर्ण प्रकार पोलिसांना सांगितला. तिच्या तक्रारीवरून पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, पुढील तपास सुरू आहे. शहरात नुकत्याच घडलेल्या शर्वरी हत्याकांडाच्या पार्श्वभूमीवर या घटनेने पुन्हा एकदा तरुणींच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

## ऑटो उलटून पाच जण जखमी

टी-पॉइंट परिसरातून जात असताना अचानक माकडांचा कळप रस्त्यावर आला. माकडांना वाचविण्याच्या प्रयत्नात ऑटोचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि ऑटो रस्त्यावर उलटला. अपघात होताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना मदत केली. घटनेची माहिती मिळताच रुग्णवाहिकेद्वारे जखमींना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर काही जखमींची प्रकृती लक्षात घेता त्यांना पुढील उपचारासाठी बडनेरा येथील ट्रॉमा केअर सेंटरमध्ये दाखल करण्यात आले. अचानक रस्त्यावर आलेल्या माकडांच्या कळपामुळे हा अपघात घडल्याची प्राथमिक माहिती असून, जखमींवर उपचार सुरू आहेत.

## मेळघाटच्या कलाल कुंड

गेला होता. यादरम्यान, विपिन कोरे यांचा अचानक तोल गेला आणि ते धबधब्याखालील खोल कुंडात कोसळले. पाण्यात बुडाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच डीडीआरएफ , वनविभाग आणि पोलीस पथकाने संयुक्तपणे तातडीने शोधमोहीम राबवली. डीडीआरएफच्या जवानांनी अथक प्रयत्नांनंतर विपिन यांचा मृतदेह पाण्यातून बाहेर काढून उत्तरीय तपासणीसाठी (पोस्टमार्टमन) पाठवला.

या घटनेप्रकरणी पोलीस विभाग पुढील तपास करत आहे. तर दुसरीकडे, बंदी असलेल्या राखीव वनक्षेत्रात बेकायदेशीरपणे प्रवेश केल्याप्रकरणी वनविभागाने भारतीय वन अधिनियम १९२७ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

**फक्त चिचाटी धबधब्यालाच परवानगी; वनविभागाचे आवाहन-**

मेळघाट वनविभागाने स्पष्ट केले आहे की, पर्यटनासाठी केवळ 'चिचाटी धबधबा' येथेच मार्गदर्शित निसर्ग भ्रमंतीची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. कलालकुंड, बाकादरी किंवा इतर कोणत्याही राखीव वनक्षेत्रात प्रवेश करण्यास पूर्णपणे बंदी असून त्यासाठी कोणतीही परवानगी देण्यात आलेली नाही. पर्यटन यात्रा किंवा ट्रेक आयोजित करणाऱ्या संस्थांनी केवळ परवानगी असलेल्याच ठिकाणी ट्रेकचे आयोजन करावे. परवानगीबाबत शंका असल्यास आधी वनविभागाशी संपर्क साधावा, त्यानंतरच प्रसिद्धीपत्रक किंवा जाहिरात जारी करावी. पर्यटनाला जाताना त्या क्षेत्रात प्रवेशाची अधिकृत परवानगी आहे की नाही, याची पर्यटकांनी स्वतः खात्री करून घ्यावी. जीवितास धोका निर्माण होईल अशा ठिकाणी जाणे टाळावे आणि वनविभागाच्या नियमांचे व सूचनांचे तंतोतंत पालन करावे. राखीव वनक्षेत्रात विनापरवानगी प्रवेश करणे हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असल्याने पर्यटकांनी आपल्या जिवाचा धोका पत्करून अशा ठिकाणी जाऊ नये, असे आवाहनात्मक इशारा वनविभागाकडून देण्यात आला आहे.

## उत्कृष्ट तीन गणेश मंडळांना

पोलीस स्टेशनच्या वतीने या संयुक्त सभेचे आयोजन करण्यात आले होते.

समाजातील शांतता आणि सलोख्याला बिघडविण्याचे कोणी मंडळी काम करीत असेल तर अशा समाजकंटक मंडळीवर कायदेशीर कार्यवाही केल्या जाणार असल्याचा इशारा निकेतन कदम अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी परतवाडा शहरातील अंबिका लॉन येथे शांतता समितीच्या सभेत बोलताना दिला.आगामी गणेशोत्सव निमित्त अचलपूर ,परतवाडा व सरमसपुरा या तिन्ही पोलीस स्टेशनच्या वतीने शांतता समितीच्या सभेचे परतवाडा शहरातील अंबिका लॉन येथे आयोजन करण्यात आले होते.यावेळी मंचावर अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे,अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक निकेतन कदम,अचलपूर पोलिस उपविभागीय अधिकारी ईशानी आनंद ,पोलिस अधिकारी वैशाली धुवे ,अचलपूर चे तहसीलदार सुदर्शन शहारे, परतवाडा पोलिस स्टेशन चे ठाणेदार अजय आखरे,अचलपूर नगर परिषदेचे अधिकारी आणि सरमसपुरा,अचलपूर पोलिस स्टेशनचे अधिकारी उपस्थितीत होते .गणेशोत्सव हा आनंद आणि उत्साहाचा सण आहे. हा सण साजरा करताना समाजातील शांतता आणि सलोखा बिघडणार नाही याची काळजी घेणे महत्त्वाचे असल्याचे मत अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी व्यक्त केले.तसेच माजी नगराध्यक्ष रफिक सेठ,उज्वल अग्रवाल ,रुपेश ढेपे यांनी सुद्धा आपले मनोगत व्यक्त केले.त्यानंतर अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी आपल्या भाषणामध्ये सांगितले की, जुळ्या शहरातील कायदा आणि सुव्यवस्था शांततेत राहण्यासाठी नागरिकांनी तसेच गणेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन त्यांनी शांतता समितीच्या सभेत बोलताना केले. यावेळी मान्यवरांच्या हस्ते ऑपरेशन कवच अंतर्गत पोस्टर स्पर्धेत विविध शाळेतील शिक्षक - विद्यार्थ्यांचा सत्कार ही करण्यात आला.याप्रसंगी मान्यवरांनी आपआपली मनोगत व्यक्त केले. मान्यवरांनी आवश्यक त्या सूचना भाषणादरम्यान दिल्यात. याप्रसंगी माजी नगराध्यक्ष रफिक सेठ ,माजी नगरसेवक रुपेश ढेपे,कुंदन यादव, सुनील चौधरी,शंकर मालखेडे,मनोज नंदवंशी, प्रफुल बर्वे,अक्षय जनावरे,सतीश शर्मा,महेश कडू आदी उपस्थितीत होते.

यावेळी अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी गणेश मंडळातील सदस्यांना वाढत्या ध्वनिप्रदूषणावर आळा घालण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचा आदेशानुसार २ बेस २ टॉप वाजविण्याचे आवाहन केले.यावेळी एका सदस्याने २ दिवसापूर्वी अचलपूर शहरात एका विशिष्ट समाजाकडून ४ बेस वाजविल्याचे सांगितले.याची तत्काळ दखल घेत अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी अचलपूर पोलिस स्टेशनचे अधिकारी यांच्याशी चर्चा केली आणि नियमाचे उल्लंघन करणाऱ्यावर गुन्हे दाखल करण्याचे निर्देश त्यांनी याप्रसंगी दिले .यामुळे नियमाचे उल्लंघन करणाऱ्या व शांतता,कायदा ,सुव्यवस्था बाधित करणाऱ्यांवर कडक कारवाई होणार असा इशारा अमरावती जिल्हा ग्रामीण पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी आपल्या कृतीतून दिल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## आश्रमशाळेत विद्यार्थिनीचा मृत्यू;

दिल्यानंतर प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करत तीन कर्मचा-यांच्या निलंबनाचे आदेश दिले. कळवण एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पांतर्गत विसापूर शासकीय आश्रमशाळा येते. श्रु तीला शाळेत असताना ताप आल्याने प्राथमिक उपचार करण्यात आले. त्यानंतर तिला मोकभगणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचारासाठी दाखल करण्यात आले. उपचारानंतर प्रकृती सुधारल्याने ती पुन्हा शाळेत आली. मात्र, त्याच रात्री तिची प्रकृती पुन्हा खालावली आणि तिचा मृत्यू झाला.श्रु तीचा मृतदेह शवविच्छेदनासाठी नाशिकच्या जिल्हा शासकीय रु ग्णालयात आणण्यात आला. या घटनेची माहिती मिळताच पालक आणि आदिवासी युवक मोठ्या संख्येने रु ग्णालयात दाखल झाले. श्रु तीच्या मृत्यूस कारणीभूत अधिकारी आणि कर्मचा-यांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी करत कारवाई होईपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका पालकांनी घेतली. मृतदेह थेट आदिवासी आयुक्तालयात नेण्याची तयारीही व्यक्त करण्यात आली.

## राज्यातील भरती परीक्षांमध्ये

(विभागीय आयुक्त, नाशिक विभाग) - सदस्य, एअर मार्शल अजित शंकरराव भोसले (सेवानिवृत्त) (माजी सदस्य, छ्घ्च्क) - सदस्य, प्रा. श्यामप्रसाद करगड्डे (प्राध्यापक, आयआयटी मुंबई) - सदस्य यांची या समितीमध्ये नियुक्ती करण्यात आली आहे.प्रश्नपत्रिका छपाई, डिजिटल वितरण, वाहतूक, परीक्षा केंद्रांवरील सुरक्षा आणि ऑडिट ट्रेल तपासणीसाठी कडक मानके ठरवणे. तसेच तोतया उमेदवारांना रोखण्यासाठी प्रवेश नियंत्रण, बायोमेट्रिक प्रमाणीकरण आणि डिजिटल देखरेखीबाबत शिफारसी करणे. देशातील इतर राज्यांमध्ये आणि परदेशात राबवल्या जाणा-या सर्वोत्तम परीक्षा प्रणालींचा अभ्यास करणे. यासह समिती राज्यातील प्रत्येक महसुली मुख्यालयाला भेट देउन स्पर्धा परीक्षेतील विद्यार्थी, शैक्षणिक संस्था आणि संबंधित घटकांशी थेट चर्चा करून त्यांच्या सूचना जाणून घेणार आहे. हा अभ्यास आणि सल्लामसलत पूर्ण झाल्यानंतर समिती आपला अंतिम अहवाल राज्य शासनास सादर करणार आहे.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ रविवार, ६ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


## कारंजात तरुणाला मारहाण करून मोबाईल व दुचाकी लंपास ; चार आरोपी जेरबंद

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कारंजा शहरातील शेलूबाजारकडून कारंजाकडे येणाऱ्या मार्गावर तरुणाला मारहाण करून त्याच्याकडील मोबाईल व दुचाकी जबरीने लंपास केल्याच्या प्रकरणाचा कारंजा शहर पोलिसांनी छडा लावला असून, या प्रकरणात चार आरोपींना अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यातील मुद्देमाल तसेच गुन्हा करताना वापरलेली चारचाकी गाडी जप्त केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. २४ ऑगस्ट २०२६ रोजी फिर्यादी नावलखन सुनील टाले (वय १९ वर्षे, रा. शेलूबाजार, ता. कारंजा, जि. वाशिम) हा त्याचा मित्र हरीओम पंजाब मस्के याच्यासोबत शेलूबाजारकडून कारंजाकडे येत होता. त्यावेळी कीर्ती गोल्ड सोयाबीन कंपनी, कारंजा लाडच्या समोर लाल रंगाच्या चारचाकी वाहनातून आलेल्या आरोपींनी त्यांच्यासमोर वाहन आडवे करून त्यांना थांबविले. यानंतर आरोपींनी फिर्यादी व त्याच्या मित्राला शिवीगाळ करून बाटली व प्लास्टिक पाइपने मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या खिशातील



रेडमी कंपनीचा मोबाईल, किंमत सुमारे १५ हजार रुपये, तसेच हिरो कंपनीची स्प्लेंडर दुचाकी, क्रमांक एमएच ३७ एएल ७८९७, अंदाजे किंमत ३५ हजार रुपये, असा एकूण सुमारे ५० हजार रुपयांचा मुद्देमाल जबरीने घेऊन आरोपी पसार झाले. या प्रकरणी कारंजा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ५४८/२०२६, कलम ३०९(६), ३(५) भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

### ५० हून अधिक सीसीटीव्ही फुटेजची तपासणी

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील यांनी गुन्हा उघडकीस आणून आरोपींना तात्काळ अटक करण्याचे निर्देश दिले. पोलीस निरीक्षक अमर चोरे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाने कारंजा शहरासह विविध ठिकाणचे ५० हून अधिक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचे फुटेज तपासले. तांत्रिक विश्लेषण व गुप्त बातमीदारांच्या माध्यमातून आरोपींचा शोध घेण्यात आला. तपासादरम्यान पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार चार संशयितांना ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्यांनी गुन्ह्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींमध्ये शिवकुमार सुरेश जगताप (वय २३, रा. सायखेडा, ता. दारव्हा, जि. यवतमाळ), आकाश गजानन कचरे (वय २५, रा. बहाणगावडा, ता. आर्णी, जि. यवतमाळ), मोहनराज ओमप्रकाश पेटेवार (वय २८, रा. विद्यानगर वॉर्ड, घाटंजी, ता. घाटंजी, जि. यवतमाळ) आणि ऋषीकेश सतीशराव काळे (वय २६, रा. बोथद, ता. आर्णी, जि. वर्धा) यांचा समावेश असल्याचे प्रेस नोटमध्ये नमूद आहे. पोलिसांनी आरोपींकडून गुन्ह्यातील नगदी व मुद्देमालासह अंदाजे ५० हजार रुपये किमतीचा माल तसेच गुन्हा करताना वापरलेली रेनॉल्ट क्विड चारचाकी, क्रमांक एमएच २९ यूआर १६७७, जप्त केली आहे. या कारवाईत पोलीस अधीक्षक निकेश खाटमोडे-पाटील, अपर पोलीस अधीक्षक लता फड-मॅडम, उपविभागीय पोलीस अधिकारी मनिष ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमर चोरे, पोलीस उपनिरीक्षक विशाल बोरकर, पोहेका गणेश जाधव, पोहेका मयुरेश तिवारी, पोहेकॉ अजय धनकर, पोहेका मोहम्मद परसवाले, पोका नितीन पाटील, पोका अनिस निमसुरवाले व पोका अमित भगत यांनी सहभाग घेतला. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक विशाल बोरकर करीत आहेत.

## पावसा अभावी खरिपातील पिके धोक्यात; शेतकरी आर्थिक विवंचनेत अडकले



■ प्रतिनिधी | मानोरा ■

यावर्षी जुलैच्या पहिल्या आठवड्यात झालेल्या तुरळक समाधानकारक पावसानंतर तालुक्यात सुमारे १०० टक्के पेरण्या पूर्ण झाल्यात. कापूस, सोयाबीन आणि तूर पिकांची उगवणही चांगली झाली होती. मात्र गेल्या ३६ दिवसांवर पावसाने अचानक दडी मारल्याने खरीप पिके धोक्यात आली असून शेतकऱ्यांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे.

पावसाच्या अभावामुळे पीका वर रोगराईचे प्रमाण वाढले असून सोयाबीन सुकू लागली आहेत. पावसाच्या विलंबाने खरीप पिके संकटात असल्याचे चित्र दिसत आहे. सध्या सोयाबीनला शेंगा पकडल्या असुन शेंगामध्ये दाणे भरण्याचा कालावधी आहे. या महत्त्वाच्या टप्पात पीकाला पाण्याची नितांत गरज आहे. मात्र पाऊस नसल्याने शेतातील ओलावा झपाट्याने कमी होत असून अनेक ठिकाणी पिके कोमेजू अथवा सुकू लागली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. ज्या शेतकऱ्यांकडे विहीर, बोअरवेल किंवा अन्य सिंचनाची सुविधा उपलब्ध आहे, त्यांनी पिकांना तुषार सिंचन द्वारे पाणी देण्यास सुरुवात केली आहे. मात्र तालुक्यातील बहुतांश शेती कोरडवाहू असल्याने अनेक शेतकरी केवळ पावसाच्या प्रतीक्षेत आहेत.

दरवर्षीच्या तुलनेत मान्सूनचे आगमन उशिरा झाले. त्यात अल निनो वाढत्या प्रभावामुळे पाऊस मागील ३६ दिवसापासून तालुक्यात बरसलाच नसल्यामुळे सोयाबीन पिकासाठी गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून त्यामुळे नक्कीच उत्पन्नात घट होईल, यामुळे शेतकऱ्याच्या चिंतेत वाढ झाली आहे.

## खडकी सदार येथे गोपाळकाला व दहीहंडी उत्साहात; वेशभूषेने वेधले लक्ष



■ प्रतिनिधी | रिसोड ■

येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत गोकुळाष्टमीनिमित्त गोपाळकाला व दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा करण्यात आला. विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण, राधा, गोप-गोपिकांच्या आकर्षक वेशभूषा परिधान करून सहभाग घेतल्याने शाळेच्या परिसरात उत्सवी वातावरण निर्माण झाले.

यावेळी विद्यार्थ्यांनी उत्साहात दहीहंडी फोडून जल्लोष केला. शिक्षक जिरवणकर सर, दागडीया मॅडम, गव्हाणे सर, कानडे मॅडम तसेच शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष शंकर सदार, सदस्य आदिनाथ सदार, संतोष सदार, ज्ञानेश्वर सदार, कृष्णा सदार, अमोल सदार, गजानन सदार, माधव सदार, भागूबाई सदार यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

गोकुळाष्टमीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती व परंपरांची ओळख व्हावी, तसेच त्यांच्यात एकता, सहकार्य व आत्मविश्वासाची भावना निर्माण व्हावी, या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शिक्षकांनी श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रसंग व गोकुळाष्टमीचे महत्त्व याबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## वन्यजीव संवर्धन, पर्यावरण रक्षण आणि पर्यटन क्षेत्रातील संधींवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | मंगरुळपीर ■

तालुक्यातील वनोजा येथिल ज्ञानगंगा शिक्षण प्रसारक संस्था, वनोजा द्वारा संचालित श्रीमंती साळुंकाबाई राऊत कला व वाणिज्य महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व राष्ट्रीय छात्र सेना (NCC) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. देवेंद्र गावंडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय वन्यजीव दिवस उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये वन्यजीव संवर्धन, पर्यावरण रक्षण तसेच मानव-वन्यजीव सहअस्तित्वाबाबत जागृती करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. गजानन घोंगटे होते. तर काटेपूर्णा वन्यजीव अभयारण्याचे वनरक्षक अमोल पोटे व वनरक्षक ज्ञानेश्वर सुरणे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांशी संवाद



साधला. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. यावेळी वनरक्षक ज्ञानेश्वर सुरणे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना जीवनातील प्रत्येक क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी सातत्यपूर्ण व अपार कष्ट आवश्यक असल्याचे सांगितले. त्याचबरोबर विद्यार्थ्यांनी पर्यावरण संवर्धनाची जाणीव मनात रुजवून निसर्ग आणि वन्यजीवांच्या संरक्षणासाठी सकारात्मक भूमिका घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले. वनरक्षक अमोल पोटे यांनी वन्यजीव म्हणजे काय, वन्यजीवांचे महत्त्व आणि मानव-वन्यजीव संघर्षाची कारणे याविषयी सविस्तर माहिती दिली. वन्यजीवांचे संरक्षण करताना स्थानिक पातळीवर कोणत्या उपाययोजना करता येऊ शकतात, याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच वनविभागाशी संबंधित विविध क्षेत्रांमध्ये आणि विशेषतः वन्यजीव व निसर्ग पर्यटन क्षेत्रात उपलब्ध असलेल्या रोजगार व व्यवसायाच्या संधींवर त्यांनी प्रकाश टाकला.

## अकोला नाका ते काटा चौक मार्गावरील वाहतूक वळवली

**वाशिम :** शहरातील अकोला नाका ते काटा चौक या मार्गावरील सुमारे १.२ किलोमीटर लांबीच्या रस्त्याचे बांधकाम सुरू असल्याने या मार्गावरील सर्व प्रकारची वाहतूक ४ सप्टेंबरपासून पूर्णपणे बंद करण्यात येणार आहे. नागरिकांनी पर्यायी मार्ग वापरण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

जिल्हा दंडाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम ३३ (१) (ख) अन्वये याबाबतचे आदेश जारी केले आहेत. अकोला नाका ते काटा चौक या मार्गावरील वाहतूक शासकीय रुग्णालय, आरटीओ कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, आर.ए. कॉलेज व इतर शासकीय कार्यालयांच्या मार्गाने वळविण्यात येणार आहे.

## नंदकिशोर भोयर यांचा शैक्षणिक कार्यासाठी सत्कार

■ प्रतिनिधी | कारंजा ■

कॉपरेट व्यवहार मंत्रालय सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग मंत्रालय निती आयोग भारत सरकार नवी दिल्ली संलग्नीत नैसर्गिक मानवधिकार सुरक्षा परिषद फोरम, धुळे व्दारा कारंजा पंचायत समिती अंतर्गत जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक मराठी शाळा सुकळीचे विज्ञान पदविधर शिक्षक नंदकिशोर भोयर यांना आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. त्या अनुषंगाने वाशिम जिल्हा शिक्षक सहकारी पंतसंस्थाच्या वतीने उल्लेखनीय शैक्षणिक कार्यासाठी पदवीधर शिक्षक नंदकिशोर भोयर यांचा सत्कार माजी मंत्री अनंतरावजी देशमुख यांचे हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटक अकोला मतदार संघाचे खासदार अनुप भैय्या धोत्रे, कार्यक्रमाचे अध्यक्ष माजीमंत्री सरकार नेते अनंतरावजी देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणून शिक्षक



आमदार किरणभाऊ सरनाईक, माजी खासदार प्रा.जोगेंद्र कवाडे, सानेगुरूजी शिक्षक संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा अकोला शिक्षक सहकारी पंतसंस्थेचे माजी अध्यक्ष दिलीपराव अंधारे, माजी जि.प. उपाध्यक्ष तथा शिक्षण सभापती चक्रधर गोटे, सहकारनेते दामुअण्णा गोटे, शिक्षकनेते अध्यक्ष महाराष्ट्र राज्य केंद्रप्रमुख संघटना अशोकराव महाले, सानेगुरुजी शिक्षक संघाचे अध्यक्ष मधुकर महाले, पंतसंस्थेचे अध्यक्ष विजय मनवर , उपाध्यक्ष राजुभाऊ मते, संचालक मंचक तायडे, सतिषधुगे, सतिष सांगळे, सुजाताताई कटके ,राहूल इंगोले उपस्थित होते.

## प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग अंतर्गत डिएलसी लाभार्थीसाठी अन्नप्रक्रिया व उद्योजकता विकास प्रशिक्षण



■ प्रतिनिधी | वाशिम ■

प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग योजना अंतर्गत ३१४ लाभार्थीसाठी अन्नप्रक्रिया उद्योग व उद्योजकता विकास या विषयावर तीन दिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम दि. २ ते ४ सप्टेंबर दरम्यान विधाता प्रशिक्षण सभागृह, वाशिम येथे संपन्न झाला. कृषी विज्ञान केंद्र, वाशिम आणि कृषी विभाग, वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

प्रशिक्षणाचे नोडल अधिकारी डॉ. एस. के. देशमुख यांनी प्रशिक्षणाचे नियोजन व समन्वय करताना योजनेच्या माध्यमातून लाभार्थींना अन्नप्रक्रिया तंत्रज्ञान, तांत्रिक मार्गदर्शन, उद्योग व्यवस्थापन आणि उद्योजकता विकासासाठी आवश्यक कौशल्ये उपलब्ध करून देणे हा प्रशिक्षणाचा प्रमुख उद्देश असल्याचे स्पष्ट केले. कृषी उत्पादनांचे वैज्ञानिक पद्धतीने मूल्यवर्धन करून सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगांची उभारणी करणे, स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मिती करणे आणि लाभार्थींना शाश्वत उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कृषी विज्ञान केंद्र, वाशिमचे प्रमुख डॉ. आर. एल. काळे यांनी अन्नप्रक्रिया उद्योगासाठी स्थानिक पातळीवर उपलब्ध असलेल्या कृषी कच्च्या मालाचा कार्यक्षम वापर, कच्च्या मालाची गुणवत्ता, योग्य प्रक्रिया तंत्रज्ञानाची निवड, उद्योगाचे नियोजन आणि कृषी उत्पादनांना बाजारपेठेशी जोडण्याचे महत्त्व स्पष्ट केले. प्राथमिक कृषी उत्पादनांचे मूल्यवर्धित उत्पादनांमध्ये रूपांतर केल्यामुळे उत्पादनातील अपव्यय कमी होऊन शेतकरी व उद्योजकांच्या उत्पन्नवाढीस तसेच ग्रामीण रोजगारनिर्मितीस चालना मिळू शकते, असे त्यांनी सांगितले.

## वाशिम जिल्हा कोरडा दुष्काळग्रस्त जाहीर करा - जतिन सोनोने

■ प्रतिनिधी | वाशिम ■

यंदाच्या खरीप हंगामात पावसाच्या अनियमिततेमुळे आणि पावसातील मोठ्या खंडामुळे वाशिम जिल्ह्यातील शेतकरी अडचणीत सापडला आहे. अनेक भागांत पिकांची वाढ खुंटली असून सोयाबीन, कापूस व इतर खरीप पिकांवर मोठा परिणाम झाला आहे. त्यामुळे शासनाने वाशिम जिल्ह्यातील परिस्थितीची तातडीने पाहणी करून कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी जतिन सोनोने यांनी जिल्हाधिकारी वाशिम यांना केली आहे. पावसाचे असमान वितरण, पावसातील दीर्घ खंड, पिकांची झालेली नुकसानस्थिती, उत्पादनात होणारी घट तसेच शेतकऱ्यांवर वाढत असलेला आर्थिक बोजा लक्षात घेता जिल्ह्यात दुष्काळसदृश



परिस्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे शासनाने केवळ कागदोपत्री आकडेवारीवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष शेतपातळीवर पंचनामे व सर्वेक्षण करावे, अशी मागणीही करण्यात आली आहे. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा यासाठी पीक नुकसान भरपाई, दुष्काळी सवलती, कृषीपंप वीजबिलात सवलत, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि आवश्यक त्या शासकीय मदतीबाबत तातडीने निर्णय घ्यावा, असे जतिन सोनोने यांनी म्हटले आहे.

## विद्याभारती शाळेत दहीहंडी सोहळा उत्साहात

■ प्रतिनिधी | वाशिम ■

सिव्हिल लाईन येथील विद्याभारती प्राथमिक व माध्यमिक शाळेत श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त दहीहंडी सोहळ्याचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. श्रीकृष्णाच्या बाललीला, गोपाळकाला आणि दहीहंडीच्या पारंपरिक संस्कृतीची विद्यार्थ्यांना ओळख व्हावी, तसेच विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संस्कृती व परंपरांविषयी प्रेम आणि आपुलकी निर्माण व्हावी, या उद्देशाने शाळेत कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'गोकुळामध्ये होता ज्याचा वास, गोपिकांसोबत ज्याने रचला रास; यशोदा-देवकी ज्याची मैया, तोच साऱ्यांचा लाडका कृष्ण कन्हैया...'



अशा भक्तिमय वातावरणात कार्यक्रमाला सुरुवात झाली. सर्वप्रथम शाळेचे तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. सुरेशराव मिटकरी, संचालक सुमित मिटकरी, मुख्याध्यापक नितेश मिटकरी व पर्यवेक्षक विजय गोटे यांच्या हस्ते भगवान श्रीकृष्णाच्या प्रतिमेचे पूजन व हारार्पण करण्यात आले. त्यानंतर दहीहंडीचे विधिवत पूजन करण्यात आले. श्रीकृष्णाच्या वेशभूषेत सजलेल्या विद्यार्थ्यांच्या हस्ते दहीहंडी फोडण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांनी मोठ्या उत्साहात सहभाग घेत जल्लोष केला. 'गोविंदा आला रे आला...' या नादघोषाने संपूर्ण शाळेचा परिसर दणाणून गेला. विद्यार्थ्यांनी गोविंदाच्या गाण्यांवर उत्स्फूर्तपणे नृत्य करत दहीहंडी सोहळ्याचा मनमुराद आनंद लुटला. या कार्यक्रमात राधा-कृष्णाच्या आकर्षक वेशभूषेतील इयत्ता १ली ते ७ वीतील विद्यार्थी विशेष आकर्षणाचे केंद्र ठरले. विद्यार्थ्यांच्या मनमोहक वेशभूषा, उत्साहपूर्ण सहभाग आणि कृष्णभक्तीने कार्यक्रमाला विशेष रंगत आली. काही विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या बाललीलांचे सादरीकरण करून उपस्थितांची मने जिंकली.

## कोजागिरी पौर्णिमेनिमित्त ऋषिकेशमध्ये महायोग ध्यान कुंभ

■ प्रतिनिधी | वाशिम ■

ध्यान, स्वाध्याय व आत्मज्ञानाच्या माध्यमातून शारीरिक, मानसिक, भावनिक आणि आध्यात्मिक उन्नतीचा अनुभव देणारा महायोग ध्यान कुंभ कोजागिरी पौर्णिमेनिमित्त ऋषिकेश येथील मुनी की रेती येथे २३ ते २७ ऑक्टोबरदरम्यान आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाचे हे नववे वर्ष असून देश-विदेशातून सुमारे १० हजार साधक सहभागी होणार आहेत.



गंगातीरावर होणाऱ्या या भव्य उपक्रमात हजारो साधकांचे सामूहिक ध्यान, स्वाध्याय व आत्मचिंतनाची विविध सत्रे आयोजित करण्यात आली आहेत. सामूहिक ध्यानामुळे शांतता, एकाग्रता आणि सकारात्मकतेचा अनुभव मिळणार आहे. यंदा ध्यान व विज्ञानाचा संगम साधत न्यूरोलॉजी क्षेत्रातील तज्ज्ञ व संशोधक डॉ. श्वेता अडातीया यांच्या उपस्थितीत सामूहिक ध्यानाचा मानवी मेंदू, शरीर व भावनिक अवस्थेवरील परिणामांचा वैज्ञानिक अभ्यासही करण्यात येणार आहे.

देश-विदेशातील पिरॅमिड मास्टर्स, आध्यात्मिक मार्गदर्शक व संत-महात्मे साधकांना मार्गदर्शन करणार आहेत. सहभागींसाठी ध्यान, स्वाध्याय व अन्नप्रसादाची व्यवस्था करण्यात आली.

## कृषी विज्ञान केंद्रात शास्त्रीय शेळीपालनावर तीन दिवसीय प्रशिक्षण

### शेळीपालनातील आधुनिक व्यवस्थापन, आरोग्य, पोषण व आर्थिक नियोजनावर प्रशिक्षणार्थींना मार्गदर्शन

■ प्रतिनिधी | वाशिम ■

भारतीय कृषी अनुसंधान परिषद नवी दिल्ली पुरस्कृत कृषी विज्ञान केंद्र, वाशिम येथे दि. १ ते ३ सप्टेंबर या कालावधीत शेतकरी व प्रशिक्षणार्थीसाठी तीन दिवसीय शेळीपालन प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरीत्या संपन्न झाला. बदलत्या कृषी अर्थव्यवस्थेत शेळीपालन हा शाश्वत व पूरक व्यवसाय म्हणून विकसित करण्याच्या उद्देशाने प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले.

या प्रशिक्षणाचे आयोजन कृषी विज्ञान केंद्र अंतर्गत पशु विज्ञान विभागामार्फत करण्यात आले. कार्यक्रमाचे उद्घाटन डॉ. आर. एल. काळे, प्रमुख, कृषी विज्ञान केंद्र, वाशिम यांच्या उद्घाटनपर मार्गदर्शनाने झाले. त्यांनी शेळीपालन व्यवसायात वैज्ञानिक व्यवस्थापन, तंत्रज्ञानाचा अवलंब, उत्पादनक्षमता वाढ आणि बाजाराभिमुख दृष्टिकोन



यांचे महत्त्व स्पष्ट केले.

प्रशिक्षणादरम्यान पशु विज्ञान तज्ञ मयूर देशमुख यांनी शास्त्रीय शेळीपालन पद्धती, सुधारित जातींची निवड, निवास व्यवस्था, प्रजनन व्यवस्थापन, करडांची निगा, खाद्य व पोषण व्यवस्थापन, स्वच्छता व जैवसुरक्षा, रोगप्रतिबंधक उपाययोजना, लसीकरण, परजीवी नियंत्रण तसेच शेळ्यांचे आरोग्य व्यवस्थापन या विषयांवर तांत्रिक मार्गदर्शन करण्यात आले. डॉ. डी. एन. इंगोले यांनी शेळीपालनातील अर्थशास्त्र, भांडवली गुंतवणूक, उत्पादन खर्च, उत्पन्न-नफा विश्लेषण, आर्थिक नियोजन आणि व्यवसायाची व्यवहार्यता याबाबत मार्गदर्शन केले. तसेच तुषार देशमुख यांनी शेळीपालन व्यवसायाशी संबंधित विविध व्यावहारिक व तांत्रिक बाबींवर मार्गदर्शन केले. प्रशिक्षणामध्ये सहभागी प्रशिक्षणार्थींना शास्त्रीय पद्धतीने शेळीपालन करून उत्पादनक्षमता व नफा वाढविण्यासाठी आवश्यक व्यवस्थापन कौशल्ये देण्यात आली. प्रशिक्षणामुळे सहभागी शेतकऱ्यांना शेळीपालन व्यवसायाकडे केवळ पारंपरिक पशुपालन म्हणून न पाहता व्यवस्थित नियोजन, वैज्ञानिक तंत्रज्ञान आणि बाजारपेठेची सांगड घालून व्यावसायिक उपक्रम म्हणून विकसित करण्याची दिशा मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संगणक तज्ञ बावस्कर, प्रक्षेत्र व्यवस्थापक प्रमोद देशमुख, राम देशमुख, संजय तवर आणि अक्षय देशमुख यांनी मोलाचे सहकार्य केले.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २८० ■ रविवार, ६ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# परवानगी शिवाय ध्वनीक्षेपक, लाऊडस्पिकर, ॲम्प्लीफायर वापरावर बंदी

## -सण, उत्सवाच्या अनुषंगाने प्रतिबंधात्मक आदेश जारी

### ध्वनिक्षेपक, लाऊडस्पीकर वापराचे नियम पाळण्याचे आवाहन

**वर्धा जनमाध्यम :** आगामी काळात जिल्ह्यात दहीहंडी, पोळा, तान्हा पोळा, सार्वजनिक गणेशोत्सव, ताजुद्दीनबाबा संदल, उर्स व इतर सण साजरे होणार आहे. त्याअनुषंगाने दि.५ ते १९ सप्टेंबर या कालावधीत विविध धार्मिक, सांस्कृतिक कार्यक्रम आणि मिरवणुका होणार आहेत. या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी जिल्हा पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम १९५१ च्या कलम ३६ व कलम ३८(१) अन्वये प्रतिबंधात्मक अधिसूचना जारी केली आहे.



प्रतिबंधात्मक आदेश काळात कोणत्याही रस्त्यात किंवा रस्त्याजवळ किंवा सार्वजनिक जागेत किंवा जागेजवळ वाद्ये वाजविण्याचे किंवा गाणी गाण्याचे किंवा ढोल व इतर वाद्ये वाजविण्याचे आणि शिंगे व इतर कर्कश वाद्य वाजविणे, सार्वजनिक करमणुकीच्या ठिकाणी ध्वनीक्षेपकांचा उपयोग करण्याचे विनियमन करणे व त्यावर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार जिल्हयातील सर्व पोलिस स्टेशन प्रभारी अधिकारी व त्यावरील वरीष्ठ दर्जाच्या पोलिस अधिकाऱ्यांना प्रदान करण्यात आले आहे.

ध्वनीक्षेपक, लाऊडस्पिकर, ॲम्प्लीफायर व इतर ध्वनी निर्माण करणाऱ्या उपकरणांचा वापर सक्षम प्राधिकाऱ्याची परवानगी घेतल्याशिवाय करता येणार नाही. परवानगीनंतरही संबंधित आयोजकांनी निर्धारित केलेल्या ध्वनीमर्यादेचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. ध्वनीक्षेपक, लाऊडस्पिकर, ॲम्प्लीफायर व इतर ध्वनी निर्माण करणाऱ्या उपकरणांचा वापर करताना सार्वजनिक शांतता, नागरिकांची सुरक्षितता व आरोग्य यांना बाधा निर्माण होणार नाही याची संबंधित आयोजकांनी दक्षता घेणे आवश्यक आहे.

रात्री १० ते सकाळी ६ वाजता या कालावधीत ध्वनीक्षेपक, लाऊडस्पिकर, ॲम्प्लीफायर व इतर ध्वनी निर्माण करणाऱ्या उपकरणांचा जिल्हा दंडाधिकारी यांनी विहीत केलेले दिवस व वेळ वगळून वापर करण्यास सक्त मनाई आहे. ध्वनीक्षेपकाच्या आवाजाची तीव्रता औद्योगिक क्षेत्रात दिवसा ७५ dB(A) व रात्री ७० dB (A), वाणिज्य क्षेत्रात दिवसा ६५ dB(A) व रात्री ५५ dB(A), निवासी क्षेत्रात दिवसा ५५ dB(A) व रात्री ४५ dB (A) व शांतता क्षेत्रात दिवसा ५० dB (A) व रात्री ४० dB (A) मर्यादा असेल तसेच याबाबत शासनाने वेळोवेळी दिलेल्या आदेशांच्या अधीन राहून निर्बंध राहतील.

रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये व शासनाने अधिसूचित केलेल्या इतर शांतता क्षेत्र परिसरात लागू असलेल्या ध्वनीमर्यादा व निर्बंधांचे काटेकोर पालन करणे बंधनकारक राहणार आहे. ध्वनी प्रदूषणाबाबत तक्रार प्राप्त झाल्यास किंवा सदर नियमांचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास कायद्यानुसार आवश्यक कारवाई करण्यात येईल. परवानगीच्या अटींचे उल्लंघन किंवा ध्वनी प्रदूषणाच्या नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांविरुद्ध महाराष्ट्र पोलिस अधिनियम, १९५१ तसेच लागू असलेल्या इतर कायदे व नियमांनुसार कारवाई करण्यात येईल. वारंवार उल्लंघन करणाऱ्या आयोजकांविरुद्ध परवानगी रद्द करणे, ध्वनी निर्माण करणारी उपकरणे जप्त करणे व इतर कायदेशीर कारवाई करण्याबाबत कायदेशीर तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

सदर आदेश जिल्ह्यात दि.५ सप्टेंबर ते दि.१९ सप्टेंबर पर्यंत अंमलात राहील. या आदेशाचा भंग केल्यास महाराष्ट्र पोलिस अधिनियम सन १९५१ चे कलम १३४, १३६ अन्वये तसेच इतर विहित प्रचलित कायद्यान्वये कार्यवाहीस पात्र राहतील तसेच महाराष्ट्र पोलिस अधिनियम सन १९५१ कलम ७० अन्वये ध्वनीक्षेपकाचे साहित्य जप्त करण्यात येईल, असे जिल्हा पोलिस अधीक्षकांनी आदेशात नमूद केले आहे.

माहोरेच्या कारभाराची अखेर चौकशी

# तक्रारींकडे डोळेझाक करणाऱ्या विद्यापीठ प्रशासनाला मंत्र्यांचा दणका

## चंद्रकांत पाटील ॲक्शन मोडमध्ये; उच्च शिक्षण विभागाला चौकशीचे आदेश, पदावरून दूर करण्याचीही मागणी

**अमरावती जनमाध्यम :** नागपूर विद्यापीठातील आजीवन शिक्षण व विस्तार विभागाचे संचालक समित माहोरे यांच्या कथित भ्रष्टाचार आणि अनियमिततेच्या तक्रारींनी आता गंभीर वळण घेतले आहे. माहोरे यांच्या कारभाराबाबत मागील अनेक दिवसांपासून विद्यापीठाच्या कुलसचिव मीनाक्षी क्षीरसागर यांच्याकडे विविध तक्रारी करण्यात आल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. मात्र तक्रारींवर अपेक्षित कारवाई होत नसल्याने अखेर तक्रार थेट उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे पोहोचली.

तक्रारीची गंभीर दखल घेत मंत्री पाटील यांनी तातडीने चौकशीचे आदेश दिल्याने विद्यापीठ प्रशासनाच्या कारभारावरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. प्रकरणाची चौकशी निष्पक्ष आणि कोणत्याही दबावाशिवाय व्हावी, यासाठी उच्च शिक्षण विभागाच्या संचालकांना आवश्यक कारवाईचे निर्देश देण्यात आल्याचे सांगण्यात येते.

विद्यापीठाच्या दारात तक्रारी धूळ खात पडल्या आणि मंत्र्यांच्या दालनात पोहोचताच चौकशीचे आदेश निघाले, मग प्रशासनाची जबाबदारी नेमकी कुठे असा प्रश्न आता उपस्थित होत आहे.

चौकशीत समित माहोरे यांच्या कारभाराबाबत नेमके कोणते खुलासे होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. चौकशीवर कोणताही प्रभाव पडू नये म्हणून समित माहोरे यांना पदावरून दूर करून चौकशी करावी, अशी मागणी तक्रारदारांनी केली आहे.

आता चौकशीचा हातोडा कुणावर पडतो आणि विद्यापीठ प्रशासन काय भूमिका घेते, याचीच खरी कसोटी आहे.

# शिक्षक दिनानिमित्त डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांना केले अभिवादन

**वर्धा जनमाध्यम :** महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठात भारताचे महान तत्त्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ आणि माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती शिक्षक दिन म्हणून श्रद्धा आणि सन्मानपूर्वक साजरी करण्यात आली. या निमित्ताने विद्यापीठाच्या प्रशासकीय भवनात आयोजित कार्यक्रमात डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून तसेच पुष्प अर्पित करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली.

कार्यक्रमात विद्यार्थी कल्याण अधिष्ठाता प्रा. अवधेश कुमार यांनी डॉ. राधाकृष्णन यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या शिक्षणविषयक तत्त्वज्ञानाचे, मानवी मूल्यांचे आणि राष्ट्रनिर्माणातील



शिक्षकांच्या भूमिकेचे स्मरण केले. त्यांनी सांगितले की, डॉ. राधाकृष्णन यांचे जीवन शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्रोत आहे. त्यांचे आदर्श आजही शिक्षणक्षेत्राला नवी दिशा देतात.

या प्रसंगी विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी पुष्प अर्पण करून डॉ. राधाकृष्णन यांना अभिवादन केले तसेच शिक्षणक्षेत्रातील त्यांच्या अमूल्य योगदानाचे स्मरण केले.

कार्यक्रमास डॉ. एच. ए. हुनगुंद, डॉ. राजीव रंजन राय, डॉ. वीरेंद्र प्रताप यादव, डॉ. श्रीनिकेत कुमार, डॉ. परिमल प्रियदर्शी, डॉ. जयंत उपाध्यक्ष, डॉ. गिरीशचंद्र पाण्डेय, डॉ. रणंजय सिंह, डॉ. तेजस्वी एच. आर., बी. एस. मिरगे यांच्यासह अनेक शिक्षक, कर्मचारी आणि विद्यार्थी उपस्थित होते.

# शेतात विजेचा धक्का; युवकाचा मृत्यू

**आष्टी शहीद जनमाध्यम :** शेतात डवरणीचे काम सुरू असताना विजेच्या लोखंडी तारेला स्पर्श झाल्याने ३६ वर्षीय युवकाचा मृत्यू झाल्याची घटना तालुक्यातील साहूर येथे घडली. किशोर भास्करराव लवणकर असे मृत युवकाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, किशोर याने वडिलांना शेतात खताची पोती आणून देण्यास सांगितले होते. त्यानुसार वडिलांनी बैलगाडीने खताची पोती शेतात नेऊन दिली. त्यानंतर किशोरने खत खाली उतरविले. दरम्यान, किशोरचे कुटुंबीय शेतातील कामासाठी गेले होते. दुपारी तीनच्या सुमारास ते घरी परतल्यानंतर किशोर अद्याप घरी आला नसल्याचे त्यांच्या लक्षात आले.

सायंकाळी सहाच्या सुमारास कुटुंबीयांनी शेतात जाऊन शोध घेतला असता किशोर शेतातील पुऱ्याजवळ जमिनीवर चितावस्थेत पडलेला दिसून आला. त्याचे कपडे पावसाने पूर्णपणे भिजले होते. डाव्या हातात बॅटरीच्या वायरचा लोखंडी ताराचा भाग आढळून आला, तर उजव्या हाताने त्याने झाड घट्ट पकडल्याचे दिसून आले.

घटनेची माहिती पोलीस पाटील व सरपंचांना देण्यात आली. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत किशोरला आष्टी येथील शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. विजेच्या धक्क्यामुळे मृत्यू झाल्याचा प्राथमिक अंदाज असून या घटनेत कोणावरही संशय नसल्याचे कुटुंबीयांनी पोलिसांना सांगितले. याप्रकरणी आष्टी पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून तपास सुरू आहे.

## रेल्वे बोर्डाच्या दारात वर्ध्याचा हक्काचा रेल्वेमार्ग

# पुलगाव-आर्वी-वरूड मार्गाला तातडीने मंजुरी द्या- खा.काळे

### लष्करी डेपो जोडणारा मार्ग राष्ट्रीय सुरक्षेसाठी निर्णायक; १२ वर्षे रखडलेल्या पुलगाव पुलावरही संताप

**वर्धा जनमाध्यम :** वर्धा लोकसभा मतदारसंघाच्या रेल्वे प्रश्नांवर खासदार अमर काळे यांनी रेल्वे विभागाच्या बैठकीत आक्रमक भूमिका घेतली. विकासाच्या नकाशावरून वर्षानुवर्षे रेल्वेपासून दूर ठेवलेल्या आर्वी-आष्टी-कारंजा पट्ट्याला आता रेल्वे जोडणी मिळालीच पाहिजे, अशी ठाम भूमिका घेत त्यांनी पुलगाव-आर्वी-वरूड ब्रॉडगेज रेल्वे मार्गाचा प्रस्ताव कोणत्याही विलंबाविना रेल्वे बोर्डाकडे पाठवावा, अशी मागणी केली.

नागपूर येथील विभागीय रेल्वे प्रबंधक कार्यालयात नागपूर व भुसावळ मंडळ रेल्वे समितीची खासदारांसोबत बैठक झाली. या बैठकीत काळे यांनी वर्धा मतदारसंघातील प्रलंबित प्रश्नांचा पाढाच रेल्वे प्रशासनासमोर वाचला. सर्वेक्षण पूर्ण झालेला पुलगाव-आर्वी-वरूड मार्ग सध्या नागपूर विभागीय कार्यालयाच्या तपासणीच्या टप्प्यात असल्याची माहिती प्रशासनाने दिली. पुढे तो मुंबईतील महाव्यवस्थापक आणि त्यानंतर रेल्वे बोर्डाकडे पाठविला जाणार आहे.

**विकासासोबत राष्ट्रीय सुरक्षेची कडी-** पुलगाव आणि आमला येथे लष्कराचे महत्त्वाचे दारुगोळा डेपो आहेत. प्रस्तावित रेल्वेमार्गामुळे या दोन्ही संरक्षणविषयक केंद्रांना रेल्वेने जोडण्याचा पर्याय निर्माण होणार आहे. त्यामुळे संरक्षण साहित्याची वाहतूक अधिक सुरक्षित, वेगवान आणि सुलभ होऊ शकते. हा केवळ विकासाचा मार्ग नसून राष्ट्रीय सुरक्षेशी जोडलेला विषय आहे. त्यामुळे केंद्राने याकडे केवळ रेल्वे प्रकल्प म्हणून न पाहता राष्ट्रीय हिताचा प्रकल्प म्हणून प्राधान्य द्यावे, असा स्पष्ट संदेश काळे यांनी दिला.



**१२ वर्षे झाली तरी पुलगावचा पूल कागदावरच-** २०१४ मध्ये मंजुरी मिळालेला पुलगाव येथील रेल्वे पूल तब्बल १२ वर्षांनंतरही पूर्ण न झाल्याने खासदारांनी रेल्वे प्रशासनाला धारेवर धरले. मंजूर कामे वर्षानुवर्षे रखडत असतील तर जबाबदारी निश्चित करून कामाला गती द्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

**हिंगणघाटचे १४ थांबे कुठे गेले**

कोरोना काळात बंद झालेले हिंगणघाटचे रेल्वे थांबे अद्याप पूर्णपणे पूर्ववत झालेले नाहीत. पूर्वी १९ गाड्यांना थांबा असताना आता केवळ पाच गाड्यांचे थांबे सुरू आहेत. उर्वरित थांबे तातडीने सुरू करण्याची मागणी करण्यात आली. सेवाग्राम आश्रमाच्या नावाने धावणाऱ्या एक्सप्रेसला सेवाग्राम येथेच थांबा नसल्याचा मुद्दाही काळे यांनी उपस्थित केला.

**रेल्वे सेवांचे जाळे विस्तारण्याची मागणी-** नागपूर-वर्धा-भुसावळ-खंडवा रेल्वे सेवा सुरू करण्याबरोबरच वर्धा-कळंब गाडी शेगावपर्यंत वाढविण्याची मागणीही करण्यात आली. त्यामुळे कळंब, देवळी, यवतमाळ परिसरातील भाविकांना शेगावच्या गजानन महाराजांच्या दर्शनासाठी थेट रेल्वे सुविधा मिळण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.

दरम्यान, पवनार येथील शेतकऱ्यांचा शेतीकडे जाणारा मार्ग बॅरिकेड टाकून बंद करण्यात आल्याचा प्रश्नही मांडण्यात आला. रेल्वे अंडरपासमध्ये पावसाचे पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय करण्याची मागणी करण्यात आली.

वर्ध्याच्या रेल्वे विकासाला आता आश्वासनांची नव्हे तर निर्णयांची गरज आहे. पुलगाव-आर्वी-वरूड मार्ग रेल्वे बोर्डाच्या टेबलावर पोहोचणे आणि त्याला मंजुरी मिळणे हीच पुढील खरी कसोटी ठरणार आहे.

# सतीश लोणारे यांची विदर्भ प्रदेशाध्यक्षपदी फेरनियुक्ती

**वर्धा जनमाध्यम :** लोक जनशक्ती पार्टी रामविलासच्या राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत सतीश लोणारे यांची विदर्भ प्रदेशाध्यक्षपदी फेरनियुक्ती करण्यात आली. पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष चिराग पासवान यांच्या निर्देशानुसार ही नियुक्ती करण्यात आली असून, पक्षाचे प्रधान महासचिव अब्दुल खालिद यांनी नियुक्तीची घोषणा केली.



फेरनियुक्तीनंतर सतीश लोणारे यांनी राष्ट्रीय अध्यक्ष चिराग पासवान तसेच राष्ट्रीय कार्यकारिणीतील सर्व पदाधिकाऱ्यांचे आभार मानले. त्यांच्या नियुक्तीचे विदर्भातील विविध जिल्ह्यांतील पक्ष पदाधिकाऱ्यांनी स्वागत करून अभिनंदन केले.

यावेळी देविदास बारसागडे, केशव तितरे, कुसुमसिंग ठाकूर, ॲड. आशिष मोहळ, मनोहर गणेर, विनय शर्मा, वर्धा जिल्हाध्यक्ष डॉ. आनंद जगताप, वीरेंद्र मेश्राम, मनोज खोब्रागडे, योगेश वानखेडे, मोहम्मद रज्जाक, सलील शेख यांच्यासह अनेक पदाधिकाऱ्यांनी शुभेच्छा दिल्या.

# मयुरेश सावंत, स्वरा करमरकर राज्यविजेते

## अंडर-१७ महाराष्ट्र राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत दमदार कामगिरी




**वर्धा जनमाध्यम :** जिल्हा क्रीडा संकुलात रंगलेल्या ४थ्या महाराष्ट्र राज्य मानांकन टेबल टेनिस स्पर्धेत अंडर-१७ गटात ठाण्याचा मयुरेश सावंत आणि नाशिकची स्वरा करमरकर यांनी विजेतेपद पटकावले. दोघांनीही अंतिम सामन्यात प्रतिस्पर्ध्यांवर मात करत आपल्या खेळातील वर्चस्व सिद्ध केले.

अंडर-१७ मुलांच्या अंतिम सामन्यात मयुरेश सावंतने ठाण्याच्याच प्रतीक तुळसानीचा ११-५, ११-७, ११-७ असा सरळ तीन गेममध्ये पराभव केला. उपांत्य फेरीत मयुरेशने अहान गोसरचा ११-७, १२-१०, १२-१० असा पराभव केला. दुसऱ्या उपांत्य सामन्यात प्रतीक तुळसानीने पुण्याच्या श्रेयस मानकेश्वरचा ११-७, ११-६, १४-१२ असा पराभव करत अंतिम फेरी गाठली.

मुलींच्या अंडर-१७ गटात नाशिकच्या स्वरा करमरकरने रंगतदार अंतिम लढतीत ठाण्याच्या त्रिशा लुडबेचा ११-४, ११-५, ९-११, ६-११, ११-० असा पाच गेममध्ये पराभव केला. उपांत्य फेरीत स्वरा हिने पुण्याच्या स्वारदा सानेचा ११-६, ६-११, ८-११, ११-४, ११-४ असा पराभव केला. त्रिशाने जिनाया वाधनचा ११-५, ११-६, ११-७ असा पराभव करत अंतिम फेरीत प्रवेश केला. वर्धा जिल्हा अमेच्युअर टेबल टेनिस असोसिएशनच्या वतीने २ ते ६ सप्टेंबरदरम्यान ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांतील खेळाडूंच्या सहभागामुळे स्पर्धेत चुरस निर्माण झाली आहे.

# बारा वर्षांच्या चिमुकलीला फुफ्फुसाने दिला नवा श्वास

## वर्ध्यात फुटलेल्या हायडेटिड सिस्टवर दुर्मिळ फुफ्फुस वाचविणारी शस्त्रक्रिया

**वर्धा जनमाध्यम:** अचानक श्वास घेण्यास त्रास आणि कफासह खोकल्याने त्रस्त असलेल्या बारा वर्षीय चिमुकलीला वर्ध्यातील आचार्य विनोबा भावे ग्रामीण रुग्णालयातील डॉक्टरांनी नवा श्वास दिला. फुफ्फुसातील फुटलेल्या हायडेटिड सिस्टवर डॉक्टरांच्या पथकाने दुर्मिळ आणि गुंतागुंतीची शस्त्रक्रिया यशस्वीपणे केली.

पाळीव बकऱ्यांच्या सतत संपर्कामुळे डॉक्टरांना हायडेटिड आजाराचा संशय आला. तपासणीत उजव्या फुफ्फुसाच्या खालच्या भागात सहा बाय पाच बाय पाच सेंटीमीटरची सिस्ट फुटलेली आढळली. मुलीचे वय कमी असल्याने आजारग्रस्त भाग काढताना निरोगी फुफ्फुस सुरक्षित ठेवणे अत्यंत आवश्यक होते.



डॉ. राजू कमलाकर शिंदे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने फुफ्फुस वाचविणारी ॲनाटॉमिकल सेगमेंटेक्टॉमी केली. आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने आजारग्रस्त भाग वेगळा करून निरोगी फुफ्फुसाचा बहुतांश भाग सुरक्षित ठेवण्यात आला.

शस्त्रक्रियेनंतर मुलीची प्रकृती सुधारली असून श्वास घेण्याचा त्रास पूर्णपणे दूर झाला आहे. या यशामुळे चिमुकलीला पुन्हा निरोगी आयुष्याची आशा मिळाली आहे. डॉक्टरांच्या या कामगिरीचे रुग्णालय प्रशासनाने कौतुक केले.

# बोगस डॉक्टरचा पर्दाफाश; ॲलोपॅथी औषधांचा साठा जप्त

## वैद्यकीय पदवी, नोंदणी नसतानाही दवाखाना थाटला; वर्धमनेरीत आरोग्य विभागाची धडक कारवाई

**आर्वी जनमाध्यम :** वैद्यकीय व्यवसायाची कोणतीही वैध शैक्षणिक पात्रता अथवा महाराष्ट्र वैद्यक परिषदेची नोंदणी नसतानाही स्वतःला डॉक्टर म्हणून भासवून रुग्णांवर उपचार करणाऱ्या कथित बोगस डॉक्टरचा आरोग्य विभागाच्या पथकाने पर्दाफाश केला. वर्धमनेरी येथे दवाखाना थाटून रुग्णांवर उपचार करणाऱ्या रंजनकुमार नालीनी मंडल याच्यावर कारवाई करण्यात आली. त्याच्या दवाखान्यातून विविध प्रकारची ॲलोपॅथी औषधे आणि इंजेक्शनचा साठा जप्त करण्यात आला. या प्रकरणी तळेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली आहे.

तालुकास्तरीय बोगस डॉक्टर शोध समितीच्या पथकाने ४ सप्टेंबर रोजी वर्धमनेरी येथे ही कारवाई केली. तालुका आरोग्य अधिकारी तथा समितीच्या सचिव डॉ. उषा अनिल कवरासे यांच्या तक्रारीवरून रंजनकुमार मंडल याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम ३१९ (२), २७८ तसेच महाराष्ट्र वैद्यक व्यवसायी अधिनियम १९६१ मधील कलम ३३ (१), ३३ (२) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**डॉ. रंजन कुमार नावाने दवाखाना**

आरोग्य विभागाच्या पथकाला वर्धमनेरी येथील खासगी वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींच्या यादीत मंडल याचे नाव आढळले होते. २७ ऑगस्ट रोजी झालेल्या समितीच्या बैठकीत त्याच्याकडील वैद्यकीय नोंदणी प्रमाणपत्र आणि संबंधित कागदपत्रांची तपासणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार ४ सप्टेंबर रोजी पथक वर्धमनेरी येथे पोहोचले. संतोष भुतडा यांच्या मालकीच्या गाळ्यात 'साईराम दवाखाना, डॉ. रंजन कुमार' असा फलक लावलेला आढळला. या फलकावर मुळव्याध, भगंदर, अंडवृद्धी, गुप्तरोग, खाज आणि तापावर उपचार केले जात असल्याचे नमूद होते.

**वैद्यकीय पदवीऐवजी संस्थेचे प्रमाणपत्र-** पथकाने दवाखान्यातील व्यक्तीची चौकशी केली असता त्याने आपले नाव रंजनकुमार नालीनी मंडल असल्याचे सांगितले. त्याच्याकडे वैद्यकीय पदवी आणि व्यवसायासाठी आवश्यक नोंदणी प्रमाणपत्र मागण्यात आले. त्यावेळी त्याने कोलकाता येथील 'बेलघरिया मेडिकल अँड एज्युकेशनल ट्रेनिंग इन्स्टिट्यूट'चे प्रमाणपत्र सादर केले. मात्र, ते मान्यताप्राप्त वैद्यकीय पदवीचे प्रमाणपत्र नसल्याचे पथकाच्या तपासणीत आढळले. महाराष्ट्र वैद्यक परिषदेची आवश्यक नोंदणी असल्याबाबत विचारणा केली असता त्याच्याकडे कोणतेही वैध नोंदणी प्रमाणपत्र नसल्याचे त्याने पंचांसमक्ष सांगितल्याचे तक्रारीत नमूद आहे.

**रुग्णांच्या नोंदी गायब; औषधांचा साठा मात्र सापडला**

दवाखान्याची झडती घेतली असता रुग्ण तपासणी रजिस्टर आढळून आले नाही. रुग्णांना कोणता उपचार देण्यात आला किंवा कोणती औषधे देण्यात आली, याच्या नोंदीही ठेवण्यात आल्या नसल्याचे समोर आले. तपासणीदरम्यान डायक्लोफिनॅक, एव्हिल, व्होमिकाइंड, जेंटामायसिनसह विविध ॲलोपॅथी औषधे, इंजेक्शन, सिरप, जेल आणि कॅप्सूलचा साठा आढळला. हा औषधसाठा पंचांसमक्ष सीलबंद करून पुराव्याकामी ताब्यात घेण्यात आला. ही कारवाई गटविकास अधिकारी तथा समिती अध्यक्ष शिवशंकर इंगोले, वैद्यकीय अधिकारी डॉ. सौदामिनी हरडे, विस्तार अधिकारी गोपाल चौधरी, औषध निर्माण अधिकारी संदिप वाघ यांच्यासह पथकाने केली. पोलिसांनी आरोपीला अटक केली असून पुढील तपास सुरू आहे.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

# राज्यात तब्बल अडीच लाख शिक्षक 'ऑल इन वन'!

## एका शिक्षकाच्या खांद्यावर सर्व विषयांचे ओझे

**मुंबई /प्रतिनिधी-** पहिली ते पाचवी किंवा सातवीच्या प्राथमिक वर्गांना एकाच शिक्षकाने सर्व विषय शिकवण्याची प्रशासकीय चौकट अनेक दशकांपासून चालत आली असली, तरी बदलती संचमान्यता आणि शाळांच्या वर्गवारीनुसार भाषा, गणित, विज्ञान, सामाजिक शास्त्रे अशा विविध विषयांचे अध्यापन एकाच शिक्षकाला करावे लागत आहे. राज्यातील एकूण ७ लाख ४६ हजार ३७७ शिक्षकांपैकी २ लाख ४७ हजार १२७ (३३.११ टक्के) शिक्षक ऑल इन वन म्हणून काम करत आहेत.

शिक्षक दिनाच्या पार्श्वभूमीवर शालेय शिक्षण विभागाकडे असलेल्या आकडेवारीतून विषयनिहाय शिक्षकांची माहिती समोर आली आहे. राज्यात पहिली ते बारावीपर्यंत एकूण १ लाख ८ हजार ९५ शाळा असून, यामध्ये २ कोटी १५ लाख ३२ हजार ३८९ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.

या अवाढव्य पटसंख्येसाठी ७ लाख ४६ हजार ३७७ शिक्षक राज्यात कार्यरत आहेत. या शिक्षकांपैकी तब्बल २ लाख ४७ हजार १२७ सर्व विषय शिकवण्यासाठी अव्वल स्थानी आहेत त्यानंतर स्वतंत्र विषयांमध्ये इंग्रजी शिकवणारे ८१ हजार ७१६, तर गणिताचे ७९ हजार ८०२, विज्ञानासाठी ५८ हजार ५१ आणि हिंदीसाठी ४३ हजार ७३१ शिक्षक आहेत. तर दुसरीकडे एकूण शिक्षकांच्या आकडेवारीत पुणे जिल्ह्यात ७८ हजार ३३ शिक्षक सर्वाधिक आहेत तर त्यापाठोपाठ ठाणे (५०,४१५), नाशिक (४०,६५७), मुंबई (३७,७६६), नागपूर (३२,८००), छत्रपती संभाजीनगर (३२,१७९) आणि अहिल्यानगर (३०,९९५) इतके शिक्षक अहेत. सर्वात सिंधुदुर्ग जिल्ह्यात सर्वात कमी अवघे ५ हजार ७०१ शिक्षक कार्यरत आहेत.

तर विदर्भातील भंडारा (६,७००), गडचिरोली (७,८५२), वर्धा (७,९८६) आणि मराठवाड्यातील हिंगोली (८,२२६) या जिल्ह्यांमध्ये शिक्षकसंख्या दहा हजारांपेक्षा कमी आहेत. या जिल्ह्यांमध्येही सर्व विषय शिकवणा-या शिक्षकांचा भार सर्वाधिक आहे; यात पुणे (२१,२९५), नाशिक (१५,२३५), ठाणे (१२,६५६), अहिल्यानगर (१२,०६१) आणि सोलापूर (११,४८८) या जिल्ह्यांमध्ये प्रत्येकी दहा हजारांहून अधिक आहेत.



**इंग्रजी-हिंदीच्या तुलनेत माय मराठीची उपेक्षा-** मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळवून दिल्याचा उत्सव साजरा केला जात असताना, प्रत्यक्ष शाळांमध्ये मात्र माय मराठी शिकवण्यासाठी स्वतंत्र शिक्षकांची संख्या कमी आहे. इंग्रजी शिकवणारे ८१ हजार ७१६ आणि हिंदीसाठी ४३ हजार ७३१ शिक्षक कार्यरत असताना, राजभाषा मराठी शिकवण्यासाठी स्वतंत्रपणे नियुक्त शिक्षकांची संख्या अवघी ११ हजार ३३७ ( १.५२ टक्के) इतकी नगण्य आहे.

**माध्यमिक स्तरावरही ओढाताण-** केवळ प्राथमिकपुरता मर्यादित राहिलेला नसून माध्यमिक स्तरावरही पसरत आहे. प्राथमिक स्तरावर विषयानुसार नव्हे, तर विद्यार्थी संख्येनुसार शिक्षक दिले जातात. यामध्ये माध्यमिकमध्ये ६० टक्के कला पदवीधर (भाषा व समाजशास्त्र -५ पैकी ३ शिक्षक) आणि ४० टक्के विज्ञान पदवीधर (गणित व विज्ञान -५ पैकी २ शिक्षक) असा तासिकांच्या विभागणीचा आकृतीबंध ठरलेला आहे. मात्र, संचमान्यतेतील जाचक अटींमुळे अनेक शिक्षकांची मंजूर पदे कमी झाली तर सेवानिवृत्त शिक्षकांच्या रिक्त जागांवर भरती न झाल्याने बहुतांश शिक्षकावर इतर विषय शिकवावे लागत आहे.

## न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कूलमध्ये श्रीकृष्ण जन्माष्टमी उत्साहात

**अमरावती/प्रतिनिधी-** बालीज नगर मोती नगर वार्डस्थित न्यू गोल्डन इंग्लिश हायस्कुलमध्ये श्रीकृष्ण जन्मोत्सव हर्षोल्हासात संपन्न झाला. शाळेचे संस्थाध्यक्ष अनिल आसलकर यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षीप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांसाठी गोपाळकाला व दहीहंडीचे विशेष आयोजन करण्यात आले होते. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. जयश्री अनिल आसलकर यांच्या हस्ते दहीहंडीचे विधिवत पूजन करण्यात आले. यानंतर जवळपास २० फूट उंचीवर दहीहंडी बांधण्यात आली होती. सकाळपासूनच शाळेतील लहान मुले बाळगोपाळ, गोपिका, राधा आणि कृष्णाच्या सुंदर वेशभूषेत आली होती, ज्यामुळे संपूर्ण परिसर जणू काही गोकुळधामसारखा भासत होता.



दहीहंडी फोडण्यासाठी मुला-मुलींमध्ये प्रचंड चढाओढ पाहायला मिळाली. वरु णराजाच्या (पावसाच्या) साथीने विद्यार्थ्यांनी 'हाथी घोडा पालखी, जय कन्हैया लाल की' अशा जयघोषात दहीहंडी फोडण्याचा आनंद घेतला. श्रीकृष्ण जन्मोत्सवाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांनी विविध कृष्णगीतांवर सुंदर नृत्ये आणि नाटिका सादर केल्या. यामध्ये प्रामुख्याने श्रीकृष्ण-सुदामा भेट आणि बाळकृष्णाच्या विविध लीलांवर आधारित सादरीकरणांचा समावेश होता. दहीहंडी फोडल्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी डीजेच्या तालावर मनसोक्त नृत्य केले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी, शालेय कर्मचारी आणि परिसरातील नागरिकांना गोपाळकाल्याचा प्रसाद वाटप करू न कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## मनोरे नाहीत, थेट 40 फूट ऊंचीवरून विहिरीत झेप घेत गोविंदांनी फोडली हंडी



**मुंबई/प्रतिनिधी :**दहीहंडीचा सण म्हटलं की ढोल-ताशांचा गजर, गगनचुंबी मानवी मनोरे आणि 'गोविंदा आला रे'चा जयघोष डोळ्यांसमोर उभा राहतो. मात्र, रायगड जिल्ह्यातील अलिबाग तालुक्यातील कुर्डुस गावात दरवर्षी दहीहंडीचा एक असा अनोखा आणि अंगावर काटा आणणारा थरार रंगतो, जो पाहण्यासाठी संपूर्ण कोकणातून गर्दी होते. इथे हंडी फोडण्यासाठी कुठलेही थर लावले जात नाहीत, तर चक्क २५ ते ४० फूट उंचीवरून विहिरीच्या मध्यभागी झेप घेत हवेतच हंडी फोडून थेट पाण्यात सूर मारला जातो. कुर्डुस गावातील विहिरीच्या बरोबर मध्यभागी २५ ते ४० फूट उंचीवर दहीहंडी बांधली जाते. गोविंदा विहिरीच्या कठड्यावर उभे राहून पूर्ण वेगाने विहिरीच्या दिशेने धाडसी झेप घेतात. हवेत झेपावतानाच अचूक वेध घेत हाताने हंडी फोडायची आणि त्याच क्षणी विहिरीच्या खोल पाण्यात सुरक्षित उडी घ्यायची, अशी ही थरारक पद्धत आहे. गोविंदांचे हे धाडस, अचूक टायमिंग आणि पाण्यात होणारी धमाकेदार एन्ट्री उपस्थितांचा श्वास रोखून धरते.

**३४ वर्षांची अखंड परंपरा-**या आगळ्यावेगळ्या दहीहंडीला तब्बल ३४ वर्षांचा गौरवशाली इतिहास आहे. १९९२ मध्ये कुर्डुस येथील 'देउळ आळी'तील काही साहसी तरु णांनी एकत्र येउन या परंपरेची सुरु वात केली होती. आज या उपक्रमाला संपूर्ण गावाच्या एकजुटीचे आणि भव्य उत्सवाचे स्वरू प प्राप्त झाले आहे. ही अनोखी हंडी डोळ्यांत साठवण्यासाठी रायगड, मुंबई, ठाणे आणि लगतच्या शहरांतून हजारो नागरिक दरवर्षी कुर्डुसमध्ये गर्दी करतात.

## सरकार विद्यार्थ्यांच्या मोर्चाला घाबरतेय?

**पुणे / प्रतिनिधी-**पोलिसांकडून शहरात कलम १४४ लागू करण्याच्या निर्णयावरून राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी राज्य सरकार आणि पुणे पोलिसांवर सडकून टीका केली आहे. पुण्यात अचानक कलम १४४ लागू करण्याच्या पोलिस आयुक्तांच्या निर्णयावर रोहित पवार यांनी तीव्र संताप व्यक्त केला.

स्वातंत्र्यापूर्वी भारतीयांच्या आंदोलनांना दाबण्यासाठी ब्रिटिश सरकार हे कलम लावत असे. आता पुण्यात हे लागू करण्याचे कारण काय? विद्यार्थी संघटित होउन स्वतःच्या हक्कासाठी लढत आहेत, म्हणून सरकार घाबरले आहे का? असा सवाल त्यांनी उपस्थित केला. काही दिवसांपूर्वी भाजपच्या राजकीय नेत्याचा कार्यक्रम पुण्यात झाला, तिथे मोठी गर्दी होती, तेव्हा कारवाई का झाली नाही? मुख्यमंत्री भाजपच्या कार्यक्रमाला आले तेव्हा कारवाई केली का? पण विद्यार्थ्यांसाठी बसलेल्या शिक्षकांवर कारवाई का केली जातेय? अशी प्रश्नांची सरबत्ती त्यांनी केली.



**शिक्षकांना धमक्या देउ नका**

पुण्याचे पोलिस आयुक्त विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी आलेल्या शिक्षकांना तुमचा जीएसटी भरला का बघतो, तुमच्या इमारतीचे ऑडिट करतो अशा धमक्या देत असल्याचा गंभीर आरोप रोहित पवार यांनी केला. सीपी साहेबांचे काम जीएसटी बघण्याचे नसून पुण्यात दहशत माजवणारी कोयता गँग आणि खराब दारू मुळे जाणारे बळी रोखणे हे आहे. त्यांनी हवेतल्या गप्पा मारणे आणि धमक्या देणे थांबवावे, असा इशारा पवार यांनी दिला. तसेच, विद्यार्थ्यांनी पुण्यात अमरावतीपेक्षा पाच पट मोठा मोर्चा काढण्याचा निर्धार केला असून, परवानगी दिली नाही तरी हा मोर्चा निघणारच, असेही त्यांनी स्पष्ट केले.

**दिशा सालियन आणि गरब्यावरू नही निशाणा-**दिशा सालियन प्रकरणात आदित्य ठाकरे यांच्यावर होणा-या आरोपांवर बोलताना त्यांनी न्यायव्यवस्थेवर विश्वास असल्याचे सांगितले आणि सीबीआय तपासातून सत्य बाहेर येईल, असा विश्वास व्यक्त केला. तसेच, नवरात्रीत गरब्यात प्रवेश देताना ओळखपत्र तपासण्याच्या विश्व हिंदू परिषदेच्या नियमावलीवरही त्यांनी जोरदार टीका केली.

## केतन अग्रवाल हत्याकांडाला नवे वळण

### चेतन-सियाला मदत करणारा तिसरा आरोपी कोण?, बीड कनेक्शन उघड

**पुणे** - शहरातील चर्चेत असणा-या केतन अग्रवाल हत्याकांड प्रकरणाला नवं वळण मिळाले आहे. या प्रकरणी आणखी एका आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. त्याला सहआरोपी बनवले जाउ शकते असं बोलले जाते.माहितीनुसार, पोलिसांच्या ताब्यात असणारा हा नवा आरोपी चेतन चौधरीचा वर्गमित्र रितेश हिंगे हा आहे. १८ जूनला लोहगड किल्ल्यावर केतन अग्रवाल याच्या हत्येचा कट रचण्याबाबत रितेशला आधीच माहिती होते. चेतन चौधरी आणि त्याची गर्लफ्रेंड सिया गोयल या दोघांनी वर्गमित्रासोबत हत्येची योजना बनवली होती. या हत्याकांडाच्या संपूर्ण कटाची चर्चा या तिघांमध्ये झाली होती. चेतन आणि सियाने रितेशलाही लोहगडला सोबत येण्यास अनेकदा सांगितले होते. मात्र त्याने येण्यास नकार दिला. परंतु केतन अग्रवाल हत्याकांडाबाबत रितेशला आधीच माहिती होती. केतनच्या हत्येनंतर कथितपणे चेतन चौधरी आपल्या या मित्राला भेटला होता असा पोलिसांचा संशय आहे. सिया गोयलही त्याच्या संपर्कात होती. आरोपी चेतन चौधरी याच्या फोन रेक?र्डमधून पोलीस रितेश हिंगे याच्यापर्यंत पोहचले. हा आरोपी मूळचा बीड जिल्ह्यातील रहिवासी असल्याचं समोर येत असून तो पुण्यातील बालेवाडी येथे एका खासगी कंपनीत काम करतो. मे महिन्याच्या अखेरच्या आठवड्यातही तो चेतन चौधरीच्या संपर्कात होता. आता या नव्या आरोपीचा हत्याकांडात काय सहभाग होता आणि त्याची गुन्ह्यात काय भूमिका होती याचा शोध पोलीस घेत आहेत. दरम्यान, १८ जूनला लोहगड किल्ल्यावर कधी काय घडले, कुणाला याबाबत माहिती होते आणि कुणाला नाही या सगळ्या प्रश्नांची उत्तरे शोधण्याचं काम पोलीस करत आहेत. परंतु तपासात चेतन आणि सियानंतर आणखी एक नाव समोर आले आहे. हे नाव समोर आल्याने या हत्याकांडात फक्त दोघे नाही तर आणखीही लोक सहभागी असू शकतात असा अंदाज पोलिसांनी वर्तवला आहे.



## सूरज चव्हाण झाला बाबा!; घरात चिमुकल्या परीचे आगमन

**मुंबई/प्रतिनिधी :** : बिग बॉस मराठी ५चा विजेता आणि झापूक झुपूक या नावाने घराघरांत पोहोचलेला सूरज चव्हाण आता बाबा झाला आहे. सूरज आणि त्याची पत्नी संजना यांच्या आयुष्यात एका गोंडस लेकीचं आगमन झालं आहे. जन्माष्टमीच्या खास दिवशी त्यांच्या घरी कन्यारत्नाचा जन्म झाल्याने चव्हाण कुटुंबाचा आनंद द्विगुणित झाला आहे. लेकीच्या जन्माची बातमी समोर येताच सूरजच्या चाहत्यांनी सोशल मीडियावर शुभेच्छांचा वर्षाव सुरू केला आहे. सूरज चव्हाण आणि संजना यांचा विवाह डिसेंबर २०२५ मध्ये झाला होता. लग्नानंतर काही महिन्यांतच त्यांच्या घरी नव्या पाहुण्याचं आगमन होणार असल्याच्या चर्चा रंगू लागल्या होत्या. अभिनेत्री जान्हवी किल्लेकरने संजनाच्या चोर ओटीचा व्हीडीओ शेअर केल्यानंतर या चर्चांना आणखी उधाण आलं होतं. त्यानंतर सूरज आणि संजनाने स्वतः चाहत्यांसोबत ही गोड बातमी शेअर करत लवकरच त्यांच्या आयुष्यात चिमुकला पाहुणा येणार असल्याचं सांगितलं होतं. गर्भावस्थेदरम्यान संजनाचे बेबी बंपसोबतचे अनेक व्हीडीओ सोशल मीडियावर चर्चेत आले होते. काही दिवसांपूर्वी तिचं डोहाळे जेवणही मोठ्या उत्साहात पार पडलं. या कार्यक्रमाच्या आयोजनात जान्हवी किल्लेकरने विशेष पुढाकार घेतला होता. कुटुंबीय आणि जवळच्या व्यक्तींच्या उपस्थितीत हा सोहळा थाटात पार पडला होता.लेकीच्या जन्मानंतर सूरज चव्हाणचा रु ग्णालयातील पहिला व्हीडीओ सोशल मीडियावर समोर आला आहे. सूरजच्या एका चाहत्याने हा व्हीडीओ शेअर केला असून तो सध्या मोठ्या प्रमाणात व्हायरल होत आहे.



मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र राज्य
मतदार याद्यांचे
विशेष सखोल पुनरीक्षण 2026
प्रारूप मतदार यादीत आजच आपले नाव तपासा
electoralsearch.eci.gov.in वर
1. मतदार ओळखपत्र क्रमांक
2. वैयक्तिक माहिती किंवा
3. मोबाईल क्रमांक वापरून शोधा
voters.eci.gov.in वर
PDF स्वरूपातील प्रारूप मतदार यादी उपलब्ध
प्रारूप मतदार यादीमध्ये आपले नाव नसल्यास किंवा आपण नवमतदार असल्यास नमुना क्र. 6 (घोषणापत्रासह) भरा.
नमुना क्र. 6
ONLINE http://voters.eci.gov.in या संकेतस्थळावर किंवा ECINET मोबाईल ॲपवर
OFFLINE मतदार नोंदणी अधिकारी यांच्या कार्यालयात कार्यालयीन वेळेत किंवा BLO कडे
अर्ज स्विकारण्याकरीता मतदान केंद्रावर विशेष मोहिम
शनिवार दि. 19 सप्टेंबर
रविवार दि. 20 सप्टेंबर
शनिवार दि. 26 सप्टेंबर
रविवार दि. 27 सप्टेंबर
मतदार मदत क्र. 1800 22 1950
Chief Electoral Officer Maharashtra | ceo_maharashtra | CEO Maharashtra | CEO_Maharashtra

## एकमेकांना मिठी मारली अन् ढसाढसा रडले!

### 35 वर्षांपासून तातातूट झालेल्या दोन भावांची SIR मुळे झाली भेट

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** हरयाणातील जिंदमध्ये, एसआयआरने ३५ वर्षांपासून विभक्त झालेल्या दोन भावांना पुन्हा एकत्र आणले. त्यापैकी एक भाउ जिंदमध्ये, तर दुसरा पंजाबमध्ये राहत होता. जेव्हा पंजाबमधील भाउ आपले मतदार ओळखपत्र काढण्यासाठी जिंदला आला, तेव्हा त्याला ३५ वर्षांपासून विभक्त झालेला आपल्या भाउ भेटला.

गेल्या ३५ वर्षांपासून पंजाबमध्ये वास्तव्यास असलेल्या सीताराम यांना एका सरकारी कागदपत्राच्या पडताळणीसाठी आपल्या मूळ शाळेच्या प्रमाणपत्राची गरज भासली. शारीरिकदृष्ट्या दिव्यांग असलेले सीताराम हे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी पंजाबमधून थेट हरयाणातील जिंद येथील आपल्या जुन्या गावी मनोहरपूर येथील शासकीय वरिष्ठ माध्यमिक शाळेत पोहोचले. शाळेतील कर्मचा-यांनी त्यांच्या पडताळणीसाठी गावातील काही ज्येष्ठ नागरिकांना बोलावून घेतले.नेमकी हीच बातमी गावात राहणारे त्यांचे सख्खे बंधू कृष्णा यांच्या कानावर पडली आणि त्यांच्या आनंदाला पारावार उरला नाही. कारण ज्या भावाचा गेल्या साडेतीन दशकांपासून कसलाही थांगपत्ता लागत नव्हता, तोच भाउ गावात परतल्याचे त्यांना समजले होते. कृष्णा यांनी एका क्षणाचाही विलंब न करता थेट शाळा गाठली आणि बीएलओला फोन लावून खात्री दिली, 'हो, हा माझाच सख्खा भाउ आहे मी गेल्या ३५ वर्षांपासून डोळ्यांत प्राण आणून ज्याची वाट पाहत होतो, तो हाच!'



**त्यांनी एकमेकांना मिठी मारली आणि ते झाले भावूक**

आपल्या भावाला ओळखताच, ते तात्काळ शाळेकडे धावले. एकमेकांना पाहताच, डोळ्यात अश्रू दाटून आले आणि त्यांनी भावुक होउन एकमेकांना आलिंगन दिले. ३५ वर्षांचा वियोग थांबवता येण्यासारखा नव्हता. शाळेच्या आवारात उपस्थित असलेल्या सर्वांसाठी हा क्षण भावनिक आणि अविस्मरणीय ठरला. सीताराम सहा भावांपैकी पाचवा आहे. ते ब-याच काळापासून पंजाबमध्ये राहत होते आणि तिथे सरकारी नोकरी करत होता. यापूर्वी त्यांनी एका खाजगी शाळेत शिपाई म्हणूनही काम केले होते.

**एसआयआरमुळे दोन भावांची पुन्हा भेट-**घटनास्थळी उपस्थित असलेले अतिरिक्तएईआरओ रमेश कुमार यांनी या घटनेचे वर्णन एक अविस्मरणीय अनुभव असे केले. ते म्हणाले की, ही केवळ एक प्रशासकीय पडताळणी प्रक्रिया नव्हती, तर यामुळे अनेक वर्षांपासून विभक्त झालेले दोन भाउ पुन्हा एकत्र आले. ही घटना याचे उदाहरण आहे की, एक साधी प्रशासकीय प्रक्रिया देखील कधीकधी कुटुंबाच्या जीवनात अत्यंत भावनिक आणि अविस्मरणीय क्षण कसे आणू शकते. एसआयआर पडताळणी दरम्यान बीएलओच्या सतर्कतेमुळेच ३५ वर्षांपासून विभक्त झालेल्या भावांना पुन्हा एकत्र येणे शक्य झाले.

## आर्थिक संबंधांपलीकडे मानवी मूल्ये, सांस्कृतिक वारसा आणि परस्पर संवाद आवश्यक -मुख्यमंत्री

**मुंबई/प्रतिनिधी :** जगातील विविध देशांच्या संस्कृती, परंपरा, विचारसरणी आणि जीवनपद्धती वेगवेगळ्या असल्या, तरी मानवतेला जोडणारी काही सार्वत्रिक मूल्ये समान आहेत. समान मूल्यांचा शोध घेत, सांस्कृतिक देवाणघेवाण, परस्पर सन्मान आणि संवादाची व्याप्ती वाढविणे आजची गरज आहे. केवळ आर्थिक सहकार्य नव्हे, तर मानवी मूल्ये, सांस्कृतिक वारसा आणि परस्पर संवादातूनच अधिक समतोल, शांततामय आणि समृद्ध जगाची निर्मिती शक्य आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केले.

ग्लोबल इम्पॅक्ट फोरम २०२६ (GIF) च्या दुस-या पर्वाच्या उद्‌घाटनप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी मुंबई येथील ब्राझीलचे महावाणिज्यदूत जोसे मौरो फोनेस्का कोस्टा कौटो, रशियाचे महावाणिज्यदूत इव्हान फेतिसोव्ह, चीनचे महावाणिज्यदूत किन ती, दक्षिण आफ्रिकाचे महावाणिज्यदूत गेडियन लाबाने यांच्यासह भारत, ब्राझील, रशिया, चीन आणि दक्षिण आफ्रिका या ब्रिक्स देशातील राजनैतिक प्रतिनिधी, उद्योगपती, अभ्यासक व सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. श्रीकृष्ण जन्माष्टमीच्या शुभेच्छा देताना त्यांनी भगवान श्रीकृष्णांच्या सर्वसमावेशकता, धर्मनिष्ठा आणि सत्याच्या विजयाच्या संदेशाचा उल्लेख केला.



मुख्यमंत्री म्हणाले की, सध्याच्या काळात जग अनेक स्तरांवर विखुरलेले असून जागतिक व्यवस्था विविध अर्थांनी असंतुलित झाल्याचे दिसून येते. अशा परिस्थितीत विविध देशांनी एकत्र येण्यासाठी उपलब्ध असलेल्या संधींचा शोध घेण्याची हीच योग्य वेळ आहे. संस्कृती ,मते आणि विचारधारा भिन्न असल्या तरी संवादाच्या माध्यमातून समान मूल्यांवर आधारित परस्पर समज वाढविणे शक्य आहे.

केवळ आर्थिक संबंध आणि व्यापाराच्या माध्यमातून जग अधिक चांगले होउ शकत नाही. त्यासाठी मानवी मूल्यांवर आधारित संवाद, सांस्कृतिक देवाणघेवाण आणि परस्परांच्या अनुभवांतून शिकण्याची प्रक्रिया आवश्यक आहे.

# संपादकीय

## प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# भारतासाठी संधी

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाच्या हद्दीत अमेरिकन सैन्य घुसवले तेव्हाच त्यांनी व्हेनेझुएलाच्या विशाल तेल क्षेत्रावर वर्चस्व मिळवण्याचा इरादा जाहीर केला होता. कॅरॅकस येथील तेल क्षेत्रावर कब्जा करण्याचा त्यांचा हेतू लपून राहिला नव्हता आणि आता तर त्यांनी दक्षिण अमेरिकन देशावर कब्जा करून ते तेल इतरांना विकण्याचा हेतू स्पष्ट केला आहे. अमेरिका-व्हेनेझुएला कराराचा अर्थ अमेरिकेला व्हेनेझुएलाच्या १७ तेल क्षेत्रातील तेल साठ्यांवर नियंत्रण मिळेल आणि यातून ६५ अब्ज डॉलर्सचे कच्चे तेल उपलब्ध होईल. संपूर्ण देशाच्या तेल साठ्यांपैकी एक पंचमांश तेलाएवढे तेल अमेरिका या करारान्वये मिळवू शकेल. व्हेनेझुएलाच्या अध्यक्षपदावरून निकोलस मादुरो गेल्यापासून अमेरिकेचा व्हेनेझुएलाच्या तेलावर डोळा होता. कारण इराणशी अमेरिकेचा सातत्याने सुरू असलेला संघर्ष आणि होर्मुझचा खाडी मार्ग बंद झाला होता. त्यामुळे त्या मार्गाने तेल आणणे सर्वच देशांना अवघड जात होते. त्यामुळे अमेरिकेने व्हेनेझुएलाच्या तेल साठ्यांवर नियंत्रण प्रस्थापित करून आपली कमकुवत होत चाललेली तेलाच्या बाजारातील पत सांभाळली आहे. व्हेनेझुएलाच्या हंगामी अध्यक्षा डेल्सी रॉड्रिग्ज यांनी या कराराचे स्वागत केले आहे. पण दोन्ही देशांतून या कराराला जोरदार विरोध होत आहे. ट्रम्प यांचे माजी व्हेनेझुएलातील प्रतिनिधी इलियट अब्राम्स यांनी कराराला विरोध करताना म्हटले आहे की, रॉड्रिग्ज यांनी फक्त अमेरिकेकडून ते जे मागत आहे ते त्या देशाला देऊन टाकले आहे. पण अमेरिकेला इराण युद्धामुळे तेल आणि गॅसोलिन महाग झाल्याने देशांतर्गत दवावाचा सामना करावा लागत आहे. कच्च्या तेलाच्या किमती मार्च २०२६ पासून २० टक्क्यांनी वाढल्या आहेत. साधारण अमेरिकन नागरिकाला या वाढीचा फटका बसला. आहे आणि अमेरिका-इराण संघर्ष सुरू झाल्यापासून तेलाच्या किमती ३७ टक्क्यांनी, तर अन्नपदार्थांच्या किमती ३ टक्क्यांनी वाढल्या आहेत. दुसरीकडे व्हेनेझुएलाची गरज अशी आहे की, त्या देशाला व्यापक गुंतवणुकीची आवश्यकता आहे. ती अमेरिकन गुंतवणुकीनेच होऊ शकते. पण दोन्ही देशांत हा करार धोकादायक मानला जातो. कारण याची परिणती कायदेशीर आव्हान देण्यात होईल. व्हेनेझुएलाची सार्वभौमता आणि तेल साठ्यावर त्याचे असलेले नियंत्रण अमेरिकेच्या हाती गेलेले अनेकांच्या पचनी पडलेले नाही. त्यामुळेच या कराराला धोकाही आहे, कारण २०२९ मध्ये अमेरिकेच्या अध्यक्षपदी नवा माणूस येईल आणि तो हा करार गुंडाळू शकतो. अमेरिका आणि व्हेनेझुएलाचे व्हायचे ते होईल, पण आपल्याला महत्त्वाचे आहे ते म्हणजे भारतावर याचा काही सकारात्मक परिणाम होईल का. आणि याचे उत्तर 'होय' असे आहे. म्हणजेच अमेरिकेने व्हेनेझुएलातील तेल क्षेत्रात १७ ठिकाणी तावा मिळवल्याने भारतासाठी स्टेक्स वाढले आहेत. त्यात आता भारताची दावेदारी वाढली आहे. व्हेनेझुएलाकडे जगातील सर्वात मोठा तेल साठा आहे. पण आर्थिक संकटे, गुंतवणुकीची कमतरता आणि अमेरिकेने लावलेल्या प्रतिबंधांमुळे व्हेनेझुएला आपल्याकडील फक्त १ टक्के तेल उत्पादन करू शकतो. निकोलस मादुरोयांच्या अटकेनंतर अमेरिका आणि व्हेनेझुएला यांच्यातील संबंध सुधारले आहेत. पण व्हेनेझुएलाकडे जगातील सर्वात मोठा तेल साठा असूनही तो देश गरीबच आहे. याला कारण आहे ते तेल उत्पादनातील सततची घसरण आणि अमेरिकेचे प्रतिबंध. अमेरिका आणि व्हेनेझुएला यांच्यातील या कराराचा तत्काळ परिणाम तर तेलाच्या किमतीवर होणार नाही, पण जागतिक बाजारात तेलाच्या किमती स्थिर होण्यास मदत होईल. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाची किंमत वाढल्याने किंवा कमी झाल्याने देशांतर्गत किमती लगेचच बदलत नाहीत. पण डॉलरचा दर, शुद्धीकरणाचा खर्च आणि इतर घटकांवर तेलाच्या किमती अवलंबून असतात. भारत ८५ टक्के कच्चे तेल आयात करतो. याचा परिणाम चालू खात्यातील तूट, महागाई आणि आर्थिक समतोलावर होत असतो. व्हेनेझुएलाकडून होणारा तेल पुरवठा वाढला, तर भारतासाठी इनपुट किमती कमी असल्याने आणि आयात बिल कमी झाल्याने भारताला त्याचा फायदा होऊ शकतो. म्हणजेच हा करार भारताच्याही फायद्याचा आहे. जागतिक तेलाच्या किमतीत फ्लक्च्युएशन्स म्हणजे चढ-उतार झाल्याने त्याचा परिणाम परिवहन, अन्नपदार्थांची महागाई आणि उत्पादनावर होत असतो. रोखे बाजारातही या कराराचा परिणाम होईल, कारण ऊर्जा कंपन्यांच्याशेअर्सच्या किमती वाढतील आणि त्यामुळे गुंतवणूकदार अधिक आकर्षित होतील. अमेरिकेला तेल बाजारात व्हेनेझुएलाच्या ६५ अब्ज बॅरल तेलावर नियंत्रण मिळाल्याने अमेरिकेचा तेल पुरवठा वाढेल आणि चीन व रशियाकडून तेलावरील वर्चस्व कमी होईल. हा करार मादुरो यांच्या अटकेनंतर ९ महिन्यांनी करण्याचे कारण म्हणजे ट्रम्प यांच्यावर देशांतर्गत दबाव तर आहेच, पण सहा महिने झाले तरीही अमेरिका-इराण युद्ध संपण्याची कसलीही चिन्हे नाहीत. व्हेनेझुएलाकडे जगातील तेल साठ्यांपैकी एकूण ३०३ अब्ज कच्च्या तेलाचा साठा आहे; परंतु पायाभूत रचना (इन्फ्रास्ट्रक्चर) नसल्यामुळे व्हेनेझुएला एला केवळ १ टक्के उत्पादन करू शकतो. पण एक गोम आहे. ट्रम्प यांनी म्हटले आहे की, भारताला तेल खरेदी करायचे असेल तर ते करू शकतो, पण सौदा पूर्ण अमेरिकेच्या नियंत्रणाखाली राहील. अर्थात या कराराच्या अटी अजून निश्चित केलेल्या नाहीत. व्हेनेझुएलाकडे जगातील सर्वात मोठे तेल भांडार आहे आणि तितके रशियाकडे अथवा चीनकडेही नाही. पण निर्बंधांमुळे भारत जो पूर्वी तेल खरेदी करत होता, तो आता खरेदी करू शकत नाही. भू-राजकीय संदर्भही याला कारण आहेत. भारत रशियाकडून तेलाची खरेदी हळूहळू कमी करत आहे, कारण अमेरिकेचा दबाव आहे. रशिया भारताचा मित्र होता, पण बदलत्या संदर्भात भारत-रशिया मैत्रीकडे पाहिले पाहिजे. पण केवळ अमेरिकेचा दबाव हेच कारण नाही, तर तेलाच्या किमती जास्तीत जास्त उतरत आहेत. त्याला अनेक कारणे आहेत, त्यातील एक प्रमुख कारण म्हणजे विद्युत वाहनांची (इलेक्ट्रिक वाहने) वाढती संख्या. मागणी आणि पुरवठा हेच दोन घटक तेलाचे भाव ठरवत असतात. त्यांच्यामुळेच तेलाच्या किमतीत चढ-उतार होत असतात.

# महागाईचे बदलणारे स्वरूप

**सध्याच्या बदलत्या जीवन शैलीत महागाईचे स्वरूपही झपाट्याने बदलत चालले आहे. पूर्वी महागाईचा अर्थ केवळ भाजीपाला, गॅस, पेट्रोल किंवा अन्नधान्याच्या वाढलेल्या किमतीं शी जोडला जात असे; परंतु आज त्याची व्याप्ती वाढली असून मनोरंजनापासून ते छोट्या छोट्या आनंदाच्या क्षणांपर्यंत प्रत्येक गोष्ट महाग झाली आहे. या नव्या आर्थिक वास्तवाचे वर्णन करण्यासाठी 'फनफ्लेशन' आणि 'ट्रीटफ्लेशन' यांसारख्या शब्दांचा वापर केला जात आहे. हे बदल जगण्याच्या आणि खर्च करण्याच्या सवयींनाही पूर्णपणे बदलत आहेत.**

महागाई म्हटले की, आतापर्यंत डोळ्यांसमोर यायचं ते कांदा-बटाटा, टोमॅटो, धान्य, पेट्रोल आणि स्वयंपाकाचा गॅस, पण आता या यादीत एक नवा शब्द जोडला गेला आहे – 'फनफ्लेशन'. सिनेमाची तिकिटे, कॉन्सर्ट, वीकेंड ट्रिप, कॅफेतली कॉफी, डेट आणि फूड डिलिव्हरी यांसारख्या रोजच्या छोट्या छोट्या विरंगुळादायी घटकांवरही आता महागाईचा थेट परिणाम दिसू लागला आहे. अर्थव्यवस्थेतील हा बदलता चेहरा समजावण्यासाठी दोन नवे शब्द चलनात आले आहेत-फनफ्लेशन आणि लाईफस्टाईलफ्लेशन. या दोन्ही संकल्पना छोट्या छोट्या आनंदांना महाग बनवत असून लोक आता आपला खर्च गुपचूप कमी करण्याचे मार्ग शोधत आहेत. आंतरराष्ट्रीय कलाकारांच्या भारतातील कॉन्सर्टच्या तिकिटांची किंमत कधी कधी एका कुटुंबाच्या महिनाभराच्या रोजच्या खर्चाइतकी असल्याचे दिसून आले आहे. या भाववाढीमागचे एक मोठे कारण समोर आले आहे. जूनमध्ये एफएमसीजी (फास्ट मूव्हिंग कन्झ्युमर गुड्स) कंपन्यांनी कर दरात पाच टक्के वाढ झाल्याचं कारण देत वाढलेल्या खर्चापैकी तब्बल ३० टक्के भार थेट ग्राहकांवर टाकला आहे. विशेष म्हणजे या कंपन्यांनी थेट किंमत वाढवण्याऐवजी एक वेगळी युक्ती वापरली, ती म्हणजे पॅकेटमधील उत्पादनाचेप्रमाणच कमी करून टाकलं. याला 'श्रिंकफ्लेशन' असंही संबोधतात.

देशभरातील किरकोळ बाजारात खाद्यतेलाच्या सरासरी दरांत मोठी झेप दिसून येते. ऑगस्ट २०२५ ते ऑगस्ट २०२६ या एका वर्षात सर्वच प्रकारच्या खाद्य तेलांच्या किमती १० ते २७ टक्क्यांनी वधारल्या आहेत. विशेषतः पामतेलाच्या दरात सर्वाधिक म्हणजेच २७.४ टक्क्यांची वाढ झाली असून ऑगस्ट २०२५ मध्ये १३१ रुपये प्रति किलो असणारे हे तेल ऑगस्ट २०२६ मध्ये १६७ रुपयांवर पोहोचले आहे. सूर्यफूल तेलाच्या किमतीतही मोठी उडी पाहायला मिळाली असून एका वर्षापूर्वी १६१ रुपये असणारे सूर्यफूल तेल आता २०१ रुपयांना (२४.८ टक्के वाढ) विकले जात आहे. याशिवाय, शेंगदाणा तेलाचे भाव १८७ रुपयांवरून वाढून २०७ रुपये (१०.७ टक्के वाढ) झाले आहेत. मोहरीच्या तेलाचे दर १८८ रुपयांवरून २०३ रुपयांवर (८ टक्के वाढ) गेले आहेत. वनस्पती तुपाची किंमत १५४ रुपयांवरून वाढून १६७ रुपये (१२.१ टक्के वाढ) झाली आहे, तर सोयाबीन तेल १४७ रुपयांवरून १६५ रुपयांवर (१२.२ टक्के वाढ) पोहोचले आहे.

साखर कारखान्यांना साखरेसाठी मिळणाऱ्या भावात वाढ झालेली नसली तरी ऐन सणासुदीच्या काळात साखरेच्या दराने उसळी घेतली आहे. अनेक शहरांत साखरेचा भाव प्रतिकिलो ७५ रुपयांपुढे गेला आहे. साखरेच्या निर्यातीवर बंदी घातल्यामुळे देशांतर्गत बाजारात साखरेचे दर पडतील, अशी अपेक्षा असताना ही वाढ झाली आहे हे विशेषत्वाने लक्षात घ्यायला हवे. यामागचे कारण म्हणजे केंद्र सरकारकडूनच देशात विक्रीसाठी या महिन्यासाठी अवघा २० लाख टनाचा कोटा देण्यात आला आहे. यामुळे बाजारात साखर कमी आहे म्हणून दर वाढत आहेत. देशांतर्गत बाजारात एका महिन्यात साखरेच्या किमतीत १० टक्क्यांनी वाढ झाली असून जूनपासून आतापर्यंत ही वाढ तब्बल ३० टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे.

फनफ्लेशनला जोडूनच आणखी एक संकल्पना समोर आली आहे – ट्रिपफ्लेशन. यात प्रवास आणि हॉटेलमधील छोट्या छोट्या गोष्टीही महागल्याचे म्हटले जाते. फूड डिलिव्हरीमध्ये प्लॅटफॉर्म फी, पॅकेजिंग चार्ज, सर्ज प्राइसिंग बिल वाढवत आहेत, तर फूड डिलिव्हरीचा खर्चही ८ ते ९ टक्क्यांनी वाढला आहे. या संपूर्ण चित्राचं विश्लेषण केले असता एक गोष्ट अधोरेखित होते ती म्हणजे




महागाई आता केवळ जगण्यासाठी आवश्यक वस्तूंपुरती मर्यादित राहिलेली नाही. एकीकडे किराणा, खाद्य तेल आणि साखर यांसारख्या जीवनावश्यक वस्तूंचे दर वाढत असताना दुसरीकडे मनोरंजन आणि विश्रांती-विरंगुळ्याच्या खर्चांवरही तितकाच भार पडतो आहे. यामुळे मध्यमवर्गीय कुटुंबांचे बजेट दुहेरी दबावाखाली आले आहे. कंपन्यांनी थेट किंमतवाढीऐवजी प्रमाण कमी करण्याचा मार्ग स्वीकारल्यामुळे ग्राहकांना ही वाढ लगेच लक्षातही येत नसली तरी हळूहळू खिशावरचा ताण वाढत जात आहे.

सर्वात चिंतेची बाब म्हणजे महागाईचे हे संकट येत्या काही महिन्यांत आणखी गडद होण्याची शक्यता आहे. एसबीआय रिसर्चच्या ताज्या अहवालानुसार, ऑगस्ट महिन्यात किरकोळ महागाई दर जुलैमधील ४.७ टक्क्यांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. इतकेच नाही, तर ऑक्टोबर आणि नोव्हेंबर या दोन महिन्यांत महागाईचा दर तात्पुरता ६ टक्क्यांची पातळीही ओलांडू शकतो, त्यानंतर आर्थिक वर्ष २०२६-२७ च्या चौथ्या तिमाहीत तो पुन्हा सुमारे ५ टक्क्यांपर्यंत खाली येण्याची शक्यता या अहवालात वर्तविण्यात आली आहे. याचाच अर्थ, सणासुदीच्या काळात जेव्हा कुटुंबे मोठ्या प्रमाणात खरेदी आणि मौजमजेवर खर्च करतात, नेमक्या त्याच वेळी महागाईचा वेग सर्वाधिक असणार आहे. यातील दिलासादायक बाब म्हणजे सुरुवातीला कमकुवत राहिलेला मान्सून जुलै आणि ऑगस्टमध्ये सावरला असून एकूण पावसाची तूट जूनमधील जवळपास ४०टक्क्यांवरून घटून आता सुमारे १३ टक्क्यांपर्यंत आली आहे. खरीप पेरणीही गेल्या हंगामाच्या तुलनेत केवळ २ टक्क्यांनी कमी झाल्याचे समोर आले आहे. अन्नधान्य पुरवठा सुधारल्यास महागाईला काहीसा लगाम बसू शकतो.

तथापि, रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांनीही महागाईबाबत सावध पवित्रा घेतला आहे. व्याज दरात कोणताही बदल करण्यापूर्वी महागाईच्या दिशेबाबत अधिक स्पष्टता येण्याची प्रतीक्षा असल्याचं त्यांनी पत धोरण समितीच्या ऑगस्ट बैठकीच्या इतिवृत्तात नमूद केलं आहे. सलग चौथ्यांदा समितीने रेपो दर 'जैसे थे' ठेवला असला तरी अन्नधान्य, इंधन आणि इनपुट खर्चातील व्यापक वाढीमुळे भविष्यात दरवाढीचा पर्यायही खुला असल्याचा इशारा गव्हर्नरांनी दिला आहे.

चलनवाढ किंवा महागाई ही उत्पन्न, बचत, गुंतवणूक, रोजगार आणि आर्थिक वाढ या सगळ्यांशी जोडलेली प्रक्रिया आहे.

महागाई वाढली की, ग्राहकांचा खर्च करण्याचा कल बदलतो, बचत कमी होऊ शकते आणि गुंतवणुकीचे निर्णयही प्रभावित होतात. एखाद्या व्यक्तीने वर्षानुवर्षे पैसे साठवले, पण त्या बचतीवर मिळणारा परतावा महागाईच्या दरापेक्षा कमी राहिला तर कागदावर रक्कम वाढत असली तरी तिची प्रत्यक्ष क्रयशक्ती कमी होत असते. उदाहरणार्थ, ठेवीवर ६ टक्के व्याज मिळत असताना महागाईचा दर त्याच पातळीवर असेल, तर व्याज मिळूनही संपत्तीची वास्तविक वाढ जवळ जवळ होत नाही. त्यामुळे महागाईच्या काळात कुटुंबांना रोजच्या गरजांसाठी अधिक पैसा खर्च करावा लागतो आणि बचतीसाठी उरणारी रक्कम कमी होते.

दीर्घकाळ अशी परिस्थिती राहिली तर घर खरेदी, निवृत्ती, मुलांचे शिक्षण किंवा आकस्मिक वैद्यकीय खर्चासाठी केलेले आर्थिक नियोजनही अपुरे पडू शकते. विशेषतः निश्चित उत्पन्नावर अवलंबून असलेल्या कुटुंबांना महागाईचा फटका अधिक तीव्रतेने बसतो. अन्न, इंधन, घर, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या अनिवार्य खर्चात वाढ झाली की, अनावश्यक वस्तू, मनोरंजन, प्रवास किंवा इतर सेवांवरील खर्च कमी केला जातो. मागणी कमी झाली तर उद्योगांच्या विक्रीवर परिणाम होतो आणि त्याचा परिणाम उत्पादन, गुंतवणूक आणि रोजगारावर होऊ शकतो. दुसरीकडे, महागाई रोखण्यासाठी मध्यवर्ती बँकेला व्याजदर वाढवावे लागले तर कर्ज महागते.

त्यामुळे उद्योगांच्या विस्ताराच्या योजना पुढे ढकलल्या जाऊ शकतात आणि घरगुती कर्जाचा भारही वाढतो. त्यामुळे केंद्र सरकार आणि आरबीआय या दोघांनी समन्वयाने चलनवाढ कमी करण्यावर भर देणे आवश्यक आहे. फनफ्लेशन आणि लाईफस्टाईलफ्लेशन हे 'जेन झी'मधील निम्न किंवा मध्यम उत्पन्न असणाऱ्या वर्गामध्ये निर्माण झालेल्या असंतोषाचेही एक कारण आहे हे लक्षात घ्यायला हवे.

**सागर शहा**

## प्रामाणिक विद्यार्थ्यांचा एमपीएससीच्या व्यवस्थेत बळी

महाराष्ट्रातील सर्वात मोठी आणि काठिण्य पातळी असलेली स्पर्धा परीक्षा महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) ची राज्यसेवा परीक्षा ही मानली जाते. याच एमपीएससीच्या कारभारावर आणि निष्पक्षतेवर वारंवार नवनवीन प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. आयोगाच्या भोंगळ व्यवस्थापनामुळे लाखो प्रामाणिक विद्यार्थ्यांचे भविष्य अधांतरी आहे. एमपीएससी राज्यसेवा मुख्य परीक्षेचा 'कटऑफ' अर्थात किमान गुण केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) तुलनेत तब्बल २०० गुणांहून अधिक लागल्यामुळे सध्या मोठा वाद निर्माण झाला आहे. ऑगस्ट २०२६ च्या अखेरीस महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने राज्यसेवा मुख्य परीक्षेचा निकाल जाहीर केला, ज्यामध्ये खुल्या प्रवर्गातील महिलांचा कटऑफ चक्क ९५९ गुण आणि सामान्य खुल्या प्रवर्गाचा कटऑफ ९४२ गुण लागला आहे. दोन्ही संस्थांचा मुख्य परीक्षेचा अभ्यासक्रम आणि एकूण गुण (१,७५० गुण) सारखेच असताना, एमपीएससीचा कटऑफ अनैसर्गिकरीत्या वाढल्याने उत्तरपत्रिका तपासणीच्या पारदर्शकतेवर विद्यार्थ्यांनी तीव्र आक्षेप घेतला आहे.

एकाच अभ्यासक्रमावर आधारित परीक्षेत एमपीएससीचा 'खुला अराखीव' कटऑफ यूपीएससीपेक्षा २०३ गुणांनी, तर 'महिला' कटऑफ २२० गुणांनी जास्त लागला आहे. ०

र्णनात्मक (डिस्क्रिप्टिव्ह) पॅटर्नमध्ये एवढे जास्त गुण मिळणे अशक्यप्राय मानले जाते. हस्तलिखित उत्तरपत्रिका तपासताना गोपनीयतेचा भंग करून 'सेटिंग' केलेल्या उमेदवारांना हवे तसे गुण उधळले गेले असावेत, असा संशय विद्यार्थ्यांनी व्यक्त केला आहे. नुकतेच अन्न व औषध प्रशासनातील 'ड्रग इन्स्पेक्टर' परीक्षेची प्रश्नपत्रिका थेट एमपीएससीच्या अवर सचिवासह कर्मचाऱ्यांनीच विकल्याचे उघडकीस आले होते. त्यामुळे मुख्य परीक्षेच्या मूल्यमापन साखळीतही मोठा गैरव्यवहार झाल्याची शक्यता वर्तवली जात आहे. आयोगाच्या स्वतःच्या अवर सचिवांपासून ते कर्मचाऱ्यांपर्यंतची टोळीच पेपरफुटीत गळ्यापर्यंत उतरलेली असताना आणि मूल्यांकनात २००-२०० गुणांची उघडीबोगडी उधळपट्टी होत असताना, एमपीएससीची विश्वासार्हताही धुळीस मिळाली आहे. अशा संशयास्पद वातावरणात 'वर्णनात्मक' पॅटर्न लादणे म्हणजे प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या भविष्याचा बळी देऊन भ्रष्टाचाराचे नवीन रस्ते मोकळे करून देणेच ठरेल. हा भोंगळ कारभार रोखण्यासाठी आणि गुणवतेचा अधिकार टिकवण्यासाठी एमपीएससीने सर्व हट्ट बाजूला सारून आगामी राज्यसेवा मुख्य परीक्षेसाठी 'वस्तुनिष्ठ' पॅटर्नच पूर्ववत लागू करावा, अन्यथा राज्यभरातील विद्यार्थी रस्त्यावर उतरल्याशिवाय राहणार नाहीत आणि उतरायलाच पाहिजे.

**सुनील शिरपुरे,**
मो.७४९८८८५०६१

## सिलेक्टिव्ह विरोध आणि सामाजिक सुधारणा

सध्या जाहिराती, चित्रपट किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून स्त्री-समानता, निसर्ग संवर्धन किंवा प्राणीमात्रांवरील दया यांसारखे पुरोगामी संदेश देताना बहुसंख्य समाजाच्याच सणांना व परंपरांना केंद्रस्थानी ठेवले जाते. दुसरीकडे, इतर धर्मीय समाजांतील अनेक कालबाह्य किंवा अनिष्ट रूढी-परंपरांवर मात्र सोयीस्कर मौन बाळगले जाते. या 'निवडक टीकेमुळे' समाजात असंतोष आणि अन्यायाची भावना निर्माण होते. यामुळे मूळ प्रबोधनाचा उद्देश बाजूला राहतो आणि निष्कारण वादांना उधाण येते. एका धर्मातील परंपरेला 'कालबाह्य' ठरवायचे आणि दुसऱ्या धर्मातील अनिष्ट रूढींकडे 'सांस्कृतिक हक्क' म्हणून दुर्लक्ष करायचे, या दुटप्पी भूमिकेमुळे सामाजिक सलोख्याला तडा जातो. काळाच्या ओघात सर्वांनीच सकारात्मक बदलांचा स्वीकार केला पाहिजे. परंतु, व्यावसायिक फायद्यासाठी किंवा पब्लिसिटीसाठी पूर्वग्रहदूषित दृष्टिकोन ठेवून एकाच घटकाला लक्ष्य करणे अयोग्य आहे. माध्यमांनी आणि जाहिरातदारांनी सामाजिक संवेदनशीलता जपत सर्वांसाठी एकच निकष लावला, तरच समाजात खऱ्या अर्थाने आणि निपक्षपातीपणे सकारात्मक परिवर्तन घडून येईल.

**अविनाश देशपांड**

## स्मृती मानधनाकडे नेतृत्व सोपविण्याची वेळ

महिला आशिया चषकात हाँगकाँगविरुद्ध १२४ धावांची वादळी शतकी खेळी करत स्मृती मानधनाने महिला आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक (१०,८८०) धावा करण्याचा जागतिक विक्रम आपल्या नावावर केला आहे. तिने भारताची भूतपूर्व कर्णधार मिताली राजचा (१०,८६८ धावा) विक्रम मोडीत काढलाच, पण क्रिकेटच्या तिन्ही फॉरमॅटमध्ये मिळून जगातील सर्वाधिक धावा करणारी ती पहिलीच महिला फलंदाज ठरली आहे. याशिवाय आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वाधिक १८ शतके ठोकण्याचा विक्रमही तिच्याच नावावर आहे. स्मृतीच्या या चमकदार कामगिरीनंतर आता भारतीय महिला क्रिकेट संघाच्या नेतृत्वामध्ये बदल करण्याची आणि भविष्याचा विचार करण्याची योग्य वेळ आली आहे, असे प्रकर्षाने जाणवते. स्मृतीच्या खेळामधील कमालीचे सातत्य, परिपक्वता आणि दांडगा अनुभव पाहता, आता तिच्याकडे तिन्ही प्रकारच्या क्रिकेटमध्ये भारतीय संघाचे पूर्णवेळ कर्णधारपद सोपवण्याची हीच खरी वेळ आहे.

**प्रदीप मोरे**

# ट्रम्प सैरभैर झाले आहेत !

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांचा पोरकटपणा अद्याप सुरूच आहे. आता त्यांनी होर्मुझच्या सामुद्रधुनीचे नाव बदलून 'ट्रम्प सामुद्रधुनी' असे ठेवण्याचा नवीन फंडा काढला आहे. होर्मुझची सामुद्रधुनी आता संपूर्णपणे अमेरिकेच्या नियंत्रणाखाली असल्याचा दावा ट्रम्प यांनी नुकताच केला आहे. आश्चर्याची गोष्ट म्हणजे ट्रम्प यांच्या पोरकटपणाला व्हाईट हाऊसची साथ लाभली आहे. व्हाईट हाऊसने सोशल मीडियावर आखाताचा नकाशा पोस्ट केला असून त्यामध्ये मार्क केलेल्या वॉटर वे ला 'ट्रम्प स्ट्रैट' असे संबोधले आहे. खरी गोष्ट अशी आहे की होर्मुझच्या सामुद्रधुनीवर अद्याप इराणचेच नियंत्रण असून, त्यातून मार्गक्रमण करणाऱ्या जहाजांचा मार्ग कसा असावा, हे इराणच ठरवत आहे.

अमेरिकेने इराणच्या बंदरांची नाकेबंदी केल्यामुळे इराणची मोठीच कोंडी झाली आहे. इराण-अमेरिका यांच्यातील युद्धाला सहा महिने उलटून गेल्यानंतर हे युद्ध लवकरच संपेल, असे दावे डोनाल्ड ट्रम्प हे वारंवार करत आहेत. मात्र युद्ध लवकर संपण्याची कोणतीच चिन्हे दिसत नाहीत. नुकताच अमेरिकेने रॉकेट लॉन्चर्सच्या सहाय्याने इराणच्या लाराक बेटावर हल्ला केला. त्याला उत्तर म्हणून इराणने जॉर्डन आणि युएई येथील अमेरिकन लष्करी तळांवर मिसाईल्सच्या सहाय्याने हल्ला केला.

इराणने आखातातील देशांवर हल्ले करणे सुरूच ठेवले असले तरी इस्त्रायलवर हल्ले करण्यापासून स्वतःला रोखले आहे. बहुदा अमेरिका आणि इस्त्रायल या दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळी न लढण्याचा हुषारीचा निर्णय इराणने घेतला असावा. इराणची सध्याची जुलमी राजवट अस्थिर करण्यासाठी तसेच इराणचा बॅल्लिस्टिक मिसाईल आणि अणू विषयक कार्यक्रम नष्ट करण्यासाठी अमेरिका आणि इस्त्रायल यांनी संयुक्त पणे २८ फेब्रुवारी रोजी इराण विरोधात युद्ध पुकारले होते.

जून महिन्यात अमेरिका आणि इराण यांच्यात युद्धबंदी करार करण्यात आला होता. मात्र होर्मुझ सामुद्रधुनीवर नियंत्रण कुणाचे असावे, यावरून अमेरिका आणि इराण यांच्यात वाद झाल्याने तो करार मोडीत निघाला होता. या सर्व गदारोळात, अमेरिकेने इराणवर ज्या कारणासाठी युद्ध लादले ती दोन कारणे, म्हणजे इराणला अण्वस्त्र निर्मिती करण्यापासून रोखणे आणि इराणचा बॅल्लिस्टिक मिसाईल कार्यक्रम संपुष्टात आणणे, मागे पडली. अमेरिकेत नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला मध्यावधी निवडणुका होणार आहेत. मात्र अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे त्या बाबतीत निश्चिंत दिसून येत आहेत.

ट्रम्प यांचे असे म्हणणे आहे की माझ्या निर्णय प्रक्रियेत मध्यावधी निवडणुका हा फॅक्टर नाही. ट्रम्प यांना असा विश्वास आहे की रिपब्लिकन पक्षाचे मतदार पेट्रोल पंपावर तात्पुरत्या काळासाठी जास्त पैसे मोजण्यास तयार आहेत. याचे कारण इराणने अण्वस्त्रधारी व्हावे असे त्यांना वाटत नाही. इराण मधील



जुलमी राजवटी विरोधात तेथील जनता पेटून का उठत नाही, या बाबत ट्रम्प यांचा असा कयास आहे की जुलमी राजवटीच्या विरोधात उठाव करण्यासाठी आवश्यक असणारी शस्त्रास्त्रे बंडखोरांकडे नाहीत. त्यामुळे ती गोष्ट अवघड आहे. ट्रम्प यांचे असे म्हणणे आहे की निदर्शने करणाऱ्या आंदोलकांवर इराणमधील राजवटीने निर्दयपणे गोळीबार केल्याने, आंदोलक आता रस्त्यावर उतरायला घाबरत आहेत

ट्रम्प यांनी असाही दावा केला आहे की दिवसेंदिवस इराण मधील दमनकारी प्रशासन कमकुवत होत आहे.

गेल्या वर्षी अमेरिकेच्या अध्यक्षपदी विराजमान झाल्यानंतर ट्रम्प यांनी काही ठिकाणांची नावे बदलण्याचा सपाटा लावला आहे. ट्रम्प यांनी नुकतीच एका आदेशावर सही केली, त्याद्वारे 'लेक ओंटॅरिओ'चे 'लेक अमेरिका' असे नामकरण करण्यात आले आहे. तसेच ट्रम्प यांनी 'गल्फ ऑफ मेक्सिको' चे 'गल्फ ऑफ अमेरिका' असे नामकरण जानेवारी २०२५ मध्ये केले होते. नुकतेच अमेरिकेच्या कोषागाराने, स्वातंत्र्याच्या २५० व्या वर्धापनदिनानिमित्त १ डॉलरचे नाणे जारी केले. त्यावर ट्रम्प यांचा फोटो आहे. खरे पहाता अमेरिकन फेडरल लॉ नुसार हयात असलेल्या अमेरीकन राष्ट्राध्यक्षाचा फोटो अमेरिकन चलनावर छापण्यास मनाई करण्यात आली आहे.

होर्मुझच्या सामुद्रधुनीचे नाव बदलून ट्रम्प सामुद्रधुनी असे करण्याचा ट्रम्प यांचा प्रस्ताव हा अमेरिकन जनतेचे लक्ष इराण विरुद्धच्या युद्धावरून इतरत्र वळवण्या करता आहे, ही गोष्ट सरळच आहे.

इराण विरुद्धच्या युद्धामुळे अमेरिकेत तेलाच्या किंमती वाढल्या असून त्याची झळ अमेरिकन जनतेला बसत आहे. त्यात पुन्हा नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला अमेरिकेत मध्यावधी निवडणुका होणार असल्याने, आपल्या चुकीच्या धोरणांचा फटका आपल्या पक्षाला कितपत बसेल या बाबत ट्रम्प हे साशंक असल्याने ते निरनिराळे फंडे वापरून अमेरिकन जनतेचे लक्ष दुसरीकडे वळवण्याचा अयशस्वी प्रयत्न करत आहेत. अर्थात अमेरिकेतील जनमत हे मोठ्या प्रमाणात ट्रम्प यांच्या विरोधात असल्याचा निष्कर्ष अनेक ओपिनियन पोल्सनी वर्तवल्याने ट्रम्प हे धास्तावले आहेत. इराणविरूध्दचे युद्ध लवकरच संपेल, असे वारंवार जाहीर करून ट्रम्प हे स्वतःचीच फसवणूक करत आहेत.

**अभय गोखले**

रविवार, दि. ६ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सत्य

# गर्लफ्रेंडच्या वादातून 18 वर्षीय रोहितचा ‘गेम’!

## दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांनी मध्यरात्री घराबाहेर बोलावून धारदार शस्त्राने केला हल्ला

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ५ : यवतमाळ गर्लफ्रेंडसोबत बोलल्याच्या कारणावरून झालेला वाद थेट १८ वर्षीय युवकाच्या हत्येपर्यंत पोहोचल्याची धक्कादायक घटना पिंपळगाव परिसरातील बोबडे ले-आऊट येथे घडली. दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांनी जुन्या वादाचा वचपा काढण्यासाठी रोहित वीरेंद्र मेश्राम (वय १८) याला मध्यरात्री घराबाहेर बोलावून धारदार शस्त्राने हल्ला केल्याचा आरोप आहे.**





या घटनेत रोहितचा मृत्यू झाला. पोलिसांनी दोन्ही विधीसंघर्षग्रस्त बालकांना तात्काळ ताब्यात घेतले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पिंपळगाव येथील पार्क परिसरात गुरुवारी रोहित आणि एका विधीसंघर्षग्रस्त बालकामध्ये वाद झाला होता. हा वाद रोहितच्या मैत्रिणीशी बोलण्याच्या कारणावरून झाल्याचे सांगितले जात आहे. त्यावेळी बाचाबाची आणि मारहाणीचा प्रकारही घडला. मध्यस्थी करून वाद मिटविण्याचा प्रयत्न करण्यात आला. मात्र या घटनेचा राग मनात कायम राहिला. शनिवारी मध्यरात्री अंदाजे १.४५ ते २ वाजताच्या सुमारास दोन्ही विधीसंघर्षग्रस्त बालकांनी रोहितच्या भ्रमणध्वनीवर संपर्क साधून त्याला भेटण्यासाठी घराबाहेर बोलावल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. रोहित बाहेर गेल्यानंतर काही वेळातच त्याच्यावर धारदार शस्त्राने हल्ला करण्यात आला. रोहित बराच वेळ घरी परतला नाही म्हणून कुटुंबीयांनी बाहेर येऊन पाहिले असता तो गंभीर जखमी अवस्थेत आढळला. या हल्ल्यात त्याला गंभीर दुखापत झाली आणि त्याचा मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलिस अधिकारी अमोल कोळी आणि लोहारा पोलिस ठाण्याचे ठाणेदार रोहित चौधरी यांच्यासह पोलिस पथकाने घटनास्थळी धाव घेतली. पंचनामा करून तपासाची चक्रे वेगाने फिरविण्यात आली. तक्रारीवरून दोन्ही विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले आहे. या घटनेमुळे अल्पवयीन मुलांमधील वाढती हिंसक प्रवृत्ती आणि क्षुल्लक वादातून टोकाची पावले उचलण्याच्या मानसिकतेचा गंभीर प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. घटनेचा पुढील तपास लोहारा पोलिस करीत आहेत.

# शिक्षकांना जुनी पेन्शन लागू करा,शिक्षक-कर्मचाऱ्यांचे निवेदन

## सुमारे २६ हजार कर्मचाऱ्यांच्या भविष्याचा प्रश्न

✦जनमाध्यम | प्रतिनिधी


**यवतमाळ , दि. ५ :** १ नोव्हेंबर २००५ पूर्वी नियुक्त विनाअनुदानित किंवा अंशतः अनुदानित आणि तदनंतर १०० टक्के अनुदानावर आलेल्या शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना १९८२ ची जुनी पेन्शन योजना पूर्ववत लागू करण्यात यावी, या मुख्य मागणीसाठी 'महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन समन्वय संघ' आक्रमक झाला आहे.

यासंदर्भात संघटनेतर्फे जिल्हाधिकाऱ्यांमार्फत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शालेय शिक्षण मंत्री दादासो भुसे यांना सविस्तर निवेदन सादर करण्यात आले. शासनाने ३१ ऑक्टोबर २००५ च्या निर्णयानंतर नवीन अंशदान निवृत्तीवेतन



योजना (DCPS) लागू केली असली, तरी त्यापूर्वी सेवेत आलेल्या शिक्षकांना शासकीय परिपत्रकांनुसार जुनी पेन्शन मिळण्याचा पूर्ण कायदेशीर व नैसर्गिक हक्क आहे. शासनाने विविध शासन निर्णयांद्वारे विनाअनुदानित कालावधीतील सेवा निवृत्तीवेतनासाठी व वरिष्ठ श्रेणीसाठी ग्राह्य धरली आहे. असे असतानाही काही प्रशासकीय अधिकाऱ्यांनी शालार्थ प्रणालीद्वारे कर्मचाऱ्यांना नवीन पेन्शन योजनेची खाती उघडण्याची सक्ती केली, असा आरोप समन्वय संघाने केला आहे. कुटुंबांवर उपासमारीची वेळ राज्यातील हजारो शिक्षक व कर्मचारी पेन्शनशिवाय सेवानिवृत्त झाले असून, अनेक कर्मचाऱ्यांच्या निधनानंतर त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. सर्वोच्च न्यायालयात याबाबत याचिका प्रलंबित असल्या तरी शासनाने मानवतावादी दृष्टिकोन ठेवून सुमारे २६ हजार पेन्शन पीडित कर्मचाऱ्यांच्या हिताचा सुस्पष्ट शासन निर्णय तात्काळ काढावा, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

## थोडक्यात



### ‘एक व्यक्ती, एक वृक्ष’ने हिरवेगार यवतमाळचा संकल्प

**शिक्षक दिनी वसंतराव नाईक पुतळ्यासमोर वृक्षारोपण.**

**यवतमाळ :** वाढते प्रदूषण, घटते हरित क्षेत्र आणि बिघडते पर्यावरणीय संतुलन यामुळे यवतमाळसमोर उभ्या राहिलेल्या आव्हानांना उत्तर देण्यासाठी 'एक व्यक्ती, एक वृक्ष' या संकल्पनेतून हिरवेगार यवतमाळ घडविण्याचा निर्धार करण्यात आला. शिक्षक दिनाचे औचित्य साधून नगर परिषद यवतमाळ, निसर्ग व सामाजिक पर्यावरण प्रदूषण निवारण मंडळ आणि गायत्री काळे फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने कृषिक्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या पुतळ्या समोरील रस्त्याच्या दुतर्फा वृक्षारोपण करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशांत बनगीनवार होते. नगरसेविका स्वाती खंडारे, अमित मोर, गिरीश जयपुरिया, प्राची बनगीनवार, डॉ. वैशाली राठोड, राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक सतीश काळे व विजय वीसपुते यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. प्रत्येक नागरिकाने एक वृक्ष लावून त्याचे संवर्धन केले, तर पुढील पाच वर्षांत यवतमाळचे रूप पालटू शकते, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



### स्मशानभूमीतील गट्टू बांधकाम सुरू करण्याची मागणी.

**राळेगाव :** राळेगाव तालुक्यातील वरुड जहांगीर येथील स्मशानभूमीत गेल्या अनेक दिवसांपासून स्मशानभूमीच्या बाहेर बारीक गिट्टीचा ढीग रस्त्याच्या कडेला पडलेला असून स्मशानभूमीच्या आतमध्ये गट्टू आणून ठेवले असून ते काम कुठल्या प्रकारे करणार आहे त्याची माहिती नसून या कामाला निश्चितच विलंब होत असून जर ते काम ठेकेदारीत असेल तर ते काम आतापर्यंत का सुरू झाले नाही. नेमके कारण काय हे समजायला मार्ग नाही. या कामाची काही शासकीय कामकाज पूर्ण व्हायचे आहे का.या बाबतीत कळायला मार्ग नाही.या बाबतीत ग्राम पंचायत कर्मचाऱ्यांशी संपर्क साधला असता हे काम ठेकेदाराने घेतले आहे अशी माहिती मिळाली.जर ते ठेकेदार काम करण्यासाठी इच्छुक नसेल तर कार्यालयीन कारवाई करून दुसऱ्या ठेकेदाराला काम देण्याची मागणी गावकरी करत आहे.करीता हे काम ताबडतोब सुरू करण्याची मागणी वरुड जहांगीर येथील रहिवासी तथा खरेदी विक्री संघाचे संचालक श्रावणसिंग वडते सर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे.

### रा. काँ. अल्पसंख्याक विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी अधिवक्ता शेख सलीम यांची नियुक्ती

**उमरखेड :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) अल्पसंख्याक



विभागाच्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अफजल फारूक यांनी यवतमाळ जिल्हाध्यक्षपदी अधिवक्ता शेख सलीम अब्दुल मजीद सौदागर यांची नियुक्ती केली आहे. याबाबतचे नियुक्तीपत्र दि. २ सप्टेंबर २०२६ रोजी जारी करण्यात आले आहे.

पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते शरदचंद्र पवार यांच्या विचारानुसार पुढील काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक विभागाच्या माध्यमातून सर्वसामान्य अल्पसंख्याक नागरिकांच्या विकासासाठी काम करण्याची तसेच पक्ष संघटना अधिक मजबूत करण्याची अपेक्षा नियुक्तीपत्रातून व्यक्त करण्यात आली आहे.

नवनियुक्त जिल्हाध्यक्ष अधिवक्ता शेख सलीम अब्दुल मजीद यांच्यावर यवतमाळ जिल्ह्यात अल्पसंख्याक विभागाची संघटनात्मक बांधणी करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीमुळे जिल्ह्यातील अल्पसंख्याक समाजामध्ये पक्ष संघटना मजबूत होण्यास मदत होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. नवनियुक्त जिल्हाध्यक्षांचे पक्षातील पदाधिकारी व इनायत उल्ला खान जनाब, राजु जयस्वाल,प्रदीप पाटील देवसरकर,मुक्तार युसुफ सौदागर जुबेर खान यांनी व कार्यकर्त्यांकडून अभिनंदन करण्यात येत आहे.


# ग्रामसभा थांबली तर गावकऱ्यांनी प्रश्न विचारायचे तरी कोणाला?

## ग्रामसेवकांच्या आंदोलनाची किंमत सामान्य नागरिकांनी का मोजावी? बोथ ग्रामसभा तहकुबीवर मनसेचा सवाल

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**केळापूर, दि. ५ :** गावाच्या विकासाचा आणि ग्रामपंचायतीच्या कारभाराचा जाब विचारण्यासाठी गावकऱ्यांना मिळालेले सर्वात प्रभावी व्यासपीठ म्हणजे ग्रामसभा. मात्र ग्रामसेवकांच्या बहिष्कारामुळे ग्रामसभांचे कामकाज प्रभावित किंवा तहकूब होत असेल, तर त्याचा थेट फटका सामान्य नागरिकांना बसत असल्याची टीका मनसेचे केळापूर तालुका अध्यक्ष अश्विन मुरलीधर ठाकरे यांनी केली आहे.

बोथ येथे ग्रामसभा तहकूब झाल्यानंतर गावकऱ्यांना आपल्या समस्या मांडण्यासाठी पंचायत समितीपर्यंत धाव घ्यावी लागली.



गावातील खराब रस्ते, तुंबलेली गटारे, पाणीपुरवठा, स्वच्छता तसेच विविध विकासकामांबाबत नागरिकांमध्ये नाराजी आहे. सोशल मीडियावर प्रश्न उपस्थित होत असले तरी निधीचा वापर कुठे झाला, कामांची सद्यस्थिती काय आणि तक्रारींवर प्रशासनाने कोणती कार्यवाही केली, याचा जाब विचारण्यासाठी ग्रामसभा आवश्यक असल्याचे ठाकरे यांनी म्हटले. कर्मचाऱ्यांच्या मागण्या व आंदोलनाचा अधिकार मान्य असला तरी त्याची झळ ग्रामस्थांच्या वैधानिक अधिकारांना बसता कामा नये. प्रशासनाने ग्रामसभा सुरळीत पार पडण्यासाठी पर्यायी व्यवस्था करावी, अशी मागणीही त्यांनी केली. ग्रामसभा ही केवळ बैठक नाही, तर गावकऱ्यांच्या लोकशाही अधिकारांचा आवाज आहे. ग्रामसभा वाचवा, गावकऱ्यांचा आवाज वाचवा,असे आवाहन अश्विन ठाकरे यांनी केले.

# यवतमाळात उद्या रंगणार ‘नशामुक्त दहीहंडी’..!

## अभिनेत्री नेहा पेंडसे, गायिका वैशाली सामंत यांची प्रमुख उपस्थिती

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. ५ :** तरुणांमध्ये आणि पालकांमध्ये वाढत्या व्यसनाधीनतेविरुद्ध जनजागृती व्हावी या उद्देशाने यवतमाळ येथे उद्या, ६ सप्टेंबर रोजी भव्य ‘नशामुक्त दहीहंडी’चे आयोजन करण्यात आले आहे. ही दहीहंडी सायंकाळी ६:०० वाजता २० फूट उंचीवर बांधण्यात येणार असून, या उपक्रमातून तरुणांना नशामुक्तीची शपथ दिली जाणार असल्याची माहिती यवतमाळ नगर परिषदेच्या नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईकें यांनी दिली.

आज येथील शासकीय विश्रामगृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्या बोलत होत्या.

सदर दहीहंडीचे आयोजन कोणत्याही राजकीय पक्षाच्या माध्यमातून नसून, नगराध्यक्षा प्रियदर्शनी उईके या स्वतःच्या वैयक्तिक खर्चातून सामाजिक



बांधिलकी म्हणून करत असल्याचे त्यांनी यावेळी स्पष्ट केले. या महोत्सवासाठी प्रसिद्ध गायिका वैशाली सामंत आणि लोकप्रिय अभिनेत्री नेहा पेंडसे यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे.

या दहीहंडीत **प्रथम बक्षीसः** १,११,१११ **द्वितीय बक्षीसः** ७१,१११ **तृतीय बक्षीसः** ५१,१११ **चौथे बक्षीसः** ३१,१११ **पाचवे बक्षीसः** ११,००० रुपये दिल्या जाणार आहे

या २० फुटी दहीहंडीसाठी आतापर्यंत बीड, जळगाव, जळगाव जामोद यांसह राज्यातील एकूण ८ नामांकित गोविंदा पथकांनी सहभागाची नोंदणी केली आहे. थरावर थर रचून मानवी मनोरे उभारतानाच व्यसनमुक्तीचा सामाजिक संदेश या माध्यमातून दिला जाणार आहे. या पत्रकार परिषदेला उपाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, नितीन गिरी, माया शेरे यांच्यासह शहरातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी घेतली शिक्षकांची भूमिका

## शिवरामजी मोघे महाविद्यालयात अनोख्या पद्धतीने शिक्षक दिन साजरा

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. ५ :** शिवरामजी मोघे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, केळापूर-पांढरकवडा येथे ५ सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त `भूमिका परिवर्तन दिन` (Role Reversal Day) उत्साहात साजरा करण्यात आला. हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना व वाणिज्य विभागाद्वारे घेण्यात आला.

या उपक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका स्वीकारून अध्यापन केले, तर प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांची भूमिका घेतली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके होते. प्रमुख अतिथी म्हणून कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. पुरुषोत्तम उदार उपस्थित होते. परीक्षक म्हणून प्रा. सतीश राऊत व प्रा. मारुती कानकाटे



यांनी जबाबदारी पार पाडली. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांनी विविध विषयांचे अध्यापन करून शिक्षकाची जबाबदारी अनुभवली. शिक्षकाची भूमिका पार पाडताना विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, नेतृत्वगुण, संवादकौशल्य आणि विषय मांडणीची क्षमता विकसित झाली. याप्रसंगी आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस देऊन सत्कार करण्यात आला. यामध्ये कु. पूनम सातपुते आणि कु. सानिका धाडवे यांनी प्रथम क्रमांक पटकावला. तर कु. नादिया शेख आणि कु. स्वरांजली बीजिंकवार यांनी द्वितीय क्रमांक मिळवला. तृतीय क्रमांक कु. गोकुल बाभुळकर, कु. ओमश्री सोनुर्ले आणि कु. ऋग्वेद मानकर यांनी मिळविला. कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व वाणिज्य विभागाच्या वतीने करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन प्रा. डॉ. अमर वंजारी यांनी केले, तर प्रास्ताविक विभागप्रमुख डॉ. अरुणा चुडासामा यांनी केले.

# वांजरी (पोड) आश्रमशाळेत दहीहंडीचा दणदणाट; शिक्षक दिनही जल्लोषात!

## श्रीकृष्ण जन्मोत्सवाने आश्रमशाळेचा परिसर दुमदुमला

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**पांढरकवडा, दि. ५ :** महाकाली शिक्षण संस्था, झटाळा द्वारा संचालित प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा, वांजरी (पोड) येथे शिक्षक दिन आणि श्रीकृष्ण जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. दिवसभर विविध उपक्रमांनी शाळेचा परिसर उत्साहाने भारून गेला. भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त सकाळच्या सत्रात शिक्षक दिन कार्यक्रम घेण्यात आला. प्राथमिक मुख्याध्यापक वाय. आर. राऊत यांनी प्रास्ताविक केले. पोलीस पाटील अशोक कुमरे तसेच सहायक शिक्षिका आठवले मॅडम यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मुख्याध्यापक वानखेडे सर यांनीही शिक्षक दिनाचे महत्त्व सांगत विद्यार्थ्यांना उपयुक्त माहिती दिली.



यानंतर दुपारच्या सत्रात श्रीकृष्ण जन्मोत्सवानिमित्त दहीहंडीचा उत्साह पाहायला मिळाला. विद्यार्थ्यांसाठी दहीहंडी फोडण्याची स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांनी संघभावना, शिस्त आणि उत्साहाचे दर्शन घडवत स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. दहीहंडी फोडताना विद्यार्थ्यांच्या जल्लोषाने आश्रमशाळेचा परिसर अक्षरशः दुमदुमून गेला. श्रीकृष्ण जन्मोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले. सण-उत्सवांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना भारतीय संस्कृती, परंपरा, सामाजिक एकोपा आणि संघभावनेची शिकवण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. कार्यक्रमाला शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# जिल्हा परिषद प्रा. शाळेत दहीहंडी उत्सव उत्साहात साजरा

## विद्यार्थ्यांचा उस्फूर्त सहभाग

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**फुलसावंगी, दि. ५ :** येथील जिल्हा परिषद प्राथमिक व माध्यमिक शाळा, फुलसावंगी येथे गोकुळाष्टमीच्या शुभमुहूर्तावर दहीहंडी उत्सवाचे भव्य आयोजन अत्यंत उत्साहात व आनंददायी वातावरणात पार पडले. या कार्यक्रमात शाळेतील विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन दहीहंडीचा थरार आणि गोपाळांचा उत्साह अनुभवला.

कार्यक्रमाचे मुख्य आयोजन शाळेचे मुख्याध्यापक शिवप्रसाद रोडगे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. याप्रसंगी शाळेतील शिक्षकवृंद मारोती वाठोरे, चंद्रकांत इंद्राक्षे, पल्लवी कोरके, बालाजी धनेवाड, मारोती वडजे,



अंजली राजपूत, आदिती जांबूतकर आणि श्वेता दळवे यांनी विद्यार्थ्यांना दहीहंडी उत्सवाचे सांस्कृतिक महत्त्व पटवून देत कार्यक्रमाचे नियोजनबद्ध संयोजन केले. या सोहळ्याला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष दत्ता पराते यांच्यासह समितीच्या सदस्यांची प्रमुख उपस्थिती लाभली. यामध्ये अर्चना वाठोरे, योगेश बाजपेयी, शैलेश पेंटेवाड, बालाजी कानडे, यादव वाघमारे, ज्योती सोनूने, कान्होपात्रा पटवे, किरण चव्हाण व कोमल मिश्रा यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांचा उत्साह वाढवला. तसेच गावातील प्रमुख नागरिक बाबुराव व्हडगिरे, त्र्यंबक व्हाडगिरे व बबन शेळके यांनीही या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लावून विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

# मेंढपाळांच्या पालावरच पोहोचले प्रशासन, ‘फाईल’बाहेर ठेऊन थेट संवाद!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**राळेगाव, दि. ५ :** भटके-विमुक्त समाजाच्या प्रश्नांकडे केवळ कागदोपत्री पाहण्याऐवजी प्रशासनाने थेट त्यांच्या पालावर पोहोचून संवाद साधल्याचे चित्र राळेगाव तालुक्यातील वरुड जहागीर येथे पाहायला मिळाले.

भटके-विमुक्त दिनानिमित्त अहिल्याबाई होळकर धनगर समाज राळेगाव संघटनेच्या पुढाकारातून मेंढपाळ बांधवांच्या पालावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील, गटविकास अधिकारी राजेश पवार, नायब तहसीलदार तसेच महसूल विभागातील अधिकारी उपस्थित होते. अधिकाऱ्यांनी मेंढपाळ



बांधवांशी थेट संवाद साधत त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक कागदपत्रे, दाखले, प्रशासकीय प्रक्रिया आणि उपलब्ध योजनांची माहिती देण्यात आली. मेंढ्यांच्या कळपासह वर्षभर स्थलांतर करणाऱ्या मेंढपाळांसमोर चारा-पाणी, निवारा, आरोग्य सुविधा, पशुधनाची काळजी, कागदपत्रांची पूर्तता आणि शासकीय योजनांचा लाभ मिळविताना येणाऱ्या अडचणींचे प्रश्न असल्याचे उपस्थितांनी मांडले. संबंधित अधिकाऱ्यांनी या प्रश्नांवर मार्गदर्शन करून प्रशासनाकडून आवश्यक सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. समाजाच्या प्रश्नांसाठी प्रशासन आणि नागरिकांमध्ये थेट संवादाची गरज अधोरेखित करणारा हा उपक्रम ठरला. यामुळे भटके-विमुक्त बांधवांना शासनाच्या योजनांची माहिती तळागाळात पोहोचण्यास मदत होणार आहे. कार्यक्रमाला डॉ. कोकरे, संजय सोनाले, बाळा शिंदे, राहुल सोनाले, बाबन शिंदे, किशोर सोनाले, गुलाब कचरे, ज्योतिराव कोकरे, बाळा कुलाल यांच्यासह धनगर व भटके-विमुक्त समाजातील मोठ्या संख्येने बांधव उपस्थित होते.

# ७० वी वरिष्ठ राज्यस्तरीय बॉल बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेचे उद्घाटन

## चित्रपट अभिनेते भारत गणेशपुरे यांच्या उपस्थितीने क्रीडाप्रेमींमध्ये संचारला उत्साह





**अमरावती/का.प्र.**

दि महाराष्ट्र बॉल बॅडमिंटन असोसिएशन संलग्नित अमरावती जिल्हा बॉल बॅडमिंटन असोसिएशन व श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालय, अमरावतीच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ७० वी वरिष्ठ पुरुष महाराष्ट्र राज्यस्तरीय बॉल बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेच्या उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर आ.बच्चू कडू,'चला हवा येऊ द्या' फेम, प्रसिद्ध चित्रपट अभिनेते भारत गणेशपुरे यांच्या विशेष उपस्थितीने सर्वांचे लक्ष वेधले होते.

तीन दिवसीय आयोजनाचे स्वागताध्यक्ष श्री शिवाजी शिक्षण संस्था, अमरावतीचे कोषाध्यक्ष शिव छत्रपती पुरस्कार प्राप्त - दिलीपबाबू इंगोले, आमदार - संजय खोडके, महाराष्ट्र राज्य बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव - अतुल इंगळे, अमरावती महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती - अविनाश मार्डीकर, अमरावती जिल्हा बॉल बॅडमिंटन असोसिएशनचे सचिव - प्रा. डॉ. हरीश काळे व आयोजन समिती सचिव - मनिष इंगोले तसेच इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. मान्यवरांच्या क्रीडा ज्योत प्रज्वलित करून तसेच क्रीडा ध्वजारोहण करून स्पर्धेचा शानदार शुभारंभ करण्यात आला. दरम्यान उद्घाटन समारंभामध्ये शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त प्राचार्य - डॉ. हनुमंत लुंगे, अमरावती विभाग क्रीडा उपसंचालक - अविनाश पुंड, जिजाऊ कमर्शिअल बँकेचे अध्यक्ष - बबनराव आवारे यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच अमरावतीच्या क्रीडा विकासाकरिता नेहमीच पुढाकार घेतल्याबद्दल आयोजन समितीचे अध्यक्ष - यश खोडके यांचा सुद्धा यावेळी सत्कार करण्यात आला.

शिवाजी बीपीएडच्या प्रांगणात तीन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेमध्ये संपूर्ण महाराष्ट्रातील एकूण ३३ पुरुष संघ सहभागी झाले असून जवळपास ४५० खेळाडू, संघ प्रशिक्षक, संघ व्यवस्थापक व ऑफिशिअल्स यांचे अमरावतीनगरीत आगमन झाले आहे. रविवार ६ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता आमदार सुलभा खोडके यांच्या हस्ते बक्षीस वितरण करून ७० वी वरिष्ठ पुरुष महाराष्ट्र राज्यस्तरीय बॉल बॅडमिंटन अजिंक्यपद स्पर्धेचा समारोप होणार आहे.

# प्रो.राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे 'आयटी प्रिमीअर लीग'

## बॉक्स क्रिकेट स्पर्धा

**अमरावती/का.प्र.**

प्रोफ राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, बडनेरा येथील माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या वतीने महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ ए. पी. ठाकरे तसेच माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या विभागप्रमुख डॉ पी. ए. खोडके यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी 'IT Premier League – Box Cricket Tournament' या बॉक्स क्रिकेट स्पर्धेचे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले.

विद्यार्थ्यांमध्ये Team Building, Leadership, Teamwork, Coordination, Communication Skills, Decision-Making आणि Sportsmanship या गुणांचा विकास व्हावा, तसेच विद्यार्थ्यांना सांघिक कार्याचा प्रत्यक्ष अनुभव मिळावा, या उद्देशाने या क्रीडा उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.विद्यार्थ्यांच्या टीम तयार करण्यासाठी Auction प्रक्रिया राबविण्यात आली. विभागातील प्राध्यापकांनी ऑक्शनियर म्हणून सहभाग घेत विद्यार्थ्यांची निवड केली. Auction प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांमध्ये नियोजन, निर्णयक्षमता, नेतृत्वगुण, संघनिवड आणि



रणनीती आखण्याची कौशल्ये विकसित होण्यास मदत झाली.उपक्रमामध्ये विभागातील प्राध्यापकांनी Team Owner म्हणून सक्रिय सहभाग नोंदविला. यामध्ये डॉ पी. एस. चौधरी, डॉ ए. पी. भगत, डॉ के. एस. काळकोंडे, डॉ आर. एस. खंडारे, डॉ डी. एस. चांडक, प्रा ए. आर. खैरकर, प्रा पी. एस. मोहोड, प्रा ए. पी. आगारकर, प्रा एस. एस. मेश्राम, प्रा एम. एस. शिरभाते, प्रा पी. व्ही. राऊत, प्रा के. दहिकर, प्रा व्ही. एन. शेलोकर व प्रा पी. पी. तिजारे यांनी सहभाग घेतला.या संपूर्ण उपक्रमाचे नियोजन, ऑक्शन प्रक्रिया, टीम व्यवस्थापन आणि स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी प्रा ए. जी. काळबांडे व प्रा के. व्ही. गोहाड यांनी मुख्य संयोजक म्हणून मोलाची भूमिका बजावली. उपक्रमाबद्दल विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष डॉ नितीन धांडे, उपाध्यक्ष ॲड उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा डॉ हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंह चौधरी, तसेच सदस्य नितीन हिवसे, डॉ पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा विनय गोहाड व प्रा गजानन काळे यांनी माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या शिक्षकांचे कौतुक केले.

# - आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी राजेश सावरकर यांची निवड

**अमरावती/का.प्र.**



ध्येय एज्युकेशन फाउंडेशन, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात येणाऱ्या 'आदर्श शिक्षक पुरस्कार २०२६' साठी जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा, उत्तमसरा येथील शिक्षक श्री. राजेश दादारावजी सावरकर यांची निवड झाली आहे.

शैक्षणिक क्षेत्रातील समर्पित सेवा, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केलेले सातत्यपूर्ण कार्य तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या प्रसारासाठी दिलेल्या योगदानाची दखल घेत त्यांची या पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे.राजेश सावरकर यांची आदर्श शिक्षक पुरस्कारा साठी निवड झाल्या बद्दल प्राथमिक शिक्षक समितीचे राज्य नेते उदय शिंदे,राज्याध्यक्ष विजय कोंबे,राज्य सरचिटणीस राजन कोरगावकर,अमरावती जिल्हा नेते गोकुलदास राऊत,जिल्हा मार्गदर्शक संभाजी रेवाळे,जिल्हाध्यक्ष अजयानंद पवार,जिल्हा सरचिटणीस शैलेन्द्र दहातोंडे,कार्याध्यक्ष प्रशांत निमकर,कोषाध्यक्ष नंदकीशोर पाटिल,कार्यालयीन सचिव मनिष काळे,राज्य महीला प्रतिनिधी प्रविणा कोल्हे,महीला आघाडी प्रमुख सरीता काठोळे,सरचिटणीस विनिता घुलक्षे,कार्याध्यक्ष सुषमा वानखडे,जिल्हा कोषाध्यक्ष भावणा ठाकरे,तुळशिदास धांडे,उमेश चुनकीकर,संगिता तडस जिल्हा,तालुका पदाधिकारी यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# तिवसा पंचायत समितीवर वंचित बहुजन आघाडीची धडक

## ८ दिवसांत प्रश्न न सुटल्यास ठिय्या आंदोलनाचा इशारा!

**तिवसा/वार्ताहर**

तालुक्यातील ग्रामीण भागात पावसाळ्यामुळे आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून, अनुसूचित जाती वस्त्यांमधील प्रलंबित नागरी समस्या तात्काळ सोडवाव्यात, या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडी तिवसा तालुक्याच्या वतीने सहाय्यक गटविकास अधिकाऱ्यांना खरमरीत निवेदन देण्यात आले. येत्या आठ दिवसांत मागण्यांची पूर्तता न झाल्यास प्रशासनाविरोधात गावकऱ्यांसह पंचायत समिती कार्यालयासमोर 'ठिय्या आंदोलन' उभारण्याचा थेट इशारा यावेळी देण्यात आला.



निवेदनात तालुक्यातील ढासळलेल्या नागरी सुविधांवरून प्रशासनाला चांगलेच धारेवर धरण्यात आले. दापोरी येथील बंद असलेला आर.ओ. वॉटर प्लांट तात्काळ सुरू करून त्याची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली. तसेच, अनुसूचित जाती वस्त्यांमधील रस्त्यांवर पसरलेले चिखलाचे साम्राज्य दूर करून स्वच्छता मोहीम राबवावी आणि पावसाळ्यात आजारांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रत्येक गावात धूर फवारणी करावी, अशी मागणी शिष्टमंडळाने केली.निवेदन सादर करताना वंचित बहुजन युवा आघाडी जिल्हा महासचिव सागर भवते, तालुका अध्यक्ष मनीष खरे, जिल्हा सदस्य विनोद खाकसे, प्रमोद मुंद्रे, उपाध्यक्ष नितीन थोरात, सिद्धार्थ कटारने, भुजंग वावरे, अनिल गाडगे, श्रीकृष्ण वावरे, सचिन बाखडे, अभिषेक मनोहरे यांच्यासह पक्षाचे अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

वरूडा येथील अनुसूचित जाती वस्तीतील पूल बांधणीनंतर अवघ्या एकाच वर्षात खचून गेल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या निकृष्ट कामाची उच्चस्तरीय चौकशी करून दोषी अधिकारी व कंत्राटदारावर तात्काळ कठोर कारवाई करण्याची आक्रमक मागणी वंचित बहुजन आघाडीने केली आहे.

# काजलडोह येथे मतदारांच्या उपस्थित मतदार यादी प्रसिद्ध

**अमरावती/का.प्र.**


४१ मेळघाट विधानसभा मतदारसंघातील, चिखलदरा तालुक्यातील यादी भाग क्रमांक १००, काजलडोह येथे मतदार यादी प्रसिद्ध करून जनजागृती करण्यात आली. मतदार यादी प्रसिद्ध करण्याच्या कार्यक्रमास गावातील मतदारांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.


निवडणूक आयोग भारत सरकारच्या वतीने मतदार यादीचा विशेष पुनरीक्षण कार्यक्रम सुरू आहे. या कार्यक्रमांतर्गत मतदार यादी भाग क्रमांक १००, काजलडोह येते प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली. मतदार यादी प्रसिद्धीच्या वेळी ग्रामपंचायत काजलडोहचे प्रशासक राजेश कवडे, ग्रामपंचायत सचिव सचिन काळे, पोलीस पाटील भीमराव कवडे, मतदान केंद्रस्तरीय अधिकारी डॉ. निलेशकुमार इंगोले, ग्रामपंचायत कर्मचारी रोहित कंगाले, रोजगार सेवक आकाश कवडे, मतदार राजकुमार बेलकर, भीमू कवडे, पन्नालाल अथोटे, विनायक कवडे, रामफल अथोटे, कवल कवडे यांच्यासह गावातील मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मतदारांना मतदार यादीची पाहणी करण्याचे आवाहन करण्यात आले. मतदार यादीमध्ये आपले नाव, पत्ता, वय, फोटो व इतर तपशील योग्य आहेत का, याची प्रत्येक मतदाराने खात्री करून घ्यावी. तसेच काही त्रुटी अथवा दुरुस्ती आवश्यक असल्यास संबंधित प्रक्रियेद्वारे ती करून घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. तसेच मतदार यादीच्या प्रसिद्धीबाबत व्यापक जनजागृती करण्यात आली. 'लोकशाही बळकट करण्यासाठी प्रत्येक पात्र नागरिकाने आपले नाव मतदार यादीत असल्याची खात्री करून मतदानाचा हक्क बजावावा' असे आवाहन मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, डॉ. निलेशकुमार इंगोले यांनी यावेळी केले. मतदार यादी प्रसिद्धीच्या कार्यक्रमास गावातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आपला सहभाग नोंदविला.

# सुपर स्पेशलिटी येथे आईने किडनी देऊन वाचविले मुलाचे प्राण

**अमरावती/का.प्र.**

स्थानिक विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशलिटी) हॉस्पिटल येथे ७७ वी किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्ण करण्यात आली.सदर रुग्ण हा काही महिन्यांपासून किडनी आजाराने त्रस्त होता. त्यासाठी बाहेर उपचार पद्धती चालू होती.तेव्हा डॉक्टरांनी रुग्णास व त्याच्या कुटुंबियांस किडनी प्रत्यारोपणविषयी माहिती दिली व विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय अमरावती येथे आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या माध्यमातून होत असलेल्या यशस्वी व विनामूल्य शस्त्रक्रिया यासाठी रुग्ण विविध जिल्ह्यांमधून नव्हे तर इतर राज्यामधून सुद्धा येत असतात याविषयी महिती दिली.





रुग्णालयात झालेले ७७ वे किडनी प्रत्यारोपण आहे. हे २० वर्षीय सार्थक पांडुरंग ढगे यांची शस्त्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण करण्यात आली आहे. सदर रुग्ण हा रा. शेलू कुंड, ता. नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती येथील रहिवासी असून मागील ४ महिन्यांपासून डायलिसिस चालु होते. मात्र डायलिसिस यावर दीर्घकाळ उपाय नसून व होणारा त्रास बघुन किडनी प्रत्यारोपण हा यावरील योग्य उपाय आहे, असे जेव्हा डॉक्टरांनी सांगितले. यावेळी ज्योती पांडुरंग ढगे (वय ४५ वर्षे ) यांनी किडनी सार्थक ला देऊन त्याला नवीन जीवन दिले. आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने अंतर्गत शस्त्रक्रिया विनामुल्य करण्यात आली.सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल अमरावती येथील वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली नेफरोलॉजिस्ट डॉ. हितेश गुल्हाने, युरो सर्जन डॉ.राहुल पोटोडे, डॉ.विक्रम देशमुख, डॉ. प्रतिक चिरडे,डॉ विशाल बाहेकर, डॉ राहुल घुले , बधिरिकरण तज्ञ- डॉ. रोहित हातगावकर, डॉ.बाळकृष्ण बागवाले, डॉ अंजू दामोदर, डॉ.अश्विनी मढावी, डॉ शीतल सोळंकी, डॉ.विक्रांत कुळमेथे, डॉ.माधव ढोपरे,डॉ. जयश्री पुसदेकर, डॉ.नाहीद, डॉ. रमणीय,डॉ. उज्वल अभ्यंकर, डॉ. प्रियंका कांबळे, डॉ. श्रद्धा जाधव,समाजसेवा अधीक्षक (वैद्यकीय) शितल बोंडे, ऋषिकेश धस, डॉ.सोनाली चौधरी,महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने मधील एम.सी.ओ.डॉ. पायल रोकडे ,डॉ. दिव्यांनी मुंदाने, कल्याणी गाढवे त्याचप्रमाणे अधीसेविका चंदा खोडके व मालती प्रधान यांच्या सूचनेनुसार इन्चार्ज सिस्टर ज्योती तायडे, सरला राऊत, वैष्णवी निकम, माधुरी सोनटक्के, दीपाली तायवाडे, अक्षय पवार,कीर्ती तायडे, यशोधरा नेवाडे, मयुरी खेरडे, ओम महल्ले, अभिषेक निचत,अनु वडे,योगिश्री पडोळे,वैशाली ढोबळे, कोमल भालेकर, रुपाली गवई, दीक्षा बेलखेडे, अर्चना मढावी,वैष्णवी टाकरखेडे, नम्रता दामले, आहारतज्ञ कविता देशमुख, रश्मिता दिघडे, श्रीधर ढेंगे, औषध विभागामधील योगेश वाडेकर,अमोल वाडेकर, प्रशांत शिरे, शुभम वरघडे, पंकज बेलुरकर, सुनीता ठाकूर,अविनाश राठोड, तुषार नारायण, शिवा भोंगाळे,गजानन मातकर, रूपेश हरडे,आशिष थुल, आशिष मिश्रा,राहुल चव्हाण,रंजना दिपटे, मंगला भेंडकर, इंदू पाटील, गजानन चौधरी,प्रशांत थेटे, निलेश आत्राम, इत्यादींचे किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रियेमध्ये विषेश सहकार्य होते.

## संक्षिप्त

### विद्यापीठात 'इंडियन स्ट्रॅटिग्राफी सिम्प्लीफाईड' पुस्तकाचे प्रकाशन



**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र पदव्युत्तर विभागात बी.एस्सी. भूगर्भशास्त्र विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरणाऱ्या 'इंडियन स्ट्रॅटिग्राफी सिम्प्लीफाईड : अ ग्रॅज्युएट लेव्हल अप्रोच' या नवीन पुस्तकाचा प्रकाशन सोहळा उत्साहात संपन्न झाला.'ज्ञानपथ' प्रकाशनाद्वारे हे पुस्तक मान्यवरांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आले. प्रकाशन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी सिपना कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, चिखलदराचे प्राचार्य तथा संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे माजी प्र-कुलगुरू डॉ.राजेश जयपूरकर, प्रमुख अतिथी म्हणून भारतीय महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राध्यापक व विभागप्रमुख तथा भारतीय विद्या मंदिर, अमरावतीचे उपाध्यक्ष डॉ. सतीश कुलकर्णी, विद्यापीठाच्या भूगर्भशास्त्र विभागप्रमुख डॉ. यादवकुमार मावळे व्यासपीठावर उपस्थित होते.ग्रंथाचे संपादन डॉ. सतीश कुलकर्णी आणि डॉ. यादवकुमार मावळे यांनी केले आहे. पुस्तकाच्या लेखनात प्रादेशिक स्तरावरील अनुभवी व नामवंत भूगर्भशास्त्र प्राध्यापकांचा सहभाग असून त्यामध्ये डॉ.एस.के. पौनिकर,डॉ.एस.एस. देशमुख ,प्रा.पी.एम.गिरी,डॉ.पी.एस. परिमल,डॉ.एम.एम. देशमुख आणि डॉ.एस.आर. वरघट यांचा समावेश आहे.यावेळी डॉ. प्रेमानंद तिडके, डॉ. मयुरा देशमुख, डॉ. सुमेध वरघट, डॉ. सौरभ पौनिकर, डॉ. प्रीतम पाल आणि श्री अभिषेक कडू यांच्यासह प्राध्यापकांची उपस्थिती होती.

### कस्तुरबा इंग्लिश स्कूलमधील विद्यार्थिनी राष्ट्रीय स्तरावर





**अमरावती-**स्थानिक श्री शिवाजी शिक्षण संस्था द्वारा संचालित कस्तुरबा इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थिनी बुद्धिबळ खेळामध्ये राष्ट्रीय स्तरावर प्रथम आली. ही स्पर्धा पॉवर चेस अकॅडमी आणि चेस असोसिएशन वाशिम यांच्या संयुक्त विद्यमाने दुसऱ्या पॉवर चेस अकॅडमी ऑल इंडिया फाईट रॅपिड रेटिंग बुद्धिबळ स्पर्धा वाशिम येथील रिसोड रोडवरील तिरुपती लॉन्स अँड रिसॉर्ट येथे आयोजित केल्या गेली होती. या प्रतिष्ठेच्या स्पर्धेत देशभरातून ३०० हून अधिक बुद्धिबळपटू सहभागी झाले होते. कस्तुरबा इंग्लिश स्कूल मधील इयत्ता दुसरीची विद्यार्थिनी कुमारी आभा अंकुश देशमुख हिने सात वर्षाखालील वयोगटामधून या स्पर्धेमध्ये राष्ट्रीय स्तरावर अमरावती जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकाविला. वाशीमच्या बुद्धिबळ क्षेत्रातील ही आतापर्यंतची सर्वात मोठी स्पर्धा असून या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील नवोदित तसेच अनुभवी बुद्धिबळ पटूंना राष्ट्रीय स्तरावरील खेळाडूंसोबत खेळण्याची आणि आपले कौशल्य सिद्ध करण्याची उत्कृष्ट संधी मिळाली.शाळेच्या मुख्याध्यापिका साधना चंदेल यांनी या विद्यार्थिनीचे अभिनंदन व कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### 'इंडिया स्किल्स' स्पर्धेसाठी उमेदवारांना अर्ज करण्याचे आवाहन

**अमरावती-** 'इंडिया स्किल्स स्पर्धा २०२६-२७'साठी ऑनलाईन नोंदणी सुरु असून जिल्ह्यातील तंत्रकुशल व व्यावसायिक कौशल्यधारक उमेदवारांना १५ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे करण्यात आले आहे. इंडिया स्किल्स स्पर्धेच्या माध्यमातून २३वर्षांखालील उमेदवारांना जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर कौशल्य दाखविण्याची संधी उपलब्ध होणार आहे. या स्पर्धेद्वारे विविध तांत्रिक,व्यावसायिक,डिजिटल आणि मेकॅट्रॉनिक्स कौशल्यांमध्ये सहभाग घेता येणार आहे.स्पर्धेत सहभागी होण्यासाठी वयोमर्यादा हा एकमेव निकष ठेवण्यात आला आहे. वैयक्तीक सहभागासाठी ५६ क्षेत्रांकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००३ किंवा त्यानंतर झालेला असावा.तसेच ऑटोनॉमस मोबाईल रोबोटिक्स,काँक्रिट कन्स्ट्रक्शन वर्क, लँडस्केप गार्डनिंग या क्षेत्राकरिता उमेदवाराचा जन्म १ जानेवारी २००६ किंवा त्यानंतर झालेला असावा. शासकीय व खाजगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय),पॉलेटेक्निक,इंजिनियरींग कॉलेज,खाजगी शाळा,विद्यापीठ,प्रशिक्षण संस्था तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य विकास सोसायटीच्या अधिनस्त सर्व व्यवसाय प्रशिक्षण संस्थांना या स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहनही करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागासाठी इच्छुक उमेदवारांना skillindiadigital.gov.in या अधिकृत संकेतस्थळावर नोंदणी करण्याचे आवाहन केले आहे.

### गडगडेश्वर मंदीरातील महाप्रसादाला पाच वर्षाची परंपररा



**अमरावती-**स्थानिक गडगडेश्वर स्थित येथे श्रावण मास निमित्त महाप्रसादाचे आयोजन केले होते.हे आयोजन फेड्स ग्रुप अमरावती यांच्या तर्फे होते. सुयोग ओलीवकर, राजु बोरकर, गणेश मेशकर, रमेश बोरकर, भारत चव्हाण, मनिष सावरकर, प्रविण मेशकर, प्रदीप पिढेकर, नरेंद्र रावळे, प्रविण सावरकर,बाल्या विजयकर, नामदेव गणेशकर, भाष्कर गणेशकर,नंदु हिरपुरकर,अरविंद सावरकर,रघु सावरकर, राजु बोरकर,गणेश मेशकर, रमेश बोरकर, भारत चव्हाण, मनिष सावरकर, प्रविण मेशकर, प्रदीप पिढेकर, नरेंद्र रावळे, प्रविण सावरकर, पिंटू चव्हाण,संजय बाळापुरे,व्यवहारे मामाजी,धनराज मेशकर,भारत गणेशकर,दिनेश विजयकर,रामेश्वर सावरकर,मनोहरजी चव्हाण आदिंनी देणगी आणि महाप्रसादाचे आयोजन केले होते.

अमरावती येथील वंदना अकर्ते यांनी कुटुंबाच्या चरितार्थासाठी घरगुती खानावळ, पापड, शेवया निर्मिती आदी अनेक उद्योग केले. संघर्ष, नुकसानीचे अनेक क्षण वाट्याला आले. परंतु न डगमगता त्या पुढे जात राहिल्या. आज रवा, मैदा, तंदुरी आटा निर्मितीचा पाककृती इंडस्ट्रीज नावाने सात कोटींचा आधुनिक प्रक्रिया प्रकल्प (फ्लोअर मिल) उभारण्यापर्यंत त्यांनी भरारी घेतली आहे. त्यातून स्वतःसह अनेकांना रोजगार दिला आहे. अमरावती जिल्ह्यातील एवढ्या मोठ्या स्वरूपाचा हा एकमेव प्रकल्प असावा, वाट अवघड आहे. परंतु निस्सीम धैर्याने व उद्योजक वृत्तीने वंदना यांचा प्रवास सुरू आहे...

# धैर्य, धडाडी, संघर्षातून वंदना घडल्या प्रक्रिया उद्योजक

अमरावती येथील वंदना अकर्ते यांचे नाव आज धडाडीच्या प्रक्रिया उद्योजक म्हणून पुढे आले आहे. रवा, मैदा व तंदुरी आटा निर्मितीचा सात कोटीच्या गुंतवणुकीचा मोठा प्रकल्प (आधुनिक फ्लोअर मिल) त्यांनी उभारला आहे. जिल्हयातील अशा स्वरूपाचा हा एकमेव प्रकल्प असावा.वंदना यांनी गाठलेला पल्ल्ला पाहता हा प्रवास प्रेरणादायी असाच आहे. वरखेड (ता. तिवसा) हे त्यांचे माहेर वयाच्या १७ व्या वर्षी शिक्षणासाठी त्या अमरावतीला आल्या. कुटुंबाला आर्थिक हातभार लागावा म्हणून त्यांनी कापड उद्योगात शर्टाला कॉलर लावण्याचे अवघड काम स्वीकारले, आव्हान स्वीकारण्याची हीच वृती पुढील वाटचालीत उपयोगी पडली. अमरावती येथील हेमंत अकर्ते यांच्याशी त्यांचा विवाह झाला. सासरीही त्यांनी स्वतःच्या पायावर उभारून दाखविण्याचा आदर्श तयार केला घरगुती खाणावळ सुरू केली. वाढता खर्च लक्षात घेऊन २००३ च्या दरम्यान यंत्रसामग्री घेऊन शेवया, पापड निर्मिती सुरू केली. हॉटेल व्यावसायिक, महिलांना पुरवठा सुरू केला, कामाप्रति प्रचंड निष्ठा, प्रामाणिकता यांच्या जोरावर व्यवसायांत जम बसवला. चांगले उत्पन्न मिळण्यास सुरुवात केली.

**जिद्दीने एकेक पाऊल पुढे पडले**

दरम्यान, पती हेमंत यांना वीज वितरण कंपनीत नोकरी लागली. पंढरपूरला बदली झाली. तेथेही वंदना पतीसोबत राहण्यास गेल्या. अमरावतीहून कापड आणून कापड व्यवसाय सुरु करीत ग्राहकवर्ग तयार केला. पतीची लोणार येथे बदली झाल्यावर तेथेही व्यवस्य सुरू ठेवला, उलाढाल सहा लाखांपर्यंत पोहोचली. पतीची पुन्हा अमरावतीला बदली झाली दोन जुळया मुली झाल्या व्यवसायात काहीसा खंड पडला. मात्र जिद्दी वंदना यांनी मुलीच्या नावे म्हणजेच जान्हवी ब्रँडने पापड, ढोकळा, गुलाबजाम, आप्पे, इडली आदी इन्स्टंट मिक्स पदार्थाची निर्मिती सुरू झाली महिन्याला सहा लाखांच्या उत्पन्नापर्यंत मजल गाठली.

**आधुनिक फ्लोअर मिलपर्यंतचा प्रवास**

प्रक्रिया उद्योगातील आव्हाने, संकटे पेलत अखेर रवा, मैदा, तंदुरी आटा निर्मिती पर्यंत वंदना यांचा उद्योग येऊन ठेपला आहे. अमरावतीपासून २५ किलोमीटरवरील नांदगाव पेठ औद्योगिक क्षेत्रात २४ हजार चौरस फूट आकारात्मा क्षेत्रफळात पाककृती इंडस्ट्रीज नावाने तीन मजली इमारत



यशोगाथा

उभी राहिली आहे. अन्य उद्योग बंद करून केवळ याच उद्योगावर लक्ष केंद्रित केले आहे. सुसज्ज यंत्रसामग्रीने सज्ज सात कोटी गुंतवणुकीच्या या आधुनिक फ्लोअर मिल प्रकल्पाला महात्मा फुले सहकारी बँकेकडून तीन कोटींचे कर्ज मिळाले आहे.

**प्रकल्पातील ठळक बाबी**

- रवा, मैदा, संदुरी आटा, गव्हाचा कोंडा यांची निर्मिती यंत्रसामग्रींची खरेदी मुख्यत्वे गुजरातमधून
- चोवीस तासाला शंभर टन अशी प्रक्रिया उद्योगाची क्षमता
- कच्चा माल (गहू) मुख्यत्वे मध्य प्रदेशातून व शेतक-यांकडून खरेदी केला जातो

'पाककृती' हा मुख्य ब्रॅंड, तर गव्हाच्या कोंड्याची विक्री कलश'बँडने 'रवा, आटा यांना हैदराबाद, पुणे, मुंबई, देवास, नागपूर, खामगाव आदी भागातून बिस्कीट उद्योगासाङ्गी, तर कोंडयाला मशरूम उत्पादक व पशुखाद्य उद्योगाकडून मागणी आहे.

उद्योगात अनेक अडथळे पार करावे लागले. त्यामुळे उत्पादन निर्मिती व विक्री यात काहीवेळा खंडही पडला मात्र वर्षाला अडीच ते साडेतीन कोटीच्या उलाढालीपर्यंत पोचण्यात वंदना यांनी यश मिळवले आहे. उद्योगात सुमारे ३० ते ३५ जणांना रोजगार दिला आहे. बहिणीचा मुलगा प्रणील बकाले मेकॅनिकल इंजिनिअर असून त्याची उद्योगात मोठी साथ आहे.

**धैर्य, धडाडीचा दिला परिचय**

आधुनिक फ्लोअर मिल राजस्थान, पंजाब लेखनी या भागात आहेत. त्यामुळे आपले तसे युनिट चालवणे उत्पादन तयार करणे यात प्रशिक्षित होणे गरजेचे होते. त्यासाठी दोन जुळया मुली लहान असण्याच्या काळात वंदना त्या राज्यात पोचल्या, तेथे संपर्क जाळे तयार करून प्रत्येक ठिकाणी काही काळ वास्तव्य केले. सर्व तंत्र आत्मसात केले.

निवास जेवणाची सुविधा शोधावी लागली. परराज्यांत अनोळखी भागांमध्ये महिला म्हणून वावरताना वंदना यांनी नेहमीच धैर्य, धडाडीचा दिला परिचय दिला. उद्योग उभारणीच्या काळात हेमंत यांचे निधन झाले. हा काळदेखील कसोटीचा होता. पण खचून न जाता वंदना यांनी उद्योग थांबविले नाही एका प्रसंगात बांधकामासाठी अभियंत्याला १४ लाख रूपये आगाऊ दिले होते. मात्र त्याने पैसे घेऊन पलायन केले यंत्रसामुग्री करिता दोन लाख रुपयेआगाऊ देऊनही पुरवठा झाला नाही या फसवणुकीमुळे दोन वर्षाचा कालावधी वाया गेला अशा रीतीने प्रत्येक अडथळ्याशी सामना करून नव्या जोमाने वंदना पुढे जात राहिल्या. नव उद्योजक, विशेषतः महिलांची उपेक्षा न कारता शासनाने त्यांना सर्वतोपरी पाठबळ, सहकार्य देण्याची अपेक्षा वंदना व्यक्त करतात. दुर्गापुर (बडनेरा विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ. के. पी. सिंह, (विस्तार) डॉ. प्रताप जायले गृहविज्ञान शाखेच्या डॉ. अर्चना काकडे यांचे मार्गदर्शन मिळाले आहे.(साभार सकाळ ॲग्रोवन)

**वंदना आकर्ते**
मो.७७६८०६४५४५

# मनोज जरांगे, अभिजीत दिपके आणि विद्यानंद बापट




वरील तीनही वेगळ्या क्षेत्रातील नावे आहेत पण या तिघांमध्ये काय साम्य काय आहे ?असा प्रश्न पडेल. साम्य असे आहे:

तिघेही असामान्य व्यक्तिमत्व नाहीत यांनी संघटना बांधणी करून अनेक वर्ष संघटनात्मक काम केलेले नाही.तिघांचेही वक्तृत्व प्रभावी नाही तिघांचे व्यक्तिमत्व जनसामान्यांवर मोहिनी टाकेल असे नाही तिघेही सर्वसामान्य कुटुंबातील आहेत फार संपत्ती संसाधने यांच्याकडे नाहीत.तिघांनाही राजकीय पार्श्वभूमी नाही तरीही जे मराठा नेत्यांना अनेक वर्षात जमले नाही ती विश्वासार्हता आणि आंदोलन मनोज जरांगे यांनी उभे करून दाखवले.

अभिजीत दिपके थेट विमानतळावरून उतरून मैदानावर गेला आणि केंद्र सरकारची दहशत झुगारून सरकारला झुकायला लावले आणि सर्व देशात धैर्य निर्माण केले . विद्यानंदचा आवाज आज महाराष्ट्रतील सर्व ॐ पेक्षा मोठा आहे.(अर्थात जरांगे यांचे आंदोलन त्याला प्रतिसाद हा या दोघांच्या तुलनेत व्यापक आहे, पण इथे नेतृत्व निर्मिती म्हणून मर्यादित तुलना केली आहे.)

नेता होण्यासाठी तुम्हाला खूप वर्ष काम करावे लागते किंवा गावागावामध्ये फिरून संघटना बांधावी लागते. कार्यकर्ता बांधणी करावी लागते आणि मग प्रश्न सुटायला सुरुवात होते.हे एक गृहीतक या तिघांनी मागे सारले आहे.याचा अर्थ काय...? याचा अर्थ जेव्हा समाजात अस्वस्थता खूप असते.तेव्हा त्या अस्वस्थतेला तोंड फोडणाऱ्या व्यक्तीचा समूह फक्त प्रामाणिकपणा बघत असतो आणि त्या धाडशी व्यक्तीच्या मागे समूह उभा राहतो हेच मनोज जरांगे अभिजीत दिपके आणि आता विद्यानंद दाखवत आहे. विद्यानंदाने महाराष्ट्रातील अनेक जिल्हे ही बघितले नाहीत पण उद्या प्रत्येक जिल्ह्यात जाऊन त्याने डीजे विरुद्ध सभा घेतली तर हजारो लोक जमतील व आंदोलन करतील.. मनोज जरांगे यांनी मध्यरात्री आणि पहाटे सभा घेतल्या तरी त्याला प्रतिसाद मिळतो आणि दिपके कोणत्याही राज्यात गेला तरी तरुणांची गर्दी होते यामध्ये समूह आणि समाज आपला नेता तयार करतात हा एक वेगळा मुद्दा पुढे आला आहे..यात पुन्हा लोक जात ही विसरतात हे ही लक्षात घ्यावे. दिपके बौद्ध आहेत आणि बापट कोकणस्थ ब्राह्मण .या दोन्हीही समुदायाला समूहाचे नेतृत्व करताना इतर वेळी जातीय विरोध सहन करावा लागतो पण आज बापट आणि अभिजीत जात ओलांडून सर्वव्यापी स्वीकारले गेले...हा जातीय परिघातील महत्वाचा मुद्दा आहे.

अर्थात याला समाज माध्यम हा महत्त्वाचा मुद्दा आहे ..सोशल मीडियाने हे तीनही नेते पुढे आणले आणि त्यांना समाज मनात प्रस्थापित केले हेही नोंदवायला हवे.नेता समाज घडवतो आणि समाजही नेता घडवतो हाच खरा मुद्दा आहे...अर्थात इथून पुढच्या काळात प्रत्येक प्रश्नासाठी अशा प्रकारचे तात्पुरत्या उद्रेकाचे असे नेते तयार होतील व ते त्या तात्कालिक प्रश्नांना सोडवण्यासाठी उत्तरही देतील, सरकारला झुकवतील पण त्या समूहाचे दीर्घकालीन प्रश्न सोडवण्यासाठी मात्र जुनीच पद्धत वापरावी लागेल... संघटना बांधणी कार्यकर्ता प्रशिक्षण आणि सातत्याने प्रबोधन करत संघर्ष करणे.

कम्युनिस्ट चळवळ, कष्टकरी लढे मेधा पाटकर यांच्यासारखे जे नेते व संघटना जे करतात त्याच पद्धतीने पुढे जावे लागेल अन्यथा असे नेते निर्माण होणे व मूळ व्यवस्थात्मक विषय पुन्हा मागे पडत जाणे यातून समाजात नैराश्यही वाढू शकते..

**हेरंब कुलकर्णी**

# डीजे हटवावा; मात्र गणेशोत्सवाचा उत्साह नव्हे!



गणेशोत्सव हा महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनाचा अविभाज्य भाग आहे.विघ्नहर्त्या गणरायाचे आगमन म्हणजे भक्ती, आनंद, उत्साह आणि सामाजिक एकोप्याचा सोहळा.सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधन, सामाजिक बांधिलकी आणि एकतेचा संदेश देण्याची मोठी परंपरा महाराष्ट्राला लाभली आहे. मात्र कालांतराने या उत्सवात मोठ्या प्रमाणावर ध्वनिप्रदूषण, अवाजवी खर्च आणि दिखाव्याची स्पर्धा वाढताना दिसत आहे.विशेषतः डीजेच्या कर्णकर्कश आवाजाचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे.

गणेशोत्सवातील मिरवणुका, मंडप आणि विविध कार्यक्रमांमध्ये मोठ्या आवाजात डीजे वाजवण्याची जणू स्पर्धाच सुरू झाली आहे. आवाजाची तीव्रता इतकी मोठी असते की परिसरातील नागरिकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. ज्येष्ठ नागरिक, लहान मुले, विद्यार्थी, रुग्ण तसेच रात्रपाळी करून विश्रांती घेणाऱ्या नागरिकांच्या शांततेवर त्याचा परिणाम होतो. केवळ माणसांनाच नव्हे, तर पक्षी आणि प्राण्यांनाही मोठ्या आवाजाचा त्रास होतो. त्यामुळे गणेशोत्सवाच्या आनंदात इतरांच्या आरोग्याचा आणि शांततेचा बळी देणे योग्य ठरणार नाही.

पुण्यात सुरू झालेल्या 'डीजे हटाव' चळवळीला मिळणारा प्रतिसाद ही वाढत्या जनजागृतीची चिन्हे आहेत.या चळवळीचे पडसाद महाराष्ट्रातील विविध शहरांमध्ये आणि गावांमध्ये उमटताना दिसत आहेत. मात्र प्रश्न असा आहे की, डीजेवर पूर्णपणे बंदी घालणे हा उपाय आहे की आवाजाला मर्यादा घालणे हा अधिक योग्य मार्ग आहे? यावर समाजाने आणि प्रशासनाने विचार करणे आवश्यक आहे.

गणेशोत्सवातील पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम, भजन, कीर्तन आणि सांस्कृतिक कार्यक्रम यांना आपली वेगळी ओळख आहे. आधुनिक मनोरंजनाच्या नावाखाली पारंपरिक संस्कृती बाजूला पडणे योग्य नाही. उत्सवातील आनंद टिकवून ठेवतानाच ध्वनिप्रदूषणाला आळा घालणे शक्य आहे. त्यासाठी ध्वनीची मर्यादा, वेळेचे काटेकोर पालन आणि नियमांचे प्रभावी पालन आवश्यक आहे.यासाठी प्रशासनाने केवळ गणेशोत्सवाच्या काळात कारवाई न करता वर्षभर जनजागृती केली पाहिजे. गणेश मंडळांनीही सामाजिक जबाबदारी स्वीकारून ध्वनिप्रदूषणमुक्त उत्सव साजरा करण्याचा संकल्प केला पाहिजे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कोणताही भेदभाव न करता कारवाई झाली पाहिजे. त्याचबरोबर नागरिकांनीही तक्रार करण्यापेक्षा प्रथम स्वतः जबाबदार नागरिक म्हणून नियमांचे पालन करण्यास सुरुवात केली पाहिजे.

गणेशोत्सव हा आवाजाची ताकद दाखवण्याचा नव्हे, तर भक्तीची ताकद दाखवण्याचा उत्सव आहे. डीजेचा दणदणाट जितका मोठा, तितकी भक्ती मोठी असे समीकरण असू शकत नाही. उलट शांतता, शिस्त, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी यामुळे उत्सवाचे खरे सौंदर्य खुलते.डीजेचा दणदणाट थांबवणे म्हणजे गणेशोत्सवाचा उत्साह कमी करणे नव्हे. उलट ध्वनिप्रदूषणाला आळा घालून भक्ती, संस्कृती आणि सामाजिक सलोखा जपणे होय. 'उत्सव हवा, पण त्रास नको' हा विचार प्रत्येक गणेश मंडळाने आणि प्रत्येक नागरिकाने स्वीकारला, तर गणेशोत्सव खऱ्या अर्थाने आनंदोत्सव ठरेल.

**श्याम ठाणेदार**

# प्रदीप चौधरी : विचार, संस्कार आणि सामाजिक कार्याचा प्रेरणादायी प्रवास

रिद्धपूर या गावाला प्राचीन इतिहास आहे. या गावाच्या मातीशी ज्यांची नाळ जोडली गेली, त्यांचे विचार प्रगल्भ आणि आचरण समाजासाठी प्रेरणादायी ठरलेले आहे. या गावातील वातावरण म्हणजे सकाळ-संध्याकाळ होणारा घंटानाद, आरत्या, उटीचा सुगंध आणि महान विभूतींच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी! 'एक मंदिराचे गाव' म्हणून रिद्धपूर या गावाचा संपूर्ण जगात सन्मानाने परिचय आहे. या मातीतच निश्चितच काही अद्भुत गुण आहेत.म्हणूनच या मातीत जो कोणी जन्म घेतो, जो या मातीत संस्कार घेतो, तो निश्चितच विचाराने आणि आचाराने मोठा होतो.

असेच एक नाव या मातीत जन्मलेले, विचारांसाठी जगणारे ते म्हणजे प्रदीप चौधरी! एक साहित्यिक, कवी मनाचा माणूस आणि संवेदनशील व्यक्तिमत्त्व.या नावाभोवती वेदनेच्या जाणिवेचे वलय आहे; त्यासोबतच संस्कार आणि विचारांची समृद्ध परंपराही आहे.त्यांनी लहानपणापासूनच घरी त्यांनी अनेक महान व्यक्तींचा वावर पाहिला. यामध्ये भाई मंगळे, सुदाम काका देशमुख, ताराबेन मशरूवाला तसेच महानुभाव पंथातील अनेक अभ्यासक व महंतांचे पाय या घराला लागले.मोर्शी तालुक्यात सुरुवातीच्या काळात शहीद भगतसिंग वाचनालयाची सुरुवात चौधरी गुरुजी यांनी केली. तेव्हापासूनच पुस्तके, पुरातन ग्रंथ, प्राचीन साहित्यापासून आधुनिक विचारांपर्यंत विविध विषयांवरील साहित्य या ग्रंथालयात उपलब्ध होते. याच वातावरणातून प्रदीप चौधरी यांना नकळत विचारांचे बाळकडू मिळाले.

**शिस्त आणि नियोजनाचा आदर्श**

शिस्त म्हणजे काय असते, हे प्रदीप काकांकडून शिकावे. कोणत्याही कामाची घाई असली तरी त्यामागे योग्य नियोजन असते. एखादा प्रसंग घडवून आणताना काळ आणि वेळेचा योग्य मेळ कसा घालावा, हे मी त्यांच्याकडून प्रत्यक्ष पाहिले आहे.सामाजिक कार्यक्रम असो किंवा कौटुंबिक कार्यक्रम..प्रत्येक गोष्टीचे बारकाईने नियोजन कसे असावे, हे त्यांच्या कार्यातून शिकायला मिळते.बऱ्याच साहित्य संमेलनांचे आयोजन त्यांनी केले आहे. वैचारिक कार्यक्रमांपासून सामाजिक कार्यक्रमांपर्यंत आयोजन आणि नियोजनाचे कौशल्य त्यांना सहज अवगत आहे.अंकुर साहित्य संमेलनाचे आयोजक म्हणून त्यांनी सुरुवातीच्या काळात अनेक साहित्य संमेलने आयोजित केली.शहीद भगतसिंग वाचनालय तसेच शब्दांकुर सार्वजनिक वाचनालय या दोन्ही वाचनालयांच्या आजच्या अस्तित्वामध्ये त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे.सामाजिक आणि कौटुंबिक बाबतीत सर्वांची काळजी घेण्यापासून ते कोणत्याही कार्यक्रमाचे महत्त्व जाणून घेऊन त्यातील छोट्या-छोट्या गोष्टींकडे बारकाईने लक्ष देण्यापर्यंत त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे एखादा मोठा कार्यक्रमही प्रदीप काकांच्या नियोजनामुळे सहज शक्य होतो.

**ताराबेन मशरूवाला यांच्या कार्याचा परिचय**

विदर्भामध्ये गांधीजींच्या 'पंचकन्या' म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो, त्यापैकी ताराबेन मशरूवाला यांच्यावरील पहिले पुस्तक लिहिले जात असताना प्रदीप काकांकडे राहून त्या पुस्तकाच्या निर्मितीचा साक्षीदार बनलो.त्या पुस्तकाच्या मुखपृष्ठापासून मलपृष्ठापर्यंत प्रत्येक गोष्टीमागे त्यांचा कलात्मक आणि संवेदनशील विचार होता. ताराबेन मशरूवाला यांचे कार्य समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी घेतलेली धडपड पाहिली आहे.

महात्मा गांधी मध्य भारतातील विविध प्रांतांमध्ये कार्यरत होते. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणाऱ्या ताराबेन मशरूवाला यांचा विशेष सहवास प्रदीप काकांना लाभला.कस्तुरबा सर्वोदय मंडळ जेव्हा माधान येथे स्थापन झाले, तेव्हा अनाथ आश्रम, शाळा, विधवा आश्रम तसेच परित्यक्ता आश्रम अशा संस्थांच्या माध्यमातून समाजातील दुर्बल घटकांसाठी कार्य केले जात होते.या संस्था गांधीजींच्या विचारांचा आणि साधेपणाचा खरा केंद्रबिंदू होत्या.महिला, मुले आणि समाजातील दुर्बल घटकांसाठी काम करणाऱ्या या संस्थेला अनेक अडचणींचा सामना करावा लागला. या अडचणींच्या काळात काकांनी



आपल्या कौशल्याने ही संस्था पुढे नेण्याचा प्रयत्न केला.त्याचाच परिणाम म्हणून आज ते कस्तुरबा सर्वोदय मंडळाचे अध्यक्ष आहेत.प्रदीर्घ संघर्षानंतर या संस्थेला पुन्हा चांगले दिवस आले आणि त्यामध्ये काकांचे योगदान महत्त्वाचे आहे.

**साहित्य, लेखन आणि संशोधन**

प्रदीप चौधरी यांचा कवी, लेखक, साहित्यिक आणि विचारवंत म्हणून कार्याचा आढावा घेतला, तर त्यांच्या नावावर प्रकाशित झालेल्या अनेक ग्रंथांचा उल्लेख करावा लागतो.यामध्ये नलिनीताई लडके तसेच पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांच्यावरील ग्रंथांचा समावेश आहे. तसेच ग्रंथालयाच्या नियोजनासंदर्भात मार्गदर्शन करणारे पुस्तकही त्यांनी प्रकाशित केले आहे. 'ग्रंथालय नियोजन' या पुस्तकातून ग्रंथालयाच्या नियोजनासह त्याच्या विविध पैलूंचा सखोल विचार मांडण्यात आला आहे.महाराष्ट्रात ग्रंथालयाच्या सर्वांगीण नियोजनाचा विचार एका पुस्तकाच्या माध्यमातून मांडणारे हे महत्त्वाचे कार्य आहे.याशिवाय पत्रकार म्हणूनही त्यांनी प्रदीर्घ काळ काम केले. संशोधनपर लेख, कविता, कथा आणि विविध विषयांवरील लेख अनेक वृत्तपत्रांमध्ये प्रकाशित झाले. त्यांच्या या लेखनाला आणि संशोधनपर कार्याला त्या काळात मोठी लोकप्रियता मिळाली.प्रदीप काकांच्या लेखनामुळे अनेक महान विभूतींच्या कार्याची ओळख समाजाला त्यांच्या पुस्तकांमधून झाली.

**पत्रकारितेतील योगदान**

पत्रकारितेचे कार्य त्या काळात आजच्यासारखे सोपे नव्हते. आधुनिक तंत्रज्ञान उपलब्ध नसताना बातमी पाठवण्यासाठी पोस्टाचा वापर करावा लागे किंवा स्वतः वृत्तपत्राच्या कार्यालयात जाऊन बातमी द्यावी लागे.बातमी छापून आल्यानंतर ती वृत्तपत्रे लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कामही तितकेच महत्त्वाचे होते.प्रदीप चौधरी यांनी त्या काळात हे कार्य सातत्याने केले. म्हणूनच ग्रंथालय चळवळ आणि पत्रकारिता या दोन्ही क्षेत्रांतील त्यांचे योगदान मोठे आहे. ग्रंथालय ही केवळ पुस्तके ठेवण्याची जागा नसून, विचार लोकांपर्यंत पोहोचवण्याची आणि त्या विचारांतून संस्कार घडवण्याची जागा आहे. आज आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात इंटरनेटच्या माध्यमातून सहज ज्ञान उपलब्ध होत असतानाही ग्रंथालयाचे महत्त्व आणि अस्तित्व टिकवून ठेवण्याचे कार्य प्रदीप चौधरी यांनी कधीच सोडले नाही.

**पुढील पिढ्यांसाठी प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व**

काही व्यक्ती नेमक्या कशा आहेत, हे समजून घेणे सहज शक्य नसते. त्यांच्या जाणिवा, त्यांच्या भावना आणि त्यांच्या कार्यामागचे अस्तित्व कधीतरी कुणाला समजावे, या अपेक्षेने कदाचित त्या व्यक्ती जगतही नसतात.परंतु प्रदीप चौधरी यांच्या कार्याचा लेखाजोखा येणाऱ्या पिढ्यांनी आणि तरुणांनी अभ्यासावा, या अनुषंगाने हा लेखप्रपंच केला आहे.ग्रंथालयाची चळवळ असो, साहित्याची चळवळ असो किंवा सामाजिक चळवळ.या सर्वांमध्ये ज्यांनी स्वतःचे अस्तित्व शोधले आणि त्यातून समाधान मिळवले, असे व्यक्तिमत्त्व आज विदर्भामध्ये आहे.त्यांच्या कार्याचा आढावा घेऊन आपण आदर्श घेऊ शकतो, प्रेरणा घेऊ शकतो आणि समाजासाठी काहीतरी करण्याची ऊर्जा मिळवू शकतो.

**संस्कारांचा वारसा**

रिद्धपूर येथील चौधरी गुरुजींचे घर म्हणजे जणू सर्वांसाठी ज्ञानाचे आणि संस्कारांचे मंदिरच होते. अत्यंत जाणीवपूर्वक सर्वांच्या विचारांची आणि भुकेची काळजी त्या काळात प्रदीप काकांच्या राहत्या घरी घेतली जात असे.मातीच्या भिंती खचल्या आणि आता विटांच्या भिंती उभ्या राहिल्या; परंतु प्रदीप चौधरी यांनी हा संस्कारांचा वारसा पुढे नेण्यासाठी घेतलेली प्रचंड मेहनत सर्वांना माहीत आहे.चौधरी गुरुजींचे विचार आणि संस्कार यांचा परिणाम म्हणजे 'प्रदीप चौधरी' हे नाव!

धार्मिक कार्यापासून सामाजिक कार्यापर्यंत त्यांनी अनेकांना मदत केली आहे. त्यांच्या कार्याचा आवाका खूप मोठा आहे.एक अभ्यासक म्हणून जेव्हा त्यांच्याकडे पाहिले जाते, तेव्हा प्रत्येक क्षेत्रातील त्यांचे अपूर्व ज्ञान येणाऱ्या पिढ्यांसाठी निश्चितच मार्गदर्शक ठरते. आज एका सामाजिक संस्थेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारताना त्या संस्थेतील अनाथ, पीडित तसेच विद्यार्थ्यांची काळजी घेण्याचे कार्य ते करत आहेत. त्यांच्या भविष्यातील जीवनाला योग्य दिशा मिळावी, यासाठी ते काळजीपूर्वक आणि सातत्याने प्रयत्नशील आहेत.

आज प्रदीप चौधरी या साहित्य, सामाजिक, धार्मिक आणि पत्रकारिता अशा विविध क्षेत्रांमध्ये अनुभवाचा समृद्ध ठेवा जपणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा वाढदिवस! या विशेष दिनानिमित्त त्यांना मनःपूर्वक वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

**चंद्रशेखर तरारे,**
विचोरी

# दोन वर्षे 'सेटिंग'च्या सावलीत जुगार? अखेर रहेमानच्या अड्ड्यावर एलसीबीचा प्रहार!

## आधी कारवाईचा प्रयत्न फोल; वरिष्ठांची नजर खिळली अन मध्यरात्री धाड पडली

■ प्रतिनिधी | अकोला ■

घराच्या हॉलमध्ये जुगाराचा डाव रंगवायचा... स्थानिक पातळीवर त्याची कुणकुण असूनही अड्डा सुरूच ठेवायचा... आणि कारवाईचा प्रयत्न झाला तरी त्यातूनही सहीसलामत बाहेर पडायचे! रहेमानच्या कथित जुगार अड्ड्याची हीच 'कारकीर्द' आता स्थानिक गुन्हे शाखेच्या धडाकेबाज कारवाईने संपुष्टात आणण्याचा इशारा दिला आहे. शुक्रवारी मध्यरात्री 'ऑपरेशन प्रहार' अंतर्गत एलसीबीने या अड्ड्यावर छापा टाकत तब्बल १८ जुगाऱ्यांना ताब्यात घेतले असून १० लाख २७ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

सूत्रांच्या माहितीनुसार, मो. रेहमान मो. इब्राहिम याच्या घरातील हॉलमध्ये गेल्या दोन वर्षांपासून जुगाराचा अड्डा सुरू असल्याची चर्चा होती. परिसरात या अड्ड्याची माहिती असल्याचेही सांगितले जाते. विशेष म्हणजे, काही दिवसांपूर्वी या अड्ड्यावर कारवाई करण्याचा प्रयत्न झाल्याची माहिती सूत्रांकडून मिळत असून, मात्र ती कारवाई अपेक्षित परिणामापर्यंत पोहोचली नाही. पहिल्या प्रयत्नानंतर मात्र संबंधित अड्डा पोलिसांच्या रडारवरून उतरला नाही. उलट, वरिष्ठ पातळीवरून या ठिकाणावर लक्ष ठेवण्यात येत असल्याची माहिती सूत्रांकडून समोर आली आहे. जुगार पुन्हा सुरू झाल्यास कठोर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आल्याचीही चर्चा होती.

अन् अखेर शुक्रवारी रात्री संधी मिळताच स्थानिक गुन्हे शाखेने थेट अड्ड्यावर धडक दिली. घरातील हॉलमध्ये सुरू असलेल्या जुगारावर अचानक छापा पडताच तेथे उपस्थित असलेल्यांची धावपळ उडाली. मात्र, पोलिसांनी १८ जणांना ताब्यात घेतले.(छाप्यात पोलिसांच्या हाती लागलेला मुद्देमालही मोठा आहे. १ लाख ६० हजार ५५० रुपयांची रोकड, विविध कंपन्यांचे १४ मोबाईल—१ लाख ९७ हजार रुपये, तसेच सहा मोटारसायकली—६ लाख ७० हजार रुपये, असा एकूण १० लाख २७ हजार ७५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. सहा मोटारसायकली आणि मोठ्या प्रमाणातील मोबाईल अड्ड्यावर आढळून आल्याने या जुगाराच्या अड्ड्यावर नेमक्या किती मोठ्या प्रमाणात हालचाली सुरू होत्या, याची चर्चा आता सुरू झाली आहे.




### कारवाईचे शिलेदार

ही कारवाई पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बि. चंद्रकांत रेड्डी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन लेव्हरकर यांच्या नेतृत्वातील सहायक पोलीस निरीक्षक निलेश देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक गोपाल जाधव, पोलीस उपनिरीक्षक माजीद पठाण, पोलीस उपनिरीक्षक अनिल चव्हाण तसेच पोलीस अंमलदार शेख हसन, सुलतान पठाण, भास्कर धोत्रे, अब्दुल माजीद, खुशाल नेमाडे, एजाज अहमद, अमित दुबे, वसिमोद्दीन, श्रीकांत पातोंड, राज चंदेल, आकाश मानकर, धीरज वानखडे, अभिषेक पाठक, पवन डांबलकर, सतीश पवार, मोहम्मद आमीर, चालक प्रविण कश्यप, मनिष ठाकरे आणि प्रकाश लोखंडे यांनी केली.

### स्थानिक पोलिसांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह?

एलसीबीच्या कारवाईनंतर सर्वाधिक चर्चेत आलेला मुद्दा म्हणजे हा अड्डा इतके दिवस सुरू असल्याचे सांगितले जात असताना स्थानिक पोलीस यंत्रणेला त्याची माहिती नव्हती का? सूत्रांच्या माहितीनुसार, अड्ड्याची माहिती स्थानिक पातळीवरील काहींना असल्याची चर्चा होती. तरीही कारवाईस विलंब का झाला, याबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. या कथित 'डोळेझाकी'मागे नेमके काय कारण होते, याचा तपास वरिष्ठ अधिकाऱ्यांनी केल्यास अनेक बाबी समोर येण्याची शक्यता आहे. मात्र, स्थानिक यंत्रणेच्या कथित दुर्लक्षाबाबत अधिकृत पुष्टी झालेली नसल्याने याबाबतचा अंतिम निष्कर्ष चौकशीनंतरच स्पष्ट होणार आहे.

### 'ऑपरेशन प्रहार'चा पुन्हा दणका

जिल्ह्यातील अवैध धंद्यांविरोधात पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांच्या निर्देशानुसार 'ऑपरेशन प्रहार' सुरू आहे. त्याच मोहिमेअंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली. स्थानिक पातळीवर वर्षानुवर्षे सुरू असल्याचा दावा केला जाणारा अड्डा अखेर वरिष्ठ यंत्रणेच्या थेट कारवाईत उद्ध्वस्त झाल्याने अवैध जुगार चालविणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. या कारवाईतून एक बाब मात्र स्पष्ट झाली—जुगाराचा डाव कितीही आतल्या गोटात रंगला, तरी पोलिसांच्या रडारवर आल्यानंतर त्याचा हिशेब चुकवता येणार नाही.

# ग्रामसभा घेतली नसल्याचा आरोप फेटाळला!

■ प्रतिनिधी | पातूर ■

**सावरगावच्या सरपंचांना जिल्हाधिकारी न्यायालयाकडून दिलासा; ग्रामसभा झाल्याचे कागदोपत्री पुरावे ठरले निर्णायक**

सावरगाव ग्रामपंचायतीच्या सरपंच बसंतीबाई राधेश्याम राठी यांच्याविरुद्ध सन २०२३-२४ मध्ये ग्रामसभा घेतली नसल्याचा आरोप करीत दाखल करण्यात आलेल्या अर्जावर जिल्हाधिकारी न्यायालयाने महत्त्वपूर्ण निर्णय दिला आहे. सरपंचांनी ग्रामसभा झाल्याचे दर्शविणारे प्रवेश व संबंधित कागदपत्रे सादर केल्याने अर्जदाराचा दावा ग्राह्य धरता आला नाही. जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी हा अर्ज फेटाळून लावला आहे.

सावरगाव येथील रविंद्र जानकीराम राठोड यांनी महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ मधील कलम ३६ अन्वये जिल्हाधिकारी यांच्या न्यायालयात अर्ज दाखल केला होता. ग्रामपंचायतीने सन २०२३-२४ मध्ये ग्रामसभा घेतली नसल्याचा आरोप करीत त्यांनी सरपंच बसंतीबाई राधेश्याम राठी तसेच ग्रामपंचायत अधिकारी आणि सचिव यांना गैरअर्जदार केले होते. या प्रकरणात संबंधित अहवाल जिल्हाधिकारी कार्यालयाकडे सादर करण्यात आला. सुनावणीदरम्यान सरपंच राठी यांनी ग्रामसभा झाल्याचे दर्शविणारे आवश्यक अभिलेख आणि कागदपत्रे न्यायालयासमोर सादर केली. या कागदपत्रांची न्यायालयाने पडताळणी करून प्रकरणातील उपलब्ध नोंदींचा विचार केला. त्यानंतर जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी २५ ऑगस्ट २०२६ रोजी आदेश पारित करीत रविंद्र राठोड यांचा ७ ऑक्टोबर २०२५ रोजीचा अर्ज फेटाळून लावला. त्यामुळे ग्रामसभा न घेतल्याचा आरोप सरपंचांविरुद्धच्या या प्रकरणात सिद्ध झालेला नाही, असे आदेशातून स्पष्ट झाले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयाने आदेशाची प्रत गटविकास अधिकारी, पातूर यांच्याकडे पाठविली आहे. आदेशाची अंमलबजावणी करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. ग्रामसभा झाली नसल्याचा आरोप करीत जिल्हाधिकारी न्यायालयात पोहोचलेले हे प्रकरण अखेर सरपंचांनी सादर केलेल्या कागदपत्रांमुळे त्यांच्या बाजूने निकाली निघाले. त्यामुळे सावरगाव ग्रामपंचायतीच्या कारभारावर उपस्थित करण्यात आलेल्या या मुद्द्याला जिल्हाधिकारी न्यायालयाच्या आदेशाने तूर्तास पूर्णविराम मिळाला आहे.

# पातुरात साकारणार एक हजार पर्यावरणपूरक गणेशमूर्ती!

■ प्रतिनिधी | पातूर ■

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत पातूर येथील किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी एक हजार पर्यावरणपूरक गणेशमूर्ती साकारण्याचा संकल्प केला आहे. शाळेत नुकत्याच आयोजित करण्यात आलेल्या पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मिती कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी हा संकल्प केला.या कार्यशाळेत सुप्रसिद्ध पर्यावरणप्रेमी शरद कोकाटे यांनी प्रमुख मार्गदर्शक म्हणून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रसंत विचार साहित्य संमेलन समितीचे अध्यक्ष डॉ.रामेश्वर



बरगट होते.पातूर वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष डांगे,झी २४ तासचे जिल्हा प्रतिनिधी जयेश जगड,किड्स पॅराडाईज पब्लिक स्कूलचे संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे,कार्यकारी संचालिका सौ.ज्योत्स्ना गाडगे,गुल्हाने सर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यशाळेचे प्रास्ताविक संस्थापक अध्यक्ष गोपाल गाडगे यांनी केले.वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष डांगे यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व पटवून देत पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचे आवाहन केले.यानंतर कार्यशाळेचे मार्गदर्शक शरद कोकाटे यांनी विद्यार्थ्यांना शाडू मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती तयार करण्याचे प्रात्यक्षिक करून दाखविले. अतिशय सोप्या आणि सहज पद्धतीने त्यांनी मूर्ती निर्मितीची प्रक्रिया समजावून सांगितली. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत स्वतः गणेशमूर्ती तयार करण्याचा अनुभव घेतला.

# महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोग दि. ९ सप्टेंबरला अकोल्यात

■ प्रतिनिधी | अकोला ■

महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या वतीने अकोला जिल्ह्याचा दौरा दि. ९ सप्टेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आला आहे. या दौऱ्यादरम्यान बालकांच्या हक्कांचे संरक्षण, बाल संरक्षण व्यवस्थेची अंमलबजावणी तसेच बालगृहातील बालकांच्या परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार आहे.

दौऱ्याच्या पहिल्या टप्प्यात सकाळी ११.०० ते दुपारी १२.३० वाजेपर्यंत बाल हक्कांशी संबंधित प्रकरणांची सुनावणी आयोजित करण्यात आली आहे. ही सुनावणी महिला व बाल विकास भवन, संतोषी माता मंदिराजवळ, अकोला येथे होणार आहे.त्यानंतर दुपारी १२.३० ते २.०० वाजेपर्यंत अकोला जिल्ह्यातील बाल संरक्षण विषयक कामकाजाची आढावा बैठक आयोजित करण्यात आली आहे. ही बैठक मीटिंग हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, अकोला येथे होणार आहे. बैठकीमध्ये जिल्ह्यातील बाल संरक्षणाशी संबंधित विविध बाबी, प्रलंबित प्रकरणे, बालकांच्या हक्कांच्या संरक्षणासाठी करण्यात येणाऱ्या उपाययोजना तसेच संबंधित यंत्रणांच्या कामकाजाचा आढावा घेण्यात येणार आहे. दौऱ्याच्या अंतिम टप्प्यात दुपारी ३.०० ते सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत आयोगाच्या वतीने अकोला जिल्ह्यातील बालगृहांना भेट देण्यात येणार आहे. या भेटीदरम्यान बालगृहातील बालकांच्या निवास, शिक्षण, आरोग्य, सुरक्षा, आहार, समुपदेशन व पुनर्वसनाच्या व्यवस्थेची पाहणी करण्यात येणार असून बालकांना उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या सुविधांचा आढावा घेतला जाणार आहे. महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाच्या या दौऱ्यामुळे अकोला जिल्ह्यातील बाल संरक्षण यंत्रणा अधिक सक्षम करण्यास तसेच बालकांना त्यांच्या हक्कांनुसार सुरक्षित, सन्मानजनक व पोषक वातावरण उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक उपाययोजनांना चालना मिळणार आहे.

# सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने कावड व यात्रेकरूंसाठी मोफत आरोग्य तपासणी औषध वितरण

■ प्रतिनिधी | अकोला ■

सामाजिक व आरोग्य सेवेत सक्रिय सुमिरमा फाउंडेशनच्या वतीने कावडधारी व यात्रेकरूसाठी मोफत आरोग्य तपासणी,औषध वितरण व मलम पट्टी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सोमवार दि ७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजतापासून खरोटे ज्वेलर्स परिसर कॅम्प गांधी चौक येथे हे एक दिवसीय शिबिर होणार आहे.यात गांधी चौकात आगमन होणाऱ्या कावडधारी व यात्रेकरूची आरोग्य तपासणी करण्यात येऊन त्यांना मोफत औषध व मलमपट्टी करण्यात येणार आहे. फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ. पूजा सुमित्रा रमाकांत खेतान यांच्या अध्यक्षतेत तथा फाउंडेशनचे मार्गदर्शक रमाकांत खेतान यांच्या मार्गदर्शनात आयोजित या शिबिराचा कावडधारी वर्गाने मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन फाउंडेशनचे सेवाधारी आशिष खिल्लारे,विनोद इंगळे, प्रवीण भोरे,आनंद गाढे, प्रवीण काळे, नंदकिशोर गावंडे, संतोष वक्ते, स्वराज पडोळे,आकाश सूर्यवंशी,सागर शिंदे, गौरव खंडारे, मोहम्मद नदीम, विशाल धांडे, किर्ती काळे, श्रुति सदांशिव, अश्विनी परदेशी, अश्विनी काळे, गीता मौर्य, रेणुका झिरपे, श्रावणी काळे, तनुश्री काळे आदींनी केले.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

संपादक - प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २६७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

मुख्य कार्यालय :— अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**Change In Name**

I Have Changed My Name From
**KM ANJU DEVI**
-TO-
**ANJU SHUBHAM MOURYA**
My Residential Address in:- Kaulkhed road, Hingna fata akola

**Change In Name**

I Have Changed My Name From
**GUNJAN MAHAVIR TAYADE**
-TO-
**GUNJAN MAHAVIR TAYDE**
My Residential Address in:- Emerald Colony, Near Emerald high school, Akoli kh, Akola 444002

**Change In Name**

I Have Changed My Name From
**NEETU MOHANKUMAR VARMA**
-TO-
**NITU SUMIT VARMA**
My Residential Address in:- Jagannath Villa, Behind Jain Lawn 1st Galli Tapadia Nagar akola 444005

**Change In Name**

I Have Changed My Name From
**MUKTABAI GAJANAN SHETE**
-TO-
**MUKTA MADHAVRAO BAKAL**
My Residential Address in:- At. po keliweli Tq Akot, Akola 444111

**Change In Name**

I Have Changed My Name From
**MADHAORAO NARAYAN BAKAL**
-TO-
**MADHAV NARAYAN BAKAL**
My Residential Address in:- At. po keliweli Tq Akot, Akola 444111

**जाहीर सुचना**

दि. ५.९.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, आमचे पक्षकार, हे श्रीमती शालिनी देवीदास असोलकर व विशाल देवीदास आसोलकर यांचे मालकीचे व ताब्यातील मौजे उमरी ता. जि. अकोला, म.न.पा. अकोला चे हद्दीतील सर्व्हे नं ३७/२-अ, लेआऊट प्लॉट नं १ वर बांधलेल्या मते कॉम्प्लेक्स मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट क्र. ८. ज्याचे क्षेत्रफळ ७२.२१ चौ.मी. व अविभाजित हिश्यासह ज्यास चतुसिमाः पुर्वेस सर्विस लाइन, पश्चिमेसः फ्लॅट क्र १, उत्तरेस : फ्लॅट क्र ७, व दक्षीणेस : श्री शेंडे साहेब यांचे घर, अशी मालमत्ता विकत घेत आहेत, व तसा करार झालेला आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमते बाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास, खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित, आज पासुन सात (७) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि याचि कृपया नोंद घ्यावि.

आपला
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो. ९८२३०९१३७७

**जाहीर नोटीस**

**वि.०४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. ४४२/२०२६ प्रोसेस नं.३९७३/२०२६
चौ.ता. २०/०४/२०२६ दिनांक : २०/०३/२०२६

**अर्जदार :** १. मनिष मोहनलाल कनोजिया २. निता मोहनलाल कनोजिया ३. पिंकी मोहनलाल कनोजिया अर्जदार क्र. १ ते ३ रा. गंगा सदन, नगर परिषद कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला. ता. जि. अकोला. ४. सोनाली मोहनलाल कनोजिया उर्फ सोनल सुनिल परदेशी रा. गल्ली नं. ५, मुराई मोहल्ला छावणी, इंदौर. ता. जि. इंदौर. एम. पी. ४५२००१

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. विमला मोहनलाल कनोजिया २. मोहनलाल ओरिराम कनोजिया
**पत्ता :-** रा. गंगा सदन, नगर परिषद कॉलनी, गौरक्षण रोड, अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत विमला मोहनलाल कनोजिया यांचे दि. ०६/०५/२०२० रोजी व तसेच मयत मोहनलाल ओरिराम कनोजिया यांचे दि. २३/०३/२०२५ रोजी अकोला ता. जि. अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २०/०४/२०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक २०/०३/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर सुचना**

दि. ५.९.२०२६

सर्वत्र लोकांना कळविण्यात येते कि, विकास पवनकुमार गर्ग व सपना विकास गर्ग यांचे मौजे उमरखेड, ता. जि अकोला येथील शेत सर्वे क्र ८. मधील प्रभा नगर लेआऊट मधील प्लॉट क्र ८, (७/१२ प्रमाणे ८/६/८) बाबतचे आधीचे खरेदीखत दि. ८.९.१९९४, दस्त क्र २८५० व ८.९.१९९४, दस्त क्र २८५१, हे दोन्ही मुळ खरेदीखत हरवले/अनावधानाने गहाळ झाले आहे, व शोधुन सापडलेले नाही. त्याबाबत मी रीतसर संबंधित पो. स्टे, कडे कार्यवाही केली आहे.

तरी सदरच्या वर उल्लेखीत मालमत्ते बाबत वा हरवलेल्या दस्ताबाबत कोणाचा कोणत्याहि प्रकारचा हक्क, संबंध, गहाण, अगर बोजा असल्यास, किंवा काही हीतसंबंध असल्यास खालील पत्त्यावर कागद पत्रा सहित आज पासुन चौदा (१४) दिवसांचे आत भेटावे. अन्यथा कोणाचा कोणत्याहि प्रकारचा उजर चालणार नाहि. याची कृपया नोंद घ्यावि.

आपला
**शिशिर अरविंद देशपांडे**
अधिवक्ता, दिवाणी न्यायालयासमोर,
स्टेशन रोड, अकोला मो. ९८२३०९१३७७

**जाहीर नोटीस**

सर्वत्र लोकांना या जाहीर नोटीसद्वारे सूचित करण्यात येते की,

आमचे पक्षकार यांनी १) प्रेम सुभाष गोयल व २) राहुल सुभाष गोयल, दोघे रा. बेव्हर्ली हिल्स, स. नं. ३४/४, राजना बेव्हर्ली हिल्स, पॅन कार्ड क्लब रोड, बाणेर, जि. पुणे, यांच्याकडून खालील स्थावर मालमत्तेचा खरेदीचा सौदा निश्चित केला आहे..

**मालमत्तेचे वर्णन :** मौजे शिवणी, प्र. ता. जि. अकोला, र.स.डी., र.डी., जि.प. व पं.स. अकोला, पूर्वीची ग्रामपंचायत शिवणी व हल्ली महानगरपालिका, अकोला मध्ये समाविष्ट असलेल्या हद्दीतील शेत सर्व्हे नं. १०२/५ मधील एकूण २ एकर २० गुंठे जमीन असून, सदर जमिनीबाबत वि. एस. डी. ओ., अकोला यांच्या फाईलवरील रा.मा.क्र. एनएपी-३४/शिवणी/२९/१९७८-७९, निर्णय दिनांक ०६/०२/१९८० अन्वये मंजूर झालेल्या लेआऊट नकाशातील लेआऊट प्लॉट क्र. ४ (चार) हा सदर खरेदी व्यवहारातील प्लॉट आहे.

**प्लॉटचे मोजमाप पुढीलप्रमाणे आहे :-** पूर्व-पश्चिम ५० फूट (१५, २४ मीटर) उत्तर-दक्षिण : ६० फूट (१८.२९ मीटर) एकूण क्षेत्रफळ : ३,०००.०० चौ. फूट (२७९.०० चौ. मीटर) ७/१२ उताऱ्यानुसार क्षेत्रफळ : २७८.०० चौ. मीटर

**सदर मालमत्तेची चतुःसीमा पुढीलप्रमाणे:** पूर्वेस - लेआऊट प्लॉट क्र. ३ उत्तरेस सर्व्हिस लेन पश्चिमेस लेआऊट प्लॉट क्र. ५ दक्षिणेस - ४० फूट रुंदीचा रस्ता

वरील मालमत्तेवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, गहाणखत, सावकारी व्यवहार, बक्षीसपत्र, हितसंबंध, आक्षेप अथवा हरकत असेल, तर त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत खालील पत्त्यावर संबंधित कागदपत्रांसह संपर्क साधावा. दर्शविलेल्या मुदतीत कोणताही संपर्क न झाल्यास, कोणालाही कोणतीही हरकत नाही असे गृहीत धरून आमचे पक्षकार सदर मालमत्तेची खरेदी नोंदवून घेतील. स्पानंतर प्राप्त होणारी कोणतीही हरकत ग्राह्य धरली जाणार नाही.

स्थळ :- अकोला
दिनांक :- ०५ सप्टेंबर २०२६

**पक्षकारातर्फे अधिवक्ता**
**ॲड. हर्ष एस. नावंधर**
अलंकार मार्केट, टिळक रोड, अकोला
मोबाईल - ७२७६५९३४६७

**जाहीर नोटीस**

**वि.०२ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १३१२/२०२६ प्रोसेस नं.१०३०४/२०२६
चौ.ता. २३/०९/२०२६ दिनांक : १०/०८/२०२६

**अर्जदार :** १. श्री. मनिष शारदाप्रसाद पाठक रा. बिरला रोड, आठले प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** १. श्रीमती. नेहा अश्विन शुक्ला रा. उमाशंकर अपार्टमेंट, दुसरा माळा, स्टेट बँक समोर, रामदासपेठ, बिरला रोड, अकोला. ता. जि. अकोला. २. सौ. तारकेश्वरी शैलेंद्र पांडे रा. महाविर चौक, पेंशनपुरा, परतवाडा, ता. अचलपूर, जि. अमरावती. ३. श्रीमती. वैशाली अरविंद मिश्रा रा. ४८७ लोहार पुरा, बाजेरिया, व्हीटीसी महात्मा फुले बाजार, ता. जि. नागपूर. ४. श्री. आशुतोष शारदाप्रसाद पाठक रा. रामदासपेठ, आठले प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.
**मयताचा पत्ता :-** मयत : शारदाप्रसाद बिहारीप्रसाद पाठक
**पत्ता :-** रा. बिरला रोड, आठले प्लॉट, अकोला. ता. जि. अकोला.

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत शारदाप्रसाद बिहारीप्रसाद पाठक यांचे दि. २१/०६/१९८६ रोजी अकोला येथे निधन झाले आहे.

वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २३/०९/२०२६ रोजी सकाळी ९:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दोष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक १०/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**

एम. जे. सी. नं. १०१४/२०२४ प्रोसेस नं.९९५५/२०२५
चौ.ता. ३०/०७/२०२५ दिनांक : २७/०६/२०२६

**अर्जदार :** १. शिल्पा अनुराग अवस्थी उर्फ शिल्पा विजयकुमार दुबे ग. मु. पो. पटेल कॉलनी, दशरा मैदान बडवाह, बरवाह, खारगावने, बरवाह मध्य प्रदेश, ८५१११ २. अभिषेक विजयकुमार दुबे रा. शिशक नगर, अ १ अखंड नगर, इंदोर पो बिजासन रोड, जि. इंदौर मध्यप्रदेश ४५२००५ ३. सुमित विजयकुमार दुबे रा. शिशक नगर, अ/ १ अखंड नगर, इंदोर पो बिजासन रोड, जि. इंदौर मध्यप्रदेश ४८२००५

**विरुध्द**

**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : १. मनोरमा विजयकुमार दुबे २. विजयकुमार मदनलाल दुबे
**पत्ता :-** रा.दोघेही रा. शिशक नगर, अ/ १ अखंड नगर, इंदोर पो बिजासन रोड, जि. इंदौर मध्यप्रदेश ४५२००५

या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७ कलम २ अन्वये या न्यायालयात वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मनोरमा विजयकुमार दुबे यांचे दि. २३/०९/२०१९ रोजी शासकीय कॅन्सर हॉस्पिटल इंदौर मध्यप्रदेश येथे निधन झाले आहे. तसेच मयत विजयकुमार मदनलाल दुबे यांचे दि २०/०२/२०२० रोजी श्री. अरबिंदो इन्स्टिटयूट मेडिकल सायन्स इंदौर येथे निधन झाले आहे. वरील अर्जदार व गैरअर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणाही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक ३०/०७/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल नाद घ्यावा. आज दिनांक २७/०६/२०२५ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले

शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**

दिनांक : ०४/०९/२०२६

सर्व लोकांना सूचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी गणेश मधुकर खेडकर व राजेश मधुकर खेडकर दोघे रा. पार्वती नगर, बाळापूर रोड, जुने शहर, अकोला ता.जि. अकोला यांच्या वडीलोपार्जीत मालकीची व ताब्यातील सामायीक मालकीची शेती मौजे रिधोरा ता. बाळापूर जि. अकोला येथील शेत सर्वे नंबर व भूमापन क्रमांक व उपविभाग क्रमांक १५४ / २ क्षेत्रफळ एकूण २ है. ०० आर, आकार रू. १३.७५ भोगवटदार वर्ग १ ची सालीम शेती ज्यास चर्तु:सिमा पूर्वेस सर्वे नं. १५५ (मोरे) यांची शेत जमीन, पश्चिमेस सर्वे नं. १५१ (सोळंके) यांची शेत जमीन, उत्तरेस सर्वे नं. १५४ मधील रामकृष्ण लासूरकर यांची शेती, दक्षिणेस सर्वे नं. १५४ (मोरे) रिधोरा ते व्याळा जाणारे रस्त्यापासून उपरोक्त शेतात येणारा वहीवाटीचा रस्ता.

येणेप्रमाणे वरील चतु:सिमेतील स्थावर मिळकत बाबत कोणत्याही व्यक्ती, वित्तीय संस्था, शासन अथवा कोणाचाही कसल्याही प्रकारचा हितसंबंध, हक्क, अधिकार, मालकी, ताबा, इसार, बोजा, गहाण, उजर इत्यादी असल्यास त्यानी हि नोटीस प्रसिध्द झाल्यानंतर ७ दिवसांच्या आत त्याची लेखी हरकत कागदोपत्री पुराव्यासह स्वत: किंवा त्याच्या अधिकृत प्रतिनीधीमार्फत हजर राहून खालील पत्यावर नोंदवावी तसे न केल्यास वरील मिळकतीवर कोणाचाही कसल्याही प्रकारचा व्यवहार नाही व कुणास काहीही हरकत नाही असे ग्राहय धरून माझे पक्षकार खरेदीखत नोंदवून घेतील व सदर व्यवहार सर्वावर बंधनकारक राहील व त्यानंतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा उजर चालणार नाही याची नोंद घ्यावी.

अकोला
दि. ०४/०९/२०२६

**पक्षकाराकरीता**
**पी.पी. गोपनारायण, ॲडव्होकेट**
कापशीरोड, ता. जि. अकोला
मो.नं. ९८२२५९५९४४

## संक्षिप्त

### शेत परिसरातून दुचाकी चोरी

**हिंगणघाट**-शेतात कामासाठी गेलेल्या शेतकऱ्याची मंदिराजवळ उभी केलेली दुचाकी अज्ञात चोरट्याने लंपास केली. या घटनेत शेतकरी माणिक उघडे यांचे सुमारे ३० हजार रुपयांचे नुकसान झाले. वाघोली येथील माणिक उघडे हे वेळा येथील ढगे यांच्या शेतात सालगडी म्हणून काम करतात. शेत रेल्वे रुळाच्या पलीकडे असल्याने ते दुचाकी हनुमान मंदिराजवळ उभी करून शेतात जात होते. घटनेच्या दिवशीही त्यांनी एमएच ३२ एई २३१३ क्रमांकाची दुचाकी मंदिराजवळ ठेवली होती. काही वेळाने काम आटोपून परत आल्यानंतर दुचाकी दिसून आली नाही. परिसरात शोध घेतल्यानंतरही ती मिळाली नाही. अखेर चोरी झाल्याचे स्पष्ट झाल्याने हिंगणघाट पोलिसांत तक्रार करण्यात आली.

### ८ लाख रुपयांनी इसमाची फसवणूक

**दहेगाव (गोसावी)**-आईच्या पेन्शनची केस करण्यासाठी घेतलेले आठ लाख रुपये परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी पती-पत्नीविरुद्ध दहेगाव पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. चेतन लगड व दीपाली लगड,रा.ईसापूर बोरगाव (मेघे), अशी आरोपींची नावे आहेत. दहेगाव येथील धर्मपाल आगलावे यांची या दांपत्याशी अनेक वर्षांपासून ओळख होती. त्यामुळे त्यांच्यात उसनवारीने पैशांची देवाणघेवाण होत होती. चेतन लगड याने आईच्या पेन्शनची केस करण्यासाठी पैशांची मागणी केली. त्यानुसार आगलावे यांनी चेतन व दीपाली यांच्या बँक खात्यात टप्प्याटप्प्याने एकूण आठ लाख रुपये जमा केले. मात्र पैसे परत मागितल्यानंतर आरोपींकडून विविध कारणे सांगून टाळाटाळ करण्यात आली. अखेर फसवणूक झाल्याचे लक्षात येताच आगलावे यांनी पोलिसांत तक्रार दिली. त्यावरून गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलिस निरीक्षक यशवंत कदम करीत आहेत.

### भावास झिलपीने मारून केले जखमी

**आर्वी**-आईची भेट घेण्यासाठी आलेल्या मोठ्या भावाने किरकोळ वादातून लहान भावाला झिलपीने मारहाण करून जखमी केल्याची घटना समोर आली आहे. रवी काळे (३६) असे जखमी युवकाचे नाव आहे. आर्वी येथील विठ्ठल वार्डात रवी काळे हे आई मालती काळे यांच्यासोबत राहतात. आईची प्रकृती ठीक नसल्याने त्यांचा मोठा भाऊ मनोज काळे हा नागपूरहून भेटण्यासाठी आला होता. यावेळी दोन्ही भावांमध्ये काही कारणावरून वाद झाला. मनोज घराबाहेर गेल्यानंतर काही वेळाने पुन्हा दारूच्या नशेत घरी आला. त्यानंतर अंगणात ठेवलेल्या झिलपीने त्याने रवी यांच्यावर हल्ला केला. यात रवी जखमी झाले. घटनेनंतर रवी यांनी आर्वी पोलिसांत तक्रार दाखल केली. तक्रारीवरून मनोज काळे याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्यात आला असून निरीक्षक सतीश डेहनकर यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

### कत्तलीसाठीच्या जनावरांची सुटका

**आर्वी**-कत्तलीच्या उद्देशाने वाहतूक करण्यात येत असलेल्या सात गोवंशाची पोलिसांनी सुटका केली. या कारवाईत जनावरे व चारचाकी वाहन असा एकूण सहा लाख ८० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.याप्रकरणी आर्वी येथील अज्जु कुरेशी व कारंजा येथील विशाल गोहते यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावळापूर परिसरातून गोवंशाची वाहतूक होणार असल्याची माहिती आर्वी पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी परिसरात नाकाबंदी केली. यावेळी संशयित चारचाकी वाहन आढळून आले. पोलिसांनी वाहन थांबवून तपासणी केली असता त्यामध्ये सात गायी आढळल्या. चौकशीत या गायी अज्जु कुरेशी यांच्या सांगण्यावरून कन्नमवार हेटी येथून आर्वी येथे कत्तलीसाठी नेण्यात येत असल्याचे चालकाने सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले.

### गळफास घेत युवकाची आत्महत्या

**वर्धा**-शहरातील गजानन नगर परिसरात एका युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आली. मयुर काकडे (३५) असे मृत युवकाचे नाव आहे. मयुर काकडे हे गजानन नगर परिसरात कुटुंबासह राहत होते. शेतीची कामे करून ते कुटुंबाचा उदरनिर्वाह करीत होते. घरातील सदस्य बाहेर गेले असताना त्यांनी गळफास घेतला. काही वेळाने हा प्रकार कुटुंबीयांच्या लक्षात आला. घटनेची माहिती पोलिसांना देण्यात आली. त्यानंतर रामनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला.

# स्वाधार योजनेच्या लाभासाठी ३० ऑक्टोंबरपर्यंत मुदतवाढ

**वर्धा/जनमाध्यम**

शासकीय वसतीगृहात प्रवेश घेण्यास पात्र असलेल्या परंतू शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या व प्रवेश न घेतलेल्या इयत्ता ११ वी, १२ वी तसेच नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यावसायिक अभ्यासक्रमांमध्ये विविध स्तरावरील महाविद्यालयात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना राबविण्यात येत आहे. योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज सादर करण्यास ३० ऑक्टोंबर पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

सन २०२५-२६ या वर्षात स्वाधार योजनेचा लाभ घेतलेल्या विद्यार्थ्यांना सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षाकरीता ऑनलाईन अर्ज नुतणीकरण करण्याकरीता १५ सप्टेंबर पर्यंत अर्ज सादर करता येणार आहे.

सर्व प्रथम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेकरीता अर्ज करावयाच्या पुर्वी शासकीय वसतीगृह प्रवेश प्रक्रियेत सहभाग घेणे आवश्यक आहे.स्वाधार योजनेंतर्गत विद्यार्थ्यांना वसतीगृहातील मुलां-मुलीप्रमाणे भोजन, निवास, शैक्षणिक साहित्य व इतर आवश्यक सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी आवश्यक रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यात थेट जमा करण्यात येणार आहे, असे समाज कल्याण सहाय्यक आयुक्तांनी कळविले आहे.

### स्वाधार योजनेच्या अर्जातील त्रुटीची पुर्तता १० सप्टेंबर पर्यंत पूर्ण करावी

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेंतर्गत सन २०२५-२६ मध्ये सेंडबॅक करण्यात आलेले २० अर्ज असून सदर अर्जातील त्रुटीची पुर्तता पुर्ण करुन १० सप्टेंबर पर्यंत पुन्हा ऑनलाईन पध्दतीने सादर करावे, असे आवाहन करण्यात आले आहे. संबंधित विद्यार्थ्यांनी hmassnew.mahait.org संकेतस्थळावर अर्जातील त्रुटीची पुर्तता करुन अर्ज ऑनलाईन सबमिट करावा तसेच अर्जाची हार्डकॉपी व आवश्यक कागदपत्रे समाज कल्याण कार्यालयास सादर करावे, असे समाज कल्याण कार्यालयाच्यावतीने कळविण्यात आले आहे.

# आरटीआयला ग्रामपंचायतीचा ठेंगा; ऑडिट झाले,पण अहवाल गायब

**वर्धा/जनमाध्यम**

माहितीचा अधिकार मागितला म्हणून माहिती देण्याऐवजी कागदोपत्री खोळ करून अर्जदाराच्या हाती अपूर्ण उत्तर टेकविण्याचा प्रकार पिपरी (मेघे) ग्रामपंचायतीत उघडकीस आला आहे. सन २०२४-२५ च्या ऑडिट अहवालाची साक्षांकित प्रत आणि प्रथम अपीलीय अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव, पदनाम, मोबाईल क्रमांक व ई-मेल आयडी अशी स्पष्ट माहिती मागण्यात आली होती. मात्र, ग्रामपंचायतीने या मागणीला थेट बगल दिल्याचे दिसून येत आहे.

ग्रामपंचायतीने सन २०२४-२५ चे ऑडिट झाले असल्याचे कबूल केले आहे. मात्र, ऑडिट नोट सध्या उपलब्ध नसल्याचे सांगत मागितलेली माहिती दप्तरी उपलब्ध नसल्याचा दावा करण्यात आला. ऑडिट झाले, तर त्याचा अहवाल कुठे आहे? ऑडिटची नोंद झाली, तर संबंधित कागदपत्रे कुठे आहेत? असे प्रश्न आता उपस्थित होत आहेत. त्याहून गंभीर बाब म्हणजे प्रथम अपीलीय अधिकाऱ्याची संपूर्ण माहिती मागूनही अर्जदाराला अपेक्षित तपशील देण्यात आलेला नाही.

# आपले सरकार सेवा केंद्रांसाठी नवे मानदंड, १५ सप्टेंबरपर्यंत पूर्तता करणे बंधनकारक

**वर्धा जनमाध्यम** : आपले सरकार सेवा केंद्रांमार्फत नागरिकांना दर्जेदार व गुणवत्तापूर्ण सेवा उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने सेवा केंद्रांच्या पायाभूत, तांत्रिक सुविधा, नामकरण व मानांकनाबाबत नवीन निकष निश्चित केले आहेत. या निकषांची पूर्तता करण्यासाठी सेवा केंद्रांना १५ सप्टेंबर पर्यंत मुदत देण्यात आली आहे. या अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व आपले सरकार सेवा केंद्र चालकांनी निर्धारित निकषांची काटेकोरपणे पूर्तता करावी, असे आवाहन करण्यात आले आहे

## उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सेवा केंद्रांना पुरस्कार

राज्यातील सेवा केंद्रांना आता 'आपले सरकार-सेतू सेवा केंद्र, 'आपले सरकार सेवा केंद्र, 'आपले सरकार ग्राम पंचायत सेवा केंद्र' आणि 'आपले सरकार-नागरी सेवा केंद्र' असे प्रमाणित नामकरण करण्यात आले आहे. सेवा केंद्रासाठी किमान १०० चौरस फुट क्षेत्रफळाची पक्की इमारत, अखंडित वीजपुरवठा, संगणक अथवा लॅपटॉप, प्रिंटर, स्कॅनर, बायोमेट्रिक उपकरण, वेब कॅमेरा आणि विश्वासार्ह इंटरनेट सुविधा उपलब्ध असणे बंधनकारक आहे. ग्रामीण भागात किमान १० एमबीपीएस, तर नागरी भागात २० एमबीपीएस इंटरनेट वेग आवश्यक राहणार आहे. यासोबतच नागरिकांसाठी बैठक व्यवस्था, पिण्याचे पाणी, पुरेशी प्रकाश व्यवस्था तसेच दिव्यांगांसाठी सुलभ सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. नागरिकांकडून वारंवार वापरल्या जाणाऱ्या सेवांची माहिती दर्शविणारे फलक तसेच इतर सेवांसाठी ँ कोड केंद्रावर प्रदर्शित करावा लागणार आहे.

प्रत्येक सेवा केंद्राचे उघ्ए मॅपिंग करून ५० मीटर परिसरात जिओ-फेन्सिंग करण्यात येणार असून, निर्धारित क्षेत्राबाहेरून लॉगिन करण्यास प्रतिबंध राहणार आहे.

सेवा केंद्रांची किमान सहा महिन्यांतून एकदा तपासणी करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. तसेच सेवा केंद्रांच्या कामकाजाचा नियमित आढावा घेतला जाणार आहे. नागरिकांकडून प्राप्त होणारा अभिप्राय केंद्रांच्या मानांकनासाठी विचारात घेतला जाणार असून, सातत्याने नकारात्मक अभिप्राय आढळल्यास सुधारात्मक तसेच शिस्तभंगाची कारवाई केली जाऊ शकते.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या सेवा केंद्रांना जिल्हा, विभाग व राज्य स्तरावर रोख पुरस्कार आणि सन्मानपत्र देण्यात येणार आहे.

दरम्यान जिल्ह्यातील सेवा केंद्रचालकांनी १५ सप्टेंबरपर्यंत नवीन मार्गदर्शक सूचनांनुसार आवश्यक पायाभूत व तांत्रिक सुविधांची पूर्तता करावी. या सुविधांची प्रत्यक्ष पूर्तता झाली आहे किंवा नाही, याची पाहणी जिल्हाधिकारी स्वतः केंद्रांना भेट देऊन करणार आहेत.


त्यामुळे सर्व सेवा केंद्रचालकांनी निर्धारित निकषांची काटेकोरपणे अंमलबजावणी करून आवश्यक सुविधा उपलब्ध करून घ्याव्यात, असे आवाहन जिल्हाधिकारी वान्मथी सी यांनी केले आहे.

# झाड कोसळण्याची वाट पाहतेय नगर परिषद

**वर्धा/जनमाध्यम**

मोहता मार्केट समोर वर्दळीच्या आर्वी-वर्धा मुख्य मार्गावर धोकादायक अवस्थेतील पिंपळाचे झाड नागरिकांच्या जिवावर उठले असताना नगर परिषद प्रशासन मात्र सुस्त असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. जर्जर झालेले हे झाड कधीही कोसळण्याची शक्यता असून त्याखाली फळविक्रेते आणि छोटे दुकानदार व्यवसाय करतात. त्यामुळे एखादी फांदी किंवा संपूर्ण झाड कोसळल्यास मोठी दुर्घटना घडण्याची भीती व्यक्त होत आहे.

मोहता मार्केट हा परिसर दिवसभर गजबजलेला असतो. कृषी साहित्याच्या दुकानांमुळे जिल्ह्यातील विविध भागांतून शेतकरी येथे मोठ्या संख्येने येतात. अशा वर्दळीच्या ठिकाणी धोकादायक झाडाकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.धक्कादायक बाब म्हणजे या झाडावरून महावितरणची ११ केव्ही वीजवाहिनी गेलेली आहे. झाड कोसळल्यास वीजवाहिनीचे नुकसान होण्यासोबतच गंभीर



विद्युत अपघाताचा धोका आहे. पावसाळ्यात हा धोका आणखी वाढला आहे. दरम्यान, झाडाखालून गेलेली नालीही वर्षानुवर्षे साफ करण्यात आलेली नसल्याने घाण आणि दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे. नागरिकांनी नगराध्यक्ष सुधीर पांगुळ आणि मुख्याधिकारी विजयकुमार देशमुख यांच्याकडे लेखी निवेदन देऊन झाडाची तातडीने पाहणी करून धोका दूर करावा तसेच नालीची साफसफाई करावी, अशी मागणी केली आहे. निवेदनावर नितेश राठी, विनीत बदनोरे, गौरव हरकुटिया, श्रीकांत राठी, राम गव्हाणे आणि सुशील राठी यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# शिस्तीचे धडे,सुरक्षित आयुष्याचा मंत्र

## विद्यार्थ्यांना दिली वाहतूक नियमांसह अमली पदार्थांच्या दुष्परिणामांची जाणीव

**वर्धा/जनमाध्यम**

सुरक्षित प्रवास, सुंदर आयुष्य आणि शिस्तीचे पालन म्हणजेच देशाचे रक्षण, असा सामाजिक संदेश देत उमरी मेघे येथील अनुसूचित जाती-जमाती शासकीय निवासी मुलांच्या आश्रमशाळेत स्टुडंट पोलीस कॅडेट अंतर्गत एकदिवसीय कार्यशाळा पार पडली. विद्यार्थ्यांच्या सुरक्षित भविष्यासाठी घेण्यात आलेल्या या उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल व अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली, वाहतूक नियंत्रण शाखेचे सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय घुले यांच्या आदेशाने सहाय्यक फौजदार रियाज खान यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अल्पवयीन विद्यार्थ्यांनी वाहन चालवू नये, १८ वर्षे पूर्ण झाल्यानंतरच वाहन परवाना घ्यावा, वाहन चालविताना मोबाईलचा वापर, स्टंटबाजी टाळावी तसेच वाहतूक चिन्हांचे पालन करावे, असे आवाहन



करण्यात आले.अमली पदार्थांमुळे शारीरिक, मानसिक व आर्थिक नुकसान होऊन भविष्य उद्ध्वस्त होऊ शकते. त्यातून गुन्हेगारीही वाढते, अशी जाणीव विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. पोलीस ११२, रुग्णवाहिका १०८, चाइल्ड हेल्पलाइन १०९८ व महामार्ग हेल्पलाइन १०३३ या क्रमांकांची माहितीही देण्यात आली. सुरेश कुमार राऊत, शिक्षिका बनकर, मेश्राम, ठाकरे यांच्यासह सुमारे १६५ ते १७० विद्यार्थी उपस्थित होते. आभार मेश्राम सर यांनी मानले.

# आर्वीत आज रंगणार 'रंगमंच क्राफ्ट एक्स्पो'

## महिलांच्या स्वनिर्मितीला बाजारपेठ;२५ हून अधिक स्टॉल्सची पर्वणी

**आर्वी/जनमाध्यम**

महिलांच्या हातातील कौशल्याला बाजारपेठ मिळावी, स्थानिक हस्तकला आणि कुटीर उद्योगांना नवी झळाळी मिळावी, या उद्देशाने इनर व्हील क्लब आर्वीतर्फे आज, रविवार ६ सप्टेंबर रोजी भव्य 'रंगमंच क्राफ्ट एक्स्पो'चे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील गोकुळ कुंज, स्टेशन रोड येथे सकाळी ९ ते रात्री ९ वाजेपर्यंत हा एक्स्पो सुरू राहणार आहे. महिलांनी स्वबळावर तयार केलेल्या वस्तूंना ग्राहकांपर्यंत पोहोचविण्यासाठी हे प्रदर्शन महत्त्वाचे व्यासपीठ ठरणार आहे. एक्स्पोमध्ये २५ हून अधिक स्टॉल्स उभारण्यात आले असून, आर्वी व परिसरातील कुशल महिला कारागीर, गृहउद्योजक आणि स्थानिक व्यावसायिकांना आपल्या उत्पादनांचे प्रदर्शन व विक्री करण्याची संधी मिळणार आहे. हस्तकला, घरगुती व स्वनिर्मित वस्तूंच्या विविध प्रकारांमुळे खरेदीदारांसाठीही हे प्रदर्शन आकर्षणाचे केंद्र ठरण्याची शक्यता आहे. महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाला चालना देतानाच स्थानिक उद्योगांना प्रोत्साहन देण्याचा संदेश या उपक्रमातून दिला जाणार आहे.इनर व्हील क्लबच्या सदस्यांसह शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून या उपक्रमाला प्रतिसाद द्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# कोटीचा दंड; तरीही वाहतूक बेशिस्त कायम

## हिंगणघाटच्या तिहेरी अपघातानंतरची मोहीम गायब, अल्पवयीनांच्या हातात पुन्हा दुचाकी

**वर्धा/जनमाध्यम**

जिल्ह्यात वाहतूक नियमांची पायमल्ली करणाऱ्या वाहनचालकांवर वाहतूक शाखेने मागील आठ महिन्यांत तब्बल ९ हजार १०० ई-चलान केसेस दाखल करून १ कोटी ९ लाख १४ हजार १५० रुपयांचा दंड ठोठावला आहे. एवढी मोठी कारवाई होऊनही रस्त्यावरील वाहतूक बेशिस्तीला लगाम लागलेला दिसत नाही. विशेषतः अल्पवयीन विद्यार्थ्यांकडून दुचाकीवर ट्रिपल सीट प्रवास आणि बिनधास्त वाहन चालविण्याचे प्रकार पुन्हा सुरू झाल्याने वाहतूक शाखेच्या कारवाईवरच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

१५ ऑगस्टला हिंगणघाट शहरात दुचाकी अपघातात तीन अल्पवयीन विद्यार्थ्यांचा घटनास्थळी मृत्यू झाला. या हृदयद्रावक घटनेनंतर वाहतूक शाखा आणि आरटीओ विभाग अचानक रस्त्यावर उतरले. अल्पवयीन वाहनचालकांवर कारवाई, पालकांना समज आणि वाहतूक नियमांचे पालन करण्याचे आवाहन अशा मोहिमा राबविण्यात आल्या. मात्र, या घटनेला जवळपास महिना उलटत असतानाच परिस्थिती पुन्हा जैसे थे झाल्याचे चित्र शहरातील रस्त्यांवर दिसत आहे.

शाळा आणि कोचिंग क्लासेसच्या परिसरात अल्पवयीन विद्यार्थी सर्रास दुचाकी चालविताना दिसत आहेत. अनेकदा एकाच दुचाकीवर तीन विद्यार्थी बसलेले असतात. हेल्मेटचा अभाव, वेगाने वाहन चालविणे आणि वाहतूक नियमांकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. त्यामुळे हिंगणघाटच्या दुर्घटनेनंतर जागी झालेली यंत्रणा पुन्हा झोपी गेली का, असा प्रश्न नागरिक विचारत आहेत.

### ऑगस्टमध्येही अल्पवयीनांवर कारवाई

हिंगणघाटच्या घटनेनंतर वाहतूक शाखेच्या आकडेवारीनुसार ऑगस्ट महिन्यात अल्पवयीन मुलांकडून विनालायसन्स वाहन चालविल्याच्या ९४ केसेस करण्यात आल्या असून त्यातून



४ लाख ७० हजार रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. अल्पवयीन मुलांना वाहन देणारे पालक आणि वाहनमालक यांच्यावरही २९८ केसेस दाखल करून ४ लाख ७० हजार रुपयांचा दंड करण्यात आला आहे.

याच काळात विनालायसन्स वाहन चालविणाऱ्या ७३१ वाहनचालकांवर कारवाई करून ३६ लाख ५५ हजार रुपयांचा दंड करण्यात आला. दारू पिऊन वाहन चालविणाऱ्यांवर ३२ केसेस, तर रस्त्यावर वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या हातगाड्या आणि आस्थापनांवर ३५ चलान करण्यात आले. वारंवार वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या १३४ वाहनचालकांचे परवाने निलंबित करण्यात आले.

### दंडाची कोटी पार; पण बेशिस्तीला ब्रेक कधी

जानेवारी ते ऑगस्ट या आठ महिन्यांच्या कालावधीत विनाहेल्मेट, ट्रिपल सीट, वाहन चालविताना मोबाईलचा वापर, सीटबेल्टचा वापर न करणे, विनानंबर प्लेट आणि वाहतुकीला अडथळा यांसह विविध नियमभंगांप्रकरणी ९ हजार १०० ई-चलान करण्यात आले. त्यातून तब्बल १ कोटी ९ लाख १४ हजार १५० रुपयांचा दंड आकारण्यात आला.

कारवाईची ही आकडेवारी मोठी असली तरी रस्त्यावरील वास्तव वेगळेच चित्र दाखवत आहे. दंडाची कोटी पार झाली; मग वाहतूक बेशिस्तीला ब्रेक कधी लागणार? हा प्रश्न आता नागरिकांकडून उपस्थित होत आहे.

### तीन दिवसांचा देखावा होता का?

हिंगणघाटच्या दुर्घटनेनंतर काही दिवस वाहतूक पोलिस आणि आरटीओची धावपळ दिसली. चौकाचौकात तपासणी, अल्पवयीन चालकांवर कारवाई आणि पालकांना सूचना देण्यात आल्या. मात्र, आता पुन्हा अल्पवयीनांच्या हातात दुचाकी आणि रस्त्यावर ट्रिपल सीटचे प्रकार सुरू झाले आहेत. त्यामुळे हिंगणघाटच्या तीन विद्यार्थ्यांच्या मृत्यूनंतरची कारवाई केवळ तीन दिवसांचा देखावा होता का असा प्रश्न नागरिकांकडून केला जात आहे. अपघात झाल्यानंतर कारवाई करण्यापेक्षा अपघात होण्यापूर्वीच नियमभंग करणाऱ्यांना आवर घालण्याची गरज आहे. विशेषतः शाळा, महाविद्यालये आणि कोचिंग क्लासेस परिसरात नियमित तपासणी करण्याची मागणी होत आहे.

वाहतूक नियमांचे पालन करणे ही केवळ पोलिसांची जबाबदारी नसून पालकांचीही तितकीच जबाबदारी आहे. १८ वर्षांखालील मुलांना दुचाकी किंवा चारचाकी वाहन देणे त्यांच्या आणि इतरांच्या जीवितासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे पालकांनी मुलांच्या हातात वाहन देण्यापूर्वी हिंगणघाटची दुर्घटना आठवावी, अशी अपेक्षा नागरिक व्यक्त करीत आहेत.

वाहतूक शाखेची कारवाई पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

सहायक पोलीस निरीक्षक विजयकुमार घुले, पोलीस उपनिरीक्षक अमोल लगड, अश्विन गजभिये, जावेद शेख, राजेश कंगाले आणि वाहतूक पोलीस अंमलदार यांनी कारवाई केली आहे. पुढेही विशेष मोहीम प्रभावीपणे राबविण्यात येणार असल्याचे वाहतूक शाखेकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

### बांधकामाचे साहित्य चोरी

**सेलू**-वर्धा-नागपूर महामार्गावरील महाबळा शिवारात सुरू असलेल्या पेट्रोल पंपाच्या बांधकामस्थळावरून अज्ञात चोरट्यांनी ३७ हजार ५५० रुपयांचे साहित्य लंपास केले. या प्रकरणी सेलू पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली आहे. पेट्रोल पंपाचे बांधकाम सुरू असून वसंता तळवेकर हे तेथे चौकीदार म्हणून काम करतात. ते हजर नसताना चोरट्यांनी बांधकामस्थळावर प्रवेश करून सळाखी, इलेक्ट्रिक मोटर, लोखंडी पलंग,खुर्च्या, पंखा आणि ड्रम असा ऐवज चोरून नेला. चोरीस गेलेल्या साहित्यामध्ये २५ हजार रुपयांच्या सळाखी, चार हजार रुपयांची इलेक्ट्रिक मोटर, साडेतीन हजार रुपयांचा लोखंडी पलंग, खुर्च्या, पंखा आणि ड्रमचा समावेश आहे. तळवेकर यांच्या तक्रारीवरून सेलू पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. सहायक पोलिस निरीक्षक पंकज वाघोडे यांच्या मार्गदर्शनाखाली हवालदार अनिल केकतपूरे तपास करीत आहेत.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २८०
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

**मुख्य कार्यालय**- अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com, abhiramdeshpande@gmail.com

# खरपीची उर्दू शाळा अखेर अचलपूरला; स्थलांतराचा मार्ग मोकळा

**अचलपूर/प्रतिनिधीः-** खरपी येथील डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम उर्दू हायस्कूल अचलपूर येथे स्थलांतरित करण्याच्या प्रकरणाला अखेर निर्णायक वळण मिळाले आहे. सुनावणीनंतर विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती यांनी शाळा अचलपूर येथे सुरू ठेवण्यास हरकत नसल्याचे स्पष्ट केले आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षितता, शैक्षणिक सुविधा आणि भविष्यातील शिक्षणव्यवस्था लक्षात घेऊन पुढील कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

खरपी येथील शाळेची शिक्षण विभागाच्या अधिकाऱ्यांनी केलेल्या तपासणीत शाळेच्या भौतिक सुविधांबाबत अनेक गंभीर त्रुटी निदर्शनास आल्या होत्या. शाळा खासगी भाड्याच्या कच्च्या टीनशेड इमारतीत सुरू असल्याचे तपासणीत आढळले. या इमारतीत मुख्याध्यापकांसाठी स्वतंत्र कक्ष, स्वतंत्र विज्ञान प्रयोगशाळा, क्रीडांगण, संरक्षण भिंत, अग्निशामक यंत्रणा आणि सीसीटीव्ही कॅमेऱ्यांसारख्या आवश्यक सुविधा उपलब्ध नसल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. त्याचबरोबर प्रमाणित इमारत नकाशा आणि इमारत सुरक्षा प्रमाणपत्रही उपलब्ध नसल्याचे स्पष्ट झाले.

टीनशेडच्या इमारतीत शाळा सुरू असल्यामुळे भविष्यात विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता तपासणी अहवालात व्यक्त करण्यात आली आहे. आरटीई-२००९ अंतर्गत आवश्यक असलेल्या भौतिक व इतर निकषांची पूर्तता होत नसल्याचेही अधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि आवश्यक शैक्षणिक सुविधा असलेल्या ठिकाणी शिक्षण देण्याचा मुद्दा या संपूर्ण प्रकरणाच्या केंद्रस्थानी आला आहे.

शाळा अचलपूर येथे स्थलांतरित करण्याबाबत झालेल्या सुनावणीदरम्यान याचिकाकर्त्यांनी खरपी गावातील विद्यार्थ्यांना अचलपूर येथे ये-जा करताना अडचणी निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन



प्रवासाचा प्रश्न उपस्थित झाल्याने स्थलांतरानंतर वाहतुकीची जबाबदारी कोण घेणार, हा महत्त्वाचा मुद्दा ठरला.

यावर संस्थेने अचलपूर येथे प्रशस्त व सुरक्षित इमारत उपलब्ध असल्याचे स्पष्ट केले. ई-लर्निंग, संगणक, सीसीटीव्ही कॅमेरे तसेच अन्य आवश्यक शैक्षणिक सुविधा उपलब्ध असल्याचा दावा संस्थेच्या वतीने करण्यात आला. विद्यार्थ्यांना सुरक्षित वातावरणात गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी अचलपूर येथील व्यवस्था अधिक सक्षम असल्याचे संस्थेने सुनावणीदरम्यान स्पष्ट केले.

संस्थेचे सचिव मो. अझर यांनी विद्यार्थ्यांच्या वाहतुकीबाबतही भूमिका स्पष्ट केली. खरपीहून अचलपूर येथे शिक्षणासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ये-जा करण्याची बस व्यवस्था संस्था स्वतः करणार असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे स्थलांतरामुळे विद्यार्थ्यांवर प्रवासाचा अतिरिक्त आर्थिक किंवा व्यवस्थापनाचा भार पडू नये, याची काळजी घेतली जाणार असल्याचे संस्थेने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, अचलपूर येथे स्थलांतर करण्यास नकार देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचाही प्रश्न संस्थेने विचारात घेतला आहे. अशा विद्यार्थ्यांचे जवळच्या शाळेत समायोजन करण्याची जबाबदारी संस्था स्वीकारणार असल्याचे सचिव मो. अझर यांनी स्पष्ट केले. त्यामुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण खंडित होऊ नये, यासाठी पर्यायी व्यवस्था करण्याची भूमिका संस्थेने घेतली आहे.

सुनावणीतील निर्णयानुसार गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती अचलपूर यांनी १५ दिवसांच्या आत स्थानिक जिल्हा परिषद शाळेत इयत्ता आठवीचा वर्ग सुरू करण्याबाबत कार्यवाही करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे खरपी परिसरातील विद्यार्थ्यांसाठी स्थानिक पातळीवर शिक्षणाची पर्यायी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या प्रक्रियेलाही आता वेग येण्याची शक्यता आहे.

या संपूर्ण प्रकरणाला न्यायालयीन पार्श्वभूमीही आहे. मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठात दाखल रिट याचिका क्र. १९७९/२०२६ मध्ये २८ एप्रिल २०२६ रोजी झालेल्या आदेशानुसार शिक्षण उपसंचालकांना शाळा स्थलांतरित करण्याबाबत कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार विभागीय शिक्षण उपसंचालक कार्यालयात ३ जून आणि १६ जून २०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आता शाळा अचलपूर येथे सुरू ठेवण्याच्या निर्णयामुळे स्थलांतराचा मार्ग मोकळा झाला असला, तरी प्रत्यक्ष अंमलबजावणी हेच पुढील आव्हान ठरणार आहे.

# मध्यवर्ती कारागृह परिसरात पुन्हा फेकला गांजाचा बॉल'

## अज्ञाताविरुद्ध फ्रेजरपुरा पोलिसांत गुन्हा

**अमरावती/प्रतिनिधीः-** अमरावती मध्यवर्ती कारागृहाच्या परिसरात बाहेरून गांजासदृश पदार्थाची बॉल फेकण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. कारागृहातील बराक क्रमांक ७ च्या परिसरात काळ्या-पांढऱ्या रंगाच्या सेलोटेपने गुंडाळलेली संशयास्पद बॉल आढळून आली. तपासणीअंती त्यामध्ये सुमारे ८७ ग्रॅम हिरव्या रंगाचा गांजासदृश पदार्थ असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी फ्रेजरपुरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध एनडीपीएस कायद्यातील विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला आहे. माहितीनुसार, ३ सप्टेंबर रोजी सकाळच्या सुमारास कारागृहातील बराक क्रमांक ७ च्या छतावर बाहेरून काही संशयास्पद वस्तू फेकण्यात आल्याची माहिती कारागृह प्रशासनाला मिळाली. त्यानंतर कर्मचाऱ्यांनी बराकीच्या मागील बाजूस असलेल्या मोकळ्या जागेची तपासणी केली असता, काळ्या-पांढऱ्या रंगाच्या सेलोटेपने पूर्णपणे गुंडाळलेली एक संशयास्पद बॉल आढळून आली. फॉरेन्सिक पथक आणि पोलिसांच्या उपस्थितीत या बॉलची तपासणी करण्यात आली. त्यामध्ये सुमारे ८७ ग्रॅम वजनाचा हिरव्या रंगाचा गांजासदृश पदार्थ आढळून आला. हा पदार्थ जप्त करून नियमानुसार सील करण्यात आला आहे.

## सीसीटीव्हीच्या आधारे आरोपीचा शोध

या प्रकरणी कारागृहातील शिपाई शिवशंकर मधुकर रानमळे यांच्या तक्रारीवरून फ्रेजरपुरा पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरुद्ध एनडीपीएस कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. कारागृह परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तसेच तांत्रिक पुराव्यांच्या आधारे संशयिताचा शोध सुरू करण्यात आला आहे. हा गांजासदृश पदार्थ नेमका कोणी, कोणत्या ठिकाणाहून आणि कोणत्या उद्देशाने कारागृहाच्या परिसरात फेकला, याचा सखोल तपास फ्रेजरपुरा पोलीस करीत आहेत.

# शरद जोशी यांना दर्यापूर बाजार समितीत अभिवादन

## शेतकरी हित, आणि आर्थिक स्वातंत्र्याचा विचार पुढे नेण्याचा निर्धार

**खल्लार/प्रतिनिधीः-** शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष, शेतकऱ्यांच्या हक्कांसाठी आयुष्यभर संघर्ष करणारे आणि शेतीमालाला योग्य भाव मिळावा यासाठी देशव्यापी लढा उभारणारे शरद जोशी यांच्या जयंतीनिमित्त कृषी उत्पन्न बाजार समिती, दर्यापूर येथे त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

शेतकऱ्याला दयेची नव्हे तर त्याच्या कष्टाचा योग्य मोबदला आणि आर्थिक स्वातंत्र्य मिळाले पाहिजे हा विचार शरद जोशींनी सातत्याने मांडला. शेतकरी, शेतीमालाचे बाजारभाव, मुक्त बाजारपेठ तसेच शेतकऱ्यांवरील अन्यायकारक धोरणांविरोधात त्यांनी सातत्याने आवाज उठविला. त्यांच्या नेतृत्वाखाली शेतकरी संघटनेने महाराष्ट्रासह देशभरातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांना व्यापक व्यासपीठ मिळवून दिले.

आजच्या बदलत्या कृषी परिस्थितीतही शरद जोशींचे विचार शेतकऱ्यांसाठी मार्गदर्शक असून, शेतकऱ्यांच्या उत्पादनाला योग्य दर, बाजारपेठेत स्वातंत्र्य आणि शेतकरीकेंद्री धोरणांसाठी त्यांचे विचार पुढे नेणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सुनिल पाटील गावंडे, संचालक डॉ.अभय गावंडे, संचालक गजानन पाटील देवतळे, संचालक असिफ खान तसेच शेतकरी संघटनेचे बाळासाहेब वडतकर, नारायण बहाळे,



रावसाहेब गावंडे, रविंद्रसिंह ठाकूर, गणेश अरबट, सुभाष गावंडे, माधव देशमुख, अतुल नळकांडे, सुभाष लाजूरकर, सुनिल साबळे, अशोक राणे, विष्णुदास काळमेघ यांच्यासह शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

शेतकरी हितासाठीचा संघर्ष आणि शरद जोशींचा विचार सदैव प्रेरणादायी राहील, अशा भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

# अवैध विदेशी दारूची तस्करी करणारा ताब्यात

## बिझीलॅण्ड परिसरात नांदगाव पेठ पोलिसांची कारवाई

**अमरावती/प्रतिनिधीः-** अवैधरित्या विदेशी दारूची वाहतूक व विक्री करणाऱ्या एका तस्कराला नांदगाव पेठ पोलिसांनी सापळा रचून अटक केली आहे. ही कारवाई बिझीलँड परिसरात करण्यात आली.

नरेशकुमार पारसमल चोपडा (वय ४३, रा. नोरोना हेरिटेज बिल्डिंग, डोंगरवाडा, गोवा) असे आरोपीचे नाव आहे. त्याच्या कडून रॉयल स्टॅग २ लिटरच्या २५ बॉटल आणि रॉयल चॅलेंजच्या १० बॉटल असा एकूण ६३ हजार रुपये किमतीचा विदेशी दारूचा साठा




जप्त करण्यात आला आहे. नांदगाव पेठ पोलिस परिसरात पेट्रोलिंग करीत होते. त्यावेळी गुप्त माहिती मिळाली की, बिझीलँड जवळ एक व्यक्ती थैलीमध्ये अवैध विदेशी दारू घेऊन विक्रीच्या इराद्याने फिरत आहे.

यावरून पोलिसांनी तात्काळ कारवाई करीत आरोपीला ताब्यात घेतले. त्याच्याकडून ६३ हजार रुपयाची विदेशी दारू जप्त करण्यात आली आहे.

ही कारवाई पोलिस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त यशवंत सोळंके, सहायक आयुक्त नयन अलूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक पुनीत कुलट यांच्या नेतृत्वात उपनिरीक्षक गणेश राऊत, ओमप्रकाश देशमुख, दिनेश माणूसमारे, सतीश देशमुख, वैभव तिखिले, राजीक खान, शोएबुद्दीन सय्यद ,निलेश सावकार ,प्रफुल खोब्रागडे, वैभव धुरंदर यांनी केली.

**जाहीरनामा/सायटेशन**

**अमरावती येथील ७ वे सह दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) श्री.जे.जी.पांडे यांच्या न्यायालयातील**

आर.एम.जे.सी. क्रमांक १६८७/२०२६ — ने.ता.१५.०९.२०२६

अर्जदार :-
Mr. Deepak Mohanlalji Varma
Age 48 years. Occu.: Service
R/o. New Ganesh Colony, Near Sonar Sangh Mangal Karyalaya, Akoili Road, Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार :-
निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, मयत **Mohanlal Bhaiyyalal Varma** हया दि.१७.१२.२०२४ रोजी अमरावती येथे मयत झाल्या. अर्जदार **Mr. Deepak Mohanlalji Varma** यांनी वरीलप्रमाणे हया कोर्टात सदहू मयत **Mohanlal Bhaiyyalal Varma** यांचे वारसाहक्क प्रमाणपत्र **APPLICATION UNDER SECTION 276 OF INDIAN SUCCESSION ACT, 1925 FOR GRANT OF PROBATE OF WILL OF DECEASED Mohanlal Bhaiyyalal Varma** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्याचप्रमाणे मयत यांच्या नावे असलेली सर्व मालमत्ता मृत्यूपत्राप्रमाणे अर्जदार यांचे नावे करण्याकरिता मयत **Mohanlal Bhaiyyalal Varma** यांनी दि.१४.०७.२०२४ रोजी मृत्यूपत्र करुन ठेवले आहे. मृत्यूपत्रात नमुद केल्याप्रमाणे

**Description of said Property**

**A) Mouje- Peth Amravati having survey no. 32/1, layout plot no. 29-B, area 2450 sq.ft. (227.61 sq.mtr.) out of which Western Portion of North-South division having area admeasuring 1225 sq.ft. (113.80 sq.mtr.) having boundaries East : Open Plot, Towards West : Plot of Plai Kundwar, Towards North :- Service Lane, Towards South : Road, Commonly known as New Ganesh Colony, Near Sonar Sangh Mangal Karyalaya, Akoili Road, Amravati .**

त्यापेक्षा अर्जाबाबत कोणास आक्षेप नोंदवायचा असेल तर हया जाहिरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आंत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहू मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहू कोर्ट सदहू अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबित दिसल्यास त्यांना सदहू मय्यत **Mohanlal Bhaiyyalal Varma** यांचे वारसा हक्काचे **(Probate)** प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०२.०९.२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिला.

शिक्का

आदेशानुसार
सहायक अधीक्षक,
दिवाणी न्यायालय (वरिष्ठ स्तर)
अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

**वि.श्री.आर.आर.खामतकर, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१५४४/२०२६
चंदा+३ -वि.- निरंक
पुढील ता.०१.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
१. **श्रीमती चंदाबाई राजेश डोंगरे**, वय ४५ वर्षे, व्यवसाय- घरकाम
रा.रसुलापुर सुकळी, ता.जि.अमरावती
२. **तेजस राजेश डोंगरे**, वय २३ वर्षे, व्यवसाय- मजुरी
रा.रसुलापुर सुकळी, ता.जि.अमरावती
३. **तुषार राजेश डोंगरे**, वय २५ वर्षे, व्यवसाय- मजुरी
रा.रसुलापुर सुकळी, ता.जि.अमरावती
४. **श्रीमती सुमन किसनराव डोंगरे**, वय वयस्कर, व्यवसाय- घरकाम
रा.राहुल नगर, जुनी वस्ती, बडनेरा, ता.जि.अमरावती

-- विरुध्द --

गैरअर्जदार- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत साहेबराव उर्फ राजेश किसनराव डोंगरे** हे दिनांक **०२.०१.२०२६** रोजी बडनेरा, ता.जि.अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार श्रीमती चंदाबाई राजेश डोंगरे** +३ यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **श्रीमती चंदाबाई राजेश डोंगरे** +३ वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१४.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

**वि.श्री.ए.बी.कट्टे, सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१७८८/२०२६
वंदना व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.०५.१०.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
1. **Vandana Gajanan Chandure**
Age 57 years. Occu.: Housewife
R/o. Main Road, Mali pura, Mahuli Jahangair,
Tq. & Dist. Amravati
2. **Pritesh Gajanan Chandure,** Age 36 years. Occu.: Labourer
R/o. Main Road, Mali pura, Mahuli Jahangair,
Tq. & Dist. Amravati
3. **Priyanka Mayur Panchghare,** Age 39 years. Occu.: Household
R/o. Ward No.5, Mangruli Peth, Post Loni,
Tq. Warud, Dist. Amravati

-- विरुध्द --

गैरअर्जदार :- निरंक

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत गजानन कृष्णराव चांदूरे** हे दिनांक **२५.०८.२०२४** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार वंदना व इतर विरुध्द निरंक** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **वंदना व इतर विरुध्द निरंक** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.२७.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**

**वि.श्री.ए.बी.कट्टे, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) अमरावती यांचे न्यायालयात**

किरकोळ अर्ज क्र.१७०७/२०२६
रुपेश व इतर विरुध्द निरंक
पुढील ता.२८.०९.२०२६

**जाहीरनामा/सायटेशन**

अर्जदार :-
1. **Rupesh Krushnarao Khandalkar**
Age 46 years. Occu.: Agriculturist
R/o. Wadhona (Papad) Tq. Nandgaon Khand. Dist. Amravati
2. **Ujwala Vijayrao Thakare,**
Age 43 years. Occu.: Household
R/o. Gharpal, Gharpal, Dist. Yavatmal

-- विरुध्द --

गैरअर्जदार :-
1. **Alka Puroshottam Shinde,** Age 50 years. Occu.: ---------
R/o. Shivaji Maratha Mahavidyalaya, Near Hamalpura
Rukhmini Nagar, Amravati
2. **Shalini Chandrakant Wabale,** Age 52 years. Occu.: ........
R/o.Lane No. 1, Near Mari Mata Mandir Chinch Fail,
Amravati

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत कृष्णराव भगवानजी खंडाळकर व फुलाबाई कृष्णराव खंडाळकर** हे अनुक्रमे हे दिनांक **१८.०९.२००६ व दि.२२.११.२०११** रोजी अमरावती येथे मयत झाले. **अर्जदार रुपेश व इतर विरुध्द अलका व इतर** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **रुपेश व इतर विरुध्द अलका** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.१३.०८.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

**फ्लॅट विकणे आहे**

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.

**संपर्क : ९४२२८५७१६९ ९४२२१२०४०६**

**डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बॅंक लि., अमरावती**
**मुख्य कार्यालय, इर्विन चौक, अमरावती**
**दुकान क्र. ०७२१-२६६३७०१, ई-मेल - ho@pducb.in**

**जागा पाहिजे**

बॅंकेच्या **रुख्मीणी नगर शाखेकरिता** भाडे तत्वावर जागेची आवश्यकता असून, जागा भाडयाने उपलब्ध करुन देणेसंदर्भातील प्रस्ताव, जागा मालकाने जागेचा संपूर्ण तपशिल, अपेक्षित भाडे व संपर्क क्रमांकासह बंद लिफाफ्यामध्ये दिनांक १५ सप्टेंबर, २०२६ पर्यत प्रति, मा.कार्यकारी संचालक, डॉ.पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बॅंक लि. मुख्य कार्यालय, इर्विन चौक, अमरावती येथे सादर करावा.

**जागेसंदर्भात आवश्यक बाबी**

१. जागा तळमजल्यावर (Ground Floor) असावी.
२. पुरेशी पार्किंग व्यवस्था उपलब्ध असावी.
३. नियमित पाणी पुरवठा उपलब्ध असावा.

**प्र. कार्यकारी संचालक**

**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

**ई निविदा प्रकाशनाची सूचना**

महानिर्मिती, औ.वि. केंद्र परळी– वै. कडून अनुभवी व नामांकित उत्पादक / पुरवठादार / कंत्राटदारा कडून खालील काम / वस्तूंचा पुरवठा करण्यासाठी ई–निविदा मागविण्यात येत आहेत.

| ई–निविदा क्रमांक | विषय | अंदाजित रक्कम /बयाना रक्कम | ई–निविदा विक्रीचा कालावधी | ई–निविदा स्वीकृत (१२.०० पर्यंत) |
|---|---|---|---|---|
| ई–निविदा क्र ३००००६७९५३ | सप्लाय ऑफ फूल टीथ गियर कपलिंग फॉर कन्व्हेयर्स अॅट सीएचपी–१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ७.७१ लाख ११२१५/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७०८८० | प्रॉक्यूरमेंट ऑफ ब्रेक ब्लॉक असेम्ब्ली (शूज) फॉर एसएएन लोकोमोटीवज अॅंड अदर कनज्यूमेबल मटेरियल अॅट सीएचपी–१, व्ही/एम , २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ८.७० लाख १२२०१/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१०९४ | सप्लाय ऑफ फॅब्रीकेटेड स्पेयर्स फॉर डस्ट कलेक्टर ड्युरिंग शॉर्ट शट डाउन ऑफ यू–६अॅंड ७ अॅट बीएम–१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | १९.८५ लाख २३३५४/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१११९ | प्रॉक्यूरमेंट ऑफ स्विच फ्यूज यूनिट (एसएफयू) अॅट सीएचपी–२–ईएम, टीपीएस,परळी वै. | ७.४७ लाख १०९६७/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१२२१ | प्रॉक्यूरमेंट ऑफ टेम्परेचर सेन्सॉर फॉर कोल मिल अॅंड एयर प्री–हीटर अॅट आय अॅंड सी–२, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ११.९५ लाख १५४५७/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१२७८ | वर्क ऑफ प्रोव्हायडिंग असिस्टंट टू डाटा एंट्री इन कम्प्युटर्स अॅंड अदर रिलेटेड वर्क्स फॉर कोल सेक्शन अॅट एम.एस 'बी' , सीएचपी–१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ७.६२ लाख १११२८/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१३३२ | प्रॉक्यूरमेंट ऑफ वॉल्व फॉर फायर हायड्रन्ट अॅंड स्प्रे सिस्टम नेटवर्क अॅट एफएस, टीपीएस,परळी वै. | ६.०१ लाख ९५२०/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१४२३ | एक्सपर्ट टेक्निकल सर्विसेस फॉर सर्विसिंग ऑफ २४व्हीडीसी छाबी मेक बॅटरी चार्जर्स अॅट ईटी–२, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | २.३४ लाख ५८४६/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१४२५ | एचपीटी, रिफिलिंग अॅंड पेंटिंग –लेबलिंग ऑफ सीओ२ फायर एक्स्टिंगविशर अॅट एफएस, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ९.९२ लाख १३४२४/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१४६३ | सप्लाय ऑफ इंडस्ट्रियल सेफ्टी शूज फॉर एमएसपीजीसीएल एम्प्लॉईज (O & M , Project & PAP) ऑफ टीपीएस परळी वै. | २१.२९ लाख २८७९४/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१५२८ | बाय अॅन्युअल कॉंट्रॅक्ट फॉर सॅम्पलिंग अॅंड अनॅलिसिस फॉर कोल मिल फाइनेस, फ्लाय अॅश, बॉटम अॅश, कोल मिल रिजेक्ट अॅंड अॅश स्लरी सॅम्पल्स फॉर डब्ल्यूटीपी–२, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | १७.४४ लाख २०९४३/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१५८८ | वर्क ऑफ शिफटिंग टेस्टिंग इन्स्ट्रुमेंटस मटेरियल अॅंड एचटी, एलटी, व्हीएफडी पॅनल क्लिनिंग अॅज अॅंड व्हेन रीक्वायर्ड अॅट ईटी–१, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | १०.०५ लाख १३५५३/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१७१५ | टू इयर वर्क कॉंट्रॅक्ट फॉर प्रोव्हायडिंग क्लोज्ड फोर व्हीलर वेहिकल फॉर स्टाफ मूवमेंट फ्रॉम ऑफिस टू खडका / नैकोटा पम्प हाऊस अॅट सीएचपी–व्ही/एम , २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ४४.०० लाख ४७५०७/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१७२२ | वर्क कॉंट्रॅक्ट फॉर प्रोव्हायडिंग सर्विसेस ऑफ जेसीबी/ पोकोलीन ऑन वॅगण टिपलेर हॉप्पर ग्रिल अॅट सीएचपी–२, २५० मे. वॅट,टीपीएस,परळी वै. | ३६.७१ लाख ४०२१४/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |
| ई–निविदा क्र ३००००७१७६८ | वर्क ऑफ सर्विसिंग ऑफ स्पेयर स्लेविंग बेरिंग अॅंड रिप्लेसमेंट ऑफ स्लेविंग बेरिंग ऑफ स्टॅकर रिक्लेमर ऑफ यू–६ अॅंड ७ अॅट सीएचपी–१, २५० मे. वॅट, टीपीएस, परळी वै. | ८४.१५ लाख ८७६५०/– | ०७.०९.२०२६ ते २८.०९.२०२६ | २९.०९.२०२६ |

वरील तारीखेस ई–निविदा विक्री सुरू होण्याची वेळ ११:०० व ई–निविदा विक्री बंद होण्याची वेळ १६:००, निविदा किंमत व बयाना रक्कम ऑनलाइन पद्धतीने भरावयाची आहे. सर्व निविदा करिता निविदा किंमत रु. ११८०/– (जीएसटी सह) संपर्क व्यक्ती: मुख्य अभियंता, टीपीएस परळी–वैजनाथ. मेल आय डि: parlitpsrp@mahagenco.in, cegenparli@mahagenco.in अधिक माहितीसाठी आणि विक्रेता नोंदणीसाठी आमच्या वेबसाईटला भेट द्याः https://eprocurement.mahagenco.in, SRM help desk E-mail ID etendering.prl@mahagenco.in एस.आर.एम. मदत लाईन क्रमांक ८४११९७१५२५

**मुख्य अभियंता**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

**संपादक-प्रदीप देशपांडे**
**संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे**
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक ३**
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025

**मुख्य कार्यालय :–** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

## संक्षिप्त



### अरूणोदय इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक दिन

**अमरावती-** व्ही.एम.व्ही. परिसरातील अरुणोदय इंग्लिश स्कूल व ज्यू.कॉलेज ऑफ सायन्स येथे शिक्षक दिनाच्या निमित्ताने अरूणोदय शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ.वसंत लुंगे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्यांच्या जीवनावर आधारीत माहिती डॉ. वसंत लुंगे पाटील यांनी विद्यार्थ्यांना तसेच शिक्षक दिन का साजरा केला जातो याचे महत्व पटवून दिले.विद्यार्थ्यांनी शिक्षक दिनावर आपले मनोगत व्यक्त केले. तसेच सर्वशिक्षक वृदांना पुष्पगुच्छ देवून त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली.कार्यक्रमाला संस्थेच्या सचिव डॉ.भारती लुंगे,प्राचार्या विशाखा नाफडे, उपप्राचार्या सीमा कुथे, अरुणोदय इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका शिल्पा पाजनकर, उपमुख्याध्यापिका निता काळमेघ,कार्यालयीन अधीक्षिका रेखा राऊत उपस्थित होत्या. कार्यक्रमाला सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.



### संत गाडगेबाबा वृद्धाश्रमात विद्यार्थ्यांनी साजरे केले रक्षाबंधन

**अमरावती-** इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाच्या तृतीय वर्षातील विद्यार्थी आणि 'इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग स्टुडंट्स असोसिएशन'च्या टीमने वलगाव येथील संत गाडगे महाराज वृद्धाश्रमाला भेट दिली आणि तेथील ज्येष्ठ नागरिकांसोबत रक्षाबंधनाचा शुभ सण साजरा केला भेटीदरम्यान, विद्यार्थ्यांनी वृद्धांशी संवाद साधला व त्यांना राख्या बांधल्या.उपक्रमासाठी विद्युत अभियांत्रिकी विभागाचे विभागप्रमुख डॉ. हेमंत सा. कुलट, सहा. विभागप्रमुख डॉ. प्रीती आर. राणे यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा.स्मिता काळमेघ यांनी काम पाहिले आणि प्रा. सारंग भोंडे, प्रा.रोशन देवतारे, प्रा.अश्विनी सोनोने यांनी जबाबदारी सांभाळली.संचालन आणि आभार प्रदर्शन प्रथमेश आडे यांनी केले.





### विवेकानंद इंग्लिश कॉन्व्हेंटमध्ये जन्माष्टमी

**लेहेगाव-** श्री विवेकानंद इंग्लिश कॉन्व्हेंट, लेहेगाव येथे श्रीकृष्ण जन्माष्टमीनिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.यावेळी विद्यार्थ्यांनी श्रीकृष्ण व राधेच्या आकर्षक वेशभूषेत उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. विद्यार्थ्यांनी श्रीकृष्णाच्या जीवनावर आधारित सुंदर सादरीकरणे, नृत्य व गीते सादर केली. तसेच दहीहंडी व श्रीकृष्ण जन्मोत्सव उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला.शिक्षकांनी विद्यार्थ्यांना श्रीकृष्णाच्या जीवनातील प्रेम, मैत्री, सत्य आणि सदाचार यांचे महत्त्व समजावून सांगितले.यशस्वी आयोजनासाठी शाळेचे मुख्याध्यापिका नितु तट्टे , शिक्षकवृंद निशा यादव व मनीषा मनोहरे तसेच शिक्षकेतर व पालकांचे सहकार्य लाभले.

### शंकर महाराज ८२ वा प्रकट दिन महोत्सव

**कुऱ्हा-** श्री संत शंकर महाराज आश्रम विश्व मंदीर भक्ति धाम




श्रीक्षेत्र पिंपळखुटा येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी परमहंस समर्थ सद्गुरु श्री. संत शंकर महाराज यांचा ८२ वा प्रकट दिन महोत्सव ७ते १४ सप्टेबरपर्यंत विविध धार्मिक कार्यक्रम यामध्ये सामुदायिक ध्यान, प्रार्थना, ग्रंथराज ज्ञानेश्वरी व ज्ञानामृत (ज्ञानेश्वरी प्रसाद) या ग्रंथाचे सामुहीक पारायण, जगद्गुरु श्रीसंत तुकाराम महाराज गाथा भजन, श्री विष्णु याग, संगीत श्रीमत भागवत कथा ज्ञानयज्ञ, किर्तन, भारुड, भगवान पांडूरंगा च्या (पंढरपूर) आणि संत तुकाराम महाराजाच्या देहू येथील चरण पादुकांचे दर्शन तसेच रक्तदान, मोफतनेत्र तपासणी, होमी-ओपॅथी औषधोपचार शिबीर, दंत तपासणी शिबीर, डॉ. राजेंद्र गोडे मेडीकल कॉलेज आणि हॉस्पीटल अमरावती रोग तपासणी शिबीर, असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहे. व महाप्रसाद १४ सप्टेंबर २०२६ ला आहे.

### मराठा विवाह मंडळाची आज आमसभा

**अमरावती-** मराठा समाजातील प्रसिद्ध सामाजिक संस्था मराठा विवाह मंडळ व वाचनालयाची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार ६ सप्टेंबरला दुपारी ४ वाजता आयोजित करण्यात आली आहे.मराठा विवाह मंडळाचे अध्यक्ष माजी कुलगुरू डॉ. गणेश पाटील यांच्या अध्यक्षतेत आयोजित या सभेत मंडळाच्या पुढील ध्येयधोरण व अन्य विषयावर चर्चा करण्यात येईल.मंडळाच्या नारायण नगर बगीचा, रुख्मिणी नगर येथील कार्यालयात आयोजित या सभेला मंडळाच्या सदस्यांनी उपस्थित रहावे तसेच दररोज दुपारी ४ ते ६ यावेळेत उपवर युवक युवती आणि पालकांनी उपवर मुलामुलींची नोंदणी करून मंडळाला सहकार्य करावे, असे आवाहन मंडळाचे सरकार्यवाह दिगंबर शहापुरे यांनी केले आहे.

# डोमा आश्रमशाळेतील विद्यार्थिनींच्या मनातील भीती दूर

## जिल्हाधिकारी येरेकर यांचा रात्रभर मुक्काम, विद्यार्थ्यांसोबत केले सामूहिक भोजन

**मेळघाट/वार्ताहर**

चिखलदरा तालुक्यातील डोमा येथील शासकीय उच्च व माध्यमिक विद्यालय आश्रमशाळेत काही विद्यार्थिनींमध्ये भूतबाधेच्या अफवेने भीतीचे वातावरण पसरले होते. या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांच्या मनातील भीती दूर करून त्यांच्यात आत्मविश्वास आणि वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण करण्यासाठी जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांच्या विशेष पुढाकाराने भव्य प्रबोधन व समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांनी स्वतः विद्यार्थिनींशी एक-एक करून संवाद साधला, त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. केवळ भाषण न देता प्रशासन आपल्या सोबत आहे हा विश्वास निर्माण करण्यासाठी



जिल्हाधिकारी येरेकर यांच्यासह सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आश्रमशाळेतच रात्रभर मुक्काम केला आणि विद्यार्थ्यांसोबत सामूहिक भोजन केले. या कृतीमुळे विद्यार्थ्यांच्या मनातील भीती मोठ्या प्रमाणात कमी झाली आहे. या कार्यक्रमासाठी सत्यपाल महाराज यांचे शिष्य प्रसिद्ध सप्तखंजेरी वादक संदीपपाल महाराज गीते (रंभापूरकर) आणि त्यांच्या टीमला विशेष निमंत्रित करण्यात आले होते. त्यांनी आपल्या प्रबोधनवाणीतून सांगितले की, 'या सृष्टीमध्ये भूत, भानामती, चमत्कार, अंगात देव येणे या अफवा असून याने अंधश्रद्धेला खतपाणी मिळते. या अंधश्रद्धेच्या खाईत अनेक परिवाराचे जीवन नष्ट झाले आहे. आपले व आपल्या परिवाराचे समृद्ध जीवन पाहायचे असेल तर विज्ञानवादी दृष्टिकोन ठेवून अंधश्रद्धेला थारा देऊ नका. माझ्या सावित्रीच्या लेकीने अंगात आणायचेच असेल तर जिजाऊ, अहिल्या यांना आणा.' संत गाडगेबाबांसह आदी संत महापुरुषांनी विज्ञानवादी दृष्टिकोन मांडून अंधश्रद्धेवर प्रहार केल्याचे त्यांनी सांगितले. त्यांना हार्मोनियम वादक गणेश पिसे, गायक नंदू चांबट, हरी सपकाळ, नाजूक पिसाट यांनी साथ दिली. या प्रसंगी विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने नूतन वसतिगृहाचे उद्घाटन विद्यार्थिनी गायत्री उईके यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी येरेकर यांनी सर्व विद्यार्थिनींनी लवकरात लवकर नियमितपणे शाळेत उपस्थित राहावे आणि शिक्षणावर लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन केले. कार्यक्रमाला आमदार केवलराम काळे, पोलीस अधीक्षक निकेतन कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी गांधी, प्रकल्प अधिकारी तथा सहायक जिल्हाधिकारी सिद्धार्थ शुक्ला, उपविभागीय अधिकारी तळवी, तहसीलदार मोराणकर, गटविकास अधिकारी खेडेकर, उपमुख्य कार्यकारी अधिकारी बायस, नायब तहसीलदार धावडे, गटशिक्षणाधिकारी गिरासे, ठाणेदार पाटील, सरपंच सुनील उईके, मुख्याध्यापक चौधरी यांच्यासह शिक्षक, पत्रकार, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विद्यार्थ्यांचे शिक्षण खंडित होऊ नये आणि त्यांना सुरक्षित, सकारात्मक व विश्वासाचे वातावरण मिळावे यासाठी प्रशासनाकडून आवश्यक त्या सर्व उपाययोजना केल्या जात आहेत, अशी माहिती यावेळी जिल्हाधिकारी आशीष येरेकर यांनी दिली.

### उद्यम प्रशिक्षणातून ५० महिला 'नवउद्योजिका'साठी सक्षम

**तिवसा-** महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम बनवून त्यांना रोजगाराचे दालन निर्माण करून देण्यासाठी महाराष्ट्र राज्य लघु उद्योग विकास महामंडळ (MSSIDC) आणि एंटरप्रेन्युअरशिप डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट ऑफ इंडिया (EDII) यांच्या संयुक्त विद्यमाने स्थानिक गुरुदेवनगर येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने देण्यात आलेल्या प्रशिक्षणातुन ५० महिला नवउद्योजिका म्हणून स्वतः च्या पायावर उभ्या राहण्यासाठी सक्षम झाल्या आहे.

गुरुकुंज आश्रम येथील स्मृती हॉल येथे आयोजित 'उद्यम' उद्योजकता प्रशिक्षण कार्यक्रमाचा नुकताच समारोप झाला. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अंकुश गायकवाड उपस्थित होते. कार्यक्रमाचे संपूर्ण नेटके नियोजन आणि यशस्वी आयोजन कपिल देशमुख यांनी केले.मुख्य ट्रेनर स्नेहा देशमुख यांनी प्रशिक्षणार्थींना नवीन व्यवसाय कसा निवडावा, त्याचे व्यवस्थापन कसे करावे आणि डिजिटल मार्केटिंगचे तंत्र यावर सखोल मार्गदर्शन केले. प्रशिक्षणादरम्यान डिजिटल साक्षरता आणि ऑनलाइन प्रक्रियेचे संपूर्ण तांत्रिक काम कॉम्प्युटर ऑपरेटर आचल वानखडे यांनी यशस्वीपणे सांभाळले. केंद्र व राज्य शासनाच्या MSME अंतर्गत मिळणाऱ्या विविध कर्ज योजना, सबसिडी आणि उद्योगासाठी लागणाऱ्या परवान्यांची माहिती यावेळी देण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी प्रशिक्षण यशस्वीरीत्या पूर्ण करणाऱ्या ५० ही प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

# कोरड्या दुष्काळाच्या छायेत चांदूरबाजारचा बळीराजा हवालदिल

## हेक्टरी ५० हजारांची मदत देण्याची लोकविकास संघटनेची मागणी

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

पावसाळा सुरू होऊन तीन महिने उलटले असतानाही पावसाने दीर्घ खंड दिल्याने चांदूरबाजार तालुक्यातील शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे.सोयाबीन, कापूस आणि तूर या पिकांवर पावसाअभावी करपण्याची वेळ आली असून, आधीच कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या बळीराजासमोर आर्थिक संकट अधिक गडद झाले आहे. तालुक्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करून बाधित शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी लोकविकास संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे.

शेतकऱ्यांनी कर्ज काढून जमीन मशागत, बियाणे, रासायनिक खते आणि



कीटकनाशकांवर मोठा खर्च करून पेरणी केली. मात्र, पिके वाढीच्या अवस्थेत असतानाच पावसाने दडी मारल्याने शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेले पीक वाया जाण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे पुढील हंगामाचे नियोजन कसे करायचे, कर्जाची परतफेड कशी करायची, या विवंचनेत शेतकरी सापडला आहे. या मागणीचे निवेदन संघटनेच्या वतीने तहसीलदारांमार्फत मुख्यमंत्री यांना देण्यात आले.पावसाने पाठ फिरवल्याने शेतातील पिकांची अवस्था दयनीय झाली आहे. अनेक ठिकाणी विहिरींनी तळ गाठला असून, बोअरवेलच्या पाणीपातळीतही घट झाली आहे. जलाशयांमधील पाणीसाठाही कमी होत असल्याने आगामी काळात पाणीटंचाईचे संकट अधिक तीव्र होण्याची शक्यता आहे. लोकविकास संघटनेने शासनाच्या शेतकरी धोरणावरही नाराजी व्यक्त केली.'शेतकरी विरोधी शासन शेतकऱ्यांना त्रास देतच आहे; त्यात निसर्गानेही साथ सोडल्याने बळीराजा दुहेरी संकटात सापडला आहे,' अशी भावना संघटनेने निवेदनातून व्यक्त केली. यावेळी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव, संघटक रमन लगोटे, रुषिकेश रडके, पवन राऊत, आकाश खेलदार, शाम पारीसे, इरफान सौदागर, प्रविण जामोदकर यांच्यासह तालुक्यातील मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते. बदलत्या हवामानामुळे तापमानवाढ, पाणीटंचाई आणि दुष्काळी परिस्थितीचे संकट अधिक गंभीर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ तात्पुरती आर्थिक मदत न देता शासनाने दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी दीर्घकालीन उपाययोजना कराव्यात, अशी मागणीही करण्यात आली.

# सेमाडोह येथे १३ नालसा योजनांची प्रभावी अंमलबजावणी

**अमरावती/का.प्र.**

जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाद्वारे राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरणाच्या (नालसा) मेगा ड्राईव्ह अंतर्गत चिखलदरा तालुक्याच्या सेमाडोह गावातील नागरिकांच्या दारापर्यंत विधी सेवा, कायदेविषयक मार्गदर्शन व विविध शासकीय योजना अशा एकूण १३ नालसा योजनांचा लाभ पोहचविण्यात येत आहे. ग्रामस्थांमध्ये या उपक्रमाबाबत उत्साह असून, त्यांच्या दारापर्यंत विधी सेवा आणि शासनाच्या योजनांची माहिती व लाभ पोहोचत असल्याने ग्रामस्थ समाधान व्यक्त करीत आहेत.




नालसाच्या निर्देशानुसार देशभरातील नागरिकांना त्यांच्या दारापर्यंत विधी सेवा, कायदेविषयक मार्गदर्शन तसेच विविध शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी महाराष्ट्रासह १८ राज्यांमध्ये नालसा मेगा ड्राईव्ह-१ हा विशेष उपक्रम राबविण्यात येत आहे.

राज्यातील निवडक जिल्ह्यांमध्ये हा उपक्रम राबविण्यात येत असून महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरणाद्वारे या उपक्रमासाठी अमरावती जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. जिल्ह्यातील दुर्गम व सामाजिक-आर्थिकदृष्ट्या गरजू भागाचा विचार करून चिखलदरा तालुक्यातील सेमाडोह गावाची निवड करण्यात आली आहे. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्ष उज्वला नंदेश्वर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच प्राधिकरणाचे सचिव संजय सहारे यांच्या समन्वयातून २५ ऑगस्ट २०२६ पासून मेगा ड्राईव्हची प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. हा मेगा ड्राईव्ह २३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत चालणार आहे.

सेमाडोह येथे नालसा मेगा ड्राईव्ह टप्पा १ अंतर्गत १३ नालसा योजनांची तळागाळात प्रभावी अंमलबजावणी करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, अमरावतीचे सचिव, कार्यालयीन कर्मचारी तसेच पॅरा-लीगल स्वयंसेवक सेमाडोह गावास वारंवार भेटी देऊन नागरिकांशी प्रत्यक्ष संवाद साधत आहेत. घरभेटी, सर्वेक्षण, कायदेविषयक जनजागृती, पात्र लाभार्थ्यांची ओळख वप्रकरणांची नोंद तसेच आवश्यकतेनुसार संबंधित शासकीय विभागांशी समन्वय साधण्याचे काम सुरू आहे. गावातील नागरिकांची माहिती संकलित करून पात्र लाभार्थ्यांची ओळख करण्यात येत आहे. नागरिकांना त्यांच्या हक्कांची, विधी सेवांची तसेच विविध शासकीय कल्याणकारी योजनांची माहिती देऊन आवश्यकतेनुसार विधी सहाय्य व संबंधित विभागांशी समन्वय साधून योजनांचा लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न केला जात आहे. या विशेष उपक्रमास ग्रामस्थ, सरपंच व ग्रामपंचायत सदस्य आणि चिखलदरा तालुका प्रशासनाचे सहकार्य प्राप्त होत आहे.

### संत गाडगेबाबा प्रबोधिनी अभ्यासिका केंद्राची सभापती आवारे यांनी केली पाहणी

**अमरावती-** अमरावती महानगरपालिकेच्या महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती ममता आवारे यांनी कॅम्प रोड येथील संत गाडगेबाबा प्रबोधिनी अभ्यासिका ग्रंथालय केंद्राची पाहणी केली. यावेळी त्यांनी अभ्यासिका केंद्रातील विविध सुविधांची पाहणी करून विद्यार्थ्यांशी संवाद साधला तसेच त्यांच्या समस्या व अडचणी जाणून घेतल्या.

पाहणीदरम्यान अभ्यासिका केंद्रात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, शौचालयाची सुविधा, साफसफाई, अपुरे मनुष्यबळ, वाढलेली झाडे, इंटरनेट सुविधा, डस्टबिनची व्यवस्था, विद्यार्थ्यांना जेवणासाठी बसण्याची सुविधा तसेच हॉलची दुरुस्ती यांसह विविध बाबी निदर्शनास आल्या. या सर्व समस्यांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या उपाययोजना करण्याचे निर्देश महिला व बाल कल्याण समितीच्या सभापती ममता आवारे यांनी दिले. प्रश्नांवर समाधानकारक उत्तर देऊन संबंधित समस्या निकाली काढण्यात येतील, असे आश्वासन सभापती ममता आवारे यांनी दिले.यावेळी संदीप आवारे, श्रीधर हिवराळे, कुलदीप भैसने, रोहित हडाले यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते.



### दत्तक विधानात जिल्ह्याची ऐतिहासिक कामगिरी

# एकाच दिवसात ९ बालकांना हक्काचा 'कुटुंबाधारित' निवारा!

## पालकत्व मिळाल्याने पालकांच्या जीवनात आनंदाची पहाट

**अमरावती/का.प्र.**

प्रत्येक बालकाला प्रेम, माया, सुरक्षितता आणि कुटुंबाचा आधार मिळावा, या उदात्त उद्देशाने राबविण्यात येणाऱ्या दत्तक विधान प्रक्रियेत जिल्ह्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी एकाच दिवशी तब्बल ९ दत्तक प्रकरणांमध्ये आदेश पारित करून या बालकांच्या आयुष्यात नवीन आशा आणि आनंदाचा अध्याय प्रारंभ केला आहे. तसेच पालकत्व मिळाल्याने पालकांच्या जीवनात आनंदाची पहाट उगविली आहे.एकाच दिवशी जिल्ह्यातील बाल संरक्षण क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण बाब असून, प्रशासनाची संवेदनशीलता, तत्परता आणि बालकांच्या सर्वोत्तम हितासाठी असलेली बांधिलकी याचे हे उत्तम उदाहरण ठरल्याची भावना जिल्हाधिकारी येरेकर यांनी व्यक्त केली आहेत.

'प्रत्येक बालकाला सुरक्षित, प्रेमळ आणि कायमस्वरूपी कुटुंबामध्ये वाढण्याचा अधिकार आहे. दत्तक विधान प्रक्रिया ही केवळ एका कायदेशीर आदेशापुरती मर्यादित नसून ती एका बालकाच्या संपूर्ण आयुष्याला नवी दिशा देणारी प्रक्रिया आहे. बालकांच्या सर्वोत्तम हिताला सर्वोच्च प्राधान्य देऊन पात्र दत्तक प्रकरणांचा वेळेत



निपटारा करण्यासाठी जिल्हा प्रशासन कटिबद्ध आहे. एकाच दिवशी ९ दत्तक आदेश पारित होणे ही निश्चितच समाधानाची बाब असून, यामुळे या बालकांना नवीन कुटुंब,नवीन नाती आणि उज्ज्वल भविष्याची संधी प्राप्त झाल्याचे जिल्हाधिकारी येरेकर यांनी सांगितले.पालकांच्या संगोपनापासून वंचित राहिलेल्या बालकांना कायमस्वरूपी प्रेमळ कुटुंब मिळवून देण्याच्या दिशेने उचललेले हे अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वपूर्ण पाऊल आहे. या निर्णयामुळे बालकांना सुरक्षित, प्रेमळ आणि स्थिर कौटुंबिक वातावरणात वाढण्याची संधी उपलब्ध झाली आहे.

दत्तक विधान प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण करण्यासाठी जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी संजय गट, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी अजय डबले, तसेच बाल संरक्षण अधिकारी भूषण कावरे यांच्या समन्वयातून आवश्यक कार्यवाही करण्यात आली.दत्तक विधान प्रक्रियेत बालकांचे सर्वोत्तम हित, आवश्यक कागदपत्रांची पूर्तता, संबंधित यंत्रणांशी समन्वय आणि प्रक्रियेतील विविध टप्प्यांवर आवश्यक कार्यवाही करण्यासाठी बाल संरक्षण अधिकारी भूषण कावरे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. बालकांना संस्थात्मक संगोपनाऐवजी शक्य तेथे कुटुंबाधारित संगोपन उपलब्ध करून देणे, तसेच बालकांच्या पुनर्वसनासाठी कायदेशीर व सुरक्षित मार्गाने कार्यवाही करणे यासाठी बाल संरक्षण यंत्रणा सातत्याने प्रयत्नशील आहे.

दत्तक प्रक्रिया ही समाजातील संवेदनशील आणि जबाबदार नागरिकांनी सकारात्मक दृष्टीने पाहण्याची गरज आहे. कायदेशीर प्रक्रियेतून दत्तक घेतलेल्या बालकाला कुटुंबाचा आधार देणे हे अत्यंत मोठे सामाजिक योगदान आहे. पात्र आणि इच्छुक पालकांनी अधिकृत प्रक्रियेची माहिती घेऊन कायदेशीर मार्गाने दत्तक विधान प्रक्रियेत सहभागी व्हावे, असा संदेशही या निमित्ताने देण्यात आला. जिल्ह्याच्या बाल संरक्षण व्यवस्थेतील ही कामगिरी निश्चितच प्रेरणादायी आणि उल्लेखनीय ठरत आहे

# डॉ. सुनील देशमुखांच्या २ कोटींच्या भ्रष्टाचाराच्या आरोपांवर प्रशासनाचे स्पष्टीकरण

## पारदर्शकतेसह शासनाचे ४५ लाखांहून अधिक रुपये वाचल्याचा दावा

**अमरावती/प्रतिनिधीः-** इर्विन रुग्णालयासाठी करण्यात आलेल्या २० उच्च दर्जाच्या व्हेंटिलेटर खरेदीवरून अमरावतीत राजकीय आणि प्रशासकीय वातावरण चांगलेच तापले आहे. अमरावती वैद्यकीय महाविद्यालयाकडून (GMC) २२.५५ लाख रुपये प्रति नग याप्रमाणे ४.५ कोटींची ही खरेदी करण्यात आली आहे. मात्र, या व्यवहारात तब्बल २ कोटी रुपयांचा मोठा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर आरोप माजी पालकमंत्री डॉ.सुनील देशमुख यांनी पुराव्यानिशी केला आहे. दुसरीकडे, सर्व नियम पाळून ऑनलाइन पद्धतीने ही खरेदी करण्यात आली असून, यामुळे उलट शासनाचे ४५ लाखांहून अधिक रुपये वाचल्याचा दावा जीएमसी प्रशासनाने केला आहे.



डफरीन रुग्णालयातील दुर्दैवी अग्निकांडानंतर आरोग्य यंत्रणेच्या खरेदीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत डॉ. सुनील देशमुख यांनी या व्यवहाराचा भांडाफोड केला. नागपूर येथील हॅमिल्टन C३ व्हेंटिलेटरच्या अधिकृत वितरकाकडून मागवलेल्या कोटेशनानुसार, जीएसटीसह एका व्हेंटिलेटरची किंमत अवघी १३.१२ लाख रुपये आहे. घाऊक खरेदीत हा दर १० लाखांपर्यंत खाली येऊ शकतो. तरीही प्रशासनाने एका व्हेंटिलेटरसाठी तब्बल २२.५५ लाख रुपये मोजले. म्हणजेच प्रति व्हेंटिलेटर १० लाख रुपयांची तफावत असून २० व्हेंटिलेटरच्या खरेदीत तब्बल २ कोटी रुपयांचा अपहार झाल्याचा थेट आरोप त्यांनी केला होता.

याशिवाय, ज्या 'निर्मल एजन्सी'ला हे कंत्राट देण्यात आले, त्या वाशीम येथील दुकानाच्या पत्त्यावर प्रत्यक्षात किराणा व तिखट-हळदीची दुकाने आढळल्याचा दावाही डॉ. देशमुखांनी छायाचित्रांसह केला. 'अमरावतीत कोणीही यावे, ओरबाडून पैसे खावे आणि निघून जावे, असा अनागोंदी कारभार सुरू आहे,' असा घणाघाती आरोप करत त्यांनी या संपूर्ण खरेदीची आणि चालू वर्षातील ३.२७ कोटींच्या इतर आयसीयू उपकरणांच्या खरेदीची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे केली आहे.




**निधीचा कोणताही अपव्यय नाही :** जीएमसी प्रशासनाचा डॉ. देशमुखांच्या आरोपांनंतर जीएमसीच्या अधिष्ठाता डॉ. स्मिता सोनटक्के यांनी प्रशासनाची बाजू मांडली. वैद्यकीय शिक्षण व आयुष आयुक्त (मुंबई) यांच्या तांत्रिक मान्यतेने आणि जिल्हा वार्षिक योजनेच्या प्रशासकीय मंजुरीनेच ही खरेदी झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले. महा-ईटेंडर प्रणालीवर उद्योग व ऊर्जा विभागाच्या नियमांनुसार ऑनलाइन निविदा प्रसिद्ध करण्यात आली होती. प्रशासनाने दिलेल्या स्पष्टीकरणानुसार, एका व्हेंटिलेटरसाठी २४.८२ लाख रुपयांची प्रशासकीय मान्यता होती. परंतु, पारदर्शक निविदा प्रक्रियेमुळे प्रति नग २२.५५ लाख रुपये असा सर्वात कमी दर प्राप्त झाला. यामुळे एका व्हेंटिलेटरमागे २.२६ लाख याप्रमाणे एकूण ४५ लाख ३९ हजार १२० रुपयांची बचत झाली आहे. तसेच, स्वित्झर्लंडच्या जगप्रसिद्ध 'हेमिल्टन' कंपनीचे हे व्हेंटिलेटर असून, रुग्णसेवेत खंड पडू नये म्हणून याच किमतीत पुढील २ वर्षे पुरतील इतके अतिरिक्त कन्ज्युमेबल्स आणि २ वर्षांची संपूर्ण वॉरंटी अंतर्भूत आहे. पुरवठादाराची सर्व कायदेशीर कागदपत्रे तपासल्यानंतरच ही खरेदी झाली असून निधीचा कोणताही अपव्यय झालेला नाही, असे प्रशासनाने ठामपणे सांगितले.

> एकीकडे प्रशासन तांत्रिक मान्यता, कागदपत्रांची पूर्तता आणि ४५ लाखांच्या बचतीचा दाखला देत आहे, तर दुसरीकडे प्रत्यक्ष बाजारभाव आणि प्रत्यक्ष पुरवठादाराच्या अस्तित्वावरच डॉ.सुनिल देशमुख यांनी बोट ठेवले आहे. कोट्यवधींच्या या आरोग्य उपकरणांच्या खरेदी दरातील प्रचंड तफावत आणि वितरकाची पार्श्वभूमी यामुळे हा विषय आता चांगलाच पेटला असून, प्रशासन व पालकमंत्र्यांच्या आगामी भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# पोलीस आयुक्तांच्या उपस्थितीत आरोपीची चौकशी

## कडेकोट बंदोबस्तात 'सीन रिक्रिएशन'

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरात खळबळ उडविणाऱ्या शर्वरी हाडके हत्याकांड प्रकरणात पोलीस तपासाला वेग आला आहे. न्यायालयाने आरोपी आनंद नंदकिशोर भड (वय २२, रा. पोही, मुर्तिजापूर) याला ८ सप्टेंबरपर्यंत पोलीस कोठडी सुनावल्यानंतर पोलिसांनी पुरावे गोळा करण्याची मोहीम सुरू केली आहे. आज शनिवार ५ सप्टेंबर रोजी पोलीस आयुक्त राकेश ओला आणि डीसीपीं श्याम घुगे स्वतः ठाण्यात येऊन आरोपीची चौकशी केली, त्यानंतर पोलीस पथक आरोपीला घेऊन



थेट त्याच्या गावी पोहोचले आणि संपूर्ण गुन्ह्याचा रूटचा 'सीन रिक्रिएशन' केला. माहिती नुसार शनिवारी दुपारी पोलीस आयुक्त राकेश ओला आणि पोलीस उपायुक्त श्याम घुगे हे राजापेठ पोलीस ठाण्यात दाखल झाले. दोन्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी आरोपी आनंद भड याची सविस्तर चौकशी करून तपास पथकाला महत्त्वाच्या सूचना दिल्या. त्यानंतर लगेचच राजापेठचे ठाणेदार संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या पोलीस बंदोबस्तात आरोपीला कडेकोट सुरक्षा घेऊन (पान २ वर)

# मोर्शी आगारात राजमाता जिजाऊ गाड्या दाखल!

## आमदार चंदू यावलकर यांच्या हस्ते पार पडले लोकार्पण

**मोर्शी/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मोर्शी आगारात नुकत्याच दाखल झालेल्या राजमाता जिजाऊ बसेसचा लोकार्पण सोहळा आज दि.५ सप्टेंबर रोजी मोर्शी विधानसभा मतदारसंघाचे कर्तव्यदक्ष आमदार चंदू यावलकर यांच्या हस्ते पार पडला.

सर्वप्रथम आमदार चंदू यावलकर यांचे मोर्शी बसस्थानकावर आगमन होताच आगारातील महिला कर्मचारी संगीता निंघोट आणि छाया बरडे यांनी त्यांना औक्षवंत केले.दरम्यान आमदार महोदयांच्या हस्ते मॉ राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करण्यात आले. प्रसंगी



मोर्शी एसटी डेपोला प्राप्त झालेल्या पाच राजमाता जिजाऊ एसटी बसेस फीत कापून प्रवाशांच्या सेवेकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या. मोर्शी आगारात गेल्या अनेक वर्षापासून राज्य परिवहन महामंडळाच्या एसटी बसेस नादुरुस्त (पान २ वर)

# आज एमपीएससी परीक्षा ; शहरात १० केंद्रांच्या परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

**अमरावती/प्रतिनिधीः-** महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) रविवार, ६ सप्टेंबर रोजी मुंबईचे नगरपाल शेरीफ कार्यालयातील बेलिफ-लिपीक (गट-क)-२०२६ ही परीक्षा शहरातील १० परीक्षा केंद्रांवर सकाळी ७.०० ते सायं.६.०० या वेळेत पार पडणार आहे. परीक्षा काळात शांतता व सुव्यवस्था राखण्यासाठी तसेच कोणताही गैरप्रकार टाळण्यासाठी अमरावती शहर पोलीस निरीक्षक (विशेष शाखा) यांनी परीक्षा केंद्रांच्या



५०० मीटर परिसरात कडक प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.


अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाच्या गाडगे नगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत ३, कोतवाली हद्दीत १ आणि राजापेठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत ६ अशा एकूण १० केंद्रांवर हे आदेश लागू राहणार आहेत.

परीक्षा केंद्रांच्या ५०० मीटर त्रिज्येच्या आत कोणत्याही बाहेरील व्यक्तीला वावरण्यास सक्त मनाई आहे. केवळ परीक्षार्थी, परीक्षा कर्तव्यावर असलेले कर्मचारी आणि शासकीय अधिकृत व्यक्तींनाच या परिसरात प्रवेश असेल. पेपर संपल्यानंतर परीक्षार्थींनाही तिथे थांबता येणार नाही. परीक्षा सुरू होण्यापूर्वीपासून ते संपेपर्यंत ५०० मीटर परिसरातील सर्व सार्वजनिक टेलिफोन, एसटीडी, आयएसडी, फॅक्स केंद्रे, (पान २ वर)

# मारडा शिवारात पट्टेदार वाघाचा वावर

## भीतीपोटी शेतमजूर कामावरून परतले

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** तिवसा तालुक्यातील मारडा शिवारात आज, ५ सप्टेंबर रोजी सकाळी ७ वाजेच्या सुमारास कॅनलवर पट्टेदार वाघ दिसून आल्याने संपूर्ण परिसरात प्रचंड घबराट पसरली आहे. वाघाच्या प्रत्यक्ष दर्शनामुळे शेतात कामासाठी गेलेले आणि जाणारे सर्व मजूर भीतीपोटी माघारी परतले आहेत.



सकाळी नेहमीप्रमाणे शेतकरी आणि शेतमजूर कामासाठी शेताकडे निघाले होते. दरम्यान, कॅनलजवळ पट्टेदार वाघ असल्याचे निदर्शनास आले. ही बातमी परिसरात पसरताच आधीच शेतात पोहचलेले मजूर काम सोडून माघारी फिरले, तर कामावर निघण्याच्या तयारीत असलेल्या मजुरांनी भीतीपोटी शेतात जाणे टाळले. यामुळे मारडा (पान २ वर)

# इलेक्ट्रिक पोलवरील साहित्य चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश

## ३ आरोपी ताब्यात, ५.७२ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** अंजनगाव सुर्जी पोलीसांनी महावितरण चे इलेक्ट्रॉनिक साहित्य चोरी करणाऱ्या टोळीचा पर्दाफाश केला आहे. त्यांच्याकडून टाटा-४०७ वाहनासह एकूण ५ लाख ७२ हजार ५८० रुपयांचा माल जप्त करण्यात आला आहे. मो. सुफियान अब्दूल कादीर (वय २५), मो. साजिद ताज मोहम्मद (वय ४५, दोघे कांझीपुरा ,अंजनगाव) आणि शेख समीर



शेख बशीर (वय २४, सत्तीपुरा, अंजनगाव) असे अटक आरोपींचे नावे आहेत. माहितीनुसार, अंजनगाव (पान २ वर)

# कुऱ्हा परिसरात वन्यप्राण्यांचा हैदोस

## रानडुकरे अन् माकडांमुळे शेतकरी हवालदिल

**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** कु-हा आणि परिसरातील , वरुडा, जगदीशपूर, देवगाव आदी भागांत रानडुकरे व माकडांनी धुमाकूळ घातला आहे. वन्यप्राण्यांच्या या हैदोसामुळे शेतकरी पार त्रस्त झाले असून, पिकांचे अतोनात नुकसान होत आहे.



सध्या शेतातील कपाशीच्या पिकाला बोंडे आली आहेत. मात्र, माकडांच्या मोठ्या टोळ्या या पिकांचे प्रचंड नुकसान करत आहेत. दुसरीकडे, शेताला तारेचे कुंपण असूनही रानडुकरे ते उंच करून संत्रा बागा आणि इतर पिकांमध्ये घुसून धुमाकूळ घालत आहेत. संत्रा बागांमध्ये मोठमोठे खड्डे करून (पान २ वर)

# कर्जाच्या चिंतेत शेतकऱ्याने केले विष प्राशन

## -उपचारादरम्यान मृत्यू

**अमरावती/प्रतिनिधीः-** कर्जबाजारीपणा आणि शेतीच्या नुकसानीच्या चिंतेतून भातकुली तालुक्यातील दर्याबाद येथील ७० वर्षीय शेतकरी नामदेवराव रामचंद्रजी तायडे यांनी विषारी औषध प्राशन केले. उपचारादरम्यान जिल्हा रुग्णालयात त्यांचा मृत्यू झाला. नामदेवराव यांच्याकडे दोन एकर शेती होती. यंदा त्यांनी तूर व सोयाबीनची पेरणी केली होती. पत्नीच्या नावेही चार एकर शेती



होती. मात्र, पावसाअभावी पिकांचे नुकसान होत होते. त्यातच सहकारी बँकेचे कर्ज थकीत असल्याने ते काही दिवसांपासून मानसिक तणावात होते. ३ सप्टेंबर रोजी सकाळी कुटुंबीयांना ते अंगणात उलट्या करताना दिसले. (पान २ वर)

# कॉलेजला जाणाऱ्या तरुणीचा पाठलाग

## सजग नागरिकाची सतर्कता, आरोपी पसार

**अमरावती/प्रतिनिधीः-** शहरातील गाडगेनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत कॉलेजला जाणाऱ्या एका तरुणीचा दुचाकीवरून पाठलाग करून तिची छेडछाड करण्यात आल्याची घटना समोर आली आहे. तरुणीने प्रसंगावधान राखत आरोपीचा हात झटकून तेथून पुढे जाण्याचा प्रयत्न केला. त्याचवेळी घटनास्थळी उपस्थित असलेल्या एका सजग नागरिकाने आरोपीला दटावल्याने तो दुचाकीवरून पसार झाला.



नागरिकाच्या सतर्कतेमुळे पुढील अनर्थ टळला. या प्रकरणी पीडित तरुणीच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित तरुणी आणि (पान २ वर)

# ऑटो उलटून पाच जण जखमी

## अकोला टी-पॉइंटजवळ अपघात

**अमरावती/प्रतिनिधीः-** रस्त्यावर अचानक माकडांचा कळप आल्याने ऑटोचालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटून ऑटो उलटल्याची घटना शनिवारी सकाळी अकोला टी-पॉइंटजवळ घडली. या अपघातात ऑटोतील चार ते पाच जण जखमी झाले असून, त्यापैकी काहींना पुढील उपचारासाठी बडनेरा येथील ट्रॉमा केअर सेंटरमध्ये दाखल करण्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, उत्तम नगर येथील



शेंडे कुटुंबातील काही सदस्य अंत्यसंस्कारासाठी हिवरा गावाकडे ऑटोने जात होते. शनिवारी सकाळी सुमारे ११.३५ वाजताच्या सुमारास त्यांचा ऑटो अकोला (पान २ वर)

# मेळघाटच्या कलाल कुंड धबधब्यात पडून शिक्षकाचा मृत्यू

## राखीव वनक्षेत्रात विनापरवाना प्रवेश ठरला जीवघेणा

**अमरावती/प्रतिनिधीः-** मेळघाट प्रादेशिक वनविभागांतर्गत येणाऱ्या घटांग परीक्षेत्रातील कलाल कुंड धबधबा येथे एका पर्यटकाचा पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाला. विपिन मनोहर कोरे (रा. मोर्शी) असे मृत पर्यटकाचे नाव आहे. ते व्यवसायाने शिक्षक होते. बंदी असलेल्या राखीव वनक्षेत्रात विनापरवानगी प्रवेश करून भ्रमंती



करणे या पर्यटकांच्या अंगाशी आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, ३ सप्टेंबर रोजी ६० ते ७० पर्यटकांचा गट विनापरवानगी घटांग परीक्षेत्रातील आडनदी गावाजवळील कलाल कुंड धबधबा परिसरात (पान २ वर)

# उत्कृष्ट तीन गणेश मंडळांना आमदारांकडून १५ लाखांचे बक्षीस

## शांतता बिघडवणाऱ्यांवर कडक कारवाईचा पोलीस अधीक्षकांचा इशारा

### -अचलपुरात शांतता समितीची सभा



**अचलपूर/प्रतिनिधीः-** आगामी गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात साजरा व्हावा यासाठी परतवाडा येथील अंबिका लॉन येथे आयोजित शांतता समितीच्या सभेत समाजातील सलोखा बिघडवणाऱ्या समाजकंटकांवर कडक कायदेशीर कारवाई करण्याचा इशारा अमरावती जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी दिला आहे. याच सभेत अचलपूर मतदारसंघाचे आमदार प्रवीण तायडे यांनी गणेशोत्सवात उत्कृष्ट नियोजन करणाऱ्या तीन गणेश मंडळांना स्थानिक आमदार निधीतून अनुक्रमे ७ लाख, ५ लाख आणि ३ लाख रुपयांचा



विकासनिधी बक्षीस म्हणून देण्याची घोषणा केली. अचलपूर, परतवाडा आणि सरमसपुरा (पान २ वर)

# अकरावी नंतर पुढे शिक्षण न घेतल्याची करिना कपूरला खंत



आघाडीच्या अभिनेत्रींपैकी एक असलेल्या करिना कपूरने आपल्या शिक्षणाबाबत एक खंत व्यक्त केली आहे. अभिनेत्री म्हणून स्वतःला सिद्ध करण्याच्या ध्येयाने तिने ११ वीनंतर शिक्षण पुढे सुरू ठेवले नाही. मात्र, आज मागे वळून पाहताना शिक्षण पूर्ण न केल्याची खंत मनात असल्याचे करिनाने सांगितले. पॉडकास्टर हनुमान दास यांच्याशी झालेल्या अलीकडील संवादात करिनाने तिच्या शिक्षण आणि अभिनयाच्या सुरुवातीच्या काळाबद्दल सांगितले.

'मी माझे शिक्षण कधीच पूर्ण केले नाही आणि ही गोष्ट कुठेतरी माझ्या मनात राहून गेली,'असेही तिने यावेळी म्हटले.

अभिनय क्षेत्रात येण्याची तीव्र इच्छा असल्यामुळे तिने शिक्षणाऐवजी चित्रपटांना प्राधान्य दिले. 'मला अभिनेत्री म्हणून स्वतःला सिद्ध करायचे होते. मला तेच करायचे होते आणि माझ्या मनाचे ऐकायचे होते,' असे करिनाने सांगितले. शिक्षण अपूर्ण राहिल्याची खंत असल्याने करिना आपल्या मुलांच्या शिक्षणाबाबत अधिक आग्रही असल्याचेही सांगते.

युनिसेफने हिंदुस्थानातील मुलींच्या शिक्षणाला पाठिंबा देण्याबाबत तिच्याशी संपर्क साधला.

त्यावेळी स्वतःचे शिक्षण पूर्ण न केल्याची खंत असल्याने हा विषय तिच्यासाठी विशेष महत्त्वाचा असल्याचे तिने सांगितले.

करिनाने मुंबईतील जमनाबाई नर्सी स्कूल आणि त्यानंतर डेहराडूनमधील वेलहॅम गर्ल्स स्कूलमध्ये शिक्षण घेतले. त्यानंतर तिने मुंबईतील मिठीबाई कॉलेजमध्ये काही काळ वाणिज्य शाखेचे शिक्षण घेतले. मात्र, तिने पदवीचे शिक्षण पूर्ण केले नाही. याशिवाय करिनाने हार्वर्ड समर स्कूलमध्ये मायक्रो-कॉम्प्युटर्सशी संबंधित तीन महिन्यांचा समर कोर्स पूर्ण केला होता. अभिनय क्षेत्रात येण्यापूर्वी तिला वकील होण्याचीही इच्छा होती.

# बोल्ड कंटेंटमुळे देशात प्रदर्शित होऊ न शकलेला बॉलीवूड चित्रपट

भारतीय चित्रपटसृष्टीत अनेकदा कथांपेक्षा चित्रपटातील 'बोल्ड कंटेंट'चीच अधिक चर्चा होते. सामा जिक-राजकीय मुद्दे, लैंगिकता, नातेसंबंध आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांसारख्या संवेदनशील विषयांवर बोट ठेवणाऱ्या चित्रपटांवर नेहमीच सेन्सॉर बोर्डाकडून कात्री फिरवली जाते. असाच एक वादग्रस्त चित्रपट म्हणजे 'अनप्रफीडम' (ळहषीा्दस) होय. २०१५ सालच्या या चित्रपटाला भारतात प्रदर्शित होऊ दिलं नव्हतं.

'अनप्रीडम'ची कथा नेमकी काय?


'अनप्रीडम' चित्रपटात दहशतवाद, धार्मिक कट्टरता, समलैंगिक संबंध आणि वैयक्तिक स्वातंत्र्य यांसारखे मुद्दे दाखवण्यात आले आहेत. चित्रपटाची कथा वेगवेगळ्या पात्रांचे आयुष्य आणि त्यांच्या संघर्षाभोवती फिरते.

राज अमित कुमार दिग्दर्शित 'अनप्रफीडम'मध्ये व्हिक्टर बॅनर्जी, आदिल हुसैन, प्रीती गुप्ता आणि भावना पाणी हे कलाकार होते. चित्रपटात एका बाजूला दहशतवाद आणि धार्मिक कट्टरता दाखवण्यात आली आहे, तर दुर्स?या बाजूला प्रेम, नातेसंबंध आणि स्वतःच्या ओळखीसाठी संघर्ष करर्णा?या लोकांचे आयुष्य दाखवले आहे. या चित्रपटाच्या माध्यमातून स्वतःच्या आवडीनुसार जगण्याच्या स्वातंत्र्याचा मुद्दाही उपस्थित करण्यात आला.चित्रपट भारतात प्रदर्शित करण्यासाठी सेन्सॉर बोर्डाकडे पाठवण्यात आला होता. मात्र, सेन्सॉर बोर्डाने चित्रपटातील अनेक भागांवर आक्षेप घेतला आणि अनेक बदल सुचवले. मात्र चित्रपटाच्या निर्मात्यांनी हे बदल करण्यास नकार दिला. त्यांच्या मते, हे बदल केल्यानंतर चित्रपटाची मूळ कथा आणि त्याचा अपेक्षित प्रभाव पडणार नाही. यानंतर चित्रपटाच्या टीमने सेन्सॉर बोर्डाच्या निर्णयाविरोधात अपीलही केले, पण तरीही चित्रपटाला भारतातील चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित करण्याची परवानगी मिळू शकली नाही.'अनप्रफीडम'मध्ये समलैंगिक संबंध आणि लैंगिकता उघडपणे दाखवली गेली होती. चित्रपटात काही इंटिमेंट सीन होते. तसेच दहशतवाद आणि धार्मिक कट्टरतेसारख्या संवेदनशील मुद्द्यांवरही सेन्सॉर बोर्डाने आक्षेप घेतला होता. यामुळेच भारतात हा चित्रपट प्रदर्शित होऊ शकला नाही.अखेर 'अनप्रफीडम' परदेशात प्रदर्शित करण्यात आला. आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये त्याचे स्क्रिनिंग झाले आणि संवेदनशील विषयांवरील सादरीकरणामुळे चित्रपटाचं प्रचंड कौतुक झालं होतं. अनप्रफीडम हा चित्रपट नेटफ्लिक्सवर उपलब्ध आहे, पण मात्र प्रादेशिक निर्बंधांमुळे तो ठराविक देशांमध्येच पाहता येतो.

# भारतात धुमाकूळ घातल्यानंतर 'हनुमान अंश' आता

भारतीय चित्रपटगृहां मध्ये चांगला प्रतिसाद मिळवल्यानंतर 'हनुमान अंश' हा हिंदी भक्तिपर चित्रपट आता जगभरातील प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. नीम करोली बाबांच्या जीवनावर आधारित या चित्रपटाच्या आंतरराष्ट्रीय वितरणाची जबाबदारी होम्बले फिल्म्सने स्वीकारली असून, ११ सप्टेंबर २०२६ रोजी चित्रपटाचा ग्लोबल रिलीज होणार आहे. नीम करोली बाबा हे भगवान हनुमानांचे भक्त आणि महान आध्यात्मिक संत म्हणून ओळखले जातात. भक्त त्यांना 'महाराज-जी' या नावानेही संबोधतात. प्रेम, सेवा, भक्ती आणि मानवतेचा संदेश देर्णा?या त्यांच्या शिकवणीचा प्रभाव भारतासोबतच परदेशातील अनेक साधकांवरही पडला.

'हनुमान अंश' या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन विशाल चतुर्वेदी यांनी केले आहे. चित्रपटाची कथा नीम करोली बाबांच्या जीवनावर आधारित असून, त्यांच्या आध्यात्मिक प्रवासासोबतच त्यांच्या शिकवणीचा आणि भक्तांवरील प्रभावाचा वेध घेण्यात आला आहे.चित्रपटाला भारतात प्रेक्षकांचा चांगला प्रतिसाद मिळत असल्याचे सांगितले जात आहे. उपलब्ध बॉक्स ऑफिस आकडेवारीनुसार, सुरुवातीला १० लाख रुपयांची कमाई करणाऱ्या या चित्रपटाने प्रदर्शनाच्या २६व्या दिवसापर्यंत ६३.८२ कोटी रुपयांचा टप्पा गाठला आहे. सकारात्मक वर्ड ऑफ माउथमुळे चित्रपटाच्या कमाईला वेग मिळाल्याचे वृत्त आहे.




नीम करोली बाबांचा प्रभाव अनेक प्रसिद्ध व्यक्तींवरही पडला. अ?पलचे सहसंस्थापक स्टीव्ह जॉब्स यांनी १९७४ मध्ये भारतात येऊन त्यांचा आध्यात्मिक शोध घेतल्याचे सांगितले जाते. त्यानंतर मार्क झुकरबर्ग यांनीही स्टीव्ह जॉब्स यांच्या सल्ल्यानुसार कैंची धामला भेट दिल्याचे त्यांनी यापूर्वी सांगितले आहे. अभिनेत्री ज्युलिया रॉबर्ट्स यांनीही आपल्या आध्यात्मिक प्रवासात नीम करोली बाबांच्या प्रभावाचा उल्लेख केला आहे.

भारतामध्येही नीम करोली बाबांच्या भक्तांची मोठी संख्या आहे. क्रिकेटपटू विराट कोहली आणि अभिनेत्री अनुष्का शर्मा यांनी कैंची धामला भेट दिल्याचेही समोर आले आहे.

होम्बले फिल्म्सच्या माध्यमातून 'हनुमान अंश' आता भारताबाहेरील प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे. त्यामुळे कैंची धाम आणि नीम करोली बाबांच्या जीवनाशी संबंधित ही कथा आता जागतिक स्तरावर पोहोचण्याची शक्यता आहे. ११ सप्टेंबरपासून हा चित्रपट आंतरराष्ट्रीय प्रेक्षकांना पाहता येणार आहे.

# तुम्ही कधी मुघलांच्या भ्याडपणाबद्दल ....

स्वरा भास्कर सध्या पूर्वी महिला करत असलेल्या जौहर या प्रथेबाबत केलेल्या विधानामुळे खूप चर्चेत आहे. ती चांगलीच अडचणीत सापडली आहे. महिलांच्या 'जौहर' प्रथेबाबत केलेल्या विधानांमुळे चर्चेत आहे. तिच्या या विधानांमुळे देशभरात संताप व्यक्त केला जात असून, तिला कायदेशीर नोटीस देखील बजावण्यात आली आहे. तसेच काही संघटनांनी तिला जीवे मारण्याची धमकी सुद्धा दिली आहे. विविध मुद्द्यांवर आपली स्पष्ट मते मांडण्यासाठी ओळखली जाणारी अभिनेत्री आणि भाजपा खासदार कंगना रणौतसुद्धा आता या मुद्द्यावर व्यक्त झाली आहे. तिने स्वराच्या विधानाला प्रत्युत्तर म्हणून एक'रॅप' गाणे शेअर केले आहे.स्वरा भास्करने अलीकडेच संजय लीला भन्साळी यांच्या 'पद्मावत' चित्रपटातील 'जौहर'च्या सीनवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले, ज्यामुळे या वादाने जोर धरला आहे. युद्धाच्या काळात आपला सन्मान जपण्यासाठी महिलांकडून केल्या जार्णा?या 'जौहर' या ऐतिहासिक प्रथेची तिने 'भित्रेपणा'शी तुलना केली, ज्यावर लोकांकडून तीव्र प्रतिक्रिया उमटल्या. कंगना रणौतने एका रॅपच्या माध्यमातून स्वराला प्रत्युत्तर दिले आहे.



### कंगना रणौतची पोस्ट

संजय लीला भन्साळींच्या 'पद्मावत' चित्रपटाचे एआय व्हर्जन कंगना रणौतने तिच्या इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केले आहे. या व्हिडिओच्या पार्श्वभूमीवर एक रॅप गाणे वाजत आहे आणि त्यातील शब्दरचना ही स्वरा भास्करला दिलेले प्रत्युत्तर असल्याचे स्पष्ट होत आहे.

# ३ इडियट्स'चे त्रिकुट परतणार

आमिर खान, आर. माधवन आणि शर्मन जोशी यांची मुख्य भूमिका असलेला २००९ मधील सुपरहिट चित्रपट '३ इडियट्स'च्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी समोर आली आहे. दिग्दर्शक राजकुमार हिरानी यांनी या चित्रपटाच्या सिक्वेलवर (पुढील भागावर) काम सुरू असल्याची माहिती दिली आहे. हिरानी यांच्या मते, लेखक अभिजात जोशी यांच्यासोबत काम करत असतानाच या सिक्वेलची कल्पना आकारास आली. मूळ चित्रपटाचा भावनिक आणि मनोरंजक वारसा जपण्याच्या उद्देशाने, नवीन कथा ही रँचो, फरहान आणि राजू यांच्या आयुष्यावर आधारित असेल.

राजकुमार हिरानी यांनी स्पष्ट केले की, हा प्रकल्प सध्या प्राथमिक टप्प्यावर आहे आणि कथेवर अजूनही काम सुरू आहे. 'आम्ही त्यावर काम करत आहोत,' असे त्यांनी सांगितले. दिग्दर्शकाने यावर भर दिला की कोणतीही घाई केली जाणार नाही; जर कथा मूळ '३ इडियट्स'च्या दर्जाशी बरोबरी करणारी असेल, तरच हा चित्रपट पुढे नेला जाईल.

हिरानी आणि अभिजात जोशी या प्रकल्पासोबतच आणखी एका कथेवरही काम करत आहेत. त्यामुळे, सिक्वेलबाबतच्या पुढील अधिकृत



तपशीलांसाठी प्रेक्षकांना वाट पाहावी लागेल.

दरम्यान, मुख्य अभिनेते आर. माधवन आणि शर्मन जोशी यांनीही त्यांचे लोकप्रिय पात्र 'फरहान' आणि 'राजू' यांच्या पुनरागमनाचे संकेत दिले आहेत. मूळ चित्रपटाने शिक्षण पद्धती, मैत्री आणि स्वप्नांचा पाठपुरावा यांसारख्या विषयांना प्रभावीपणे हाताळले होते आणि बॉक्स ऑफिसवर प्रचंड यश मिळवले होते.जर आमिर खान, आर. माधवन आणि शर्मन जोशी ही लोकप्रिय त्रिकुटी पुन्हा एकत्र आली, तर '३ इडियट्स'च्या सिक्वेलबद्दल प्रेक्षकांचा उत्साह नक्कीच शिगेला पोहोचेल.

# मला खरंच भांडता येत नाही, म्हणून बिग बॉसमध्ये ......

आ:'बिग बॉस मराठी ५' या लोकप्रिय रिॲलिटी शोमधून घराघरांत पोहोचलेली आणि मराठी टीव्ही विश्वातील अभिनेत्री जान्हवी किल्लेकर सध्या तिच्या मुलाखतीमुळं चर्चेत आहे. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत जान्हवीनं बिग बॉसच्या प्रवासाबाबत आणि शोमध्ये सहभागी होण्याआधीच्या तिच्या मनातील भीतीबद्दल सांगितलं आहे. मला भांडण करायला येत नाही, म्हणूनच मला बिग बॉसच्या घरात जायचं नव्हतं,असा खुलासा जान्हवीने केला आहे.

खरं तर बिग बॉस मराठीच्या पाचव्या सीझनमध्ये सगळ्यात जास्त चर्चेत राहिलेलं नाव म्हणजे जान्हवी किल्लेकर . पहिल्या दिवसापासूनच ती चर्चेत राहिली. इतर स्पर्धकांसोबतची तिची भांडणं, तिने केलेला आरडाओरडा, ज्येष्ठ कलाकरांचा तिनं केलेला अपमान ..यामुळे हा सीझन गाजला.पण आता तिनं आपल्याला भांडताच येत नसल्याचं म्हटल्यानं , नेटकऱ्यांनी तिला पुन्हा ट्रोल केलंय.

मुलाखतीदरम्यान जान्हवी म्हणाली, 'मला सुरुवातीला बिग बॉसच्या घरात जाण्याची मुळीच इच्छा नव्हती. कारण मला असं वाटायचं की मला भांडण करायला येतच नाही. मी वैयक्तिक आयुष्यात खूप भावूक आणि रडकी आहे. छोट्या-छोट्या गोष्टींवरून माझ्या डोळ्यात पाणी येतं. अशा वेळी बिग बॉससारख्या शोमध्ये जिथे रोज वाद आणि भांडणे होतात, तिथं मी कशी टिकेन? ही भीती माझ्या मनात होती. अभिनेत्री सोनाली खरे हिच्या 'थजथ थळींह डेपरश्रळ' या टॉक शोमध्ये हजेरी लावली असताना जान्हवीनं बिग बॉसच्या ऑफरबद्दल आणि तिच्या अनुभवाबद्दल गप्पा मारल्या.

मला तीन महिन्यांपूर्वीच ऑफर आलेली. तेव्हाही मी त्यांना म्हटलं की, मी या गेमसाठी सूटच होणार नाही. पण तीन महिन्यात मी ठरवलं की, हेच डेलीसोप करायचं आहे की, संधी आलेली ती स्वीकारायची. त्यावेळी माझी मालिका सुरू होती, त्यांनाही वाटाचं की, हिला का ऑफर दिलेय, ही तर भांडूच शकणार नाही. पण मला भांडण करायला येत नाही, म्हणूनच मला बिग बॉसच्या घरात जायचं नव्हतं, पण त्यानंतर मी ठरवलं की आपण बिग बॉसध्ये जायचं.

# 'मला लक्ष करायचे नाही' ....



शिव ठाकरे हा विविध रिॲलिटी शोसाठी ओळखला जातो. रोडीज, बिग बॉस मराठी २, बिग बॉस १६, द ५० अशा विविध रिॲलिटी शोसाठी तो ओळखला जातो. 'बिग बॉस मराठी २'चा तो विजेता ठरला होता. 'बिग बॉस १६'चा उपविजेता ठरला. तर, 'द ५०'चा तो विजेता ठरला. या शोंमधून त्याने कायमच प्रेक्षकांच्या मनावर राज्य केले. त्याचा खेळ, इतर स्पर्धकांबरोबरचे वागणे यांतून त्याने प्रेक्षकांची मने जिंकली आहेत.

शिव ठाकरे सोशल मीडियावरही मोठ्या प्रमाणात सक्रिय असतो. तो काही वेळा त्याच्या दैनंदिन आयुष्यातील खास गोष्टी व्हिडीओच्या माध्यमातून चाहत्यांबरोबर शेअर करतो. त्याचे त्याच्या कुटुंबावर अतिशय प्रेम आहे. आजीबरोबरचे अनेक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल होताना दिसतात. चाहते त्याच्या व्हिडीओवर भरभरून कमेंट्स करतात. त्याबरोबरच, शिव म्युझिक व्हिडीओंमधूनही प्रेक्षकांच्या भेटीला येतो. आता शिव त्याच्या कोणत्याही कामामुळे नाही, तर त्याच्या एका वक्तव्यामुळे चर्चेत आला आहे. शिव ठाकरेने नुकतीच 'लोकमत फिल्मी'ला मुलाखत दिली. त्या मुलाखतीत त्याने त्याच्या लग्नाबद्दल वक्तव्य केले.

शिव ठाकरेला विचारले की, मागे वळून पाहताना कोणती गोष्ट करायची राहिली किंवा करायचीच आहे? यावर शिव ठाकरे म्हणाला, 'मी काही करायचं सोडलंच नाही. मी पूर्ण कॉलेज लाईफ जगलोय. मी माझ्या कुटुंबाला वेळ देतोय. मी माझ्या मित्रांबरोबर अजूनही वेळ घालवतोय. काम करतोय. कुठे प्रवास करायचा असेल, तर तोही करतोय. अशी कुठली गोष्टनाही की राहिली आहे. आता मी जिथे आहे, त्यासाठी मी खूप कृतज्ञ आहे. मला माहीत आहे की, खूप मेहनत करायची आहे. आपण त्या ठिकाणी पोहोचलोय, त्या ठिकाणी पोहोचण्यासाठी लाखो लोक मेहनत करतात. मी प्रयत्न करतो की, माझ्या माध्यमातून एका तरी व्यक्तीला पुढे जाण्याची संधी मिळावी. मला नेहमी वाटतं की, पहिली पायरी मिळाली की, इतर लोकांना हात द्या. जेव्हा तुम्ही पाचव्या-दहाव्या पायरीला जाऊन थकाल तेव्हा तो हात मदतीसाठी येईल. त्याला कर्म म्हणतात. माझी आई वगैरे जास्त आध्यात्मिक आहे; तर माझा त्यावर विश्वास आहे. माझा आतापर्यंतचा जो प्रवास आहे, त्याबद्दल मी कृतज्ञ आहे.'पुढे शिव हसत म्हणाला, 'आता लग्नाशिवाय करायचं काही राहिलंच नाही; पण मला लग्न करायचं नाही. सध्या ज्या पद्धतीच्या घटना समाजात घडत आहेत, त्यामुळे भीतीचं वातावरण आहे. आधी लग्नाची व्याख्या हीच होती की, एकत्र म्हातारे व्हायचे; पण आता तसे घडताना दिसत नाही. त्यामुळे मला आता लग्न करायचंच नाही, अशी माझी मानसिकता झाली आहे.'

# पदव्यांचा डोंगर

भारतात आज पदवीधरांची संख्या विक्रमी पातळीवर पोहोचली आहे. गल्लीबोळांत महाविद्यालयांचे पेव फुटले आहे आणि वर्षागणिक लाखांच्या घरात तरुण हातात पदवी, पदविका किंवा प्रमाणपत्राची सुरकुतलेली वही घेऊन बाहेर पडत आहेत.

विद्यापीठाच्या सुरक्षित वातावरणातून बाहेर पडताना त्यांच्या डोळ्यात उज्ज्वल भविष्याचे स्वप्न असते खरे पण या तथाकथित शिक्षणाचा देशाच्या श्रम बाजाराशी खरोखर काही संबंध उरला आहे का? असा प्रश्न जर विद्वानांनी स्वत:ला विचारला तर त्याचे उत्तर निश्चितच नकारात्मक असेल. नीती आयोगाचा अलीकडचा रीइमॅजिनिंग स्किलिंग फॉर विकसित भारत २०४७ हा अहवाल या प्रश्नाचे जे उत्तर देतो, ते अंगावर काटे आणणारे आहे.



देशातील ८ कोटी ७० लाख तरुण ना शिक्षण घेत आहेत, ना कोणता रोजगार करत आहेत आणि ना कोणते व्यावसायिक प्रशिक्षण घेत आहेत. तसेच ८.२५ टक्के पदवीधर अशा नोकऱ्यांमध्ये आहेत, ज्या त्यांच्या शैक्षणिक पात्रतेशी सुसंगत आहेत. उरलेले तरुण काय करत आहेत? एकतर ते त्यांच्या शिक्षणाशी काहीही संबंध नसलेली कामे करत आहेत किंवा बेरोजगारीच्या उंबरठ्यावर खितपत पडले आहेत. हा केवळ बेरोजगारीचा प्रश्न नाही; हा आपल्या शिक्षण व्यवस्थेच्या अपुरेपणाचा, दूरदृष्टीच्या अभावाचा, धोरणशून्यतेचा आणि एकूणच ढिसाळपणाचा जळजळीत पुरावा आहे.

सध्या देशात उच्च शिक्षणात ४.३४ कोटी विद्यार्थी नोंदणीकृत आहेत. एकट्या बी.ए.साठी १.१३ कोटी तरुण रांगेत आहेत, तर बी.ए., बी.कॉम. आणि बी.एस्सी. मिळून हा आकडा दोन कोटींच्या पार जातो. पण या पारंपरिक पदव्यांचे मूल्य काय? पदवी घेतली की सरकारी नोकरीची परीक्षा देता येते एवढाच एक मर्यादित दृष्टिकोन आज या पदव्यांमागे उरला आहे.

नोव्हेंबर २०२४ ते जुलै २०२५ या अवघ्या आठ–नऊ महिन्यांच्या काळात केवळ ५५ हजार सरकारी जागांसाठी तब्बल १.८६ कोटी अर्ज आले, ही आकडेवारीच सांगते की तरुण किती हताश आहेत. बी.ए. अर्थशास्त्र झालेला तरुण कंपनीचे फायनान्स सांभाळू शकत नाही, बी.कॉम. झालेला मुलगा टॅली किंवा ॲडव्हान्स एक्सेल चालवू शकत नाही आणि राज्यशास्त्राचा पदवीधर साधे धोरणात्मक विश्लेषण करू शकत नाही, अशी ओरड आहे व उदाहरणेही दिली जातात.मग या कागदी पदव्यांचा खरेच उपयोग आहे का? त्यांना वर्षानुवर्षे (एर्वीलरींळेप) जे शिकवले जाते आहे ते भविष्यात त्यांच्या कितपत उपयोगी पडणार आहे किंवा मुळातच त्याचा उपयोग तरी होणार आहे का, याचा कुठेही विचार होताना दिसत नाही.

मध्यंतरी एक चमत्कारिक माहितीही कानावर आली. त्यानुसार मुलांचे ज्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेतले जातात आणि तो अभ्यासक्रम पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थी बाहेर पडतात तो अभ्यासक्रमच मुलांना नोकरीसाठी तयार करत नाही; आणि उद्योजक बनण्यासाठी तर अजिबातच नाही अशी स्पष्टोक्तीच ऑफ द रेकॉर्ड देण्यात आली.

याचा अर्थ तुम्ही प्रवेश घ्या, फी भरा आणि पदवीचे बेंडोळे तेवढे शिक्षण संस्थांकडून घ्या, त्याचा नोकरीच्या अथवा उद्योगाच्या बाजारात काही उपयोग होईल याची कोणतीही हमी व जबाबदारी या संस्थांची नाही आणि अभ्यासक्रम तयार करणाऱ्यांची तर नाहीच नाही. नोकरी–उद्योगाचे ज्याने त्याने आपापल्या पात्रतेवर आणि वकुबावार पाहावे.

नीती आयोगाच्या अहवालानुसार ८० टक्के विद्यार्थ्यांनी मान्य केले आहे की, त्यांच्या अभ्यासक्रमात प्रत्यक्ष कामाचा अनुभव आणि उद्योगांशी संपर्क नावालाही नव्हता. ३४ टक्के तरुणांना कौशल्यांची कमतरता जाणवते, तर १८ टक्क्यांना साधी मुलाखत कशी द्यावी हेही माहीत नसते. कॉलेजच्या चार भिंतींत पुस्तकांचा रट्टा मारून मिळालेली पदवी म्हणजे रोजगाराची गॅरंटी ही कल्पनाच आता पूर्णपणे लयाला गेली आहे.

उद्योगजगताची गरज वेगळी आहे आणि आपल्या विद्यापीठांचे जुनाट अभ्यासक्रम वेगळ्याच जगात वावरत आहेत. आजच्या डिजिटल आणि तंत्रज्ञानाच्या युगातही आपण २०–२५ वर्षे जुनाट विषय विद्यार्थ्यांना शिकवत आहोत. प्राध्यापकांना स्वतःला उद्योगांचा कोणताही अनुभव नसतो, तर महाविद्यालयांकडे आधुनिक प्रयोगशाळा किंवा पायाभूत सुविधा नाहीत.

संशोधनाच्या नावाने आनंदी आनंदच आहे. केवळ आणखी महाविद्यालये काढणे किंवा पदव्या वाटणे हा यावरचा उपाय नक्कीच नाही. नीती आयोगाने जो रोडमॅप मांडला आहे, त्याची तातडीने आणि कठोर अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे. उच्च शिक्षणाला थेट उद्योगांशी जोडावे लागेल. उद्योगांच्या गरजेनुसार अभ्यासक्रम दरवर्षी अपडेट झाले पाहिजेत.महाविद्यालयांमध्ये केवळ पुस्तकीज्ञान न देता प्रत्यक्ष उद्योगांच्या सहकार्याने प्रयोगशाळा आणि लाइव्ह प्रोजेक्ट्स सुरू केले पाहिजेत.

प्रत्येक पदवी अभ्यासक्रमात किमान ६ महिने ते १ वर्षाची प्रत्यक्ष कामाची सक्ती केली पाहिजे. केवळ कागदी प्रमाणपत्र चालणार नाही; विद्यार्थ्याला प्रत्यक्ष काम करता आले पाहिजे. शिक्षण संस्थांना आधुनिक रूप देऊन तरुण पिढीला विशिष्ट कौशल्यांमध्ये पारंगत केले पाहिजे.

# चीनच्या ह्युमनॉइड रोबोट क्रांतीचे वास्तव

मोठ्या संख्येने रोबोट तयार करण्यामागे चीनचा केवळ उत्पादन विक्रीचा हेतू नसू शकतो. अधिक रोबोट म्हणजे अधिक प्रयोग; अधिक प्रयोग म्हणजे अधिक डेटा; अधिक डेटा म्हणजे अधिक सक्षम कृत्रिम बुद्धिमत्ता.

माणसासारखा दिसणारा, दोन पायांवर चालणारा, हातांनी वस्तू उचलणारा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने निर्णय घेणारा रोबोट पाहिला की भविष्यातील जग आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. कारखान्यात काम करणारे रोबोट, घरातील कामे करणारे रोबोट, वृद्धांना मदत करणारे यंत्रमानव आणि माणसाच्या नोकऱ्या हिरावून घेणारी यंत्रे – या सगळ्या कल्पना आता विज्ञानकथेपुरत्या राहिलेल्या नाहीत. विशेषतः चीनने ह्युमनॉइड रोबोटच्या क्षेत्रात घेतलेली झेप जगाचे लक्ष वेधून घेत आहे. मात्र, माणसासारखा दिसणारा रोबोट माणसासारखा विचारही करू शकतो का? उत्तर सध्या तरी नाही असे स्पष्ट आहे.

चीनमध्ये ह्युमनॉइड रोबोटस क्षेत्रात १५०हून अधिक कंपन्या कार्यरत आहेत. २०२५ मध्ये जगभरात सुमारे २० हजार ह्युमनॉइड रोबोट पाठवले गेले. त्यापैकी तब्बल ९५ टक्के चीनमध्ये तयार झाले. २०२६ मध्ये चीन एक लाखांहून अधिक ह्युमनॉइड रोबोट तयार करण्याच्या दिशेने वाटचाल करीत आहे. आकडे मोठे आहेत; पण प्रत्यक्ष वापर आणि व्यावसायिक व्यवहार्यता याबाबतचे चित्र मात्र तेवढे आश्वासक नाही. यातून चीनच्या महत्त्वाकांक्षेचे कौतुक करायचे की या तंत्रज्ञानामागील आर्थिक फुगवट्याबद्दल सावध व्हायचे, हा प्रश्न उभा राहतो.

ह्युमनॉइड रोबोटचे प्रात्यक्षिक पाहताना सर्वप्रथम लक्ष वेधले जाते ते त्याच्या हालचालींकडे. रोबोट नाचतो, धावतो, बॉक्सिंग करतो, कुंग फूच्या हालचाली करतो किंवा अवघड कसरती करतो. सोशल मीडियावर अशा व्हिडिओंना मोठी लोकप्रियता मिळते. मात्र उद्योगासाठी या कौशल्यांचे महत्त्व मर्यादित आहे. कारखान्याच्या व्यवस्थापकाला रोबोट नाचतो की नाही यापेक्षा तो दिवसभर एकच काम सातत्याने, अचूकतेने आणि कमी खर्चात करू शकतो का, हा प्रश्न महत्त्वाचा असतो. याच ठिकाणी ह्युमनॉइड रोबोटची खरी परीक्षा सुरू होते.

> **माणसासारखा दिसणारा, दोन पायांवर चालणारा, हातांनी वस्तू उचलणारा आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने निर्णय घेणारा रोबोट पाहिला की भविष्यातील जग आपल्या डोळ्यांसमोर उभे राहते. कारखान्यात काम करणारे रोबोट, घरातील कामे करणारे रोबोट, वृद्धांना मदत करणारे यंत्रमानव आणि माणसाच्या नोकऱ्या हिरावून घेणारी यंत्रे – या सगळ्या कल्पना आता विज्ञानकथेपुरत्या राहिलेल्या नाहीत.**

चीनमधील प्रशिक्षण केंद्रात शंभरहून अधिक रोबोट्सना खोकी वर्गीकृत करणे, नूडल्सचे पॅकेजिंग करणे किंवा कॉफी बनविणे यांसारखी साधी कामे शिकवावी लागत आहेत. माणसासाठी सहज असलेली कृती मशीनसाठी किती गुंतागुंतीची आहे, हे यातून दिसते.

टेबलवरचा ग्लास उचलताना किती दाब द्यायचा? तो ग्लास अपेक्षेपेक्षा जड असेल तर पकड कशी बदलायची? समोरचा माणूस अचानक बाजूला झाला तर शरीराचा तोल कसा सांभाळायचा? जमिनीवर एखादी वस्तू पडली तर तिच्यावर पाय न ठेवता मार्ग कसा बदलायचा? माणूस ही कामे विचार करून नव्हे, तर अनुभवातून जवळपास सहज करतो. रोबोटला मात्र प्रत्येक



हालचालीमागे डेटा, सेन्सर आणि संगणकीय प्रक्रिया लागते. यंत्राला चालता येणे सोपे होत आहे; पण परिस्थिती समजून घेणे अजूनही कठीण आहे. ह्युमनॉइड रोबोटसमोरील सर्वांत मोठ्या तांत्रिक अडचणींपैकी एक म्हणजे हातांची अचूकताङ्ग'डेक्स्टेरिटी'. मोठी हालचाल करणे सोपे आहे. रोबोटिक्समधील खरी लढाई शेवटच्या दहा सेंटीमीटरची, शेवटच्या एका सेंटीमीटरची आणि अखेरीस शेवटच्या एका मिलिमीटरची आहे. माणसाची हुबेहुब नक्कल करणे आणि माणसाच्या क्षमतेची पुनरावृत्ती करणे या दोन पूर्णपणे वेगळ्या गोष्टी आहेत.

**भावेश ब्राम्हणकर**

गेल्या महिन्यात चीनच्या तियांगोंग अल्ट्रा या ह्युमनॉइड रोबोटने १०० मीटर अंतर ८.६४ सेकंदांत पूर्ण केले. हा वेग उसैन बोल्टच्या ९.५८ सेकंदांच्या विक्रमापेक्षा अधिक आहे. तसे पाहता हा मानवापेक्षा मशीन श्रेष्ठ असल्याचा पुरावा वाटू शकतो. पण धावताना रोबोट अडथळ्यावर धडकला. म्हणजे तो वेगाने धावू शकला; पण योग्य वेळी थांबू किंवा दिशा बदलू शकला नाही. माणसापेक्षा वेगवान असणे म्हणजे माणसापेक्षा बुद्धिमान असणे नव्हे. योग्य वेळी थांबता येणे हीदेखील बुद्धिमत्ताच आहे. एका अहवालानुसार २०२६च्या पहिल्या सहामाहीत चीनमधील केंद्र आणि स्थानिक सरकारांनी ह्युमनॉइड रोबोट व संबंधित उपकरणांच्या खरेदीसाठी किमान २३० दशलक्ष डॉलर खर्च केले. वर्षभरापूर्वी हा खर्च सुमारे ६२ दशलक्ष डॉलर होता. ग्राहक, गुंतवणूकदार आणि धोरणकर्ते या तिन्ही भूमिका सरकार बजावत असेल, तर बाजारातील खरी मागणी किती आहे हे मोजणे कठीण होते.

माणसासाठी तयार केलेल्या वातावरणात माणसासारखा रोबोट वापरणे हा त्याचा एक मोठा फायदा मानला जातो. पण जर एखाद्या कारखान्यात विशिष्ट कामासाठी आधी पासूनच स्वस्त आणि अधिक कार्यक्षम औद्योगिक रोबोट उपलब्ध असेल, तर त्याच कामासाठी दोन पायांचा, दोन हातांचा आणि अधिक गुंतागुंतीच्या कृत्रिम बुद्धिमत्तेचा ह्युमनॉइड का तयार करायचा? याच कारणामुळे ह्युमनॉइड रोबोटची खरी बाजारपेठ विशिष्ट क्षेत्रांत असू शकतेङ्गधोकादायक कामे, गोदामे, आपत्ती व्यवस्थापन, वृद्धांची मदत, घरगुती सेवा किंवा अशा ठिकाणी जिथे वातावरण वारंवार बदलते. म्हणजेच भविष्यात प्रत्येक कामा साठी ह्युमना ॅइड रोबोट आवश्यक असेलच असे नाही.

ह्युमनॉइड रोबोट अजून मोठ्या प्रमाणावर मानवी रोजगाराची जागा घेण्याच्या स्थितीत नाहीत. काही प्रशिक्षण केंद्रांमध्ये त्यांची कार्यक्षमता मानवी कामगिरीच्या तुलनेत अत्यंत कमी असल्याचे दिसते. मात्र यावरून भविष्यातील धोका नाकारता येणार नाही. संगणकाच्या सुरुवातीच्या काळात त्याची क्षमता मर्यादित होती. मोबाईल फोन कधीकाळी अवजड आणि महाग होते. इंटरनेट अत्यंत संथ होते. तंत्रज्ञानाने वेळ घेतला, पण समाज बदलला. त्यामुळे 'आज रोबोट अपयशी आहेत' याचा अर्थ 'ते उद्याही अपयशीच राहतील' असा नाही.

जर रोबोट स्वस्त झाले, त्यांच्या हालचाली अधिक अचूक झाल्या, त्यांना मोठ्या प्रमाणावर वास्तविक जगातील प्रशिक्षण डेटा मिळाला आणि कृत्रिम बुद्धिमत्ता अधिक सक्षम झाली, तर रोजगाराच्या बाजारपेठेवर परिणाम होणे अपरिहार्य ठरू शकते. म्हणून प्रश्न रोबोट नोकरी घेईल का, हा नसून रोबोटच्या आगमनानंतर माणसाकडे कोणती कौशल्ये उरतील आणि कोणती नवी कौशल्ये निर्माण होतील, हा आहे.

आजचा रोबोट जर अपयशी ठरला तरी त्यातून मिळालेला डेटा उद्याच्या रोबोटला अधिक हुशार करू शकतो. हीच या शर्यतीची खरी ताकद आहे. भारताकडे मोठे तरुण मनुष्यबळ आहे आणि त्यामुळे रोजगारनिर्मितीची गरज चीनपेक्षा वेगळी आहे. त्यामुळे ह्युमनॉइड रोबोट्सना अंधानुकरणाने स्वीकारणे किंवा रोजगाराच्या भीतीने त्यांना नाकारणे, दोन्ही टोकाची भूमिका ठरेल. भारताने रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता, सेन्सर तंत्रज्ञान, ॲक्च्युएटर्स, बॅटरी, चिप्स आणि उत्पादनक्षमता यांची एकात्मिक परिसंस्था निर्माण करण्यावर भर दिला पाहिजे. संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन, खाणकाम, अंतराळ संशोधन, धोकादायक औद्योगिक कामे आणि आरोग्यसेवा या क्षेत्रांत भारतासाठी ह्युमनॉइड तंत्रज्ञानाची विशेष उपयुक्तता निर्माण होऊ शकते.

# प्लास्टिक मॅन



प्लास्टिक म्हणजे कचरा, असेच आपल्याला नेहमी सांगितले जाते. पण याच प्लास्टिकपासून चक्क मजबूत रस्ते तयार होऊ शकतात, हे एका भारतीय शास्त्रज्ञाने जगाला दाखवून दिले!

सन २००१ची गोष्ट आहे. मदुराईच्या इंजिनिअरिंग कॉलेजमध्ये डॉ. राजगोपालन वासुदेवन आपल्या खोलीत विचारमग्न बसले होते. सरकारने प्लास्टिक बंदीची घोषणा केली होती. ५० ते ७० मायक्रॉनपेक्षा कमी जाडी असलेले प्लास्टिक आता सामान्यांना वापरता येणार नव्हते. राजगोपालन हे घन कचरा व्यवस्थापनातले मोठे नाव! रसायन शास्त्रज्ञ! आणि पेशाने प्राध्यापक. घनकचरा व्यवस्थापन कसे करावे यासाठी त्यांनी भरपूर अभ्यास करून अनेक चांगले उपाय देशाला सुचवले. त्यांच्या मते प्लास्टिक वाईट नाही. खूप उपयोगी आहे. आपण त्याचा वापर नीट करत नाही! आपण ते पाण्यात फेक, रस्त्यावर फेक असे करतो. त्याचे विलगीकरण करून त्याची योग्य विल्हेवाट लावत नाही. ते आधी करायला हवे. कारण जर आपण प्लास्टिक वापरू शकलो नाही तर खूप नुकसान होईल. ते कसे? तर बघा, आधी दूध हे गावागावातून एकत्रित होऊन काचेच्या बाटल्यांमधून वितरित केले जायचे. त्यात मग कधी बाटल्या फुटायच्या, त्या वापरल्यावर पुन्हा दूध केंद्रांवर आणून देताना तर पुनर्वापर करते वेळी नीट निर्जंतुक झाल्या नाहीत तर दूध नासायचे. या प्रक्रियेमुळे दूध वेळेत पोहचायलादेखील अडचणी निर्माण व्हायच्या. यामुळे कित्येक दुर्गम भागात दूध मिळायचे नाही आणि लहान मुलांमध्ये कुपोषणाचे प्रमाण वाढले. प्लास्टिक पिशव्यांचा वापर सुरू झाल्याने दुधाचा प्रश्न मोठ्या प्रमाणात मिटला. हे एक दुधाचे उदाहरण झाले. अशाच कितीतरी गोष्टी आहेत ज्या प्लास्टिक वापरामुळे सोप्या झाल्या.

वाहनांचे भाग प्लास्टिकमध्ये तयार होऊ लागले आणि वाहने वजनाने हलकी झाली, दळणवळण सोयीचे झाले आणि लोकांचा रोजगाराचा प्रश्न सोडवायला मदत झाली. अनेक छोट्या छोट्या स्वस्त वस्तूत प्लास्टिक वापर बंद झाला तर तयार होणार नाहीत आणि सामान्यांना त्याचा त्रास होईल. म्हणूनच जे घटक प्लास्टिकचे आहेत आणि ज्यांचे विघटन नीट होत नाही, जसे बाजारात मिळणाऱ्या भाज्या, फळे नेण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या पिशव्या–'कॅरी बॅग्ज' यावर बंदी घालण्यात आली. वाहनात वापरले जाणारे प्लास्टिक आणि दूध पिशव्या यांची विल्हेवाट योग्य रीतीने केली जाते. डॉ. राजगोपालन यांचे म्हणणे असे आहे की, आधी प्लास्टिकची नीट विल्हेवाट कशी करता येईल हे बघायला हवे! पर्यावरणाला हानिकारक प्लास्टिकवर बंदी तर हवीच, परंतु गरजेच्या प्लास्टिकची नीट विल्हेवाट लावणे हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. त्यांनी मग यावर विचार करताना एक दिवस आपल्या प्रयोग शाळेत प्लास्टिक वितळवले आणि त्यांच्या अचानक लक्षात आले की, याची जोडून ठेवण्याची 'बंधन क्षमता' (बायनडिंग कॅपॅसिटी) खूपच छान आहे!

प्लास्टिकच्या तुकड्यांचा रस्ता तयार केला तर? आणि मग या प्लास्टिकमध्ये डांबर घालून सुरू झाले नवनवीन प्रयोग! प्लास्टिकचे बारीक तुकडे करण्यासाठी 'श्रेडिंग मशीन' सज्ज झाले. प्रयोगशाळेत सहकाऱ्यांसोबत काम करताना त्यांच्या लक्षात आले की, या प्रयोगामुळे डांबर पण खूप कमी प्रमाणात लागते आहे. डांबर हे रस्ता तयार करण्यासाठी लागणारा सर्वात महत्त्वाचा आणि महाग घटक! तेच कमी प्रमाणात लागणार म्हणजे हा प्लास्टिकचा रस्ता स्वस्तात तयार होऊ शकतो! राजगोपालन यांना आनंद झाला आणि त्यांनी अधिक जोमाने प्रयोग करायला सुरुवात केली. त्याचदरम्यान एकदा भारताचे माजी राष्ट्रपती आणि थोर शास्त्रज्ञ डॉ. ए.पी.जे. अब्दुल कलाम यांनी कॅम्पसला भेट दिली. त्यावेळी त्यांनी राजगोपालन यांचा शोध बघून त्यांना सल्ला दिला की, कॅम्पसमधलाच एक रस्ता तुम्ही या तंत्रज्ञानाने तयार करा. राजगोपालन यांना आनंद झाला. त्यांनी साठ फूट लांबीचा रस्ता त्यांच्या डिपार्टमेंटसमोर तयार केला. बस मग काय! देशालाच नाही तर जगाला एका फार मोठ्या संशोधनाने दिलासा मिळाला होता! प्लास्टिकच्या कचऱ्यावर एक अत्यंत उपयुक्त असे उत्तर मिळाले होते. जगभर या प्रयोगाची वाहवा झाली.

# आनंदाचे इंद्रधनुष्य

ए आई, काखेत कळसा आणि गावाला वळसा म्हणजे नेमकं काय गं?' वैष्णवीने अभ्यास करता करता आईला विचारलं.

'अगं ही एक म्हण आहे. कशासाठी हवाय या म्हणीचा अर्थ?'

'अगं उद्या परिपाठात या म्हणीवर आधारित गोष्ट सांगायला सांगितलीय सरांनी मला. आई, सांग ना मला, काखेत कळसा आणि गावाला वळसा म्हणजे नेमकं काय ते?'

'अगं, म्हणजे एखादी वस्तू आपल्या जवळ असताना त्या वस्तूचा शोध आपण सर्व ठिकाणी घेत राहणं.'

वैष्णवी पटकन म्हणाली, 'अरेच्चाः! असं आहे का ते. आठवलं, आपले बाबा एकदा चष्मा घरभर शोधत होते आणि तो चष्मा होता त्यांच्या डोक्यावरच.'

आई म्हणाली, 'एखाद्या बाईच्या कमरेवर काखेत कळशी असते, मात्र ती गावभर कळशी शोधत फिरते. अगदी तशीच स्थिती झाली की मग म्हणतात असं.'

'छान..! आता बघ मी मस्त गोष्ट लिहून काढते यावर.' असं बोलून वैष्णवी गोष्ट लिहायला बसली. दुसऱ्या दिवशी ती शाळेत वेळेत पोहोचली. तिने परिपाठाचे केलेले नियोजन आणि झालेले सादरीकरण पाहून वर्गशिक्षक भागवत सर खूप खूष झाले. सुंदर परिपाठाने अभ्यासाची सुरुवात झाली होती.

**एकनाथआव्हाड**

पहिला तास भागवत सरांचा. ते मुलांना म्हणाले, 'मुलांनो, या म्हणी म्हणजे अनुभवांच्या खाणीच. आज आपण एक खेळ खेळूया. पशुपक्ष्यांच्या नावांचा उल्लेख असणाऱ्या म्हणी तुम्ही मला आणि मी तुम्हाला सांगायच्याः खेळूया?'

वैष्णवी पटकन म्हणाली, 'सर, मी सुरुवात करू?' सरांचा होकार मिळताच ती म्हणाली, 'अडला हरी गाढवाचे पाय धरी.'

दिनेश म्हणाला, 'आंधळं दळतं आणि कुत्रं पीठ खातं.'

आता सर म्हणाले, 'उंदराला मांजर साक्ष.' मुलांची आणि सरांची खऱ्या अर्थाने आता चढाओढ सुरू झाली. मुलांनी एक म्हण सांगितली की सर लगेच दुसरी एक म्हण सांगायचे. खेळता खेळता पशुपक्ष्यांचा उल्लेख असलेल्या केवढ्या तरी म्हणींची यादी वर्गात तयार झाली.

'अगं अगं म्हशी मला कुठे नेशी, कावळ्याच्या शापाने गाय मरत नाही, कोंबडे झाकले तरी तांबडे फुटायचे राहात नाही, कोल्हा काकडीला राजी, कोल्ह्याला द्राक्षे आंबट, कुत्र्याचे शेपूट नळीत घातले तरी वाकडे ते वाकडेच, गाढवाला गुळाची चव काय, गाढवांचा गोंधळ आणि लाथांचा सुकाळ, गाढवापुढे वाचली गीता आणि कालचा गोंधळ बरा होता, गोगलगाय आणि पोटात पाय, घोडा मैदान जवळ असणे, घरचे झाले थोडे आणि व्याह्याने धाडले घोडे, डोंगर पोखरून उंदीर काढणे, दुभत्या गायीच्या लाथा गोड, बैल गेला झोपा केला, मांजराच्या गळ्यात घंटा कोणी बांधावी, मुंगी होऊन साखर खावी, पण हत्ती होऊन लाकडे फोडू नये, माकडाच्या हाती कोलीत, वरातीमागून घोडे, शेळी जाते जीवानिशी आणि खाणारा म्हणतो वातड कशी, सरड्याची धाव कुंपणापर्यंत, हत्ती गेला पण शेपूट राहिलेः'बापरे! एक ना दोन, पशुपक्ष्यांचा उल्लेख असलेल्या केवढ्या या म्हणी! मराठी भाषेचे हे वैभवच.

मुलांना आश्चर्य वाटले. वैष्णवीला तर या म्हणींचा अर्थ आणि या म्हणींमागची कहाणी समजून घेण्याची उत्सुकताच लागली. शाळेतून ती घरी आल्यावर तिने आईला शाळेत म्हणींचा खेळ कसा रंगला त्याची इत्यंभूत माहिती दिली. विविध विषयांवरील म्हणींचा शोध घेण्याचा तिने चंगच बांधला. हा मनमोकळा संवाद त्यांचं आनंदाचं इंद्रधनुष्य आपसूक फुलवून गेला.

# वयाच्या शर्यतीतले विजेते

वयाची शंभरी पार केलेल्या लोकांच्या बातम्या अधूनमधून प्रसार माध्यमांवर झळकताना तुम्ही पाहिल्या असतील. गिनिज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या नोंदीनुसार २०२६ सालात जिवंत असलेली जगातली सर्वात वयोवृद्ध व्यक्ती आहे युनायटेड किंगडममधील 'एथेल कटरहॅम', वयवर्ष फक्त ११६ (एप्रिल २०२६ पर्यंत!). याआधीचा रेकॉर्ड तपासला तर ११५, ११७, १२२ वर्षांपर्यंत जगलेल्या लोकांची यादी मिळते. मात्र पृथ्वीवरच्या सगळ्या जीवसृष्टीत सर्वांत बुद्धिमान ठरलेला आणि आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर बाकीच्या प्राण्यांना वेठीला धरणारा मानवप्राणी दीर्घायुष्याच्या बाबतीत काहीसा मागेच म्हणावा लागेल. माणूस ज्या गटात येतो त्यात म्हणजे सस्तन प्राण्यांमध्ये पाहिलं तर हत्ती ७० ते ८० वर्षं, घोडा ६० वर्षं, पोलार बेअर्स ४० ते ४२ वर्षं मजल मारताना दिसतात. आता या सगळ्यांत माणसाचंच आयुष्य जास्त असं वाटलं असेल. पण थांबा, सस्तन प्राण्यांचे काही प्रकार समुद्रातही आढळतात (ज्यांना आपण अनेकदा विसरूनच जातो), तर अशा सागरी सस्तन प्राण्यांनी मात्र आयुर्मर्यादेच्या बाबतीत मानवावर मात केल्याचं लक्षात येतं. आर्क्टिक समुद्रातील बोहेड व्हेल सुमारे २०० वर्षं जगतो. ५० फुटांपेक्षाही लांबीला मोठा असणारा हा व्हेल आपल्या मजबूत डोक्याच्या सहाय्याने चोवीस इंचांचा बर्फाचा थर भेदून बाहेर येतो.

बोहेड व्हेलच्या इतकं दीर्घ आयुष्य जगणारा दुसरा सस्तन प्राणी नसला तरी याबाबतीत त्याचा तगडा स्पर्धक पाहायला मिळतो तो रेप्टाइल्सच्या गटात. गॅलापेगोस टॉरटॉइज हे प्रशांत महासागरातील बेटावरचं कासव आहे, कासवांच्या जगातील आकाराने सर्वांत मोठं असलेलं हे कासव सुमारे चारशे किलो वजनाचं असतं. वयाची शंभरी आरामात पार करणारं हे कासव प्राणी संग्रहालयात पावणेदोनशे वर्षं जगलं आहे. आता याच्या दीर्घायुष्याचं रहस्य याच्या शाकाहारीपणात आहे की दिवसाचे सोळा तास आराम करण्यात आहे हे ठरवणं कठीण आहे. याच म्हणजे रेप्टाइल्सच्या

**मकरंद जोशी**

गटातील मगरींचं आयुष्य बघितलं तर नैसर्गिक अवस्थेत ६० वर्षांपर्यंत जगणाऱ्या मगरींनी बंदिवासात मात्र ८०च्या पुढे मजल मारल्याचं दिसून येतं. पक्ष्यांच्या जगात डोकावल्यावर लक्षात येतं की, सर्वांत लांबलचक पंख असलेला अल्बाट्रोस हा पक्षी ३२–३४ वर्षं जगतो, तर व्हाइट टर्न ३५ वर्षं जगतात. लेयसन अल्बाट्रोस वयाचं अर्धशतक पूर्ण करतो, तर आपल्या आकर्षक रंगाने जगाचं लक्ष वेधून घेणारे (आणि म्हणून पाळले जाणारे!) मकाव पक्षी नैसर्गिक अवस्थेत पस्तिशीपर्यंतच मजल गाठतात. मात्र पाळीव पक्षी म्हणून संरक्षित वातावरणात हे पक्षी ८० वर्षांपर्यंत जगतात असं आढळलं आहे.जमिनीवरून पाण्यात जाऊ तसतशी आयुर्मर्यादा वाढू लागते.

अटलांटिक महासागरातील 'ग्रीनलँड शार्क' हा मासा पृथ्वीवरील सर्व कणाधारी प्राण्यांमधील सर्वांत जास्त काळ जगणारा प्राणी आहे. एकवीस फुटांपर्यंत वाढणारा हा मासा सुमारे ५०० वर्षं जगतो असं सिद्ध झालं आहे. मात्र या माशाची वाढ अतिशय हळूहळू होत असते, म्हणजे वर्षाला जेमतेम १ सेंटिमीटर इतकाच तो मोठा होतो.

# ......मग हाताच्या नसा निळ्या का दिसतात?

आपल्यापैकी बऱ्याच जणांनी कदाचित आपल्या हातांतील, पायांतील किंवा मनगटांतील नसांकडे पाहून 'त्या निळ्या का दिसतात?' असा विचार केला असेल. काहींचा तर असाही समज आहे की, आपल्या नसांमधून वाहणारे रक्त निळे असते आणि ते फुफ्फुसांकडून ऑक्सिजन मिळाल्यानंतरच लाल होते. पण हे खरंच आहे का? हृदयरोग विभागाचे संचालक सांगतात की, हा एक व्यापक गैरसमज आहे. मानवी रक्त कधीही निळे नसते. नसा निळ्या दिसणे हा केवळ प्रकाश आणि त्वचा यांच्यातील एका प्रकाशीय परिणामाचा परिणाम आहे.

**नसांमध्ये निळे रक्त वाहते का?**

डॉ सांगतात की, आपल्या शरीरातील रक्त नेहमी लालच राहते. धमन्यांमधून वाहणारे ऑक्सिजनयुक्त रक्त हे चमकदार लाल रंगाचे दिसते; तर शिरांमधून परत येणारे रक्त ज्यात ऑक्सिजनचे प्रमाण कमी असतेते गडद लाल रंगाचे असते. परंतु, ते प्रत्यक्षात




कधीही निळे होत नाही.डॉक्टरांच्या मते, याचे उत्तर शरीराची रचना आणि प्रकाशाच्या स्वरूपामध्ये दडलेले आहे. जेव्हा प्रकाश त्वचेवर पडतो, तेव्हा वेगवेगळ्या तरंगलांबीचे किरण त्वचेवर आणि त्याखालील ऊतींवर वेगवेगळ्या प्रकारे परिणाम करतात. लाल प्रकाश त्वचेत अधिक खोलवर शिरतो आणि जास्त प्रमाणात शोषला जातो. याउलट, निळा प्रकाश कमी खोलीपर्यंत शिरतो आणि जास्त प्रमाणात डोळ्यांकडे परावर्तित होतो.

यामुळेच त्वचेखालील नसांमधून येणारा प्रकाश आपल्या डोळ्यांना निळा किंवा हिरवट-निळा दिसतो; मात्र त्या नसांमध्ये वाहणारे रक्त प्रत्यक्षात लाल रंगाचेच असते.

## अन्नाची ॲलर्जी

**अ** अनेकांना एखादा अन्नपदार्थ खाल्ल्यानंतर शिंका येणे, श्वास घेताना घरघर होणे, अंगावर पुरळ उठणे, पोट फुगणे, जुलाब, मळमळ, सांधेदुखी किंवा थकवा यांसारखी लक्षणे जाणवतात. अशा वेळी बहुतेक जण त्याला 'अन्न ॲलर्जी' समजतात. मात्र प्रत्येक वेळी ती ॲलर्जीच असेल असे नाही. काही वेळा ही अन्न असहिष्णुता, अन्न संवेदनशील ता किंवा सेलिअक रोगाची लक्षणे असू शकतात. या स्थितींचे स्वरूप फरक समजून घेणे महत्त्वाचे आहे. अन्न असहिष्णुता अन्न असहिष्णुता म्हणजे शरीराला विशिष्ट अन्नपदार्थ नीट पचवता किंवा त्यावर प्रक्रिया करता न येणे. याचे सर्वाधिक परिचित उदाहरण म्हणजे लॅक्टोज असहिष्णुता. वय वाढत गेल्यानंतर अनेकांच्या शरीरात लॅक्टोज पचवण्यासाठी आवश्यक असलेले लॅक्टेज हे



एन्झाइम कमी प्रमाणात तयार होते. त्यामुळे दुधातील लॅक्टोज पूर्णपणे पचत नाही आणि पोट फुगणे, गॅस, पोटदुखी किंवा जुलाब यांसारख्या तक्रारी निर्माण होतात. संशोधनानुसार, जगातील केवळ सुमारे ३५ टक्के लोकच बालपणानंतरही लॅक्टोज सहज पचवू शकतात. लॅक्टोज असहिष्णुता जीवघेणी नसली, तरी ती दैनंदिन जीवनात मोठा त्रास देऊ शकते. दुग्धजन्य पदार्थ कमी करणे किंवा टाळणे, तसेच डॉक्टरांच्या सल्ल्याने लॅक्टेज एन्झाइमची पूरक औषधे घेणे उपयुक्त ठरू शकते.

अन्न ॲलर्जी ही रोगप्रतिकारक शक्तीची अतितीव्र प्रतिक्रिया असते. शरीर एखाद्या निरुपद्रवी अन्नपदार्थालाही धोकादायक समजून त्याविरुद्ध प्रतिक्रिया देते. शेंगदाणे, समुद्री खाद्यपदार्थ, अंडी, दूध किंवा इतर काही अन्नपदार्थांमुळे श्वास घेण्यास त्रास, चेहरा किंवा घसा सुजणे, रक्तदाब अचानक कमी होणे किंवा ॲनाफिलॅक्सिस सारखी जीवघेणी अवस्था निर्माण होऊ शकते.

# आता बदलतेय जेवणाचे ताट

भारतीयांच्या जेवणाच्या ताटात आता केवळ चव आणि पोट भरण्यापेक्षा पोषणालाही महत्त्व मिळू लागले आहे. प्रोटीनयुक्त पदार्थ, प्लांट-बेस्ड फूड, फंक्शनल फूड आणि न्यूट्रास्युटिकल्स यांची मागणी वाढत असल्याचे चित्र फूड इंडस्ट्रीमध्ये पाहायला मिळत आहे.

काही वर्षांपूर्वी हेल्दी डाएट म्हणजे कमी कॅलरीचे अन्न, अशी सर्वसाधारण धारणा होती. मात्र आता ग्राहकांचा कल बदलत आहे. आपल्या आहारातून किती प्रोटीन आणि इतर पोषक घटक मिळतात, याकडेही लोक लक्ष देऊ लागले आहेत. विशेषतः जिममध्ये जाणारे, फिटनेसकडे लक्ष देणारे तरुण आणि आरोग्याबाबत जागरूक कुटुंबांमध्ये प्रोटीनयुक्त पदार्थांची मागणी वाढताना दिसत आहे. डाळी, दूध, पनीर आणि सोया यांसारख्या पारंपरिक प्रोटीन स्रोतांसोबतच बाजारात प्रोटीन ड्रिंक्स, प्रोटीन स्नॅक्स आणि प्लांट-बेस्ड प्रोटीनचे विविध पर्याय उपलब्ध होत आहेत.

सोया, मटार, डाळी आणि इतर वनस्पतींपासून मिळर्णा?या प्रोटीनचा वापर करून प्लांट-बेस्ड खाद्यपदार्थ तयार केले



जातात. मांसाहार कमी करण्या ची इच्छा, आरोग्या बाबत वाढलेली जागरूकता, पर्यावरणीय चिंता आणि आहारात वेगवेगळे प्रोटीन स्रोत समाविष्ट करण्याची इच्छा यामुळे या पदार्थांची मागणी वाढत आहे.

भारतात वापरल्या जाणाऱ्या प्लांट-प्रोटीन इनग्रेडिएंट्सपैकी मोठा हिस्सा सध्या परदेशातून आयात केला जातो. देशांतर्गत उत्पादन वाढल्यास या क्षेत्राला आणखी चालना मिळू शकते.

फंक्शनल फूड आणि न्यूट्रास्युटिकल्सकडेही ग्राहकांचा कल वाढत आहे. सामान्य पोषणासोबत विशिष्ट आरोग्यविषयक गरजा लक्षात घेऊन तयार केलेल्या खाद्यपदार्थांना या श्रेणीत स्थान दिले जाते. त्यामुळे येत्या काळात बाजारात प्रोटीन, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे यांसारख्या पोषक घटकांवर भर देणारे अधिक पर्याय उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

# रात्री जेवणानंतर परत कडकडून भूक लागते?

दिवसभराची धावपळ आटोपून रात्रीचे जेवण वेळेवर झाले आहे, तुम्ही शांतपणे झोपण्यासाठी अंथरुणावर पडून आराम करत आहात आणि अचानक तुमच्या पोटात कावळे ओरडू लागतात किंवा काहीतरी चविष्ट खाण्याची तीव्र इच्छा निर्माण होते. अशावेळी काय करावे? अनेक लोक लगेच किचनमध्ये जाऊन बिस्कीट, नमकीन किंवा चिप्स खातात, तर काही जण थेट ऑनलाईन फूड डिलिव्हरी ॲपवरून काहीतरी ऑर्डर करतात.

परंतु, रात्री उशिरा अचानक काहीतरी खाण्यापूर्वी स्वतःला एक अतिशय सोपा पण महत्त्वाचा प्रश्न विचारणे आवश्यक आहे: 'मला खरोखरच भूक लागली आहे का?' आपल्या शरीराची कार्यप्रणाली अत्यंत गुंतागुंतीची आहे. अनेकदा मेंदूला मिळणारे भुकेचे आणि तहानेचे संकेत इतके सरमिसळ असतात की आपण पाण्याच्या कमतरतेलाही भूक समजण्याची चूक करतो. रात्रीच्या वेळी असा अनुभव येणे ही एक सामान्य बाब असली, तरी दररोज असे होणे हे तुमच्या आरोग्यावर, झोपेवर आणि वजनावर थेट परिणाम करू शकते.

अनेकदा तहान आणि भूक यातील फरक ओळखणे शरीरासाठी कठीण जाते, कारण मेंदूकडून मिळणारे संकेत एकाच प्रकारचे वाटू शकतात.

शरीरात सौम्य प्रमाणात पाण्याची कमतरता असल्यास थकवा जाणवणे, तोंड सुकणे किंवा काहीतरी खाण्याची किंवा पिण्याची तीव्र इच्छा होणे अशा संवेदना निर्माण होऊ शकतात.

परंतु, रात्रीच्या वेळी लागणारी प्रत्येक भूक ही केवळ डिहायड्रेशनमुळेच असते असा निष्कर्ष काढणे चुकीचे ठरेल. काही वेळा शरीर खरोखरच अन्नाची मागणी करत असते, तर काही वेळा ते केवळ पाण्याचे संकेत देत असते.

खरी शारीरिक भूक ही हळूहळू वाढते आणि ती योग्य जेवणाने किंवा पौष्टिक पदार्थाने तृप्त होते. याउलट, 'क्रेविंग' ही अतिशय विशिष्ट असते. उदाहरणार्थ, व्यवस्थित जेवण झालेले असतानाही अचानक चॉकलेट, वेफर्स किंवा काहीतरी गोड खाण्याची तीव्र इच्छा होणे. रात्रीच्या वेळी, विशेषतः जेव्हा व्यक्ती उशिरापर्यंत जागी असते, तेव्हा भावनिक आहार , कंटाळा, मानसिक ताण आणि जुन्या सवयी या सर्व गोष्टी अधिक तीव्र होतात आणि व्यक्ती अन्नाकडे आकर्षित होते.

रात्रीच्या भुकेमागे 'झोप' हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. जेव्हा शरीराला पुरेशी झोप मिळत नाही, तेव्हा भूक आणि तृप्ती नियंत्रित करणाऱ्या हार्मोन्सचे संतुलन बिघडते. यामुळे जास्त कॅलरीज असलेले, गोड किंवा तेलकट पदार्थ खाण्याची इच्छा वाढते.


जे लोक नियमितपणे रात्री उशिरापर्यंत जगतात, ते केवळ जास्त वेळ जागे असल्यामुळे आणि शरीराला ऊर्जेची गरज वाटल्यामुळे वारंवार काहीतरी खात राहतात.

## हार्टबिटवरून खरंच समजतं बाळाचं लिंग?

**ग** गर्भावस्थेत बाळाची धडधड ऐकून बाळाच्या लिंगाचा अंदाज लावला जाऊ शकतो, असा दावा अनेकदा केला जातो. परंतु या दाव्यात किती सत्यता आहे? डॉक्टरांचा यावर काय सल्ला आहे याविषयी आपण सविस्तर जाणून घेऊया.

गर्भावस्थेदरम्यान गर्भातील बाळाच्या हृदयाचे ठोके ऐकणे हा पालकांसाठी अत्यंत खास आणि आनंदाचा क्षण असतो. याच काळात अनेकांच्या मनात प्रश्न निर्माण होतो की, बाळाच्या हार्टबिटवरून पोटात मुलगा आहे की मुलगी, हे ओळखता येऊ शकतं का?

गेल्या अनेक वर्षांपासून असा दावा केला जातो की, जर बाळाचे ठोके प्रति मिनिट १४० पेक्षा जास्त असतील तर मुलगी आणि १४० पेक्षा कमी असतील तर मुलगा होतो. पण खरंच असं असतं का?



मात्र, वैद्यकीय शास्त्रात हा फॉर्म्युला लिंग ओळखण्याचा विश्वासार्ह मार्ग मानला जात नाही.

गर्भातील बाळाचे हार्ट रेट संपूर्ण गर्भावस्थेत एकाच पातळीवर राहत नाहीत. गर्भावस्थेचा आठवडा, बाळाची हालचाल आणि बाळाची गर्भातील स्थिती यांमुळे या ठोक्यांमध्ये सतत बदल होत असतो. त्यामुळे तपासणीदरम्यान बाळाचे ठोके १५० किंवा १६० आले, तर बाळ मुलगीच असेल असे नाही. तसेच १३० किंवा १४० ँइशब ठोके असणे हा मुलगा असण्याचा संकेत मानला जाऊ शकत नाही.

डॉक्टर बाळाच्या हृदयाच्या ठोक्यांचा वापर मुख्यत्वे त्याचे आरोग्य आणि गर्भावस्थेची स्थिती तपासण्यासाठी करतात.

हार्ट रेटवरून बाळाच्या आरोग्याविषयी अत्यंत महत्त्वाची वैद्यकीय माहिती मिळते, परंतु यावरून मुलगा की मुलगी याची पुष्टी केली जात नाही.

हा गर्भावस्थेशी संबंधित एक अत्यंत लोकप्रिय गैरसमज आहे. याला कोणताही वैज्ञानिक आधार नाही. प्रत्येक बाळाच्या हृदयाच्या ठोक्यांचा दर नैसर्गिकरीत्या वेगवेगळा असू शकतो. त्यामुळे केवळ पाहून लिंगाचा अंदाज लावणे पूर्णपणे चुकीचे ठरू शकते.

गर्भावस्थेत जेव्हा तुम्ही बाळाचे ठोके ऐकता, तेव्हा त्याकडे बाळाच्या आरोग्याची माहिती घेण्याचा मार्ग म्हणून पाहा, लिंग ओळखण्याचा उपाय म्हणून नाही.

# नॉर्मल की सिझेरियन कशामुळे कंबरदुखी व हाडांच्या वेदना ?

**ग** प्रसूतीनंतर पाठीचे दुखणे आणि अंगदुखी होणे अत्यंत सामान्य आहे; परंतु हे दुखणे केवळ नॅचरल डिलिव्हरी झाली आहे की सिझरियन या एकाच घटकावर ठरत नाही. गरोदरपणात शरीरात होणारे संप्रेरकांचे बदल आणि वजन वाढणे या गोष्टी पाठीवर अतिरिक्त ताण आणतात. याशिवाय शरीराची बदललेली बसण्या-उठण्याची पद्धत आणि पोटाच्या स्नायूंचे ताणले जाणे यामुळेही त्रास होतो. बाळंतपणानंतर बाळाला कडेवर घेणे, दीर्घकाळ स्तनपान करताना चुकीच्या पद्धतीने बसणे, झोपेची कमतरता आणि स्नायूंचा थकवा यांमुळे हे दुखणे अधिक वाढू शकते. रिकव्हरीचा काळ हा प्रत्येक स्त्रीनुसार वेगवेगळा असू शकतो. बाळंतपणानंतर ६ आठवड्यांनी पेल्व्हिक फ्लोअर मजबूत करर्णा?या व्यायामांना सुरुवात करणे अत्यंत महत्त्वाचे आहे, कारण हे स्नायू मूत्राशय, गर्भाशय, आतडे आणि पाठीच्या कण्याला आधार देऊन पाठीचे दुखणे कमी करण्यास मदत करतात.

प्रसूतीनंतर होणारे पाठीचे दुखणे किंवा अंगदुखी ही नॉर्मल डिलिव्हरी किंवा सिझरियन यांपैकी एकाच घटकावर आधारित नसते.



गरोदरपणात शरीरात 'रिलॅक्सिन' हार्मोनची पातळी वाढल्याने पाठीचा कणा आणि ओटीपोटाला आधार देणारे लिगामेंट्स शिथिल होतात. यासोबतच वजन वाढणे, शरीराची बदललेली पोश्चर आणि पोटाच्या स्नायूंचे ताणले जाणे यामुळे पाठीवर ताण येतो. बाळंतपणानंतर बाळाला सातत्याने कडेवर घेणे, दीर्घकाळ स्तनपान करणे, झोपेची कमतरता आणि स्नायूंचा थकवा यांमुळे हे दुखणे वाढू शकते.

नॅचरल डिलिव्हरी असो किंवा सिझरियन, दोन्हीपैकी कोणत्याही पद्धतीमुळे महिलांच्या हाडांचे थेट नुकसान होण्याचा धोका वाढत नाही. अनेक महिला ज्याला 'हाडांचे दुखणे' समजतात, ते प्रत्यक्षात स्नायूंचा ताण , पेल्व्हिक गर्डल पेन किंवा लिगामेंट्स ताणले गेल्यामुळे होणारे दुखणे असते. गरोदरपणातील हे बदल सामान्य असून वेळेनुसार त्यात सुधारणा होते. मात्र, जर दुखणे खूप तीव्र असेल, तर इतर वैद्यकीय कारणांचा शोध घेण्यासाठी डॉक्टरांकडून तपासणी करून घेणे आवश्यक आहे.

गरोदरपणात शारीरिकदृष्ट्या सक्रिय असर्णा?या महिलांची स्नायूंची ताकद, सहनशक्ती आणि शरीराची पोश्चर उत्तम असते, ज्यामुळे त्यांना बाळंतपणानंतर लवकर पूर्ववत होण्यास मदत होते. मजबूत पेल्व्हिक स्नायूंमुळे लघवी गळती आणि पाठीच्या दुखण्याचा धोका कमी होतो. परंतु, ज्या महिलांनी गरोदरपणात नियमित व्यायाम केलेला नाही, त्याही कोणतीही वैद्यकीय अडचण नसल्यास सुरक्षितपणे नॅचरल डिलिव्हरी करू शकतात.

# पाण्याची योग्य मर्यादा

जेव्हा रात्री अचानक काहीतरी खाण्याची इच्छा होईल, तेव्हा लगेच खाण्याऐवजी थोडा वेळ थांबून विचार करा. आपण शेवटचे जेवण कधी घेतले होते, आपल्याला खरोखर शारीरिक भूक लागली आहे का आणि दिवसभरात पुरेसे पाणी प्यायलो आहोत का, याचा अंदाज घ्या. थोडे पाणी पिऊन काही मिनिटे वाट पाहिल्यास, जर ती केवळ तहान असेल तर इच्छा शांत होईल. परंतु, पाणी प्यायल्यानंतरही खरी भूक कायम असेल, तर उपाशी पोटी झोपण्यात काहीही समजूतदारपणा नाही. तसेच, रात्रीच्या वेळी भुकेवर मात करण्यासाठी अतिप्रमाणात पाणी पिणे देखील चुकीचे आहे; यामुळे वारंवार टॉयलेटला जावे लागून झोपमोड होऊ शकते.

**दिवसभराचा संतुलित आहार आणि रात्रीच्या भुकेवर उपाय**


जर तुम्हाला दररोज रात्री उशिरा भूक लागत असेल, तर रात्रीच्या उपायांपेक्षा दिवसभराच्या आहाराचे निरीक्षण करणे जास्त गरजेचे आहे. दिवसभरातील जेवणात प्रथिनांचे किंवा फायबरचे प्रमाण कमी असल्यास



पोट पूर्णपणे भरत नाही आणि रात्री भूक लागते. त्यामुळे दिवसाच्या आहारामध्ये पुरेशी प्रथिने, भाज्या, पूर्ण धान्ये आणि निरोगी स्निग्ध पदार्थांचा समावेश केल्यास पोट दीर्घकाळ भरलेले राहते.

## तोंड येण्याकडे दुर्लक्ष टाळा

तोंडात फोड येणे, सूज येणे किंवा अल्सर होणे, यालाच सर्वसामान्य भाषेत 'तोंड येणे' असे म्हटले जाते. अनेकजण ही किरकोळ समस्या समजून त्याकडे दुर्लक्ष करतात. मात्र ठराविक कालावधीत तोंडातील फोड किंवा अल्सर बरे होत नसतील, तर ते शरीरातील गंभीर आजाराचे संकेत असू शकतात,' असे मत वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केले आहे. 'वेळेवर निदान करून योग्य उपचार घेतल्यास या समस्येवर प्रभावीपणे नियंत्रण मिळवता येते,' असेही तज्ज्ञांनी स्पष्ट केले.आरोग्यतज्ज्ञांनी दिलेल्या माहितीनुसार, तोंडाची आतील त्वचा (म्युकस मेंब्रेन) अतिशय नाजूक आणि संवेदनशील असते. या भागावर लाल किंवा पांढरे चट्टे, लहान जखमा (अल्सर), सूज किंवा फोड निर्माण होऊ शकतात. सर्वसाधारणपणे तोंड येणे ही किरकोळ समस्या मानली जाते; मात्र काही वेळा ते शरीरातील गंभीर आजारांचे किंवा पोषणातील कमतरतेचेही लक्षण असू शकते. तोंड आल्यावर जीभ कोरडी पडणे, जिभेवर काटे येणे, अल्सर होणे तसेच खाणे-पिणे आणि बोलताना वेदना होणे अशा तक्रारी जाणवू शकतात.



तोंड येण्यामागे अनेक कारणे असू शकतात. यातील प्रमुख कारणांविषयी माहिती देताना तज्ज्ञ सांगतात की, शरीरातील जीवनसत्त्वे, विशेषतः बी-समूहातील जीवनसत्त्वे, लोह किंवा फॉलिक अ?ॅसिडची कमतरता हे एक महत्त्वाचे कारण आहे. याशिवाय, अ?ॅसिडिटी, चयापचयातील बिघाड, काही गंभीर आजार, गुटखा व तंबाखूचे सेवन, रात्रीची अपुरी झोप, मानसिक ताण, जेवणाच्या वेळांमध्ये सातत्याने होणारे बदल, सतत बाहेरचे किंवा तेलकट-तिखट पदार्थ खाण्याची

# सकाळी उठून प्राणायाम करण्याचे फायदे

**दि** दिवसाची सुरुवात सकारात्मक आणि शांत वातावरणात करायची असेल तर सकाळच्या वेळेत प्राणायाम करणे फायदेशीर ठरू शकते. प्राणायाम ही श्वासोच्छवास नियंत्रित करण्याची योगिक पद्धत असून, नियमित आणि योग्य पद्धतीने केल्यास मन शांत ठेवण्यास तसेच शरीराला सक्रिय ठेवण्यास मदत होऊ शकते.



प्राणायाम करताना श्वासाच्या हालचालीवर लक्ष केंद्रित केले जाते. त्यामुळे मनाला शांतता मिळण्यास आणि ताण-तणाव व अस्वस्थता कमी करण्यास मदत होऊ शकते. नियमित सरावामुळे दिवसाची सुरुवात अधिक शांत आणि सकारात्मक पद्धतीने करता येऊ शकते. सकाळी काही वेळ शांत बसून श्वासावर लक्ष केंद्रित केल्यामुळे एकाग्रता सुधारण्यास मदत होऊ शकते. विद्यार्थी, ऑफिसमध्ये काम करणारे किंवा दिवसभर मानसिक काम करणाऱ्या व्यक्तींसाठी प्राणायाम सकाळच्या दिनचर्येचा एक भाग ठरू शकतो. प्राणायामामध्ये श्वास घेण्याची आणि सोडण्याची प्रक्रिया नियंत्रित केली जाते. नियमित सरावामुळे श्वासोच्छवासाबाबत जागरूकता वाढू शकते आणि सकाळची सुस्ती कमी होऊन शरीर अधिक सक्रिय वाटू शकते. श्वसन आणि रिलॅक्सेशनशी संबंधित योगाभ्यासामुळे शरीर व मनाला आराम मिळण्यास मदत होऊ शकते. त्यामुळे काही व्यक्तींना रात्री चांगली झोप लागण्यासही मदत होऊ शकते. प्राणायामासोबत हलका व्यायाम, पुरेसे पाणी आणि पौष्टिक नाश्ता घेतल्यास दिवसाची सुरुवात अधिक चांगली होऊ शकते.प्राणायाम करताना आपल्या क्षमतेनुसारच सराव करावा. सुरुवातीला वेगाने श्वास घेणे किंवा दीर्घकाळ श्वास रोखून ठेवणे टाळावे.

***मानवी जीवनातील सर्वांत गुंतागुंतीचा शोध कोणता, असा प्रश्न विचारला तर त्याचे उत्तर बाह्य विश्वात नव्हे, तर स्वतःच्या अंतर्मनात सापडते. विज्ञानाने विश्वाची असंख्य रहस्ये उलगडली, तंत्रज्ञानाने जीवन अधिक सुलभ केले आणि समाजव्यवस्थेने प्रगतीची नवी क्षितिजे गाठली; परंतु माणूस स्वतःला कितपत ओळखतो, हा प्रश्न आजही तितकाच महत्त्वाचा आहे. आत्मपरीक्षण ही स्वतःच्या विचारांचे, भावनांचे, कृतींचे, मूल्यांचे आणि मर्यादांचे प्रामाणिक परीक्षण करण्याची प्रक्रिया आहे. ती केवळ आत्मचिंतन नसून आत्मपरिवर्तनाची पहिली पायरी आहे.***

# आत्मपरीक्षण

आत्मपरीक्षण म्हणजे स्वतःवर टीका करणे किंवा दोष शोधणे नव्हे. उलट, स्वतःकडे पूर्वग्रह, अहंकार आणि आत्मसमर्थन यांपासून मुक्त होऊन वस्तुनिष्ठपणे पाहण्याची क्षमता होय. प्रत्येक व्यक्तीला स्वतः विषयी काही ठाम



समजुती असतात. आपण योग्यच आहोत, आपल्या निर्णयांमागे योग्य कारणे आहेत, आपले वर्तन परिस्थितीमुळे घडतेङ्खअशी भूमिका अनेकदा नकळत घेतली जाते. परंतु आत्मपरीक्षण या सोयीस्कर समजुतींना प्रश्न विचारते. ते विचारतेङ्खआपल्या कृतींचा इतरांवर काय परिणाम झाला? आपल्या यशामध्ये इतरांचे योगदान किती होते? आपल्या अपयशाला आपणच कितपत जबाबदार आहोत? अशा प्रश्नांची प्रामाणिक उत्तरे व्यक्तिमत्त्वाला अधिक परिपक्व बनवतात. भारतीय तत्त्वज्ञानात आत्मपरीक्षणाला विशेष महत्त्व दिले गेले आहे. उपनिषदांपासून संतसाहित्यापर्यंत आणि योगपरंपरेपासून आधुनिक विचारवंतांपर्यंत आत्मज्ञान ही जीवनाची सर्वोच्च साधना मानली गेली आहे. स्वतःला जाणल्याशिवाय जगाला समजणे शक्य नाही, अशी भूमिका अनेक तत्त्वज्ञानपर परंपरांमध्ये दिसून येते. आत्मपरीक्षणामुळे माणूस आपल्या इच्छा, भीती, आसक्ती आणि अहंकार यांचे स्वरूप समजू लागतो. ही जाणीव त्याला अधिक विवेकी, संयमी आणि संवेदनशील बनवते.

मानसशास्त्रीय दृष्टीने पाहिले तर आत्मपरीक्षण हे भावनिक परिपक्वतेचे लक्षण आहे. स्वतःच्या भावना ओळखणे, राग किंवा दुःखामागील कारणांचा शोध घेणे, चुका मान्य करण्याची तयारी ठेवणे आणि त्यातून शिकणेङ्खया सर्व गोष्टी मानसिक आरोग्यासाठी आवश्यक आहेत. आत्मपरीक्षण करणारी व्यक्ती परिस्थितीवर दोषारोप करण्यापेक्षा स्वतःच्या प्रतिसादाचे मूल्यमापन करते. त्यामुळे तिच्यात बदल स्वीकारण्याची क्षमता वाढते आणि नातेसंबंध अधिक सुदृढ होतात. आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक युगात आत्मपरीक्षणासाठी वेळ देणे कठीण होत चालले आहे. सामाजिक माध्यमांवरील प्रतिमा, बाह्य यशाची धडपड आणि सततची तुलना यांमुळे माणूस स्वतः च्या अंतरंगापासून दूर जात आहे. अनेकदा आपण इतरांच्या जीवनाबद्दल अधिक जाणतो; पण स्वतःच्या मनातील भीती, आकांक्षा किंवा अस्वस्थता यांचा विचार करण्यास वेळ देत नाही. परिणामी बाह्य यश मिळूनही अंतर्मनात रिक्तता जाणवते. अशा वेळी आत्मपरीक्षण ही केवळ वैचारिक प्रक्रिया राहत नाही; ती मानसिक संतुलन आणि जीवनातील अर्थ शोधण्याचे प्रभावी साधन ठरते.

आत्मपरीक्ष णाचा अर्थ स्वतःमध्येच गुरफटून राहणे असा नाही. उलट, स्वतःला समजून घेतल्यावरच इतरांना समजून घेण्याची क्षमता विकसित होते. स्वतःच्या मर्यादा मान्य करणारा माणूस इतरांच्या चुका अधिक सहानुभूतीने स्वीकारतो. स्वतःच्या अपूर्णतेची जाणीव असलेली व्यक्ती अहंकारी होत नाही. म्हणूनच आत्मपरीक्षण हे वैयक्तिक विकासाबरोबरच सामाजिक सलोखा निर्माण करण्याचेही माध्यम आहे.आत्मपरीक्षण प्रभावी होण्यासाठी काही मूलभूत अटी आवश्यक असतात. त्यामध्ये प्रामाणिकपणा, संयम आणि सातत्य यांना विशेष महत्त्व आहे. एखाद्या दिवसाचे आत्मचिंतन पुरेसे नसते; जीवनातील प्रत्येक अनुभवातून शिकण्याची वृत्ती विकसित करावी लागते. यश मिळाले तर त्यामागील कारणांचा आणि अपयश आले तर त्यातून मिळालेल्या शिकवणीचा विचार करणे आवश्यक असते. तसेच विधायक टीका स्वीकारण्याची तयारीही आत्मपरीक्षणाचा महत्त्वाचा भाग आहे. कारण अनेकदा इतरांच्या निरीक्षणांतूनही आपल्याला स्वतःचे नवे पैलू समजतात.आधुनिक नेतृत्वशास्त्र, व्यवस्थापन आणि शिक्षण शास्त्रातही आत्मपरीक्षणाला विशेष महत्त्व दिले जाते.

# विश्वाचा नवा नकाशा उलगडणार

विश्वाची निर्मिती कशी झाली, त्याचा विस्तार नेमका कसा वाढत आहे आणि आपल्या आकाश गंगेबाहेर किती ग्रह आहेत, या प्रश्नांची उत्तरे शोधण्यासाठी नासाची नॅन्सी ग्रेस रोमन स्पेस टेलिस्कोप आता सज्ज झाली आहे. या अत्याधुनिक अवकाश दुर्बिणीचे प्रक्षेपण ३० ऑगस्ट २०२६ रोजी फ्लोरिडातील केनेडी स्पेस सेंटरमधून स्पेसएक्सच्या फाल्कन हेवी रॉकेटद्वारे करण्याचे नियोजन आहे. हबल दुर्बिणीच्या तुलनेत रोमनचा आकाशाकडे पाहण्याचा परिसर तब्बल १०० पट मोठा असेल.

रोमन दुर्बिणीचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे तिची मोठी निरीक्षण क्षमता आणि अवरक्त प्रकाश पाहण्याची ताकद. हबलप्रमाणेच ती सूक्ष्म तपशील टिपू शकते. मात्र तिचे विस्तीर्ण दृश्य क्षेत्र असल्यामुळे ती हबलपेक्षा सुमारे १,००० पट वेगाने आकाशाचे सर्वेक्षण करू शकेल. आपल्या पाच वर्षांच्या प्राथमिक मोहिमेत रोमन अब्जावधी आकाशगंगांमधून येणा?या प्रकाशाचा अभ्यास करणार आहे. या माहितीच्या आधारे आकाशगंगा, तारे आणि ग्रहांची निर्मिती व उत्क्रांती कशी झाली, याचा अधिक व्यापक मागोवा घेता येईल.

रोमनच्या

मोहिमेचा एक प्रमुख उद्देश डार्क एनर्जी आणि डार्क मॅटरचा अभ्यास हा आहे. विश्वाच्या विस्ताराचा वेग वाढत असल्याचे निरीक्षणातून दिसते. त्यामागे नेमकी कोणती शक्ती कार्यरत आहे, हा आधुनिक खगोलशास्त्रातील मोठा प्रश्न आहे. त्याचबरोबर विश्वातील पदार्थाच्या रचनेत डार्क मॅटरची भूमिका काय आहे, हे समजून घेण्यासाठीही रोमन महत्त्वाची माहिती देईल. अतिदूर वस्तूंच्या प्रकाशावर गुरुत्वाकर्षणामुळे होणारे सूक्ष्म बदल मोजून विश्वातील पदार्थाची रचना आणि त्याचा काळानुसार झालेला बदल समजून घेण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. ही दुर्बिण आपल्या सूर्यमालेबाहेरील ग्रहांचाही मोठ्या प्रमाणावर शोध घेणार आहे. रोमनच्या विस्तीर्ण निरीक्षण क्षेत्रामुळे हजारो नव्हे, तर सुमारे एक लाख नवीन बाह्यग्रह शोधण्याची क्षमता निर्माण होणार आहे. त्यापैकी काही ग्रहांबाबत त्यांच्या कक्षा, आकार आणि वातावरणाविषयी अधिक माहिती मिळू शकते. याशिवाय रोमन ग्रह तयार होत असलेल्या प्रदेशांचाही



अभ्यास करणार असून काही मोठ्या बाह्यग्रहांची थेट छायाचित्रे घेण्याच्या तंत्राची चाचणीही केली जाणार आहे.

रोमन दुर्बिण केवळ दूरवरच्या आकाशगंगांकडे पाहणार नाही, तर प्राचीन कृष्णविवरांचाही शोध घेईल. विश्वाच्या सुरुवातीच्या काळात अस्तित्वात असलेल्या अतिविशाल कृष्णविवरांची निर्मिती आणि वाढ कशी झाली, हा प्रश्नही या

मोहिमेच्या अभ्यासाचा भाग आहे. त्यामुळे डार्क एनर्जी, डार्क मॅटर, बाह्यग्रह, कृष्णविवरे आणि आकाशगंगांची उत्क्रांती अशा अनेक क्षेत्रांना एकाच मोहिमेतून मोठी चालना मिळणार आहे. हबल आणि जेम्स वेब या दुर्बिणींच्या कामाला पूरक ठरत रोमन

विश्वाचा आणखी विस्तीर्ण पट वैज्ञानिकांसमोर उघडेल.

रोमन दुर्बिणीचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे तिच्या मदतीने आकाशातील बदलत्या वस्तूंचा दीर्घकाळ अभ्यास करता येणार आहे. काही तारे विशिष्ट काळानंतर तेजस्वी किंवा अंधुक होतात, तर काही ठिकाणी अचानक प्रचंड प्रकाश निर्माण होतो. अशा घटनांचा मागोवा घेऊन खगोलशास्त्रज्ञांना विश्वातील विविध प्रक्रियांची अधिक अचूक माहिती मिळू शकते.

बाह्यग्रहांच्या शोधासाठीही ही क्षमता महत्त्वाची ठरणार आहे. एखादा ग्रह आपल्या ताऱ्यासमोरून

जाताना त्या ताऱ्याच्या प्रकाशात होणारा अतिशय सूक्ष्म बदल रोमन टिपू शकते.

विशेष म्हणजे रोमनकडून मिळणारी माहिती इतर अवकाश दुर्बिणींच्या निरीक्षणांना पूरक ठरणार असल्याने एखाद्या वस्तूचा विस्तृत अभ्यास करणे वैज्ञानिकांना अधिक सोपे होईल. त्यामुळे ही दुर्बिण केवळ आणखी एक अवकाश दुर्बिण न राहता विश्वाच्या इतिहासाकडे पाहण्याची नवी खिडकी ठरण्याची शक्यता आहे.

# सायबर दरोड्यांचा 'चक्रव्यूह'

विस एपीजीच्या अहवालातून एक बाब प्रकर्षाने समोर येते की, सायबर फसवणूक ही तांत्रिक किंवा बँकिंग क्षेत्राशी जोडलेली साधी समस्या नाही, तर ती मानवी तस्करी आणि अवैध आंतरराष्ट्रीय पैशांचे एक अत्यंत गंभीर संकट आहे.

सध्याच्या डिजिटल युगात सायबर फसवणूक ही एखाद्या व्यक्तीचे बँक खाते रिकामे करणे किंवा ऑनलाइन गुंतवणुकीच्या नावाखाली पैसे उकळणे एवढ्यापुरती मर्यादित असल्याचा अनेकांचा समज आहे; पण प्रत्यक्षात या गुन्ह्यामागे मानवी तस्करी, सक्तीची मजुरी, बनावट कंपन्या, म्युल बँक खाती, क्रिप्टोकरन्सी आणि हवाला यांचे एक अत्यंत गुंतागुंतीचे आणि बहुस्तरीय आंतरराष्ट्रीय जाळे उभे राहिले आहे.

आशिया पॅसिफिक ग्रुप ऑन मनी लॉंडरिंग म्हणजेच 'एपीजी'च्या 'सायबर स्कॅम हब्स अँड ह्युमन ट्रॅफिकिंग' या अलीकडील अहवालात या गुन्हेगारीची अत्यंत भीषण आणि मानवी बाजू उजेडात आणली आहे. दक्षिण–पूर्व आशियातील विविध सायबर स्कॅम केंद्रांमध्ये नोकरीच्या शोधात असणाऱ्या सुशिक्षित तरुणांना आकर्षक नोर्क?यांचे आमिष दाखवून बोलावले जाते.

परदेशात पोहोचल्यानंतर त्यांच्याशी फसवणूक करून त्यांचे पासपोर्ट आणि मोबाइल फोन जप्त केले जातात. त्यानंतर त्यांना नजरकैदेत ठेवून ऑनलाइन गेमिंग, रोमान्स स्कॅम, गुंतवणूक फसवणूक, फेक लोन आणि डिजिटल अरेस्ट यांसारखे गंभीर सायबर गुन्हे करण्यास जबरदस्ती केली जाते. कंबोडियातील सिहानोव्हिल आणि पोइपेट, म्यानमारच्या म्यावादी आणि श्वे कोक्को तसेच लाओसचा गोल्डन ट्रँगल परिसर हे या प्रकारच्या आंतरराष्ट्रीय गुन्ह्यांचे प्रमुख केंद्र बनले आहेत.

भारताच्या गृह मंत्रालयाने देखील संसदेमध्ये या सर्व ठिकाणांचा सविस्तर उल्लेख करून नागरिकांना गंभीर इशारा दिला आहे. खरे पाहता सिहानोव्हिल हे एकेकाळी पर्यटन स्थळ म्हणून ओळखले जात होते; परंतु मोठ्या प्रमाणावर झालेल्या चिनी गुंतवणुकीमुळे याचे रूपांतर एका 'स्कॅम सिटी'मध्ये झाले आहे. येथे अनेक आलिशान हॉटेल्स आणि कॅसिनोचे रूपांतर आता गजाआड असलेल्या 'स्कॅम कंपाउंडस'मध्ये झाले आहे.

या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर मानवी तस्करी करून आणलेल्या लोकांना ओलीस ठेवून त्यांच्याकडून जगभरातील लोकांची ऑनलाइन



फसवणूक करून घेतली जाते. हे शहर या गुन्हेगारीचे मुख्य केंद्र मानले जाते. पोइपेट हे कंबोडिया–थायलंड सीमेवर वसलेले शहर आहे. अलीकडच्या काळात या शहरातही सायबर गुन्हेगारीचे जाळे वेगाने पसरले आहे. येथेही अनेक मोठ्या इमारती आणि कंपाउंडस्मध्ये ऑनलाइन फसवणुकीचे रॅकेट चालवले जातात.

या शहराचा वापर सीमावर्ती भाग असल्यामुळे गुन्हेगारांच्या हालचालींसाठी आणि तस्करीसाठी अधिक सोयीस्कर होतो. येथे मानवी तस्करी करून आणलेल्या मजुरांना शारीरिक आणि मानसिक छळ सोसून सक्तीने गुन्हेगारी कृत्य करायला भाग पाडले जाते. या पार्श्वभूमीवर परदेशात नोकरी स्वीकारण्यापूर्वी तेथील नियुक्ती संस्था आणि भर्ती एजंटची कायदेशीर वैधता आणि विश्वसनीयता कसून तपासणे अत्यंत गरजेचे असल्याचे शासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

सायबर फसवणुकीत लुटलेली रक्कम सामान्यतः अत्यंत सुनियोजित मार्गाने फिरवली जाते. पीडित व्यक्तीकडून गेलेली रक्कम सर्वप्रथम ज्या खात्यात जमा होते, त्याला म्युल बँक खाते म्हटले जाते. या खात्याचा वापर गुन्ह्याची रक्कम गोळा करण्यासाठी आणि ती पुढे अन्यत्र वळवण्यासाठी केला जातो. हे म्युल खाते कधी कमिशन, कर्ज किंवा नोकरीचे आमिष दाखवून गरीब आणि भोळ्या लोकांच्या नावावर मिळवले जाते, तर कधी बोगस कागदपत्रे आणि बनावट कंपन्यांच्या नावावर उघडले जाते.

फसवणुकीची रक्कम वेगाने अनेक खात्यांमध्ये फिरवून तिची मूळ ओळख पूर्णपणे धुसर केली जाती. त्यानंतर पीयर–टू–पीयर सौद्यांमधून किंवा थेट व्यवहारांमधून दलालांच्या माध्यमातून त्याचे रूपांतर यूएसडीटीसारख्या स्टेबलकॉइन्समध्ये केले जाते. येथूनच खरी क्रिप्टो–हवाल्याची साखळी सुरू होते.

फसवणुकीची रक्कम प्रथम स्थानिक खात्यात येते आणि स्थानिक एजंट त्याद्वारे परदेशात असलेल्या त्यांच्या डिजिटल वॉलेटमध्ये यूएसडीटी पाठवतो. मोबदल्यात तिथला हवाला व्यावसायिक स्कॅम केंद्राला डॉलर किंवा स्थानिक चलनात रोख रक्कम देतो. या प्रक्रियेमुळे क्रिप्टोमधील पैसे अत्यंत वेगाने जगाच्या पाठीवर कुठेही पोहोचवले जाऊ शकतात, तर हवाला यंत्रणा स्थानिक चलनात रोख पैसे उपलब्ध करून देते. तथापि, क्रिप्टोकरन्सीमधील प्रत्येक व्यवहार हा पूर्णपणे अदृश्य किंवा बेकायदेशीर नसतो. सार्वजनिक ब्लॉकचेनवर प्रत्येक व्यवहाराची नोंद अत्यंत सुरक्षित असते, ज्याच्या मदतीने तपास यंत्रणा संशयित वॉलेटसब आणि रकमेचा प्रवास अचूक शोधून काढू शकतात.

परंतु, गुन्हेगार अनेक वॉलेटसब, बोगस ओळख, परदेशी क्रिप्टो प्लॅटफॉर्म्स आणि रोख व्यवहारांचा एकाच वेळी एकत्रित वापर करतात तेव्हा गुंतागुंत निर्माण होते. परदेशातील क्रिप्टो एटीएम हे गुन्हेगारांना पैसे पाठवण्याचा आणखी एक सोपा मार्ग उपलब्ध करून देतात. या मशिन्समध्ये रोख रक्कम जमा करून बिटकॉइन किंवा इतर क्रिप्टोकरन्सी खरेदी केली जाऊ शकते.

ठकसेन पीडितांना एक यूआरएल कोड पाठवतात आणि त्यांना क्रिप्टो एटीएममध्ये रोख रक्कम जमा करण्यास सांगतात. रोख रक्कम जमा होताच ती क्रिप्टो थेट ठकसेनांच्या डिजिटल वॉलेटमध्ये जमा होते. यामध्ये थेट बँक खात्याचा वापर होत नसल्यामुळे अंतिम लाभार्थ्याची ओळख पटवणे आणि रक्कम परत मिळवणे अत्यंत कठीण होऊन जाते.

तपासापासून वाचण्यासाठी गुन्हेगार ही रक्कम लहान–लहान भागांमध्ये वाटून टाकतात. यासाठी वेगवेगळ्या लोकांचा, क्रिप्टो एटीएमचा आणि डिजिटल वॉलेटचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जातो. यामुळे रक्कम पाठवणारे आणि अंतिम गुन्हेगार यांच्यामध्ये अनेक थरांची ढाल तयार होते.

तरीही, क्रिप्टो एटीएमद्वारे केलेल्या व्यवहारातून मशिनचे कॅमेरे, स्थान, मोबाइल नंबर, यूआरएल कोड आणि ब्लॉकचेनवर नोंद झालेल्या व्यवहारावरून महत्त्वाचे धागेदोरे तपास यंत्रणांच्या हाती लागू शकतात. ज्या देशांमध्ये ग्राहकांची ओळख पटवण्याचे नियम आणि संशयित व्यवहारांची माहिती देण्याचे कायदे सौम्य आहेत, तिथे हा धोका अधिक प्रमाणात वाढतो.

भारतात म्युल खात्यांच्या समस्येला आळा घालण्यासाठी भारतीय सायबर अपराध समन्वय केंद्राने सात संयुक्त सायबर समन्वय टीमची निर्मिती केली आहे.

यामध्ये हरियाणा, राजस्थान, झारखंड, गुजरात, तेलंगणा, चंदीगड आणि आसपासच्या राज्यांसोबतच आंध्र प्रदेश, आसाम आणि इतर ईशान्येकडील राज्यांमध्ये या सायबर जाळ्याचे सक्रिय नेटवर्क असल्याचे तपासात उघड झाले आहे.


म्युल खाती उघडण्यापूर्वीच त्यांची योग्य ती ओळख पटवणे आणि त्यांना वेळीच थांबवणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी बँकांनी ग्राहकांच्या पत्त्याची, घोषित व्यवसायाची आणि बँक खात्याच्या वापराची अत्यंत कसून आणि सावधगिरीने तपासणी करणे गरजेचे आहे.

# 'घाव बसलं घावावर सोसायला... झुंझायाला...'

**ऋतुजा केळकर**

सध्या छायेच्या सावलीत नेहमी सारखीच संगीताच्या दुनियेत हरवलेली मी सांजवात करायला स्वामींच्या पादुकांसमोर उभी राहिले आणि रवींद्र दादांची आठवण आली. 'श्रीरामाचे निस्सीम भक्त असलेले 'डॉक्टर रवींद्र मराठे'... विरारच्या शाखेतील त्यांची माझी पहिली आणि शेवटची भेट. आज श्रीरामचा जप करून त्यांच्याकडे येर्णा?या प्रत्येक रुग्णाला ते औषध देतात म्हणूनच कदाचित ते धन्वंतरी आहेत असं मला वाटते. त्या दिवशी दादाने मला श्रीरामशिधा दिला ज्यामुळे मला कधीही काहीही कमी पडले नाही. मग मनात विचार आला लक्ष्मी म्हणजे तरी काय?

मग संध्याकाळच्या मंद वर्ा?यात पादुकांसमोर उभं राहिल्यावर मनात एक गहिरा विचार उमटला. रवींद्र दादांनी दिलेला श्रीरामशिधा हा केवळ अन्नाचा शिधा नव्हता, तर तो आशीर्वादाचा खजिना होता. त्या क्षणी जाणवलं लक्ष्मी म्हणजे फक्त पैसा नाही, तर जीवनातली पूर्णता आहे. आज लक्ष्मीची अनेक रूपे आजूबाजूला वावरत असतात पण आपल्याला त्याची बरेचदा जाणीवच नसते. अगदी लक्ष्मीची दैवी रूपे याबद्दल विचार करायचा झाला तर समग्र जीवनाच्या वीणेच्या स्वरात पावलोपावली ती आहेत कारण लक्ष्मी ही केवळ सोनं वा वैभवापुरती मर्यादित नाही. ती प्रत्येक घरातल्या छोट्या छोट्या सुखसोयींमध्ये, प्रेमळ नात्यांमध्ये आणि गुरुकृपेच्या सावलीत प्रकट होते. जिथे अन्नाच्या सुगंधाने घर भरून जातं, तिथे धान्यलक्ष्मी आपली कृपा दाखवते. ती फक्त भाकरीपुरती मर्यादित नसून, घरातील गृहलक्ष्मीच्या हातच्या जेवणातली माया, शेतर्क?याच्या घामातलं सोनं आणि भक्ताच्या थाळीतला प्रसाद हे सगळं तिचं रूप आहे. धान्यलक्ष्मी ही उपासमारीवर मात करणारी कृपा आहेच पण, अन्न म्हणजे केवळ शरीराचं पोषण नव्हे तर, जीवन टिकवण्याचं सामर्थ्य आहे आणि म्हणूनच धान्यलक्ष्मी ही खरी जीवनाधार आहे. धान्यलक्ष्मी आजच्या काळात म्हणजे



अन्नसुरक्षा. शेतकऱ्याच्या घामातून उगवलेलं धान्य, अन्नधान्या च्या पुरवठ्याची साखळी आणि प्रत्येकाच्या थाळीत पोहोचणारं अन्न हे तिचं आधुनिक रूप आहे. उपासमारीवर मात करणारे अन्नछत्र, अन्नदानाच्या योजना आणि शाश्वत शेती ही धान्यलक्ष्मीची आजची अभिव्यक्ती आहे.

कसं आहे ना की, जिथे औषधाच्या कडवट चवीतही जीवनाचं गोड आश्वासन दडलेलं असतं, तिथे आरोग्यलक्ष्मी प्रकट होते. खरंतर आरोग्यलक्ष्मी ही शरीराचं बळच नव्हे, तर मनःशांती आणि जीवनाचा आनंद आहे. तिथे ती फक्त गोळ्या वा औषधांच्या बाटल्यांत नसते, तर डॉक्टरांच्या हर्स?या चेर्ह?यात, सेवाभावी परिचारिकेच्या स्पर्शात आणि रुग्णाच्या मनात निर्माण होर्णा?या आशावादात तिचं वास्तव्य असतं. आरोग्यलक्ष्मी म्हणजे आधुनिक आरोग्यसेवा. हॉस्पिटल्स, औषधं, डॉक्टरांचा सेवाभाव आणि मानसिक आरोग्याची काळजी ही तिची आजची रूपं आहेत. कोविड सारख्या संकटात जेव्हा आरोग्यसेवा जीवन वाचवते, तेव्हा तीच आरोग्यलक्ष्मी प्रकट झालेली जाणवते.

जिथे ज्ञान आहे, तिथे विद्यालक्ष्मी आहे. पुस्तकांच्या पानांत, गुरूंच्या शिकवणीत आणि विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत चमकणाऱ्या उद्याच्या पूर्ण होऊ घातलेल्या स्वप्नांमध्ये तिचं दर्शन होतं. ज्ञानाशिवाय कोणतीही समृद्धी टिकत नाही, म्हणूनच विद्यालक्ष्मी ही जीवनाची खरी दिशा दाखवते. म्हणूनच विद्यालक्ष्मी ही ज्ञानाचं तेज आहे. पुस्तकांच्या पानांत, गुरूंच्या शिकवणीत, आणि विद्यार्थ्यांच्या डोळ्यांत चमकर्णा?या उत्सुकतेत तिचं दर्शन होतं. ज्ञानाशिवाय कोणतीही समृद्धी टिकत नाही, म्हणूनच विद्यालक्ष्मी ही जीवनाची खरी दिशा दाखवते. ती अंधारात दीपज्योतीसारखी आहे, जी मार्गदर्शन करते आणि संस्कारांची बीजं पेरते. विद्यालक्ष्मी आजच्या युगात म्हणजे शिक्षणाचा प्रकाश. शाळा, महाविद्यालयं, डिजिटल शिक्षण आणि ज्ञानसंपन्न समाज ही तिची रूपं आहेत. इंटरनेटवर उपलब्ध असलेलं ज्ञान, संशोधन आणि नवकल्पना ही विद्यालक्ष्मीची आधुनिक अभिव्यक्ती आहे.तसेच जिथे भक्ती आहे किंवा पाहिलेली स्वप्ने पूर्ण करण्याची जिद्द आहे तिथे आदिलक्ष्मी आहे. म्हणूनच आदिलक्ष्मी ही धर्माचं तेज आहे. भक्तीच्या मार्गावर चालताना, सत्याचं पालन करताना आणि गुरुकृपेच्या सावलीत राहिल्यावर तिचं दर्शन होतं. ती जीवनाला आध्यात्मिक आधार देते आणि मनाला स्थैर्य देते. आदिलक्ष्मी म्हणजे जीवनाला दिशा देणारी शक्ती, जी भक्ताला धर्माच्या मार्गावर स्थिर ठेवते. ती स्वप्ने पूर्ण करताना येणारे अडथळे पार करण्याची जिद्द आणि धैर्य आहे, तिथे वीरलक्ष्मी आहे. संकटांचा सामना करताना, अन्यायाविरुद्ध उभं राहताना आणि सत्यासाठी झुंझताना तिचं सामर्थ्य जाणवतं आणि सरतेशेवटी जेव्हा विजय मिळतो तेव्हा तीच विजयलक्ष्मी बनते, वीरलक्ष्मी आणि विजयलक्ष्मी आजच्या काळात म्हणजे संघर्ष आणि यश. अन्यायाविरुद्ध आवाज उठवणारे लोक, समाजासाठी झुंझणारे कार्यकर्ते आणि प्रयत्नांनी मिळवलेलं यश ही तिची रूपं आहेत. खेळाडूंचा विजय, संशोधकांची शोधयात्रा आणि सामान्य माणसाचा संघर्ष हीच तिची आधुनिक छटा आहे.

याच प्रयत्नांना यशाचं फळ देणारी शिवाय जिथे धर्माचे पालनकर्ते आहेत, तिथे आदिलक्ष्मी आहे. आदिलक्ष्मी म्हणजे आजच्या युगात धर्माचं तेज पण, धर्म म्हणजे केवळ धार्मिक विधी नव्हेत, तर सत्याचं पालन, नैतिकता आणि जीवनाला अध्यात्मिक आधार देणे म्हणजे धर्म असतो. समाजात प्रामाणिकपणा, न्याय, आणि गुरुकृपेवर विश्वास ठेवणं ही आदिलक्ष्मीची आजची रूपं आहेत.